म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १८९८



# गद्य प्रासाद

REFBK-0013783

संपादक
प्रा. म. ना. अदवंत
प्रा. भीमराव कुलकर्णी

१९५२३ संदर्भ
१६।३।७०

## मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

26 MAR 1975

[क्रु. मा. प.]

# गद्यप्रासाद

संपादक :

प्रा. म. ना. अदवंत

प्रा. भीमराव कुलकर्णी

विदर्भ मराठवाडा बुक कंपनी

पुणे २.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम 64522 दि: 1-9-95
क्रमांक 9196 नोंद दि: 28-3-60
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
दा. क्र. 93483
संदर्भ शाखा (स्थलप्रत)
REFBK-0013783

प्रथमावृत्ती : १९६४

◎

मुखपृष्ठ : चित्रकार पाथरकर

◎

सर्व हक्क सुरक्षित

◎

प्रकाशक :
अ. ज. प्रभु
विदर्भ मराठवाडा बुक कंपनी
१३२० शुक्रवार, पुणे २.

◎

मुद्रक :
ह. म. गद्रे
जनवाणी प्रिंटिंग प्रेस
४५ बुधवार, पुणे २.

किंमत
साडेतीन रुपये

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम 69423 दि: 1/7/95
क्रमांक 96468 नों: दि: 26/12/60

# अनुक्रमणिका

प्रस्तावना ५

विष्णुशास्त्री चिपळूणकर

१. आपल्या देशाविषयी एकंदर जगाचे मत १७
२. वाचन २८

गो. ग. आगरकर

१. बोलके सुधारक, वागते सुधारक व सुधारणानिंदक ३५
२. आणखी एक शहाण्याचा कांदा ४०

अ. ब. कोल्हटकर

१. हे तात्या आणि हे तात्या ४७
२. संगीत राक्षसी महत्त्वाकांक्षा ५५

विनोबा भावे

१. कृष्णभक्तीचा रोग ६५
२. मते आणि मतप्रचार ७०

श्री. ना. बनहट्टी

१. युगप्रवर्तक डॉ. केतकर ७५
२. वैचारिक नेतृत्वाची अभावलापिका ८६

पु. ग. सहस्रबुद्धे

१. समाजकारणाची बचावती ढाल ९५
२. काव्याच्या पायावर शास्त्र १०५

वि. द. घाटे

१. भाषांचे ओझे ११५
२. हर्लिंगहॅमचा वीरपुरुष १२८

दुर्गा भागवत

१. कोंडलेले क्षितिज १३६
२. चिर-दाह १४६

अनंत काणेकर

१. जगाशी संबंध १५३
२. गणूकाका १५६

०००

## प्र स्ता व ना —

कुठल्याहि देशातील भाषेचे वैभव त्या भाषेत जन्माला आलेल्या प्रतिभावंतांवर अवलंबून असते यात काही शंका नाही. प्राचीन मराठी वाङ्मयभांडार संतकवी, पंडितकवी आणि महानुभावीय निष्ठावंत साहित्यिक यांच्या लेखनावर अतिशय संपन्न झालेले आहे. मध्यंतरीच्या अस्मानी–सुलतानी आक्रमणामुळे मराठी भाषेवर फारशी भाषेचे सावट पसरलेले होते, ते दूर करण्यामध्ये संतांची अभंग-वाणी, व अध्यात्मिक ग्रंथरचना जितकी महत्त्वाची तितकीच युगकर्त्या शिवरायांनी 'राज्यव्यवहार कोशा'च्या साहाय्याने तिच्यावरचे अक्रमण दूर करण्यासाठी दाखविलेली दूरदृष्टीही महत्त्वाची होय.

शिवरायांच्या पुण्याईमुळे अनेक संकटे येऊनही ज्याप्रमाणे 'स्वराज्य' स्थिर झाले, किंबहुना स्वराज्यामध्ये अधिक व्यापक भूमिकेवरून 'सीमोल्लंघन' होऊ लागले, त्याचप्रमाणे मराठी भाषाही संस्कृतभाषेच्या आश्रयाने प्रौढ झाली व फारशीलाही तिने आपल्यातच सामावून घेऊन आपली लवचिकता सिद्ध केली. ऐतिहासिक पत्रे, बखरी यांमधून अशा या प्रौढ व लवचिक गद्याचे मोठे आकर्षक रूप दृष्टीस पडते.

परंतु या गद्याला इंग्रजी अमदानीत एक असाधारण महत्त्व प्राप्त झाले. मुद्रणकला आणि वृत्तपत्रे यांमुळे या गद्याच्या सामर्थ्याचा आपल्याला एक नवा साक्षात्कार झाला. या साक्षात्काराचे स्वरूप दुहेरी होते. त्यातील पहिली महत्त्वाची गोष्ट म्हणजे इंग्रजी राज्याच्या सुव्यवस्थेमुळे व इंग्रजांच्या अतिशय चौकस उद्योगी हालचालीमुळे आपल्या लोकांना फार मोठ्या प्रमाणात आपोआपच प्रत्येक गोष्टीचा विचार करण्याची वेळ येऊन ठेपली. इंग्रजी शाळांतून शिक्षण घेत असता, त्यानिमित्ताने झालेले इंग्रजी भाषेचे व वाङ्मयाचे ज्ञान, महा-

विद्यालयीन अभ्यासक्रमांतून इतिहास, वाङ्मय, धर्म, समाज यांकडे पाहण्याची इंग्रजांची अतिशय डोळस व व्यवहारी दृष्टी यामुळे आपला धर्म, आपला समाज, त्यातील आचार-विचार व रूढी, आपली भाषा व आपले वाङ्मय यांच्याबद्दल विचार करणाऱ्या उद्योगी तरुणांची एक पिढी आपोआपच तयार झाली. या तरुणांना या निमित्ताने सुचलेले विचार मांडण्याची जशी जरूरी भासली, त्याचप्रमाणे आपले विचार मुद्रणयंत्राद्वारे जास्तीतजास्त लोकांपर्यंत पोचल्यामुळे त्यांच्यातील सुप्त अशा 'मी'पणाचेही आपोआपच पोषण होत गेले.

सुरुवातीला निर्माण झालेल्या गद्यलेखनात आपल्या हीन-दीन परिस्थितीची मीमांसा करून लोकांना ज्ञानदान करण्याचा पगडा साहजिकच विलक्षण असल्याने मीपणापेक्षा सुरुवातीचे गद्य अगदी सामान्य अशा विचाराच्या, तर्कांच्या, उपदेशाच्या पातळीवर रेंगाळताना दिसते. त्यामुळे शैली, रचना, आशय या सर्व दृष्टींनी तिची ऐट उसनी व दुबळी वाटते; कारण तिची प्रेरणाच मुळी तशी विशेष महत्त्वाची नव्हती. भाऊ महाजन, लोकहितवादींसारख्या एखाद-दुसऱ्या पुरुषाच्या लेखनात काहीशी दूरदृष्टी, समाजसुधारणेची बरीच तळमळ दिसून येते. त्याचप्रमाणे त्यानंतर बाबा पद्मनजीसारख्यांच्या लेखनात आपल्या धर्मासंबंधाने एकांगी परंतु सखोल चिंतन दिसते-दादोबा पांडुरंग, न्या. रानडे, भांडारकर यांच्या लेखनात भाषेपेक्षा विचारांचेच प्रौढत्व आढळते.

न्या. रानडे, भांडारकर, तेलंगांसारख्या अत्यंत समतोल व सूक्ष्म विचारसरणीच्या महाराष्ट्रीय सुपुत्रांना आपले विचार प्रामुख्याने इंग्रजीत मांडण्याचा मोह झाला, त्यामुळे मराठी गद्याच्या विकासाच्या दृष्टीने आपल्या भाषेचे खूपच नुकसान झाले व त्यांच्या विचाराशी समबल विचार तोलणारे गद्यकार निर्माण होण्यासाठी टिळक, आगरकर, राजवाडे, केतकर, जावडेकर यांच्यापर्यंत आपल्याला वाट पाहावी लागली. गद्य-वाङ्मयाच्या विकासाच्या दृष्टीने हे क्रमप्राप्तच होते. कारण गद्याचे सामर्थ्य समृद्ध अशा विचारशील व्यक्तींच्या लेखनापेक्षा नैमित्तिक अशा विषयांवरील ओजोगुणाने व उद्दीपकतेने युक्त असलेल्या भावनाशील व्यक्तींच्या लेखनाने जलदगतीने वाढीला लागते.

विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या रूपाने या ओजोगुणाने व तेजाने युक्त असलेली शैली मराठी गद्याला लाभली. प्रखर स्वातंत्र्यभक्ती व परकियांबद्दलची पराकाष्ठेची

प्रक्षोभवृत्ती हे चिपळूणकरांच्या लेखनाचे महत्त्वाचे विशेष. ‘ शास्त्री ’ घराण्यात झालेला जन्म, पुण्यासारख्या ठिकाणी वास्तव्य आणि इतिहासाची आवड यांमुळे चिपळूणकरांच्या मनावर जे संस्कार झाले होते, त्या सर्वांचे अतिशय परिणामकारक दर्शन त्यांच्या निबंधांतून दिसते. परंतु चिपळूणकरांचे व्यक्तिमत्व ज्याप्रमाणे वरील वैशिष्टयांनी युक्त होते; त्याचप्रमाणे राष्ट्रसुधारणेसाठी स्वार्थत्याग, सततोद्योग, नवनवीन क्षेत्रे पादाक्रांत करण्याची इर्षाही त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. ‘ मी मराठी भाषेचा शिवाजी आहे ’ असा प्रखर आत्मविश्वास धारण करूनच ते लिहावयास बसले होते. आपल्याला जे काही करावयाचे आहे, त्याचे स्पष्ट चित्र त्यांच्या डोळयांसमोर होते आणि ते चित्र साकार होत असलेले पाहण्याची महत्त्वाकांक्षाही होती.

विष्णुशास्त्र्यांची हीच महत्त्वाकांक्षा टिळक–आगरकरांच्यारूपाने पूर्णतेला गेलेली दिसते. वास्तविक टिळकांची वृत्ती ही तेलंग–रानड्यांच्या कोटीतली, परंतु राजकीय स्वातंत्र्याचे वाण घेऊन ती वृत्तपत्राच्या क्षेत्रात उतरली म्हणून मराठीला तिच्या तर्कशुद्ध नीर्भीड, व काटेकोर दृष्टीची जोड लाभली. भावनेपेक्षा विचाराचे प्राबल्य टिळकांच्या लेखनात इतके आहे की, त्यामुळेच त्यांच्या शैलीचे अनुकरणच होऊ शकले नाही. वास्तविक ‘ स्वातंत्र्यभक्ती व प्रक्षोभवृत्ती ’ हाच टिळकांच्या उद्योगाचा महत्त्वाचा विशेष, परंतु भावनात्मकतेपासून ती अलिप्त राहिली. त्यामुळे चिपळूणकर–आगरकरांचे उदंड अनुकरण झाले, आणि टिळकांची रोखठोक, प्रमाणबद्ध, वकिली बाण्याची लेखनशैली अननुकरणीय राहिली.

निर्भयता, स्वातंत्र्यप्रियता आणि ज्ञानोपासना यांची चिपळूणकरांनी निबंध-रूपाने दिलेली दीक्षाच मराठी गद्यात प्रेरक व पोषक ठरली. सामाजिक व राजकीय सुधारणांच्या चळवळीच्या पुरस्कर्त्यांनी चिपळूणकरांपासून स्फूर्ती घेऊन आपले विचार गद्यरूपाने मांडल्यामुळे मराठी गद्याचा विकास होत गेला. कालमानाप्रमाणे या विकासाच्या पाठीमागे स्वातंत्र्याची प्रेरणाच अतिशय प्रभावी होती. या प्रेरणेपोटी शिवराम महादेव परांजपे, कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर, अच्युत बळवंत कोल्हटकर व नरसिंह चिंतामण केळकर यांनी वृत्तपत्र सृष्टीत आपल्या लेखणीने फार मोठे नवचैतन्य आणले. शिवरामपंतांची वक्रोक्तीपूर्ण व काव्यमय भरारी, अच्युत बळवंतांची वैचित्र्यप्रिय कल्पकता, खाडिलकरांची भव्य उत्कट

अशा आदर्शांनी भारावलेली देशभक्तीपूर्ण चेतावणी व नरसोपंतांचे नर्मसाचिव्य व मृदुत्वाने युक्त असलेले कसबी लेखन यांमुळे मराठी भाषा शैलीच्या दृष्टीने समृद्ध होत गेली, तर राजवाडे, वासुदेवशास्त्री खरे यांचे ऐतिहासिक संशोधन, सावरकर, केतकर, विठ्ठल रामजी शिंदे, जावडेकर यांचे समाजशास्त्रीय व राजकीय विषयांवरचे लेखन, चिंतामणराव वैद्य, सारस्वतकार भावे, राजवाडे इत्यादिकांचे संशोधनात्मक व चिकित्सायुक्त लेखन यांमुळे मराठी भाषेच्या विचारधारणेला सखोलता प्राप्त झाली.

श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, वामन मल्हार जोशी, श्रीपाद महादेव माटे, गजानन त्र्यंबक माडखोलकर, काका कालेलकर, द. के. केळकर, पु. ग. सहस्रबुद्धे श्रीनिवास नारायण बनहट्टी इत्यादि काही नावे विद्वत्ता, व्यासंग व नावीन्यपूर्ण विचार या बाबतीत निबंधवाङ्मयात प्रामुख्याने दिसून येतात.

ही सखोलता अनेकविध अंगांनी समृद्ध होण्यासाठी एकापेक्षा एक श्रेष्ठ प्रतिभेचे व व्यक्तिमत्वाचे लेखक जसे मराठीमध्ये जन्माला आले, तसेच मराठी भाषा आणि वाङ्मय यांच्या विकासाला अनुकूल वातावरणही आपोआपच तयार होत गेले. विद्यापीठीय शिक्षणात 'मराठी 'ला स्थान मिळाले. वाचक वर्गाची वाढ झाली आणि स्वातंत्र्यप्राप्ती आणि ज्ञानप्रबोधन यांपेक्षा अधिक व्यापक भूमिकेवरून तिची साधना होऊ लागली. दुर्दैवाने वैचारिक वाङ्मयाच्या प्रत्येक दालनात पारतंत्र्याच्या काळात सह्याद्रीशी स्पर्धा करणारी व्यक्तित्वसंपन्न जितकी माणसे मराठीला लाभली, तितकीच मोठी पोकळी १९४० नंतरच्या काळात वैचारिक वाङ्मयाच्या क्षेत्रात निर्माण झाली आणि त्याचा मोठा परिणाम मराठी गद्यावर झाल्याखेरीज राहिला नाही. परंतु हा परिणाम ऐतिहासिक, भाषाशास्त्रीय व समाजशास्त्रीय या क्षेत्रांतील स्वतंत्र संशोधनात्मक वाङ्मयाबद्दलच विशेष असा जाणवला. उलट विज्ञाननिष्ठा, साहित्यशास्त्रीय विचार इत्यादि दृष्टीने मराठी गद्य वाङ्मय दिवसेदिवस सूक्ष्मतर होत गेल्याची लक्षणे दिसू लागली आहेत. आणि कादंबरी व कथा यांच्या बाबतीत तर मराठी गद्याने फारच वेगाने दौड केलेली आहे.

मराठीतल्या विचारप्रधान, वस्तुनिष्ठ गद्यलेखनाला १९२६ च्या सुमारास व्यक्तिनिष्ठ व नावीन्यपूर्ण अशा 'ललित निबंधां 'ची जोड मिळाली; आणि

फडके, खांडेकर, काणेकर इत्यादिकांनी अल्पावधीत लघुनिबंधरूपाने हा वाङ्मय-प्रकार मराठीमध्ये रुजविल्यानंतर विचारप्रधान, पांडित्यपूर्ण, विषयनिष्ठ 'निबंध' व स्वैर, आत्मप्रकटीकरणात्मक, खेळकर दृष्टिकोनातून सजविलेला 'लघुनिबंध' अशा रीतीचे निबंध वाङ्मयाचे दोन महत्त्वाचे भेद करण्यात येऊन निबंधाची वैशिष्ट्ये व मराठी निबंधाचा जन्म यासंबंधाने काही एक महत्त्वाचे विवेचन आपल्याकडे करण्यात आले आहे.

आपल्याकडे 'निबंध' हा गद्यवाङ्मयाचा प्रकार इंग्रजीतील 'Essay' वरून आला, यात शंका घेण्याचे मुळीच कारण नाही. सूर्यप्रकाशाइतकी ही गोष्ट स्पष्ट आहे. परंतु 'Essay' ह्या इंग्रजीतील वाङ्मयप्रकाराची व्याख्या आपल्याकडे 'निबंधा'पेक्षा 'लघुनिबंधा'लाच जास्त लागू पडते. हे डॉ. मा. गो. देशमुखांच्या लक्षात आले व 'निबंध परिमल' या संग्रहाला प्रस्तावना लिहिताना त्यांनी मराठी निबंधकारांचा पिंड हा ललित निबंधापेक्षा रचनाबद्ध, वस्तुनिष्ठ व कसलेल्या शैलीने आपले विचार व्यक्त करणाऱ्या निबंधकारांचा असून तो 'निबंध' या शब्दाच्या धात्वर्थाशी (निबध्यते अस्मिन् इति; नि + बन्ध + ल्युट्, अधिकरणे निबन्धम्) सुसंगत आहे अशी भूमिका मांडली व त्यामुळे आजच्या मराठी निबंधाचे मूळ आपणांस बहुतांशी संस्कृतातील निबंधात आणि संस्कृत दर्शनातील 'अधिकरणा'त सापडते...वासवदत्ताने आपल्या गद्यकथेच्या शेवटी निबंध हा शब्द वापरला आहे. बाणाच्या 'कादंबरी'वरून नवलकथा 'कादंबरी' झाली व सुबंधूच्या शब्दामुळे 'जीत विषय गोविला जातो अशा रचनेस 'निबंध' म्हणण्यात येऊ लागले, अशा अर्थाचे विवेचन केले आहे. वि. स. खांडेकरांना इंग्रजी अंमलामुळे 'निबंध' हा वाङ्मयप्रकार आला, हे मान्य असले तरी—समाजाला निद्रेतून जागे करणे, जीवनातल्या मूल्यांचा निर्भय आणि प्रामाणिक दृष्टीने विचार करायला त्याला शिकविणे, जे असत् आणि अमंगळ आहे त्याच्यावर तर्कशुद्ध प्रहार करणे, जे सत् आणि मंगल आहे त्याचा सावेश पुरस्कार करणे—हे निबंधलेखनाचे मुख्य कार्य आहे आणि त्या दृष्टीने प्राचीन मराठीतल्या संत व पंडित कवींना निबंधलेखनाची उपनिर्दिष्ट 'वृत्ती' परिचित असल्याची त्यांनी ग्वाही दिली आहे.

डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांनी, 'निबंधरचना आणि राष्ट्ररचना' या निबंधात यासंबंधी निराळा विचार मांडला आहे. समाजाच्या जीवनाशी, राष्ट्राच्या

उत्कर्षापकर्षांशी निबंधवाङ्मयाचा अत्यंत निकटचा संबंध आहे, असे त्यांना वाटते. परंतु आपल्या उत्कर्षापकर्षाची मीमांसा करणारे वाङ्मय संस्कृत, प्राकृत व प्राचीन मराठीत जवळजवळ नाहीच, ही त्यांची महत्त्वाची विचारसरणी आहे. व्यापार, उद्योग, लष्कर आणि विज्ञान ही समाजसंघटनेची महत्त्वाची वैशिष्ट्ये. त्यांचा विचार इंग्रजांमुळे आपल्याकडे आला आणि आपल्या अपकर्षाच्या कारणपरंपरेच्या विचारातून, परिस्थितीच्या चिंतनातून आणि भौतिक कारणमीमांसेतून निबंध निर्माण झाला—वाचकांच्या बुद्धीला आव्हान करणे आणि तिला वश करण्यासाठी इतिहास, अनुभव, अवलोकन यांचा आधार घेणे, आपल्या विषयाचे विवरण करणे, कार्यकारण संगती दाखविणे, आक्षेप उद्भावित करून त्यांचे खंडन करणे, आपल्या मताचे मंडन करणे, तुलनेने विवेचन करणे, इत्यादि विशेषांनी युक्त असलेल्या लेखनास ' निबंध ' म्हणावे असे डॉ. सहस्रबुद्धे यांनी विवेचिले आहे; आणि आपली लोकशाही यशस्वी होण्यासाठी अशा प्रकारच्या 'निबंधा'चीच आवश्यकता त्यांनी प्रतिपादिली आहे. लोकहितवादींच्या ' शतपत्रां 'तून आपल्या अपकर्षाची कारणमीमांसा आणि तत्कालीन परिस्थितीच्या चिंतनातून निर्माण झालेली विचारसरणी जरी असली, तरी रचनेच्या दृष्टीने वर उल्लेखिलेली वैशिष्ट्ये त्यांत आढळत नसल्यामुळे त्यांना ' निबंधकार ' म्हणता यावयाचे नाही, असा त्यांनी निष्कर्ष काढला आहे.

' निबंध ' या वाङ्मयप्रकाराबद्दल डॉ. देशमुख, वि. स. खांडेकर व डॉ. सहस्रबुद्धे या तिघांचे वरील तिन्ही दृष्टिकोन महत्त्वाचे आहेत. त्यांच्या दृष्टिकोनांतून दिसून येणारी मतभिन्नता ही मराठीतल्या कादंबरी, कथा, नाटक व चरित्र या वाङ्मयप्रकारेतर गद्यलेखनाला ' निबंध ' ही संज्ञा दिल्यामुळेच उद्भवली आहे. म्हणूनच ज्या ( " Essay " ) ह्या इंग्रजीतील वाङ्मयप्रकारावरून मराठीत निबंध अवतरला त्या ' एस 'चे पाश्चात्य वाङ्मयातील मूळ स्वरूप पाहाणे मोठे उद्बोधक ठरेल.

—मॉंटेन या फ्रेंच साहित्यिकाने सोळाव्या शतकाच्या अखेरीस आपल्या मनामध्ये येणाऱ्या कित्येक कल्पना व विचार यांना शब्दरूप देण्यासाठी ' निबंध ' लिहावयास सुरुवात केली. हे त्याचे निबंध ' एसे ' या इंग्रजी शब्दाच्या फ्रेंचमधील पर्यायाच्या अर्थाला साजेसे होते. ( फ्रेंचमध्ये, ' एसे ' म्हणजे, ' प्रयत्न

करणे') मॉंटेनने जगातील कित्येक माणसांचे व प्रसंगांचे आपल्याला आलेले नानाप्रकारचे अनुभव, विस्तृत वाचनामुळे सुचलेले स्फुट विचार व अनेकविध अनुभवांतून समृद्ध झालेले आपले बहुरंगी व बहुढंगी व्यक्तिमत्त्व यांचे चित्रण करण्याच्या प्रयत्नातूनच 'निबंधा'ला जन्म दिला. एखाद्या विषयावर थोडक्यामध्ये आपले विचार मांडण्याचा प्रयत्न करणे, हेच या निबंधांचे मूळ स्वरूप. बेकन या इंग्रज निबंधकाराने मॉंटेनच्या अनुकरणाने इंग्रजीमध्ये सतराव्या शतकात वरील पद्धतीनेच निबंध लिहिले आणि आठराव्या शतकात इंग्रजी वृत्तपत्रांनी लवकरच आपल्या वृत्तपत्रांतून हा वाङ्मयप्रकार अतिशय लोकप्रिय केला. एकोणिसाव्या शतकात जॉन्सन, मेकॉले यांनी या निबंधाला मोठे प्रौढ, पल्लेदार व दीर्घ स्वरूप दिले. लेखकाच्या लहरी व स्वछंद भाव-विचारांचे त्याला हव्या त्या प्रकारे आत्मनिष्ठ, संभाषणरूपाने आविष्कारण करणारे मॉंटेनच्या निबंधांचे स्वरूप पुढच्या कालखंडात अतिशय गंभीर, विचारप्रवर्तक, बांधीव व वस्तुनिष्ठ बनले. युरोपच्या पुनरुज्जीवनाच्या सर्वंकष आणि विश्वव्यापी चळवळीचा हा गंभीर, तत्त्वविवेचक निबंध हाच आत्मा होता. विज्ञानाच्या नव्या दर्शनाने त्याने सबंध युरोपचा व पर्यायाने साऱ्या जगाचा कायापालट घडवून आणला.

परंतु गंभीर प्रकृतीच्या निबंधांचे हे सामर्थ्य मान्य करूनसुद्धा निबंध किंवा Essay ही संज्ञा फक्त त्यांच्यापुरतीच मर्यादित ठेविली पाहिजे असे म्हणता यावयाचे नाही. उलट आज निबंधलेखनाने नानाविध रूपे धारण केली आहेत, आणि त्यांच्या अनेकविध रूपांतून ते निरनिराळे भासत असले तरी मूळच्या मॉंटेन, बेकनच्या निबंधांशी त्यांचे जवळचे नाते आहे हे विसरता येत नाही.

या निबंधाच्या नानाविध प्रकारांनी कधी इतिहासाचे, कधी तत्त्वज्ञानाचे, कधी वाङ्मयाचे, कधी धर्मांचे तर कधी नीतितत्त्वाचे अत्यंत विचारपूर्वक, व्यासंगपूर्वक तत्त्वविवेचन किंवा विश्लेषण केले आहे, तर कधी उपहास, उपरोध यांसारख्या तीक्ष्ण वाग्बाणांनी समाजातील दोषांचे अतिशय परिणामकारकरीत्या आविष्करण केले आहे. हा 'निबंध' कधी खट्याळ, विदूषकी, तर कधी विक्षिप्त वृत्तीचा बुरखा पांघरतो तर कधी निसर्गसौंदर्याचा, जीवनातील मंगलतेचा, उदात्ततेचा किंवा आदर्शांचा वेध घेतो. पारतंत्र्याच्या काळात परकीय आक्रमणाविरुद्ध चीड व संताप निर्माण करून कधी तो उद्दीपक स्वरूपात

वावरतो, तर कधी समाजाला जागे करण्यासाठी समाजनियमनासंबंधाने तळमळीने स्वार्थत्यागाची व नवविचारांची भाषा बोलू लागतो.

पृथ्वीतलावरील कोणतीही गोष्ट म्हणूनच निबंधाचा विषय होऊ शकते. परंतु जगातील श्रेष्ठ प्रकारच्या निबंधवाङ्मयाचे अवलोकन केले तर या निबंध-वाङ्मयामध्ये अगदी सुरुवातीलाच सांगितल्याप्रमाणे निबंधकाराच्या व्यक्तित्वानुरूप त्याला महत्त्व प्राप्त झालेले दिसून येते आणि म्हणूनच वस्तुनिष्ठ निबंधामध्ये लेखकाच्या व्यक्तिमत्वाचे मुळीच दर्शन होत नाही अथवा ललित निबंधामध्ये व्यवस्थित बांधणी नसते, असे मानण्याचे मुळीच कारण नाही. चिपळूणकर, आगरकर यांच्या विषयनिष्ठ निबंधांतून चिपळूणकर, आगरकरच कित्येक वेळा विषयांपेक्षा अधिक जाणवतात. कुठलाही विषय असो, त्याचे विवेचन करताना स्वातंत्र्यभक्तीच्या मूळ पदावर येणारी चिपळूणकरांची मूर्ती त्यांचे निबंध वाचताना सारखी डोळ्यांसमोर दिसू लागते आणि आपल्या कर्तव्यनिष्ठेची, निर्धाराची सतत जाणीव देऊन शक्य तितक्या लवकर सामाजिक सुधारणा घडवून आणाव्यात अशी, काहीशी भावविवश, आगरकरांची व्यक्तिरेखा त्यांच्या निबंधांतून सारखी जाणवत असते. या उलट बऱ्याच वेळेला ‘लघुनिबंधा’च्या नावाखाली लिहिल्या गेलेल्या कित्येक निबंधांतून लेखक ओढून चंद्रबळ आणीत असल्याची खात्री पटावयास कसलाही विलंब लागत नाही. लालित्य हा लघुनिबंधाचा प्राण असला तरी दर खेपेस तो सहजगत्या व्यक्त करणे अवघड असल्यामुळे त्यामध्ये हेतुपुरस्सर लालित्य आणण्याचा खटाटोप सुरू झाला की लघुनिबंधातील गंमत हरवून बसते आणि म्हणूनच या लघुनिबंधकारांविरुद्ध मागे एकदा प्रा. रा. श्री. जोगांनी फिर्याद पेश केली होती—लघुनिबंधकार आरंभ तर आपण जणू काही एखादी लघुकथाच वाचतो आहो असा भास निर्माण करतो आणि वाचक आहारी आल्यानंतर आपले खरे स्वरूप प्रगट करतो. नंतर वाचकांना अगदीच मठ्ठ व रूढिप्रिय ठरवून त्यांना उपदेश करू लागतो. सामान्य जनांस जे वाटते, त्यापेक्षा काहीतरी निराळे सांगण्याचा त्याचा हव्यास, नंतर त्याचा विलक्षण अहंगंड आणि वाचकाशी वेळी-अवेळी तो करीत असलेली फाजील सलगी यांमुळे वाचक लवकरच कंटाळतो. आणि खासगी म्हणून सांगितलेल्या कित्येक गोष्टी कल्पित असतात, हे उघडउघड जाणवू लागते—अशा

अर्थाच्या मोठ्या मार्मिक तक्रारी त्यांनी केल्या होत्या. 'लघुनिबंध' हा वाङ्मयप्रकार थंडावण्याचे मराठीतल्या लघुनिबंधांना प्राप्त झालेले वरील साचेबंद स्वरूप होय, असे म्हणावयास हरकत नाही.

मात्र फडके-खांडेकर-काणेकरांसारख्या समृद्ध व्यक्तिमत्वांतून निर्माण झालेल्या लघुनिबंधांतील कित्येक वैशिष्ट्ये मूळातूनच इतकी आकर्षक आहेत की त्यामुळे मराठी वाङ्मयाची वैभवस्थाने म्हणून त्यांचा गौरवपूर्ण उल्लेख जरूर करावयास हवा.

वर उल्लेखिलेल्या फडके-खांडेकर व काणेकर यांच्या निबंधांप्रमाणेच अतिशय संवेदनाशील व भावमंथर अशा दुर्गा भागवतांसारख्यांच्या निबंधांचेही एक स्वतंत्र अस्तित्व आहे, हे नाकारता येणार नाही.

मराठी गद्याने 'निबंध' या वाङ्मयप्रकाराच्या बहुविध दालनांतून गेल्या कित्येक वर्षांत मोठया झपाट्याने वाटचाल केली आहे आणि या सर्व दालनांचा साकल्याने विचार करून त्यांतील काही आकर्षक 'निबंधां'ची निवड या संग्रहात करण्यात आलेली आहे. निव्वळ विचारप्रधान गद्यलेखनातील उतारे देण्यापेक्षा त्यातल्यात्यात आकर्षक परंतु विचारप्रवर्तक उतारे निवडण्याकडे अधिक लक्ष दिले आहे. त्यामध्ये 'इतिहास', 'वाचन' यांसारख्या विषयांवर लिहितानासुद्धा आपली सारी वैशिष्ट्ये कटाक्षाने व परिश्रमपूर्वक ओतणारे चिपळूणकर दिसतील तर सुधारकांच्या बाबतीत आपले विचार पोटतिडीकीने मांडणारे व हिंदुधर्माबद्दल कडवी निष्ठा असणारे आगरकर आढळतील. आचार्य विनोबाजी भावे, प्रा. बनहट्टी, डॉ. सहस्रबुद्धे, विठ्ठलराव घाटे यांच्या निबंधांतून कित्येक महत्त्वाच्या विषयांवरचे मोठे परिणामकारक विवेचन आढळेल. रचना, भाषाशैली या दृष्टीने या सर्व निबंधांच्या अभ्यासाने विद्यार्थ्यांच्या भाषाज्ञानात चांगलीच भर पडेल.

निरनिराळ्या भूमिकेवरून केलेली 'व्यक्तिचित्रणे' या संग्रहामध्ये मुद्दाम निर्दिष्ट करण्यात आलेली आहेत. अच्युतरावांच्या कल्पक व चमत्कृतीपूर्ण लेखनशैलीतून दोन तात्यांमधला साम्यभेद पाहताना त्यांच्या व्यक्तिमत्वाची सहजगत्या ओळख पटून जाईल व मोठी गंमत वाटेल. बनहट्टींनी केलेले डॉ. केतकरांचे विश्लेषण केतकरांच्या प्रचंड कार्याची वाचकांना यथायोग्य

कल्पना देईल. घाटयांचा 'हर्लिंगहॅमचा वीरपुरुष' त्याच्या आगळ्या व्यक्तिवैशिष्टयांनी आणि घाटयांच्या तन्मय वृत्तीच्या चित्रणामुळे सदैव स्मरणात राहील, आणि काणेकरांच्या लघुनिबंधांतील 'गणूकाका' बद्दलचे वर्णन वाचून वाङ्मयांतील व्यक्तिचित्रणांची परिणामकारकता चित्तावर ठसेल. दुर्गाबाईंनी केलेले अश्वत्थाम्याचे व्यक्तिचित्रण तर त्यातल्या भेदक व सूक्ष्म चिकित्सेमुळे मराठीमध्ये आलेल्या सूक्ष्मतर विश्लेषणशक्तीची प्रचीती देणारे ठरेल, असे वाटते.

या अनेकविध प्रकारच्या 'निबंधां'मध्ये अच्युतरावांच्या 'राक्षसी महत्त्वाकांक्षे'ची निवडही काही हेतूनेच केली आहे. वास्तविक अच्युतरावांचा हा लेख वाङ्मयसमीक्षणात्मक आहे, परंतु त्यामध्ये विनोद, कल्पकता आणि वाङ्मय समीक्षकाला अवश्य अशी मर्मभेदी टीकादृष्टी यांचे इतके काही मजेशीर मिश्रण झाले आहे की, त्यामुळे 'राक्षसी महत्त्वाकांक्षा' हे नाटक न वाचलेल्या वाचकाला देखील हा लेख वाचावयास घेतल्यानंतर खाली ठेववत नाही. कल्पकतेच्या साहाय्याने तत्कालीन विषयांवर प्रसंगोपात्त लेखन करणाऱ्या अच्युतरावांसारख्यांनी समीक्षणात्मक लेखन मोठ्या प्रमाणात केले असते तर मराठी वाङ्मयाला ते अधिक उपकारी ठरले असते, अशा प्रकारचा विचार अच्युतरावांनी लिहिलेल्या दोन-चार वाङ्मयीन निबंधांवरून मनात तरळून जातो.

लालित्य आणि तर्कशुद्धता, विचारप्रेरकता आणि भावनाप्रधानता, वस्तुनिष्ठा व आत्मनिष्ठा, चिंतनशिलता आणि क्रीडाप्रवणता, आकर्षकता आणि गोष्टीवेल्हाळपणा, स्वातंत्र्यप्रेम आणि समाजोद्धार यांसारख्या अत्यंत व्यापक भूमिकेवरून मराठी गद्यप्रासादातील काही दालने या संग्रहातून उघडली आहेत. वाचकांना त्यांमधून विहार करण्यात मोठा आनंद वाटेल अशी आशा आहे.

अशा प्रकारच्या निबंध-संग्रहाची कल्पना प्रत्यक्षात येण्यासाठी श्री. प्रभूसारखे तडफेचे प्रकाशक आम्हांला लाभले व जनवाणी प्रेसचे व्यवस्थापक श्री. बोंद्रे यांनी तत्परतेने त्याच्या मुद्रणाची जबाबदारी स्वीकारली म्हणूनच अल्पावधीत हा संग्रह बाहेर पडू शकला.

तसेच निबंधांच्या हक्कदारांनी व निबंधकारांनी आपापले लेख या संग्रहात घेण्यासाठी उदार मनाने परवानगी दिली.

वरील सर्वांचे कृतज्ञतापूर्वक आम्ही आभार मानतो.

संपादक

# ग द्य प्रा सा द

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम ६९४२२ दि: [illegible]
क्रमांक [illegible] नों दि: २६/३/६०
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
९८८(३

विष्णुशास्त्री चिपळूणकर

# आपल्या देशाविषयी एकंदर जगाचें मत

अलीकडे पन्नास पाऊणशे वर्षांत या देशाची स्थिती मोठी चमत्कारिक होऊन गेली आहे. त्यास फारा दिवसांनी मोठ्या सुदैवाने जे स्वराज्याचे वारे लागले होते ते एकाएकी नाहीसे होऊन तो हल्ली एका टोकापासून तो दुसऱ्या टोकापर्यंत परराज्याच्या सत्तेखाली आला आहे. असे पूर्ण पराधीनत्व त्यास यापूर्वी कधीही आले असेलसे दिसत नाही. आणि याहूनही विशेष खेदास्पद काय की, हीतून मुक्त होऊन त्यास पुनः वर डोके उचलण्याचा बहुधा प्रसंगही इतःपर येईलसा वाटत नाही. सध्याच्या अत्यंत कष्टावस्थेत इंग्रजांच्या तरवारीच्या तिखट धारांशी दयार्द्रतेचा जो काही थोडाबहुत अंश मिश्रित असेल तेवढेच बहुतकरून आम्हांस त्राण उरले आहे! असो पण हीही दशा कदाचित सह्य होती. का की, 'नीचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण'[1] या न्यायानेच एकंदर जगाची रहाटी चालली आहे. जो मनुष्य, जे कुळ, किंवा जे राष्ट्र आज भाग्याच्या परम शिखरास चढलेले असते तेच उद्या एकाएकी डबघाईस येऊन परवा त्याचा मागमूसही मागे राहात नाही. पहा बरे, 'ग्रीक' या नुसत्य नावाबरोबर किती कल्पना एकदम मनात उभ्या राहतात! ज्या देशैकनिष्ठ वीर्यापुढे झर्सीज राजाचे असंख्यात सैन्य भुसासारखे उडून गेले, ते वीर्य;

१. 'चाकाच्या धावेप्रमाणे मनुष्याची स्थिती वरचेवर पालटत असते, म्हणजे एकदा खाली होते, पुनः वर होते.'

सारे जग अजूनही ज्यांच्या योगाने थक्क होते असे वाक्‌चातुर्य व बुद्धि; मोठमोठ्या राजांस ज्याचा धाक पडावा असे उत्साहोद्दीपक वक्तृत्व; प्रत्यक्ष पाषाणास बोलता चालता करण्याची अपूर्व करामत; इत्यादि कल्पना वरील नावाच्या केवळ उच्चाराबरोबर एकसमयावच्छेदेकरून मनात प्रवेश करतात ! व यांमुळेच हे नाव आजपर्यंत सर्वांच्या कानांस अमृतासारखे मधुर लागत आले आहे. फार तर काय, पण या चिमुकल्या देशाचा—की ज्याचा एकंदर विस्तार येथील एखाद्या जिल्ह्याइतका सुद्धा नसेल, त्याचा-इतिहास सर्व जगास एकाद्या महातीर्थाप्रमाणे, पावन व तारकच जणो काय झाला आहे. यानेच नुकते सगळ्या युरोपास दीर्घकालीक महानिद्रेतून एकदम जागविले, व त्याचा प्रचार व प्रसाद जेथे जेथे होत जाईल तेथे तेथे त्याच्या मागोमाग विद्या व कला या आल्याच असे समजावे. आजवर जे युरोपात व अमेरिकेत थोर थोर लोक होऊन गेले त्यांपैकी ज्याच्या बुद्धीने येथून पेट घेतला नाही असा कदाचित एकही मनुष्य सापडणार नाही. असो; पण याच ग्रीक लोकांची लवकरच काय दशा होऊन गेली ! ज्या मासिडोनियन लोकांस ते आपणांहून अत्यंत हीन समजून त्यांची अवगणना करीत तेच साऱ्या ग्रीस देशास शिरजोर झाले; त्यानंतर अक्षरशून्य जे रोमचे दांडगे शिपाई त्यांनी सहज तो सगळा देश सर केला आणि त्यांच्या मागून तर वाळवंटांतून भटकणारे जे आरब त्यांची एक टोळी इकडे येऊन त्यांनी मूर्ती फोडण्यास व सगळ्या देशाची धूळदाण करण्यास आरंभ केला. लक्ष्मीच्या चंचलतेचे व दैवाच्या अस्थिर-पणाचे आणखी उदाहरण हवे असल्यास रोमचेही आहे ! या शहराच्या इतिहासापेक्षा चमत्कारास्पद दुसरे काय आहे ! रॉम्युलसाने जी मर्यादा पहिल्याने नांगराने आखून दिली तीच वाढता वाढता कोठपर्यंत वाढली ! त्या वेळेस माहीत असलेले सारे जग तीत आले ! पण येवढे होऊनही शेवटी काय राहिले ? ज्या रोमन लोकांचा मागे पाय म्हणून कोठे कधीही आलाच नाही; ज्यांचे धैर्य असे अढळ की, केनीच्या मोठ्या लढाईत हानिबलाने त्यांचे बहुधा हातपायच मोडून टाकले असताही जे यत्किंचि-तही न डगमगता जो कोणी शत्रूस शरण जाण्याची मसलत काढील त्यास मारून टाकावे असा ज्यांनी नियम केला, ज्या वीरांचा अद्‌भुत पराक्रम

ऐकून ईजिप्त, हिंदुस्थान[1] अशा दूरदूरच्या देशांतूनही त्यांकडे वकील येत, त्यांसच शेवटी रानटी जे गॉल, व्यांडल; गॉथ, हन्स, आरब, तुर्क अशा लोकांपुढे थरथरा कापावे लागले! असो; तर याप्रमाणे हे कालचक्र सतत फिरत आहे! याच्या सपाट्यात कोणाचे काय होईल याचा काय नेम आहे? तेव्हा आमचे पूर्वज केवढेही थोर असले, व सध्या आम्ही कितीही नीच पदवीस आलो असलो, तरी त्यात चमत्कार कसचा? जी गती ग्रीक व रोमन लोकांसही चुकली नाही तीच हिंदूंसही प्राप्त झाली असल्यास नवल कसचे? याप्रमाणे सध्याच्या पक्षी मनाचे समाधान करून घेण्यास सवड झाली असती; आणि आमच्या पूर्वीच्या वैभवाकडे पाहून आमचा मान चोहोकडे अद्याप असता! पण हे तरी कोठे आहे? आमच्या देशाविषयी व आमच्या लोकांविषयी एकंदर जगाच्या कशा समजुती आहेत त्या येथे विशेष सांगायला पाहिजेत असे नाही. मोठमोठ्या नामांकित इंग्रेज ग्रंथकारांच्या ग्रंथांत हिंदुस्थानासंबंधी काही प्रकरण निघाले असता, पार्लमेंट सभेत, येशू ख्रिस्ताने वरदहस्त डोईवर ठेवून सर्वज्ञ केलेल्या मिशनरी लोकांच्या मोलवान भाषणांत, त्यांच्या प्रसादाने सर्वज्ञतेची झुळूक ज्यांच्यावरून गेली अशा येशूच्या कळपात जाऊन फसलेल्या बिचाऱ्या बाट्यांच्या दांभिक बोलण्यांत, किंवा ख्रिस्ताच्या शरीराचे व रक्ताचे भोजन पुरतेच अर्धेमुर्धे मेंढे बनून कळपात शिरलेल्या लबाड लांडग्याच्या कपट व्याख्यानांत, वगैरे जिकडे तिकडे एक घोष ऐकू येतो! त्याचा सारांश हा की, आम्हांसारखे मूर्ख, वेडगळ, भितरे, लबाड, दुराचारी असे आम्हीच! इंग्लंडात अगोदर हिंदुस्थानाचे नाव निघाले की, लोकांच्या कपाळास तिडीक उठते; पण त्यातूनही आमच्या देशास आपल्या वास्तव्याने भूषित करण्यास व आम्हांवर उपकार करण्याच्या बुद्धीने जे कोणी इकडे येतात, ते येताना मेकॉलेसाहेबांचे ‘ लॉर्ड क्लाइव ’, ‘ वॉरन

१. ही गोष्ट इतिहासप्रसिद्ध आहे. मुसलमानांच्या संबंधाने ‘ रूमशाम ’ हा शब्दही आमच्यात आला आहे. तुर्कस्थानच्या सुलतानास ते हा शब्द लावतात. तसेच एका हिंदू चालीच्या कृत्रिम भूगोलावर ‘ रोमकपत्तनम् ’ असे नाव पाहिलेले आम्हांस आठवते!

हेस्टिंग्ज ' हे निबंध रेल्वे स्टेशनावर विकत घेऊन वाचीत असतील! साहेबांची वृत्ती मूळची सौम्य व ज्ञानही अगाध असतेच; त्यातून हे सुंदर निबंध वाचल्यावर तर हिंदुस्थानावर पाऊल टेवताच त्यांच्या मनांत अशा वृत्ती उद्भवत असतील—' अहो! क्लाइव व हेस्टिंग्ज यांस इतके श्रम तरी पडले! मी असतो तर एका सपाट्यास साऱ्या हिंदूंस चीत करून दिले असते! मी एक शब्द बोलेन तर त्यांचे सगळे ग्रंथ त्यांस कस्पटाप्रमाणे वाटवीन!' आम्हांस खचित वाटते की मोठमोठ्या वरिष्ठ कामदारांपासून तो रेल्वेच्या यःकश्चित गार्डापर्यंत जो अरेरावीपणा सर्वांत दृष्टीस पडतो तो इंग्रेज लोकांच्या अंगच्या उद्दामपणामुळे व त्यांचे हिंदुस्थानावर प्रभुत्व झाले आहे यामुळेच केवळ आलेला नव्हे. हिंदू म्हणजे काय कस्पटापेक्षा कस्पट, अधमांहून अधम, मूर्खांपेक्षा मूर्ख असे जे वेडगळ समज साऱ्या लोकांचे झाले आहेत, व जे अधिकाधिक दृढ करण्याविषयी ज्याचा त्याचा यत्न चालू आहे, त्यांचे जर आमचे लोक खंडन करतील, आणि आपली योग्यता प्रकट करतील, तर वरील दांडगेपणा बराच कमी होईल यात संशय नाही. याविषयी दोन उदाहरणांवरून आमच्या वाचकांची खात्री होईल. सर्व इतिहासज्ञांस, किंबहुना इकडील सर्व लोकांस, सर जॉन मालकमसाहेबाचे नाव ठाऊक असेलच. अव्वल इंग्रेजीत ज्या साहेबांची नावे या प्रांतात, आबालवृद्धांस माहीत होती, व ज्यावर एकंदर लोकांचाही लोभ जडला असे, त्यात अल्पिष्टनच्या खालोखाल सदहू मालकमसाहेबाचेच नाव होते. या भल्या साहेबाने आपणाविषयी हा मजकूर लिहिला आहे—

" माझी स्वतःची एतद्देशीय लोकांविषयी पहिल्याने काय समजूत होती ती अजून मला आठवते,—व ती आठवली असता माझी मला मोठी शरम वाटते! ती अशी होती की, माझ्या हाताखाली जे नेटिव कामगार आहेत ते माझ्यापेक्षा सर्व प्रकारे किती हलके आहेत! असे मला बरेच दिवस वाटत असे; पण जसजसे येथील लोकांविषयी व माझे स्वतःविषयी मला अधिकाधिक कळू लागले, तसतसा आमच्यामधील भेद कमी कमी होत गेला. आमचे इंग्रेज लोक आपल्या श्रेष्ठपणाचा मोठा डौल मिरवितात हे मी पुष्कळच ठिकाणी पाहिले आहे व ऐकलेही आहे;

पण युरोपातील व हिंदुस्थानातील निरनिराळ्या प्रतींच्या लोकांची त्यांच्या त्यांच्या मानाने परस्पर तुलना केली, तर तिकडच्या लोकांस गर्व मिरविण्यास मोठेसे कारण दिसेल असे वाटत नाही ! तसेच सगळ्या हिंदूंविषयी एकंदर सरसकट जे मत ज्याच्या त्याच्या तोंडून ऐकू येते, की ते सारे लोक येथून तेथून लुच्चे, लबाड आहेत, त्यांची भल्याने संगत करू नये; आणि ते बुद्धीचे इतके मंद आहेत की विद्याभ्यासाच्या योगाने ज्यांची मने विशाल व उदार झाली अशा युरोपियन लोकांच्या संभाषणास व स्नेहास ते अगदी लायक नाहीत हेही मला बिलकूल मान्य नाही. "[1]

दुसरे उदाहरण कोलब्रूक नामक प्रख्यात संस्कृतज्ञाचे. आपल्या प्राचीन विद्येवर व्यासंग करून तिची माहिती युरोपात ज्यांनी करून दिली, त्या पंडितांच्या मालिकेत याची गणना मोठी आहे. असे असता याच साहेबाचे आधीचे उद्गार येथे दाखल केले असता सर्वांस मोठा चमत्कार वाटेल; व ते पुनः वाचून कोलब्रूकसाहेबास स्वतःही अनेक वेळा खचित लाज वाटली असेल ! ज्याची पुढे संस्कृतावर येवढी भक्ती जडली, व फारशी वगैरे भाषांशीही ज्याने चांगला परिचय केला, त्यानेच विल्किन्स नामक संस्कृतज्ञास 'संस्कृताचे वेड डोक्यात शिरलेला' असे म्हणावे. 'एशियाटिक मिसलेनी' म्हणून एक बंगाल्यात पुस्तक काढीत असत त्यास 'वेडगळ मजकुराचे आगर', 'ऐने अकबरी' ग्रंथास 'हा नुसता उकिरडा आहे, यात एकादे दुसरे मोती सापडेल न सापडेल' असे म्हणावे ही केवढी चमत्काराची गोष्ट ! या दोन उदाहरणांवरून आमच्या वाचकांस स्पष्ट दिसून येईल की एकंदर जगास आमच्या देशाविषयी यथार्थ ज्ञान बिलकूल नाही. तसेच यावरून आम्हांस असेही खचित वाटते की जे जे युरोपियन लोक येथे येऊन पुनः माघारी गेले व जातात, त्यांच्या हिंदूंविषयी पहिल्या समजुतीत फारच तफावत पडत असेल ! नाही अशी मेकॉलेसारख्या दुराग्रही व कोत्या मनाच्या लोकांची किंवा युरोपातून शुभवर्तमान घेऊन येऊन ते बहुधा जसेचे तसेच गुंडाळून माघारी न्यावे लागल्यामुळे निराश झालेल्या मिशनरी लोकांची मात्र समजूत पालटत नसेल ! मग हे सद्गृहस्थ

१. Briggs's Letters XXIII.

तिकडे गेल्यावर आपले सर्व पांडित्य हिंदूंवर खुशाल बिनधोक ओतीत असतील. तिकडे अगोदर हिंदुस्थानाविषयी माहिती इतकी जबर की, शिंदा हिंदू की मुसलमान याची भ्रांत, हैदर दिल्लीस राज्य करीत होता की त्रावणकोरास करीत होता कोण जाणे ! मुंबईस एकाद्यास पत्र लिहिले असता मद्रासेस व कलकत्त्यास असणाऱ्या इष्टमित्रांचा समाचार त्यास पुसायाचा ! केवळ नकाशाकडे पाहून किंवा इतिहासाच्या चार ओळी वाचून जी माहिती मिळायाची तिची इतकी भ्रांत; मग अशा लोकांस हिंदू धर्माची, हिंदूंच्या विद्येची, त्यांच्या भाषांची वगैरे माहिती कितपत असेल हे सांगावयास नकोच ! फार कशाला, अजूनही हा प्रकार चोहोकडे दृष्टीस पडत नाही काय ? संस्कृतामध्ये ओ का ठो करता येत नसताही हिंदु धर्माविषयी सव्वासव्वा हात गप्पा झोकणारे पाद्रीसाहेब कोणी पाहिले नाही ? ‘ पंचतंत्र ’ या महाग्रंथाचे अकटोविकट अध्ययन करून खासे पी. एच्. डी. बनून आलेले, चारी वेद, सहा शास्त्रे, अठरा पुराणे, यांत पारंगत झालेले श्वेतद्वीपीय व शर्मण्यदेशीय शास्त्री कोणास माहीत नाहीत ? पण अः यात काय आहे ? संस्कृतचसे काय, एशिया खंडातील झाडून साऱ्या भाषांत ज्यांचा कोणी हात धरणारा नाही असे ‘पूर्वदेशीय भाषांचा बाणा बाळगणारे’ही युरोपात तयार होऊन इकडे येत नाहीत काय ! त्यांस तुम्ही आरबी विचारा, फारशी विचारा, चिनी विचारा; सगळ्यांत तयारी ! प्रश्न करण्याचा अवकाश ! साहेबांची बुद्धी येथवर फाकली असल्यावर मग युनिव्हर्सिटीत मराठीची बुके नेमताना ‘ विद्येपासून लाभ आणि संतोष ’, ‘ ईश्वरी ज्ञान ’ वगैरे लाखो ग्रंथ त्यांनी निवडल्यास, किंवा ‘ दक्षिणा–प्रैज–कमिटी ’कडे कसाही गद्यपद्यात्मक ग्रंथ येवो, त्यावर फाडकन न्यायाच्या तराजूत जोखलेले मत साहेबांनी दिल्यास आश्चर्य कोणते ? वाः ! एकूण अक्कल हा जिन्नस हल्लीच्या काळी युरोपखंडात जितका रगड पिकतो तितका एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वी कधी कोठेही पिकला नसेल ! ! हा देवाने आपल्या आवडत्या लोकांवर एकदम महाप्रसाद केला असेल, किंवा त्यांच्या पुत्राने आपले शुभवर्तमान भूमंडळावर फैलावलेसे पाहून खुश होऊन आकाशातून हे अपूर्व पारितोषिक पाठवून दिले असेल कोण जाणे ! असो, तेव्हा सांगायाचे काय की, असे अरण्यपंडित इंग्लंडांत गेल्यावर ‘ एरंडोऽपि द्रुमायते ’ या न्यायाने

तेथे मोठी प्रतिष्ठा व विद्वत्तेबद्दल मान पावतात. मग काय, सांगतील ती पूर्वदिशा ! कोणत्याही लोकांस इतरांचा मोठेपणा व थोरवीचे वर्णन कधी सहन होत नसतेच; त्यातून हिंदूसारखे लोक, जे त्यांच्या सत्तेखाली आलेले, त्यांचे वर्णन काय करावयाचे आहे ? यास्तव लोकांस हसवायासाठी व आपण किती थोर आहो हे त्यांस समजविण्यासाठी हिंदूंचा जितका पाडाव करावा तितका इष्टच ! त्यातून दुसरे काय झाले आहे की, हिंदूंचा फार प्राचीन काळापासून संपत्तीविषयी, कलांविषयी, विद्येविषयी वगैरे मोठा लौकिक इतका की, युरोपातील सर्व राष्ट्रे तिकडून आलेले अमोलिक जिन्नस पाहून हिंदुस्थानाविषयी केवळ वेडी होऊन गेली होती. कोलंबस अमेरिकेजवळील बेटांस जाऊन लागला, पण त्यास आपण हिंदुस्थानच शोधून काढला असे वाटून त्याने त्यास तेच नाव दिले, ते अद्याप चालत आहे. तसेच ग्रीक व रोमन लोकांतही आमच्या पूर्वजांची मोठी ख्याती होती असे त्यांच्या ग्रंथांवरून वगैरे दिसते.' तेव्हा येवढ्या नामांकित लोकांचे नाक खाली करून ते अत्यंत नीच आहेत हे दाखविले म्हणजे इंग्रेज लोक मोठे थोर कसे नाही झाले ? अर्थातच झाले ! खिस्ती धर्माकरिता वेडे होऊन गेलेल्या मिशनरी लोकांनी हिंदूंविषयी एकंदरीत, व विशेषतः धर्माच्या संबंधाने हवी तितकी बडबड केली तरी ती त्यांच्या थोरपणास व त्यांच्या येशूच्या नावास शोभते खरी; पण सत्याचा, न्यायाचा, विद्वत्तेचा बाणा बाळगणाऱ्या अशा मोठमोठ्या ग्रंथकारांनीही आमच्या देशाविषयी झोटिंगपाच्छाहीचा मजकूर लिहावा या केवढा चमत्कार आहे ? मेकॉलेसाहेब मोठ्या तीव्र बुद्धीचा, बहुश्रुतपणाचा, रसिकतेचा व निःपक्षपातपणाचा

१. शिकंदर बादशहा हिंदुस्थानात आला होता तेव्हा तेथील लोकांचे ज्ञान व चातुर्य पाहून तो चकित झाला, ही गोष्ट इतिहासप्रसिद्ध आहे. तसेच अनेक ग्रीक व रोमन ग्रंथकारांनी हिंदुस्थानाविषयी लिहिले असून येथील लोकांविषयी त्यांच्या मनांत आदराची बुद्धी पुष्कळ वागत असावी असे दिसते. पोप कवीने 'टेंपल ऑफ् फेम' [ कीर्तिमंदिर ] या नावाच्या काव्यात पूर्वदेशीय विद्वत्समाजात ब्राह्मणांस घातले आहे:—

'—The sage Chaldeans robed in white appeared,
And Brahmans, deep in desert woods revered.'

बाणा मारीत असता हिंदुस्थानाच्यासंबंधाने जेथे जेथे त्यांनी काही म्हणून लिहिले आहे, तेथे तेथे अत्यंत दुराग्रह–किंबहुना पोरकटपणाही–त्यांनी प्रगट केला आहे, त्याची माहिती केवढी जबर होती हे त्यांस दहा बारा भाषा येत होत्या यावरून व त्यांच्या ग्रंथांवरून स्पष्ट दिसतेच. दृष्टान्त देण्याविषयी तर त्यांची हद्दच होती. प्राचीन ग्रीक व रोमन लोकांच्या ग्रंथांतून, अर्वाचीन युरोपातील भाषांतल्या ग्रंथांतून, किंबहुना फारशी वगैरे इकडील ग्रंथांतूनही ते त्यांनी प्रसंगवशात दिले आहेत. पण नाही असा संस्कृतातून ! त्यांच्या तडाक्यातून आमच्या कालिदासाचे ‘ शाकुंतल ’ नाटक, की ज्याचे इंग्रजी भाषांतर प्रसिद्ध होताच श्लेजेल, हंबोल्ड, गेटी अशा महापंडितांस त्याने गर्कच करून टाकले ते चुकले असेल असे मुळीच संभवत नाही. त्यातून साहेबमजकूर आमच्या देशात तीन चार वर्षे येऊन राहिलेही होते. पण काही नाही. फारशी ग्रंथांचा संबंध जसा त्यांनी आपली माहिती दाखविण्याकरिता आपल्या ग्रंथांत कोठे कोठे आणला आहे, व फर्दोशी, शेक सादी वगैरे कवींची नावे मोठ्या प्रेमाने आपल्या ग्रंथांत एके ठिकाणी आणली आहेत, तशी हिंदू कवींची मात्र बिलकूल कोठे नाहीत. आम्हांस खचित वाटते की, त्यांनी शाकुंतलाचे भाषांतर जे एकादे वेळेस कधी वाचले असेल, ते त्यांचे बंधू जेम्स मिल्ल इतिहासकार यांच्यासारखे धूकदृष्टीनेच वाचले असेल ! बरे ते इतके दिवस बंगाल्यात राहिले तेव्हा नंदकुमाराच्या देशबांधवांची वर्तणूक त्यांनी ‘ वॉरन हेस्टिंग्ज ’ या निबंधात लिहिली आहे तशीच त्यांच्या नजरेस आली असेल काय ? म्हणजे लहानापासून थोरापर्यंत सर्वच लबाड, ठक, मूर्ख असे त्यांस आढळले असतील काय ? तसेच जेवढा टापू त्यांनी पाहिला असेल तेवढ्यात कोणत्याही संबंधाने चांगले म्हणण्यासारखे त्यात काहीच दिसले नसेल ? काय असेल ते असो. गरीब बिचारा हिंदुस्थान ! त्याच्या धर्माची तर सर्वांनी पायमल्ली करावीच––‘ दुमी हिंदू लोक ’ करणाऱ्या पाद्रीसाहेबापासून तो मोठ्या लाटसाहेबापर्यंत––त्याप्रमाणे प्रस्तुत ग्रंथकारानेही एके ठिकाणी आपल्या नेहेमीच्या चालीप्रमाणे त्यावर वर्षाव केलाच आहे. त्याचा अंमळशाने उल्लेख करू––पण नवल पाहा काय की, आमच्या देशाची संपत्तीही साहेबमजकुरांस सहन झाली नाही ! ! त्यांनी वर सांगित-

लेल्या सर्वप्रसिद्ध निबंधात असा मजकूर लिहिला आहे—" मोठ्या शहाण्या व्यापाऱ्यांसही हिंदुस्थानातील संपत्तीचा मोठा भ्रम असे. त्यांच्या मनात अशा वेड्या कल्पना घोळत की, हिंदुस्थानात हिऱ्यांची जोती, रत्नांचे खांब, सोन्याचे वाडे असे आहेत; पण खरोखरी पाहता हा सगळा भ्रम होता. युरोपात पोर्तुगाल देश, किंवा त्याहूनही ऐर्लंड देश भिकारी समजतात, पण हिंदुस्थान तर आयर्लंडहूनही भिकारी आहे ! ! ! " लॉर्डसाहेबाचे हे महावचन ऐकून आमचे वाचक खरोखर भांबावून जातील ! — काय ? हिंदुस्थान आणि भिकारी !—वा: ! दिवसा ढवळ्या साऱ्या जगाच्या डोळ्यांत माती टाकण्याचे हे साहेबांचे धाडस त्यांचे त्यांसच शोभो ! हिंदुस्थान जर दरिद्री झाला तर मेकॉलेसाहेबांचा देश कशाने श्रीमंत झाला कोण जाणे ? शिशाच्या व कोळशाच्या खाणींनी तर नाहीना ! कोणी नाही म्हणावे ? उद्या मेकॉलेसाहेबांचे एखादे बंधू साऱ्या जगास कदाचित जाहीर करतील की, ' अहो ! हिमालयाविषयी मोठ्या भूगोलवेत्त्यांसही मोठी भ्रांती आहे. आमच्या इंग्लंडातील एकादे लहानसे टेकाड त्यास उंचीत हटवून टाकील ! तसेच गंगा, ब्रह्मपुत्रा यांची सारे लोक रिकामी बढाई सांगतात. आमच्या लंडनातले एकादे गटार पुढे होईल तर त्यास मागे सारून देईल !'—जुलमी राजांनी प्रजा चरकातून पिळून काढल्यामुळे, येथील लोकांस अगदी त्राण उरले नसते असे जर आमच्या साहेबांचे म्हणणे असेल, तर वरील वाक्य क्लैव्, हेस्टिंग्ज अशांच्या देशबंधूंस फारच नामी शोभते म्हणायाचे ! असो; या वरील मतावर आणखी विस्तार येथे करीत नाही; ते आमच्या वाचकांवरच आम्ही सोपवून देतो. आता वरील महाविद्वान साहेबांचे आमच्या बिचाऱ्या धर्मावरील मत ऐका. सरकाराने प्रजेवर धर्माच्या बाबतीत सक्ती करावी की नाही असा विषय चालला असता तदनुरोधाने मेकॉले साहेब हिंदुस्थानाविषयी लिहितात—" परधर्म जबरीने लोकांवर बसविला असता जेथे त्यांचे अपरिमित कल्याण होईल असा देश हिंदुस्थानाखेरीज कदाचित दुसरा कोठेही सापडणार नाही. तेथील धर्मासारखा नीचतेस पोचलेला धर्म साऱ्या पृथ्वीवर कोठेही नाही. त्याचा समूळ उच्छेद करून खिस्ती धर्माचे अत्यंत हीन काळी अत्यंत हीन जे स्वरूप कधी कोठे चालू असेल ते त्याच्या जागी आणून बसविले असताही त्या देशातील लोकांचे

अतोनात हित होणार आहे !"[१] वा: येथे तर आमच्या साहेबांनी आपल्या सर्वज्ञतेची पराकाष्ठाच दाखविली ! आमच्या देशाकरिता राज्यसंबंधाचे कायदे करण्याच्या कामात हे साहेब पुढारी होते, व सध्या चोहोकडे चालू असणारी शिक्षणपद्धतीही त्यांनीच घालून दिली, या डौलावर जाऊन आमच्या धर्मावरही ते घसरले नसतील ना ! वरील त्यांच्या लेखावरून पाहता हे साहेब येशूचे पुरे भक्त असून आमच्या धर्मातला त्यास खडान खडा माहीत होता याविषयी आम्हांस संशयच उरला नाही ! साहेबांचे लिहिणे कोठेही पहा; ते अर्धबोबड्या मनुष्यासारखे अर्धेमुर्धे कधी नसायचेच. त्यातून हिंदुस्थानासारख्या देशाविषयी तर ते अगदी निक्षूनच असायाचे. त्यांची व त्यांच्या देशबंधूंची खात्रीच होऊन गेली आहे की, आमच्या देशाविषयी कितीही वाईट लिहिले तरी ते पुरे नाहीच होत! मग कशाला कसर करा ! मानवी भाषेने जेथवर म्हणून निंदा व्यक्त करता येते तेथवर तिचे सत्त्व बघून बिचाऱ्या हिंदुस्थानावर वर्षाव ! ही मजा ज्यास पुरतेपणी पाहायची असेल त्यांनी जेम्स मिल्लसाहेबांचा 'हिंदुस्थानचा इतिहास', पाहावा. यांनी तर इतिहास लिहिण्याची नवीन तऱ्हा जगात प्रगट केली. इतिहासकारक इंग्लंडात; ज्याचा इतिहास लिहावयाचा तो देश सात आठ हजार कोस दूर; तेथील लोक काळे का गोरे कधी पाहिले नाहीत; तेथील भाषांच्या ज्ञानाच्या नावाने तर आवळ्यायेवढेच म्हणण्यास काही हरकत नाही; अशा थाटाने हे साहेब इतिहास रचावयास बसले. बरे, इतकेही नाही म्हटले; येथील देशाची हकीकत ज्यांनी लिहिली त्यांच्या लेखांवरच निर्वाह करून इतिहासकाराने आपले बुद्धिकौशल्य योजून निदान नि:पक्षपातबुद्धीने खरा मजकूर तरी लिहिला असेल म्हणावे ! पण तसे तर बिलकूल नाही. स्वतः हिंदुस्थानाविषयी माहिती तर मेकॉलेसाहेबांच्याच तोडीची, तेव्हा दुसऱ्यांचे लेख तर पाहायाला हवेच; पण खुबी काय करायची ? जेवढे म्हणून हिंदूंच्या विरुद्ध लिहिलेले सापडेल तितके मात्र घ्यावयाचे; पण त्याच ग्रंथकाराने त्याविषयी जेवढा प्रशंसेचा मजकूर लिहिला असेल तेवढाच नेमका गाळायाचा! येवढी सगळी सामग्री

१. Gladstone on Church ahd State

असल्यावर मग हा इतिहास किती उत्कृष्ट उतरला असेल हे सांगावयास नकोच! या थोर इंग्रेज इतिहासकाराच्या मनात आमच्या हिंदुस्थानाविषयी केवढी बळकट अढी होती ती थोडक्या उदाहरणांवरून वाचकांस कळवितो. सारे जग ज्यास पाहून विस्मय पावते अशा डाकाच्या मलमली, आग्र्याचा ताजमहाल, कालिदासाचे ‘ शाकुंतल नाटक ’, वेरूळची लेणी ही सुद्धा साहेबाच्या पसंतीस उतरली नाहीत ! ! लेण्यांविषयी त्यांनी एक तर्क सुचविला आहे तो मोठ्या मौजेचा आहे. साहेबांची कल्पना अशी धावते की, ही लेणी कदाचित भुईतूनच स्वयंभू वर निघाली असतील किंवा आकाशातील ढगांतून खाली कोसळली असतील ! ! ! विलायती कल्पना खरी ! असो; तेव्हा असे दिव्य इतिहास वाचून एकंदर जग आमच्याविषयी कल्पना बांधणार ! मग त्यात आमच्याविषयी त्या आताप्रमाणे अत्यंत मूर्खत्वाच्या असल्यास नवल काय ?

◎ ◎ ◎

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ७१५२२ वि: ९२४
क्रमांक ९८१५ नोंद दि. २६/३/८०

विष्णुशास्त्री चिपळूणकर

## वाचन

पहिल्याने हे उघडच आहे की, वाचन म्हटले म्हणजे अगोदर भाषेत ग्रंथसंग्रह पाहिजे. आता आपला ग्रंथसंग्रह सगळा एकंदरीत धरला तरी अर्वाचीन युरोपियन भाषांशी किंवा संस्कृतादि प्राचीन भाषांशी त्या संबंधाने आमच्या गरीब मराठी भाषेस टक्कर मारता येईल हे अगदी संभवत नाही खरे; तरी सध्याच्या स्थितीतसुद्धा तीस आपल्या दारिद्र्यास्तव केवळ खालीच पाहायास हवे असे आम्हांस अगदी वाटत नाही. एतद्देशीय इतर भाषांत तर तिच्याहून कोणच्याही संबंधी वरचढशी भाषा एकही नाही असे आम्हांस वाटते. तसेच सुमारे तीन-चारशे वर्षांपूर्वी इंग्लिश वगैरे युरोपियन भाषांची जी स्थिती होती तीपेक्षाही सध्यादेखील तिची स्थिती बरी आहे.

सारांश, केवळ अज्ञानास्तव, दुराग्रहास्तव व आळसामुळे मराठीचा जे तिरस्कार करू पाहतात व तिची ज्यांस मोठी लाज वाटते, त्यांस तसे करण्यास वरच्याशिवाय दुसरे कोणतेही समर्पक कारण नाही हे त्यांनी पक्के समजावे. तसेच जे फाकडे नवीन विद्वान जुन्या शालजोडीवाल्या शास्त्र्यां-प्रमाणे मराठी भाषेवर नाक मुरडतात त्यांवर दोन प्रकारचा दोष येतो. एकतर जिचे ज्ञान आपण पुरतेपणी संपादन केले नाही तीस विनाकारण दूषण देणे हे; आणि दुसरे असे की जी न्यूनता त्यांनी पूर्ण करायाची ती न केली हे तर एकीकडेच राहिले, पण पुनः तीबद्दल भाषेसच दोष! भाषेच्या अंगी रानातील जमिनीप्रमाणे तर शक्ती नाही ना! की तीत गगनचुंबित वृक्ष आपोआप उत्पन्न होतात व वाढतात त्याप्रमाणे मोठमोठे

ग्रंथ भाषेत आपले आपोआप व्हावे ! काव्ये, नाटके, कादंबऱ्या, शास्त्रीय ग्रंथ हे केवळ स्वतःच उत्पन्न व्हावे, मनुष्याच्या श्रमाची म्हणून त्यांस बिलकूल गरज लागू नंय, असा जर सृष्टीचा नियम असता तर बरीक वरील मराठीवरची दूषणे ठीक होती ! पण अशी स्थिती मुळीच नाही हे स्पष्ट आहे. ग्रंथसंग्रह हे मुख्यतः उद्योगाचे फळ होय. मोठमोठे कवी, कादंबरीकार, किंवा शास्त्रकार वगैरे निपजणे ही गोष्ट केवळ एकेका देशाच्या भाग्याची होय; ती येथे धरायची नाही. पण एकंदर लोकांच्या हितार्थ इतर भाषांतील ग्रंथांची भाषांतरे करणे किंवा त्यांच्या नमुन्यावर आपल्या भाषेत तसे ग्रंथ उतरणे असल्या सामान्य कृत्यांकरिता ईश्वराचे लालच निर्माण झाले पाहिजेत असे नाही ! सुताराचे, शिंप्याचे, वगैरे काम जसे त्यात काही दिवस पडले म्हणजे बहुधा सर्वांस येण्यासारखे आहे तशाच मासल्याची वरील कामे होत. इंग्लिश भाषेत जे आज लाखो ग्रंथ झाले आहेत व होत आहेत त्या सर्वांचेच कर्ते प्रतिमिल्टन, प्रतिन्यूटन असे आहेत काय ? काही नाही. पुष्कळ अंशी त्या लोकांच्या अचाट उद्योगांचेच केवळ ते फळ होय. पण आमच्यात बहाद्दर पाहा कसे आहेत ! नाव लिहिण्याचे तर पुढे हात सव्वा हात किताब, देशाभिमानाविषयी तर पहिल्या प्रतीचा बाणा, देशकल्याणाचे कोणतेही काम निघो, त्यात प्रमुख मंडळीत नाव, पण देशभाषेत जर चार शब्द बोलण्याचा किंवा लिहिण्याचा प्रसंग आला तर बहुधा प्राणसंकटच ! असो, तर जेथे स्वभाषेचे एवढे ज्ञान व तीविषयी येवढी आस्था दृष्टीस पडते तेथील स्थिती काय सांगावी ? ती सर्व प्रकारे अत्यंत शोचनीय असून तिच्या संबंधाने येथवर अनेक वेळा मागे आम्ही लिहिलेच आहे, यास्तव जास्त लिहिण्याची गरज दिसत नाही. असो एकंदरीत मराठीतील ग्रंथसंग्रहाविषयी आम्हांस असे वाटते की सध्या तो जितपत आहे, त्याची इतरांच्या मानाने पाहता फार मोठी योग्यता जरी नाही तरी आम्ही जितपत स्थितीस येऊन पोचलो आहो तितक्या स्थितीला तो चांगला उपयोगी पडण्यासारखा आहे, व आमचे पाऊल जसजसे पुढे पडत जाईल त्या त्याप्रमाणे आमच्या भाषेची आमची योग्यता व लोकांचे कर्तृत्व पाहता ती वाढत जाण्याचेही आम्हांस अगदी कठीण वाटत नाही.

आता वाचनाचा प्रघात आपल्या लोकात सध्या कितपत आहे तो पाहू. पूर्वीच्या पद्धतीचे जे लोक आहेत, त्यांच्या वाचनाचा वर एक प्रकार सांगितलाच आहे,–की ज्ञानेश्वरी, भगवद्गीता अशांसारखे ग्रंथ ते नियमाने वाचतात; पण ते केवळ भाविकपणाने, म्हणजे आपण जे वाचतो त्याचा अर्थ आपणांस कळावा इतकीसुद्धा थोड्यांचीच इच्छा असते ! हे असले वाचन विद्येच्या दृष्टीने केवळ निरर्थक होय हे उघड आहे. आता नव्या पद्धतीचे लोक पाहू. यांपैकी फार करून सगळ्यांचे मुख्य वाचन म्हटले म्हणजे वर्तमानपत्रेच होत, सांज-सकाळ लायब्ररीत खेप घालून आले म्हणजे त्या दिवसाचे कर्तव्यकर्म बजावले असा पुष्कळांचा समज दिसतो. पण खरोखरीची जी लायब्ररी तिजकडे बहुधा कोणी महिन्याचे महिने ढुंकूनही पाहात नाही, तेथे खरा अक्षय वास म्हटला म्हणजे अंधाराचा व केराचा. पुस्तकांचा खरा चालक म्हटला म्हणजे महिन्या दोन महिन्यांनी त्यांवर साचलेला मळ झाडणारा गडी, आणि त्यांचे खरे उपभोक्ते म्हटले म्हणजे कृमिकीटक ! हा हास्यास्पद प्रकार बहुधा जेथे तेथे दृष्टीस पडत असेल यात संशय नाही. पण याबद्दल कोणासही कधी काहीं चमत्कार वाटला आहे, किंवा तो मोडायाचे मनात आले आहे, असे बिलकुल आढळत नाही !

याचे कारण काय असावे बरे ? एकंदर लोकांत एकाएकी ज्ञानाची भरती येऊन आजपर्यंत मोठे मानलेले ग्रंथही त्यांस आज एकदम नादान वाटू लागले, किंवा देशात विद्येची अगदी रेलचेल होऊन गेल्यामुळे अधिक शिकण्यास आता जागाच उरली नाही; अथवा सर्व लोक एकंदर लोककल्याणाच्या कामास लागून मार्ग तयार करण्याच्या किंवा कलाकौशल्य वाढविण्याचा कामास तर गुंतले नाहीत ना ! काय असेल ते असो. याचे कारण आम्हांस एक सुचते. ते हे की, वरच्यासारखे प्रकार केवळ लोकाचाराचे होत. सुधारलेले शहर म्हटले म्हणजे जशी त्यात म्युनिसिपालिटी पाहिजे, सभागृह, नाटकगृह वगैरेही अवश्य आलीच; त्याचप्रमाणे पुस्तकालय. त्याची एकदा स्थापना होऊन गेली पाहिजे; मग त्याची पुढे व्यवस्था काही का होईना ! त्याचा मूळचा अर्थ असा खरा, की उपयुक्त व मनोरंजक पुस्तके त्यात ठेऊन ती लोकांनी वाचावी, व तेणेकरून ज्ञानप्राप्ती करून घेऊन देशभाषेत तसे ग्रंथ रचण्याची त्यांस उमेद यावी; व

पहिल्या पहिल्याने हा त्याचा उद्देश बराच सिद्धीस गेला. पण त्याचे आता काय ? जे पहिल्याने खरोखर उपयोगाकरिता होते ते आता केवळ शोभेचे कलम झाले आहे. सारांश, आमच्या राजेरजवाड्यांस कमरेस रेशमी म्यानांत लटकणाऱ्या तरवारीचा जितका उपयोग किंवा कित्येक शौकिन गृहस्थांच्या बंड्यांच्या कप्यांत टिकटिक करणाऱ्या धाकट्या घड्याळांचा त्यांस जितका उपयोग, तितकाच घरच्या दिवाणखान्यात सुंदर सोनेरी पुठ्ठे करवून नीट बेताबाताने ठेवलेल्या लायब्ररीतील बुकांचा! असो; एकंदरीत सांगायाचे काय की, याप्रमाणे ग्रंथवाचनाचा प्रघात बहुतेक मोडून नुसती वर्तमानपत्रेच वाचण्याकडे आमच्या लोकांचा दिवसेंदिवस कल होत चालला आहे. यावरून वर्तमानपत्रे वाचणे अगदी निरर्थक, लोकांनी त्यांस आश्रय देणे अगदी गैर आहे असे म्हणण्याचा आमचा बिलकुल रोख नाही. ती वाढविणे हे भाषेच्या संबंधाने लोकांस फार हितावह होय अशी आमची पक्की खात्री आहे. पण त्यापलीकडे ज्ञानाचे साधनच नाही, ही जी लोकांची समजूत होत चालली आहे ती मात्र फार गैर आहे हे आम्हांस दाखविणे आहे. वर्तमानपत्रे वाचणे हे इंग्रेज लोक सकाळी जसा चहा घेतात त्या सारखेच पुष्कळ अंशी होय. म्हणजे अर्धे पोषण, अर्धी करमणूक असाच दोहोंचा प्रकार आहे. शरीराचा निर्वाह होऊन त्याचे व्यवस्थित पोषण होण्यास जसे चांगले जेवणच पाहिजे त्याप्रमाणेच खरी उपयोगाची अशी विद्वत्ता ज्यास संपादन करणे असेल त्याने मोठमोठ्या नानाविध विषयक ग्रंथांचा ऊहापोह-पूर्वक यथास्थित व्यासंगच केला पाहिजे. हे परिश्रम केल्याने आलेला शीण घटकाभर दूर करण्यास व जगात काय उलाढाली चालल्या आहेत त्या समजण्यास वरील पत्रांचा आदर करणे बरोबर आहे; पण त्यांस विद्येच्या शिखरावर बसवून ठेवणे हे अगदीच शोभत नाही, फार तर काय, पण कित्येक मोठमोठ्या ग्रंथकारांचे असेही मत आहे की, वर्तमानपत्रे, मासिक-पुस्तके, इत्यादिकांची समृद्धी लोकांस अपायकारक होय. का की, हीच चाळून पाळून वरवर वाचण्याची संवय एकदा मनास लागून गेली म्हणजे विचारपूर्वक व शोधक बुद्धीने मोठमोठे ग्रंथ सावकाश वाचण्याचा मनास कंटाळा येऊ लागतो. व यामुळे वरवरचे शुष्क पांडित्य मात्र चोहोकडे माजून खऱ्या विद्वत्तेचा लोप होतो.

ज्यांस ग्रंथ वाचण्याचा नाद असतो, किंवा डौलाकरिता जे तसा आव घालतात, ते बहुधा आपली विद्वत्ता वाचलेल्या पानांच्या संख्येवर लेखतात, म्हणजे जितकी पाने आपण वाचली तितक्या मानाने आपले ठायी अधिक ज्ञान आले असे ते समजतात. पण हा केवढा भ्रम आहे हे हवे त्यास अमळ विचार केला असता कळण्यासारखे आहे. जितके जितके ज्याने वाचले तितका तितका तो विशेष ज्ञानसंपन्न व शहाणा असे जर असते तर सध्याचा काळ जगाच्या मागील सर्व काळांपेक्षा ज्ञानात व शहाणपणात श्रेष्ठ असता; कारण हल्ली जितके ग्रंथ झाले आहेत व होताहेत व लोकांत वाचनाचा जेवढा प्रचार आहे त्याचा लक्षांशही प्राचीन काळी नव्हता. पण चमत्कार पाहा काय आहे, की अत्यंत प्राचीन काळचेच महान महान ग्रंथकार कीर्तिमंदिराच्या अत्युच्च पदांवर जे एकदा अढळ बसले आहेत ते आहेत! हल्लीच्या काळी ज्ञानाचा केवढाही फैलावा झाला तरी त्यांची सर कोणासही येत नाही! तेव्हा यावरून स्पष्टच दिसते की, वाचलेल्या ग्रंथांच्या संख्येचा आणि विद्वत्तेचा मेळ घालणे हे नेहेमी बरोबरच असते असा नेम नाही. ज्याने दहाच ग्रंथ वाचले, मननपूर्वक शोधक बुद्धीने वाचले त्याचे ज्ञान, आणि ज्याने शेकडो भराभर वाचून फेकून दिले त्याचे ज्ञान, या दोहोंत काहीच साम्य धरता येणार नाही. पारसीकांचे मोठ्या व्यामडौलाचे अफाट सैन्य आणि सिकंदराचे थोडेकेच पण कसलेले सैन्य या दोहोंचा सामना झाला असता जो परिणाम झाला तोच वरील दोन पंडितांचे वाग्युद्ध झाले असता व्हावयाचा. पण इतकेच नव्हे. असे ' भाराभर केलेले पाठांतर ' सर्वथा ' व्यर्थ ' होय इतकेच नव्हे, तर ते अत्यंत अनर्थकारकही होय. वरच्या सैन्याचाच दृष्टांत घेऊन पाहा. त्यात कोणाचा जोडा कोणाच्याच पायांत नसल्यामुळे व जो तो आपल्याच थाटात असल्यामुळे ऐन गर्दीच्या वेळेस घोटाळाच घोटाळा होऊन सैन्याची संख्याच त्याच्या नाशास जशी कारण होते, त्याप्रमाणेच वरील ग्रंथसंख्या वाचणारांस उपयोगी पडत तर नाहीच, पण उलटी गर्वोत्पत्तीस मात्र कारण होऊन त्यांस प्रसंगी गोत्यात आणण्यास मात्र खाशी उपयोगी पडते! अथवा सर्वांच्या अतिशय परिचयातला जो व्यापार भोजन त्याचा दाखला घ्या. अन्न जसे शरीरास तसे वाचन, श्रवण वगैरे जी ज्ञानाची साधने ती मनास होत. एकाने जसे

मराठी ग्रंथ संग्रहालय ६९५२३ दि: ... अनुक्रम ९६९५ नों: दि: २६/३/६०

शरीराचे पोषण होते, तसेच दुसऱ्याने मनाचे होते. या दोन्ही व्यापारांत पुष्कळ प्रकारचे मोठे चमत्कारिक साम्य आहे. ते असे.—जेवण जसे सावकाश नेमस्तपणाचे व नियमाने असेच केले असता अंगी लागून शरीरास हितावह होते, त्याप्रमाणेच वाचावयाचे ग्रंथ जर पूर्ण लक्ष देऊन वाचले तरच त्यापासून ज्ञानाचा लाभ होऊन निरनिराळ्या मानसिक शक्ती वृद्धिंगत होत जातील. नाहीतर जसा अधाशी मनुष्य अन्नाशी गाठ पडली असता आकंठ तृप्ती करून घेऊन पुढे मग आमांशाच्या योगाने होणारी पीडा भोगीत बसतो त्याप्रमाणेच वाचणाराचीही स्थिती होते. म्हणजे सगळेच अर्धेमुर्धे माहीत, पक्के निश्चित असे काहीच नाही, असे असल्यामुळे भलभलत्या कल्पना व विलक्षण मते त्याच्या मनात शिरून ती अभिमानास्तव त्यास कधीही टाकावीशी वाटत नाहीत. तेव्हा अन्नाचा परिपाक होऊन ते रक्त-रूपाने शरीरास मिळाले म्हणजे जसे त्याचे सार्थक झाले प्रमाणेच आपण जे वाचले त्याचे पुरतेपणी विवेचन करून त्यातले ग्राह्य कोणते, त्याज्य कोणते वगैरेंची नीट व्यवस्था झाली म्हणजे तो मजकूर ज्ञानरूपाने आपल्या मनाशी मिळून तो आपला झाला असे समजावे. या ठिकाणी मांसाहाराचा दृष्टान्त तर फार समर्पक होय. पशुपक्षादिकांचे मांस खाल्ले म्हणजे ते जसे तत्क्षणीच शरीराच्या मांसाशी मिळत नाही, तर जठराग्नीने त्याचे पुनः पृथक्करण होऊन व तेथील सर्व व्यापार त्यावर क्रमाक्रमाने होऊन शेवटी जेव्हा त्याचे रक्त बनते व रक्ताचे मांस होते, तेव्हाच ते जसे खाणाऱ्यांच्या मांसाशी मिळते, तशीच गोष्ट ग्रंथवाचनाची होय. शेकडो मोठमोठाले ग्रंथ जरी घोकून टाकले, तरी जोपर्यंत त्यांचे विवेचन करण्यास वाचणाऱ्याने आपल्या विचारशक्तीचा उपयोग केला नाही तोपर्यंत तितकी विद्या त्या जाडी-पुस्तकांतल्या पुस्तकांतच राहिली. त्याचा लवलेशही याच्या मनात शिरला नाही. इसापनीतीतील उंटाप्रमाणे त्याच्या पाठीवर मात्र अन्नसामग्री पुष्कळ झाली, पण पोटात काही नाही! त्या खाशा ओझ्याने यास वाहण्याचे मात्र श्रम होतील, मूर्खत्वास्तव त्याच्या भाराचा यास मोठा गर्वही वाटेल. पण उपयोग म्हटला तर जो कोणी शहाणा त्यातील अन्न काढून करून घेईल त्यासच!

असो; वरील अर्ध्याकच्च्या विद्वत्तेचे अनर्थ फार प्राचीन काळापासून

सर्व देशांतल्या पंडितांनी पाहून ठेवले आहेत. ते सर्व भाषांतील म्हणींत व सुभाषितांत बहुधा सापडतील. त्यांपैकी आम्हांस अवगत असलेल्या तीन भाषांतले तीन चुटके येथे लिहून हा लेख पुरा करतो.

आपल्या मराठीतील म्हण आमच्या सर्व वाचकांस माहीत असेलच—

'उथळ पाण्याला खळखळाट फार.'

पोप कवीने आपल्या एका लहानशा काव्यात ( Essay on Criticism ) म्हटले आहे.

A little learning is a dangerous thing;
Drink deep, or taste not the pierian spring,
There, shallow draughts intoxicate the brain,
But drinking largely sobers us again.

"चुटपुटती विद्या ही फार भयंकर आहे. विद्यारूप झऱ्यांशी तोंड लावून एक यथेच्छ प्राशन तरी कर, नाहीतर एक बिंदूही घेऊ नको. कारण त्याचा असा विचित्र गुण आहे की, थोडेच घोट घेतले असता त्यांनी माथे फिरून जाते; पण तेच पुष्कळ जसजसे घ्यावे तसतसा मद उतरत जातो.

भर्तृहरी 'नीतिशतका'च्या आरंभी म्हणतो,

अज्ञः सुखमाराध्यः सुखतरमाराध्यते विशेषज्ञः ।
ज्ञानलवदुर्विदग्धं ब्रह्मापि च तं नरं न रंजयति ॥

"जो केवळ अज्ञान आहे, त्याची लवकर समजूत करून देता येते; किंवा जो ज्ञाता आहे त्याची तर त्याहीपेक्षा लवकर करता येते; पण ज्ञानाचा अर्धामुर्धांच संस्कार ज्यास घडला आहे अशास नमस्कार असो ! साक्षात् ब्रह्मदेवाच्यानेही त्याचे समाधान करवणार नाही !"

० ० ०

गोपाळ गणेश आगरकर

# बोलके सुधारक, वागते सुधारक व सुधारणानिंदक

हे लोकांचे तीन वर्ग सुधारणापंथास लागलेल्या प्रत्येक देशात केव्हाही दृष्टीस पडतात. ज्या अर्थी मनुष्यास चांगल्यावाईटाची निवडानिवड करण्याची बुद्धी, व जे वाईट असेल त्याचा त्याग आणि चांगल्याचे संपादन करण्याचे मानसिक व शारीरिक सामर्थ्य आहे, त्या अर्थी पशूप्रमाणे त्यांची स्थिती स्थिर न राहता, कालमानाप्रमाणे तीत कमी अधिक बदल होत जाणे स्वाभाविक आहे. ज्याप्रमाणे कालाचा क्रम थांबविणे अशक्य आहे, त्याप्रमाणेच मनुष्याच्या स्थित्यंतरास खळ पाडणे अशक्य आहे. तथापि हे सत्य अज्ञ लोकांच्या लक्षात नीट न येत असल्यामुळे, व आपण ज्या स्थितीत आहो तीच स्थिति अत्युत्तम असे अप्रबुद्ध जनावरांप्रमाणे त्यांस वाटत असल्यामुळे, कोणत्याही रीतीने त्या स्थितीत बदल करू पाहणाराचा ते द्वेष करतात, आणि त्यांचे श्रम निष्फळ होण्याचा आपल्याकडून होईल तेवढा प्रयत्न करतात. अशा नित्य कलहामुळे समाजातील अवयवाचे प्रथम दोन स्थूल विभाग होतात; एक पुराणप्रियांचा व दुसरा सुधारकांचा. पुढे दुसऱ्याचे दोन पोटभेद होतात; एक बोलक्या सुधारकांचा व दुसरा वागत्या सुधारकांचा. ज्या वेळेस काही केले तरी समाजातील बहुतेक लोक चांगल्या गोष्टीचा विचार करावयाचे नाहीत– इतकेच नाही, तर जो ती करण्यास प्रवृत्त होईल त्याचा ते छळ करण्यासही सोडीत नाहीत, अशी स्थिती असते, त्यावेळेस बहुधा अनेक प्रकारचे हाल व जाचणुकी सोसून व गरज पडल्यास निराळी जात करून घेण्यास किंवा मरण्यासही तयार होऊन, आपल्या विचाराप्रमाणे आचरण करण्यास प्रवृत्त होणारे मताभिमानी सुधा-

रक फार निघतात. आजपर्यंत नवीन धर्मपंथाचे जे स्थापक झाले आहेत, त्यांचा इतिहास बहुधा अशा प्रकारचा आहे. साक्रेतीस, बुद्ध, महंमद, ख्रिस्त, ल्यूथर, राममोहन किंवा दयानंद यांपैकी लहानमोठ्या प्राचीन किंवा अर्वाचीन पाहिजे त्या महापुरुषाचे चरित्र घ्या, त्यावरून असे दिसून येईल की, ज्या सुधारणा झाल्याच पाहिजेत असा त्यांच्या मनाचा दृढ ग्रह झाला होता, त्या सुधारणांस तत्कालीन बहुजनसमाज अत्यंत प्रतिकूल असल्यामुळे, एक तर आपला हेका आपण सोडावा, किंवा लोक जेवढा त्रास देतील तेवढा सहन करण्यास तयार होऊन आपला हेका आपण चालवावा– याशिवाय त्यांना दुसरा मार्गच नव्हता. अशा स्थितीत लोकांच्या निष्ठुर दुराग्रहामुळे सुधारकांच्या अंतःकरणांत पेटलेली ज्वाला लोकांच्या उपरोधक फुंकरांनी न विझता अधिक जोराने भडकू लागते, आणि ती त्या सुधारकांस मनाप्रमाणे आचरण करू लागल्याशिवाय चैन पडू देत नाही. मनाची अशी अवस्था झाली असता, विचाराप्रमाणे न वागण्यापेक्षा लोकांनी केलेला छळ सोसणे, हेच अधिक सह्य व सुखावह वाटते, आणि म्हणून अशा काळात वागते किंवा करते सुधारक निपजतात.

परंतु ज्या वेळेस ज्ञानप्रसारामुळे किंवा दुसऱ्या कोणत्याही कारणामुळे लोकांची दुराग्रहबुद्धी किंचित शिथिल झालेली असते, व चर्चा केल्याने, समजुतीच्या दोन गोष्टी बरेच दिवस सांगत राहिल्याने, आणि अशाच प्रकारचे सामोपचाराचे दुसरे उपाय केल्याने ते आपणांस हळूहळू हवे तसे वागू देतील इतकेच नाही, तर आपले अनुकरणही करू लागतील, अशी चिन्हे दिसत असतात, त्या वेळेस लोकांपासून तुटून निघून किंवा त्यांचे यथेच्छ ‘ छी थू’ करून घेऊन, आपली जात निराळी करण्यास किंवा लोकांशी रक्तस्रावाचे रण माजविण्यास प्रवृत्त होणारे सुधारक निघत नाहीत. तात्पर्य, अशा दोन प्रकारच्या सुधारकांचे दोन वर्ग निघण्याच्या विशिष्ट वेळा आहेत. सध्या आमच्या देशात विशेषतः बोलके सुधारकच निघण्याची वेळ आहे; म्हणून जे बोलके सुधारक आहेत त्यांस सुधारणानिंदकांनी किंवा वागत्या किंवा करत्या सुधारकपणाची फुकट ऐट मिरविणारांनी “ तुम्ही करून किंवा वागून का दाखवीत नाही ? स्वतंत्र जात का करीत नाही ? ” असले अडाणीपणाचे प्रश्न विचारू नयेत ! फार कशाला ? तुमच्या वागत्या किंवा

करत्या **टिळकसुधारकाचेच** उदाहरण घ्या. ज्याने उपप्रतिसूचनेत १६ वर्षांच्या आत मुलीचे लग्न करू नये, व प्राप्तीचा एकदशांश सार्वजनिक कामाकडे द्यावा, अशी कलमे घातली त्यालाच त्यासंबंधाने साक्षात काही करण्याच्या हेतूने लोकांपुढे येण्याची बुद्धी झाली, तेव्हा सोळाचा आकडा चौदावर, व एकदशांशाचा एक विसांशावर आणून ठेवणे जरूर आहे, असे वाटले किंवा नाही ते पहा ! तसेच, अशा रीतीने स्थापलेल्या मंडळीपैकी कोणत्याही इसमाने प्रतिज्ञाभंग केला असता त्याला दंडण्याकरिता सरकारी मदत घेणे अवश्य आहे, असे वाटले किंवा नाही तेही पहा ! तात्पर्य, या वागत्या किंवा करत्या **सुधारकांस** प्रत्यक्ष क्रियेचा विचार मनात आणिल्या-बरोबर जर इतकी पीछेहाट करावी लागली, व " विधी, विकल्प आणि निषेध " या त्रयीचे रडगाणे गावे लागले, तर यासंबंधाने खरोखरीच काही करून दाखविण्याचा प्रसंग आला असता, बोलक्या सुधारकांप्रमाणे हे **दहा-सोळा** किंवा **अकरा-सतरा** तरी कबूल करतील किंवा नाही, याची मोठी शंका आहे ! व अशी शंका येण्यास थोडासा आधारही झाला आहे. कारण चौदा म्हणजे संपूर्ण तेरा असा अर्थ आधीच निघू लागला आहे, असे ऐकतो ! तेव्हा या कालात बोलक्या सुधारकांची आणि पोकळ डौलाखातर स्वतः वागते **सुधारक** म्हणवून घेणारांची वास्तविक स्थिती एकच आहे, असे म्हणण्यास हरकत दिसत नाही.

आता सुधारणानिंदकांकडे किंचित वळू. यांची गतही पहिल्या दोघां-प्रमाणेच आहे. हे आपल्या बोलण्याच्या ऐटीत आपण समाजाचे स्थिरस्थाणू आहो, समाजास कल्याणकारक गोष्टी कोणत्या त्या आपणांसच समजतात, व त्यांचे संरक्षणकर्ते आपणच आहो, अशी आपल्या मनांतल्या मनांत व उघडपणे फुशारकी मिरवीत असतात. पण ज्याप्रमाणे पंचाक्षऱ्याने भारलेले भूत त्याच्या पाठीमागे, आरडाओरड करीत का होईना, पण कसेतरी जातच असते, व त्याला वाटेल त्याप्रमाणे वागत असते, त्याप्रमाणे इंग्रजां-सारख्या परक्या लोकांचा अंमल; सुधारणाविषयक त्यांचे विचार; त्यांकडून आम्हांस मिळत असलेले शिक्षण; कामाधामाच्या निमित्ताने प्रत्येक दिवशी त्यांशी होत असलेला व्यवहार; त्यांनी आपल्याबरोबर इकडे आणिलेल्या नाना प्रकारच्या यांत्रिक सुधारणा आणि स्थानांतराची साधने-वगैरे गोष्टींना

पंचाक्षऱ्याच्या मंत्राप्रमाणे भारून टाकलेला आमचा सुधारणानिंदकगण डॉक्टरांची औषधे निःशंकपणे घेऊन अप्रत्यक्ष रीतीने मदिरा सेवन करीत आहे, आगगाडीत व आगबोटीत प्रवास करताना हव्या त्या जातीच्या लोकांशी चिकटून बसून जातीचे पाश शिथिल करीत आहे, साहेब लोकांशी नित्य 'शेक हॅन्ड' करून किंवा त्यांच्या टेबलांपाशी खरडे घाशीत बसून पाहिजे तसला विटाळ प्रतिदिवशी घरी आणीत आहे, आगगाड्यांच्या किंवा आगबोटींच्या वेळा साधण्यासाठी आणि लांबीचे प्रवास झपाट्यासरशी उरकून घेण्यासाठी स्नानसंध्येचा प्रत्याहार करीत आहे किंवा तीस कधी कधी मुळीच फाटा देत आहे, वर्तमानपत्रांत किंवा इतर ठिकाणी होत असलेल्या चर्चेमुळे न कळत लग्नाचे वय हळूहळू वाढवीत आहे, स्त्रीस अधिकाधिक स्वातंत्र्य देऊ लागला आहे, स्वेच्छेविरुद्ध धर्मविनाशक शाळांत आपली मुले पाठवीत आहे, कामकाजाच्या संबंधाने हव्या त्या जातीच्या लोकांशी स्नेह व व्यवहार करीत आहे, श्राद्धश्रावण्यादि धर्मकर्मांपासून काहीतरी प्राप्ती व्हावी, येवढ्यासाठी सुधारकांच्या तब्यतीप्रमाणे हव्या त्या कलावर नेत आहे, व कधी कधी त्यांचेकडून काही कामे करून घेण्यासाठी आपले हेके सोडीत आहे, हे त्याचे लक्षात न यावे, व जे लोक जाणूनबुजून अमुक सुधारणा केल्याच पाहिजेत असे उघडपणे प्रतिपादीत आहेत, किंवा त्या स्वशक्तीप्रमाणे अमलात आणीत आहेत, त्यांची थट्टा करण्यात त्याने प्रवृत्त व्हावे हे आश्चर्य नव्हे काय? अथवा यात आश्चर्य तरी कसले? अंतर्दृष्टी करून न पाहणाऱ्या अज्ञ जनांनी असे वागणे व बोलणे हेच त्यांस उचित आहे. त्यांच्या स्थितींत जे अंतर पडत आहे ते त्यांना न समजता घडत असल्यामुळे आपली स्थिती कायमच आहे, असे त्यांस वाटणे, हे फार स्वाभाविक आहे! पण हा त्यांचा भ्रम आहे, हे कोणाही समंजस पुरुषाच्या लक्षात सहज येण्यासारखे आहे. या सुधारणानिंदकांचा आणखी एक असा भ्रम आहे की, **बोलके सुधारक** काय ते अलीकडेच दृष्टीस पडू लागले आहेत. पण खरी गोष्ट तशी नाही. सुधारकांची ही जात पूर्वीपासून आहे! उदाहरणार्थ, आपले पुराणिक, हरिदास, भिक्षुक, कर्मठ शास्त्री, जोशी किंवा अशाच प्रकारच्या दुसऱ्या कोणत्याही वर्गातील लोक घ्या. लोकांस धर्मोपदेश करावा, त्यास नीती पढवावी, व स्वतःच्या पवित्र व शुद्ध आचरणाने लोकांस

उदाहरण घालून द्यावे–हे या पूर्वपद्धतीच्या सुधारकांचे कर्तव्य होय. पण हे कर्तव्य नीट बजावणारे असले किती सुधारक निघतील बरे ? स्त्रियांस मंत्रोपदेश करण्याच्या निमित्ताने त्यांस व्यभिचारपंकात गूढ गोवून टाकणारे, पोथीपुढे ठेवलेल्या तांदुळाचे गाठोडे बाजारी अंगवस्त्राच्या घरी नेऊन सोडणारे, लोकांस नीतीच्या व निर्लोभाच्या गोष्टी सांगून घरातल्या घरात किंवा परक्याच्या घरी हवा तसला अनाचार करणारे, किंवा पैशासाठी प्राण सोडणारे, अथवा भस्माचे लांबलचक पट्टे, मुद्रांचे छाप, दर्भाच्या मुष्टी, शालजोड्यांचे लपेट, रेशीमकाठी धोतरांच्या निऱ्या, रुद्राक्षाच्या व स्फटिकांच्या माळा, टाळ व करताल इत्यादि वाद्ये, नाना प्रकारची भजने व नाच व गीत, व जीवात्मा आणि परमात्मा यांतील भेदाभेदांविषयी कधी कधी समजणारी व कधी न समजणारी चर्चा इत्यादि धार्मिकपणाच्या दिखाऊ साधनांनी बायाबापड्यांस व अज्ञ पुरुषांस बुचाडणारे पहिल्या चालीचे दुर्वृत्त दांभिक सुधारक काय थोडे आहेत ! पण त्यांना शेणमार करण्याची, अपंक्त करण्याची, किंवा अलीकडील बोलक्या सुधारकांवर जी वाक्यशरांची वृष्टी होत असते तशा प्रकारची वृष्टी त्यांवर करण्याची इच्छा कधी कोणास झाली आहे काय ? कधी नाही. कारण चांगली गोष्ट हातून प्रत्यक्षपणे न घडली तरी ती सांगत फिरणे हा काही दोष नाही, असा मनुष्याचा पक्का समज होऊन गेला आहे, असे त्यांच्या अशा प्रकारच्या आचरणांवरून उघड होते. तेव्हा सुधारणानिंदकांनी सध्याच्याच बोलक्या सुधारकांवर इतके तुटून पडणे शुद्ध वेडेपण होय. वाद करता करता ज्या चांगल्या गोष्टी ठरतील त्यांचा अंगीकार त्यांच्याकडूनचसा काय, खुद्द सुधारणानिंदकांकडूनही हळूहळू होत जाईल, अशी आमची खात्री आहे !

**गोपाळ गणेश आगरकर**

# आणखी एक शहाण्याचा कांदा

मि. अशबर्नर हा गृहस्थ या इलाख्यातील मुलकी खात्यात तीस वर्षांहून अधिक वर्षे नोकरीस होता. असिस्टंट कलेक्टरच्या जागेपासून कौन्सिलदाराच्या जागेपर्यंत ज्याने लहान मोठ्या साऱ्या हुद्यांची कामे केली, व त्या कामांच्या निमित्ताने नेटिव्ह लोकांशी ज्याचे संघटन नित्य घडत असे, त्याने आपल्या तीस वर्षांच्या अनुभवावरून व माहितीवरून " हिंदू विधवा सनदी स्वेच्छाचारिणी असतात " असे आपले मत ( न्याशनल रिव्ह्यूमध्ये ) स्पष्टपणे ठोकून दिले आहे ! तेव्हा ज्याने इतकी वर्षे येथे काढलेली नाहीत, ज्याला आपल्या विशेष तऱ्हेच्या कर्तव्यामुळे हिंदू लोकांच्या भेटी वारंवार घेता आल्या नाहीत, व ज्याला वाचण्याचा किंवा लिहिण्याचा विशेष नाद असण्याचा संभव नाही, अशा एखाद्या लष्करी लढवय्याने जर असा अभिप्राय दिला की, बहुतेक हिंदू स्त्रिया पातिव्रत्यपराङ्मुख आहेत, तर त्याबद्दल त्याला काय म्हणावे ? दुसरे काय म्हणावयाचे ? अशा बृहस्पतीच्या तोंडातून पडलेल्या शब्दकुसुमांचा दुर्गंध दुःसह झाल्यास, ती तिरस्काराच्या उकिरड्यावर फेकून द्यावी, आणि स्वस्थ बसावे, हेच योग्य आहे ! पण जर त्या ठिकाणाहूनही त्याचा किळस आणणारा दर्प घरात भरू लागला तर तो नाहीसा करण्यासाठी ज्याप्रमाणे वाख्याची साथ आली असता शहरसफाई ठेवणारे म्युनिसिपॅलिट्यांचे अधिकारी रस्तोरस्ती रोगविनाशक तांबडी पूड टाकीत जाऊन तीवर संसर्गप्रतिरोधक अशा एका प्रवाही द्रव्याचे प्रोक्षण करितात, त्याप्रमाणे त्यावर टीकारूप दुर्गंधविध्वंसक द्रव्याचे सिंचन केले पाहिजे; दुसरा उपाय नाही !

लॉर्ड वुइलियम बेंटिंक याचे कारकीर्दीत कॅप्टन **ऑगस्टस वुइलर्ड** म्हणून एक उत्तर हिंदुस्थानात लष्करी अधिकारी होता. याच्या ग्रंथावरून त्याला गाण्याचा शोक फार असावा असे दिसते. याने आमच्या गायनशास्त्राविषयी जो अभिप्राय दिला आहे त्यावरून त्याची शोधकबुद्धी व्यक्त होते. इतकेच नाही; तर त्याला आपल्या गाण्याचे मर्महीी बरेच समजले होते असे दिसते. याने आमच्या गायकांविषयी, वाद्यांविषयी व संगीतकलेविषयी जे लिहिले आहे ते वाचून त्याविषयी आपल्या अंतःकरणात कृतज्ञता उत्पन्न झाल्याखेरीज राहणार नाही. पण तो येवढेच करून स्वस्थ बसला नाही, हे फार वाईट झाले. '**हिंदुस्थानचे संगीत**' या नावाच्या ग्रंथात त्याला आमच्या गाण्याविषयी जे लिहावेसे वाटले ते लिहून गेल्यावर, अनेक संगीतांच्या भाषांतरापासून आमच्या जुन्या चालीरीती कशा प्रकारच्या असाव्या, याचे अनुमान करण्याचा प्रयत्न त्याने केला आहे व त्यात तो अगदी फसला आहे. कोणत्याही देशातील लोकांच्या काव्यावरून किंवा तालसुरात बसविलेल्या पद्यांवरून त्या लोकांच्या नीतिविषयी, विशेषतः लिंगविषयक नीतिविषयी, अभिप्राय देणे मोठे साहस होय, असे आम्हांस वाटते. कारण 'शृंगार' हा काव्याचा प्रधान विषय असल्यामुळे, आणि अतिशयोक्ती हा काव्यरसात्मा होऊन बसल्यामुळे, काव्यांतर्गत स्त्रीपुरुषांच्या उद्गारांवरून कोणत्याही लोकांच्या नीतिमत्तेविषयी अटकळ करू गेल्यास तीत प्रमाद होण्याचा फार संभव असतो. '**मिस्टरीज ऑफ धी कोर्ट ऑफ लंडन**' या रेनॉल्डकृत ग्रंथमालिकेवरून इंग्लिश लोकांच्या नीतिविषयी मत देणे न्याय्य होईल काय ? संभावित इंग्लिश लोक उघडपणे ही कादंबरी वाचीत नाहीत. व लोकांच्या दृष्टीस पडतील अशा ठिकाणी तिची 'व्हाल्मे' ठेवीत नाहीत; कारण बीभत्स शृंगार त्यांत ओतप्रोत भरला आहे, असे सांगतात! तेव्हा ज्याप्रमाणे **मिस्तरीची** पुस्तके आंग्ल नीतीवर निबंध लिहिण्यास बसले असता आधारभूत मानता येणार नाहीत, त्याप्रमाणेच उत्तर हिंदुस्थानातील हिंदू व मुसलमान गवय्ये आणि नायकिणी ज्या चिजा गातात किंवा वाजवितात त्यांवरून हिंदू लोकांच्या नीतीचे प्रमाण बांधिता येणार नाही. पण असे करण्याचे धाडस आमच्या आजच्या निबंधाच्या नायकाने केले आहे. व ते आमच्या मते अगदी चुकले असल्यामुळे या निबंधाच्या

शिरोभागी आम्ही त्यास **आणखी एक शहाण्याचा कांदा** असे म्हणून **अशबर्नरसाहेबांच्या** पंक्तीस त्यास बसविले आहे. आमच्या संगीत शास्त्रातील स्वररचनेविषयी व स्वरमेळाविषयी जे म्हणावयाचे होते ते म्हटल्यावर, या ग्रंथकर्त्याने आपले मन गीतांच्या किंवा चिजांच्या अर्थात घातले, व तसे केल्याबरोबर त्याच्या लेखणीस स्फुरण येण्यासारखा नवीन विषय त्याचे हाती लागला ! अनेक चिजांच्या अर्थांचे मंथन केल्यावर आमच्या संगीतात बहुधा ज्या गोष्टींचा अंतर्भाव केलेला असतो असे त्याच्या नजरेस आले, त्या ह्या होतः—

१. अनुकूल होण्याविषयी वल्लभाची प्रार्थना.

२ वल्लभाच्या विरहामुळे कामिनीस होणारा शोक.

३ प्रतिस्पर्धिनी कामिनीविषयी द्वेषोद्गगार.

४ सासू, नणंदा, किंवा जावा यांचा डोळा चुकवून प्राणेशाची मुलाखत घेण्याची पंचाईत, व मेखलातील क्षुद्रघंटांच्या आवाजामुळे कोणास समजू न देता घरातून बाहेर पडण्याची, किंवा रस्त्यातून जाण्यायेण्याची अडचण.

५ दयितावर ठेवलेल्या प्रेमास सासू व नणंदा यांकडून होणाऱ्या प्रत्यूहाच्या संबंधाने कामिनीचे दुःखोद्गार.

६ सखीपाशी हितगुजाच्या गोष्टींचे कथन, आणि इष्ट मनोरथ पूर्ण करण्याच्या कामी तिने साहाय्य करावे यासाठी तिची विनवणी.

७ संकेत चुकू न देण्याविषयी व प्रेमबंध शिथिल न होऊ देण्याविषयी सख्यांचा उपदेश.

हे आमच्या संगीतपयाच्या मंथनापासून **वुइलर्ड** साहेबांनी काढलेले सार-किंवा नवनीत ! कदाचित हे त्यांस स्वल्प आयासाने काढिता आले असले, असे वाचकांस वाटण्याचा संभव आहे. पण तसे बिलकूल झालेले नाही. ते काढताना त्यांस भगीरथ प्रयत्न करावा लागला. हिंदू लोकांच्या गाण्यांतच असे विषय येतात, किंवा आशिया खंडातील इतर लोकांच्या गाण्यांतही अशाच विषयाचा भरणा आहे, अशी शंका त्यांस उत्पन्न होऊन, अरबी

व फारशी चिजांकडे त्यांनी आपली नजर फेकली, व त्यांवरून त्यांस असे दिसून आले की, हिंदुस्थानातील स्त्रियांप्रमाणे अरबी स्त्रियांवर मदनाच्या बाणांचा प्रहार होत नसल्यामुळे, त्यांना वश करण्यासाठी अरबी पुरुष नेहमी उत्कंठ झालेले असतात, व म्हणून अरबी काव्यात जागोजाग पुरुष स्त्रियांची विनवणी करीत आहेत असे दिसून येते ! फारशी किंवा परशिअन काव्यात भलताच प्रकार दिसून येतो. त्यात स्त्रीपुरुषांतील प्रेमास दुय्यम स्थान देऊन, जेथे तेथे पुरुषाभिलाषाचाच उल्लेख केलेला आढळतो. या अमानुष अनुच्चारणीय पापाची आसक्ती या लोकांस कशी लागली असेल ती असो; हे खरे आहे की, यांच्या काव्यात या दुष्ट व्यसनासच आद्यपद दिले आहे ! हिंदूंच्या कवितेत अरबी कवितेचा व्युत्क्रम आढळतो. हिंदूंच्या संगीत पद्यावरून हिंदू स्त्रिया अत्यंत कामातुर आहेत व इष्ट पुरुषास वश करण्याच्या इराद्याने त्या नाना प्रकारचे उपाय योजीत आहेत, असे दिसून येते !

याप्रमाणे हिंदुस्थानातील नायकिणींच्या तोंडी असलेल्या चिजांच्या अर्थावरून आमच्या बायकांस कामातुर ठरविल्यावर त्या इतक्या कामातुर कशामुळे होतात, याचा छडा काढण्याकडे **वुइलर्ड** साहेब वळले, व त्या कामित्वाची त्यांनी जी तीन कारणे शोधून काढली ती हीः— १ हिंदुस्थानातील पूर्वीची अनवस्था; २ अनेक बायका करण्याची चाल; व ३ हिंदू स्त्रियांचे अज्ञान. या तीन कारणांमुळे पूर्वी हिंदू स्त्रिया कामातुर होऊन व्यभिचार करण्यास प्रवृत्त होत, असे **वुइलर्ड** साहेबांचे म्हणणे आहे !

हिंदुस्थानच्या सांप्रत स्थितीवरून त्यांच्या पूर्वस्थितीचे अनुमान करणे फार चुकीचे होणार आहे, असे या गृहस्थांचे म्हणणे आहे. ती पूर्वस्थिती बरोबर लक्षात येण्यास सध्या डोळ्यांपुढे ज्या गोष्टी दिसतात त्या अगदी विसरून गेले पाहिजे व इतिहासापासून, काव्यापासून, व इतर ग्रंथांपासून जी माहिती मिळते तीवरून, तत्कालीन स्थितीचे चित्र काढण्याचा प्रयत्न केला पाहिजे; जे कोणी अशा प्रकारचा प्रयत्न करतील त्यांस असे दिसून येईल की, त्या वेळची हिंदुस्थानची स्थिती फारच शोचनीय होती. आताप्रमाणे तेव्हा कोठेही शांतता दृष्टीस पडत नसे; एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पायवाटांनी जावे लागे; साऱ्या देशात चार-दोन देखील मोठ्या सडका नव्हत्या; मार्गात चोरांचे भय मोठे असे; रस्ते

सापडण्याची मारामार पडे; वाटेत भेटेल त्यास रस्ता विचारून पुढे चालू लागावे तर कदाचित त्याच्या सांगण्यावरून चोराच्या हातांत आपण होऊन पडू की काय, अशी दहशत वाटत असे; जिकडे तिकडे दाट झाड्या, ओसाड राने किंवा चिखलाच्या दलदली असत, व त्यांत भयंकर श्वापदे संचार करीत असत; त्यामुळे कोणालाही आपला गाव सोडून एकट्या दुकट्याने फार लांब जाववत नसे. रात्री प्रवास करणे बहुधा अशक्यच असे; ज्याप्रमाणे जमिनीवरचा त्याप्रमाणे पाण्यावरचा प्रवासही अत्यंत संकटवह असे; अशा स्थितीत दूरचा प्रवास करावयाचा म्हटला म्हणजे त्याचे बेत पूर्वी वर्ष दोन वर्षे चालत; व तो करण्याकरिता निघण्याचा प्रसंग येऊन ठेपला म्हणजे कुटुंबांतील माणसांत, विशेषतः ज्या तरुणींचे पती प्रवासास निघालेले असत, त्यांच्या अंतःकरणांत दुःखाचा अनिर्वाच्य कल्होळ होत असे.

अशा रीतीने प्रवास करण्यासाठी घर सोडून गेलेल्या तरुणांच्या तरुण पत्न्या चिंतेने व विरहव्यथेने व्याकुळ होत्सात्या मोठ्या कष्टाने आपले दिवस कंठीत. त्यांच्या नणंदा व जावा सकाळी उठून वेणीफणी करीत आहेत, दागदागिने घालीत आहेत, व एकमेकींचा विनोद करीत आहेत हे पाहून या विरहव्यथेने पीडलेल्या तरुणींना फार खेद होत असे. तथापि ब-याबाईटाने आपला दिवसाचा वेळ कसा तरी काढीत. पण रात्र येऊन जिकडे तिकडे सामसूम झाले व त्या आपल्या आंथरुणावर पडल्या म्हणजे पतिचिंतेत त्या इतक्या व्यग्र होऊन जात की, उभ्या रात्रीत त्यांचा डोळा लागत नसे. अशा स्थितीत उन्हाळा गेल्यावर पावसाळ्याच्या आरंभास तरी आपले पती परत येतील, आणि आपली त्यांची गाठ पडून आपणांस आनंदाचा दिवस दिसेल, अशा आशेवर त्या वसंत व ग्रीष्म ऋतूंतील अत्यंत प्रखर दिवस व रमणीय रात्री मोठ्या कष्टाने लोटीत असत. हे ऋतू निघून जाऊन पावसाळ्याच्या आरंभास त्यांचे पती परत आले तर सारे ठीकच असे, पण दुर्दैवाने जर तसे घडले नाही, तर मात्र त्यांच्या दुःखास व चिंतेस पारावार नसे. याप्रमाणे अनेक वर्षे वाट पाहिल्यावर, पती परत येत नाहीत, असे पाहून कामाग्नीने करपून गेलेल्या या तरुणींची काय अवस्था होत असेल याची वाचकांनीच कल्पना करावी. अशा संकटात सापडलेल्या तरुण कन्यका अखेरीस निराश होऊन वाकडे पाऊल टाकण्यास तयार होत, आणि

सखीच्या साह्याने संकेतस्थानी पाहिजे तसले धाडस करून वल्लभांच्या गाठी घेत आणि अप्रशस्त रीतीने आपले मनोरथ पूर्ण करीत, अशी वस्तुस्थिती अनेक कुटुंबांत दृष्टिगोचर होत असल्यामुळे तिचे प्रतिबिंब तत्कालीन काव्यांत व संगीतात पडले आहे, असे **वुइलर्ड** साहेबांचे म्हणणे आहे.

याशिवाय आम्हांत रूढ असलेले बहुपत्नीकत्व हे आमच्या स्त्रिया व्यभिचारी असण्याचे दुसरे कारण आहे, असे या गृहस्थाचे मत आहे, व ते काही खोटे नाही. **एका पुरुषा दोघी नारी। पाप वसे ज्याचे घरी॥** ही तुकारामोक्ती जर आमच्या लोकांस मान्य असेल तर एकाच पुरुषाने तीन किंवा चार बायका करण्याची चाल ज्या वेळी रूढ असेल त्या वेळेस प्रत्येक स्त्री आपल्या पतीचे सारे प्रेम आपणावर असावे म्हणून खटपट करीत असल्यामुळे, सापत्नमत्सर विकोपास जाऊन कुटुंबातील शांततेचा नाश होत असेल, इतकेच नाही, तर ज्या दुर्दैवी तरुणी आपल्या पतींच्या नजरेतून उतरल्या जात असतील त्यांचे मन त्यांच्या संसाराकडे न लागता बाह्यसुखाकडे जाऊ पाहत असेल, असे मानण्यास काय हरकत आहे?

व्यभिचाराचे तिसरे कारण आमच्या स्त्रियांचे अज्ञान होय, असे हे साहेब म्हणतात, व त्याविषयी आम्हांस थोडी शंका आहे. ज्ञान आणि सद्‌गुण यांचा अन्योन्य संबंध कितपत आहे, हे अद्यापि चांगलेसे ठरलेले नाही. ज्ञानाचा प्रसार झाल्याने खून, दरवडे, मारामाऱ्या वगैरे मोठमोठ्या गुन्ह्यांची संख्या कमी होते, असे पुष्कळ विचारी लोक कबूल करतात. पण खोटे बोलणे, बनावट कागद करणे, खोट्या साक्षी देणे, चतुराईने दुसऱ्यास फसविणे, लाच खाणे, व्यभिचार करणे, खोट्या शपथा घेणे वगैरे कमी दुष्टपणाचे गुन्हे वाढतात किंवा कमी होतात याविषयी जितका संशय ॲरिस्टॉटल यांस होता तितकाच हर्बर्ट स्पेन्सर यांसही आहे. तेव्हा अज्ञानामुळे आमच्या स्त्रिया विशेष व्यभिचारी होत्या, व आता त्यांस थोडेबहुत लिहिता वाचता येऊ लागले आहे, म्हणून आमच्यांतील व्यभिचार कमी होऊ लागला असला पाहिजे, असे जर कोणी इंग्रज आम्हांस सांगू लागेल तर त्याचे आम्हांस हसू आल्यावाचून राहणार नाही! कोणत्याही देशातील लोकांनी दुसऱ्या देशातील लोकांस व्यभिचारी ठरविण्याचे धाडस करू नये,

म्हणून आम्ही इंग्लिश लोकांच्या व्यभिचाराविषयी काही एक म्हणत नाही; तथापि जर ते आपण होऊन तो दोष आमच्या स्त्रियांवर अविचाराने आणू लागतील, तर तुमच्या मडमांनी आमच्या स्त्रियांचे तीर्थ घेऊन त्या पापापासून मुक्त व्हावे इतक्या त्या पवित्र आहेत, असे म्हणण्यास आम्ही कधीही सोडणार नाही ! हिंदुस्थानातील स्त्रियांच्या पातिव्रत्याइतके शुद्ध पातिव्रत्य बहुधा दुसऱ्या कोणत्याही देशात सापडणार नाही.

◎ ◎ ◎

अच्युत बळवंत कोल्हटकर

# हे तात्या आणि हे तात्या

यंदाच्या पुणे येथील साहित्य संमेलनास उद्यापासून सुरुवात होणार असून त्याची विशेष गोष्ट अशी आहे की महाराष्ट्रातील दोन तात्या त्यात प्रमुखत्वेकरून चमकणार आहेत. ह्यांपैकी श्री. श्रीपाद कृष्ण उर्फ तात्यासाहेब कोल्हटकर हे साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष आहेत व श्री. नरसिंह चिंतामण उर्फ तात्यासाहेब केळकर हे साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष आहेत.

तात्या हे नाव महाराष्ट्रास अगदीच अपरिचित नाही. स्वतःच्या मुख्य नावापेक्षा घरगुती नावाने प्रसिद्ध असणाऱ्या पुरुषांत नाना फडणीस हे प्रमुखच म्हटले पाहिजेत ! त्यांच्या घरगुती नावाने ते एवढे प्रसिद्धीला पोचले की नाना हे त्यांचे मूळ नाव नव्हे असे कोणाला सांगितले तर पुष्कळ वेळा ते खरे देखील वाटत नाही. ह्या नाना फडणीसांच्या कारकीर्दीत व त्यांना अत्यंत साहाय्यभूत असे दुसरे पुरुष म्हणजे हरिपंत तात्या फडके झाले ! महाराष्ट्राला अतिशय आवडते असे हे तात्या होते.

नानांत नाना फडणीस नाना
इतर नाना करिती तनाना

ह्याप्रमाणे खडबडीत पण व्यावहारिक कवन करून नाना फडणीसांची स्तुती गाणारा ज्या वेळी एक गुणग्राहक निघाला, त्या वेळी तात्यांचाही एक गुणग्राहक त्यांची प्रसिद्धी करायला तयार झाला. त्याने हरिपंत तात्यांना उद्देशून म्हटले की,

तात्यांत तात्या हरिपंत तात्या
इतर तात्या करिती चपात्या

आणि हरिपंत तात्यांसंबंधाने हं जे म्हणण्यात आले ते आजतागाईत श्रीपाद कृष्ण उर्फ तात्यासाहेब कोल्हटकर ह्यांच्यासंबंधानेही खरे आहे. मराठीत आजपर्यंत अनेक नाटककार होऊन गेले व पुढेही होतील! पण ह्या सर्व नाटककारांतील श्रीपाद कृष्णांची श्रेष्ठता अजूनही इतकी अबाधित आहे की, त्यांचेपुढे इतर सर्व नाटककार 'करिती चपात्या' असे म्हटले तर ते अतिशयोक्तीचे होणार नाही!

कै. गडकरी ह्यांनी अलीकडे नाट्यसिंहासनावर उडी मारलेली आहे व राजकीय भाषेत बोलावयाचे म्हणजे सध्या मराठी नाट्यकला गडकरी-राजवटीत आहे असे म्हटले तरी चालेल! गडकऱ्यांनी नाट्यकलेत पाऊल टाकले त्या वेळी किर्लोस्कर-युग संपलेले होते व श्रीपाद कृष्णांचे युग चालू होते. पण गडकऱ्यांनी टिचकीसरशी ते युग बंद केले आणि त्याचे जागी आपली शिक्के–कट्यार सुरू केली. पण जरी ह्याप्रमाणे गडकऱ्यांची साम्राज्यसत्ता सुरू झाली व 'तात्यांच्या नाटकांचा मी सोमवार करीन' ही गडकऱ्यांच्या तोंडी चिकटविलेली उक्ती खरी झाली तरी त्यामुळे श्रीपाद कृष्णांच्या श्रेष्ठतेस बाध आला नाही. किंबहुना ह्या पराभवामुळे श्रीपाद कृष्णांची श्रेष्ठता जास्तच वाढली! कारण गडकरी हे श्रीपाद-कृष्णांचे शिष्य होते. गडकऱ्यांचे युग म्हणजे एक प्रकारे पेशवाईची स्थापना होती. ह्या सत्तास्थापनेमुळे नाट्यराजकारणाचे केन्द्र जरी बद-लले तरी गादी कायम राहिली, मुजरा कायम राहिला.

आणि मुजरा कायम राहिल्यामुळेच श्रीपाद कृष्णांचे नाट्याधिष्ठान अजून कायम राहिलेले आहे! गडकरी पंथाचे ते प्रणेते आहेत–नावीन्याचे ते नायक आहेत–विनोदाचे ते विनायक आहेत! त्यांच्याइतका स्वाभाविक परिपोष कुणालाही साधत नाही! डायऱ्या आणि टाचणे ह्यांच्या मुंडावळ्यांशिवाय लिहिता लिहिता सहज सुचलेल्या साहित्यसाजाने नाट्य-भाषेला सजविणारा भाषासुवर्णकार जर कोणी असेल तर एकच श्रीपाद कृष्ण कोल्हटकर हे होत!

एवढेच की श्रीपाद कृष्ण कोल्हटकर हे आज चलनी नाणे ( Current coin ) नाहीत. आजकालचे चलनी नाणे म्हणजे खाडिलकर, वरेरकर, शुक्ल हे होत! श्रीपाद कृष्ण म्हटले म्हणजे काहीतरी जुनी मोहोर आपण वापरीत आहोत, काहीतरी जुनी बातमी आपण वाचीत आहोत असे वाटते. आबासाहेब म्हाळस, विनायक कोंडदेव, भालचंद्र कृष्ण वगैरे शब्द उच्चारल्याबरोबर जसा एकदम जुनेपणाचा भास होतो, त्याप्रमाणे श्रीपाद कृष्ण म्हटले म्हणजे मागे उलटलेले पृष्ठ ( Back Page ) आहे असे आपल्याला वाटते.

पण त्याचे कारण हेच की तात्यासाहेब हे सध्याच्या जगाशी जितके समरस असायला पाहिजेत तितके नाहीत! ते एल्एल्. बी. होऊन वऱ्हाडात शिरले. ते जिथे होते तेथेच राहिले. त्यांची सृष्टी म्हणजे तीस वर्षांपूर्वीची सृष्टी! ह्या ३० वर्षांत जी घडामोड झाली ती त्यांच्या अंगावरूनही गेली नाही व त्यांना जाणवलीही नाही! निजकोशात तल्लीन असलेला भ्रमर किंवा निजानंदात निमग्न असलेले परब्रह्म-ह्यांना ज्याप्रमाणे जगातील वावटळीचा काहीएक उपसर्ग पोचत नाही त्याप्रमाणे श्री. तात्यासाहेब जगातल्या वावटळीपासून अलिप्त आहेत!

एवढेच काय, अजून त्यांच्या मनाभोवती ३० वर्षांपूर्वीचीच सृष्टी आहे— ३० वर्षांपूर्वीचेच जग आहे! त्यांचे संभाषण ऐकले तरीही पुराणयुगातला हा पुराण-पुरुष आहे असेच वाटते! अजूनही विधवावपनावर बोलताना ते आपल्या अस्सल कोट्या काढतील व पुनर्विवाहाच्या प्रश्नावरून त्यांचा चेहरा जितका गोरामोरा होईल तितका असहकारी किंवा प्रतिसहकारी ह्या शब्दावरून होणार नाही! त्याबद्दलची फारशी माहितीही त्यांना असणार नाही! कारण तात्यासाहेबांचा आणि सध्याच्या जगाचा फारसा संबंध नाही. ना. पटेल जेव्हा इकडे बादशहाची मुलाखत घेत असतील त्या वेळी जिन्याच्या पायऱ्या लक्षात रहायची सोपी युक्ती कोणती ह्याचा विचार तात्यासाहेब करीत असतील आणि ज्या वेळी काँग्रेसच्या वर्किंग कमिटीने आपल्याला फसविले म्हणून ऑल इंडियातील माणसे धुसफुसत असतील त्या वेळी दोन पिढ्यांपूर्वी बाळासाहेब नातूंनी केलेली दंगल आठ-

वून तात्यासाहेब मनात चरफडत असतील की, " हे दुरात्म्या बाळासाहेबा, विविधज्ञानविस्तारात तर चल, म्हणजे तुला दाखवितो ! "

श्रीपाद कृष्ण ऊर्फ तात्यासाहेब ह्यांची अशी अवस्था होण्याचे कारण म्हणजे त्यांचे खेडेगावातील राहणे ! त्यांना रहायला खेडेगावेही अशी इरसाल मिळाली की तेथे चालू धामधुमीच्या फारशा लाटा उठूच नयेत ! वऱ्हाडातील अकोला गावी त्यानी आपला वकिलीचा धंदा सुरू केला व ते अखेरपर्यंत अकोला येथेच असते तर कदाचित अप-टु-डेट राहाते ! पण त्यांनी लवकरच आपले राहणे तेल्हारे गावी नेले, व पुढे खामगावाचा संपर्क होतो न होतो तोच जळगाव-जामोद येथे राहायला गेले ! अर्थात जळगाव-जामोद म्हणजे आधुनिक जगातले टिम्बक्टूच ! ते कुठे आहे म्हणून विचारले तर कुणाला सांगता यावयाचे नाही ! फक्त केव्हातरी व कुठेतरी त्याचे नाव ऐकलेले असायचे !

कुग्रामवासाविषयी एका प्राचीन संस्कृत कवीने आपली नापसंती प्रदर्शित केलेली आहे. ही नापसंती किती सार्थ होती व कुग्रामवासाचे किती शोचनीय परिणाम होतात ह्याचे ढळढळीत उदाहरण बघावयाचे असल्यास श्री. श्रीपाद कृष्ण ऊर्फ तात्यासाहेब होत ! ते जगाच्या मागे राहिले ह्याचे कारण ते चालू जगात कधी राहिलेच नाहीत. ध्रुवस्थान ज्याप्रमाणे जगाच्या गाड्या-भिंगाऱ्यापासून अलिप्त राहून आपल्या श्रेष्ठ दर्जावर गुपचूप बसलेले असते, त्याप्रमाणे श्री. श्रीपाद कृष्ण हे जन-संमर्दापासून अत्यंत दूर अशा आपल्या श्रेष्ठ स्थानावर बसलेले आहेत. जगात असूनही आपण जगात कसे नाही ह्याची त्यांना जाणीवही नाही.

दुसरे तात्यासाहेब म्हणजे श्री. नरसिंह चिंतामण ऊर्फ तात्यासाहेब केळकर. ह्यांची गोष्ट ह्याच्या अगदी उलट आहे. ते आधुनिकांतले आधुनिक आहेत. त्यांच्यात जुनेपाने असे काहीच नाही. व्यासंगाच्या अभावा-मुळे श्री. गंगाधरराव देशपांडे जितके मागे पडले किंवा व्यासंगाच्या एक-देशीयत्वामुळे श्री. शिवरामपंत परांजपे जितके मागे पडले तितकेही तात्यासाहेब केळकर मागे पडलेले नाहीत ! ते अगदी आधुनिकांतले आधुनिक आहेत–, ' मॉडर्नातले मॉडर्न ' आहेत !

दा. क्र. 93513

ह्याचे एक कारण त्यांची चवकस बुद्धी व दुसरे कारण त्यांचा वर्तमानपत्राचा व्यवसाय ! चवकस बुद्धी नसली तर वर्तमानपत्राचा व्यवसाय असूनही खाडिलकरांसारखी माणसे जुनीपुराणी होऊ शकतात आणि वर्तमानपत्रासारखा व्यवसाय किंवा राजकारणाची रोजची उठाठेव नसली तर चिंतामणराव वैद्यांसारख्या चवकस माणसावर देखील जुनेपणाची हिरवी छाया पडायला लागते ! पण तात्यासाहेब केळकरांना दोन्ही आहेत ! त्यांचेजवळ राजकारणाचा रोजचा प्रपंचही आहे व चवकस बुद्धीही आहे–आणि एखाद्या घासलेल्या तरवारीप्रमाणे त्यांची मेंदूची तरतरी चकचक चकाकणारी आहे.

आणि म्हणूनच साहित्यसंमेलनातील दोन तात्यासाहेबांचा संयोग म्हणजे प्राचीन युग व अर्वाचीन युग ह्यांचा संयोग आहे ! कृतयुग जर कलियुगास भेटायला आले किंवा अश्वत्थामा जर ब्रिटिश पलटणीत उभा राहिला तर ज्या प्रकारचा संयोग दिसेल तशा प्रकारचा संयोग ह्या दोन तात्यासाहेबांच्या योगाने साहित्यसंमेलनात दिसणार आहे ! कारण श्रीपाद कृष्ण म्हणजे प्राचीन जग आणि नरसोपंत केळकर म्हणजे वर्तमानपत्राचा ताजा अंक ! मौज पत्राच्या पहिल्या पानावर वेद छापावे किंवा वेदाच्या एखाद्या अध्यायात बालगंधर्वाचे ' लेटेस्ट ' पद आढळावे त्यातीलच हा संयोग होय.

दोघा तात्यासाहेबांत हा जसा एक मोठा फरक आहे. तसा आणखीही एक फरक आहे. दोघेही तात्यासाहेब रसिक आहेत, प्रेमळ आहेत, रंगदार आहेत, रंगेल आहेत– तथापि एकाचे स्वभावात भयंकर लाजाळूपणा आहे आणि दुसऱ्याचे स्वभावात तितकाच ढकलबाजपणा ( pushingness ) आहे ! एकाच्यापुढे पक्वान्नांचे ताट वाढलेले असले तरी दुसरे काय म्हणतील या भीतीने ते जपून खातील तर दुसरे खुलेपणाने पक्वान्नांवर हात मारतील आणि पुन्हा वर असे म्हणतील की, " कायहो, जिलब्याच जिलब्या झाल्यामुळे तोंडाला कशी मिठी बसलेली आहे ! ह्या वेळी जर चार खुसखुशीत भजी असती तर काय बहार झाली असती ! "

किंबहुना तात्यासाहेब केळकरांच्या लोकप्रियतेचे हेच बीज आहे ! ते कुठेही गेले तर मनमोकळेपणाने घरच्यासारखे वागतील आणि लहानांपासून थोरांपर्यंत आवडणाऱ्या प्रत्येक विषयात लक्ष घालतील. तात्यासाहेब कोल्हटकरांचे तसे नाही ! त्यांच्या भोवती नेमकी ३-४ माणसेच आहेत

तोपर्यंत खुलेपणाने बोलतील, पण ज्यास्ती माणसे जमायला लागली की तात्यासाहेबांच्या तोंडाला कुलूप बसलेच. तात्यासाहेबांच्या या संकोचीपणाचे अनेक वेळा सभाभीरुत्वात रूपांतर झालेले आहे! ते जेव्हा सभेत बोलतात, तेव्हा फारच चांगली भाषणे करतात; पण ते सभेत बोलायला येतातच कशाला? येतच नाहीत! त्यांना संकोच वाटतो! ते 'अपसेट' होतात!

साहित्यसभा ही एक शकुंतला आहे अशी जर कल्पना केली तर तात्यासाहेब केळकर व तात्यासाहेब कोल्हटकर हे शकुंतलेच्याबरोबर दुष्यंत राजाच्या राजवाड्यात गेलेले दोन ऋषिकुमार आहेत असे म्हणायला काही हरकत नाही! ह्यांपैकी एकाला सभा आणि थाट व गर्दी म्हणजे अगदी कंटाळा—दुसऱ्याला त्याची अतिशय हौस! त्याला उलट हाच आनंद की शकुंतलेला पोचविण्याच्या डेप्युटेशनवर आपण आलो हे सर्व लोकांना समजावे आणि दुष्यंत राजाशी शेकहँड करायला आपल्याला मिळाले ह्याच्या तारा चोहोकडे जाव्या!

ह्या दोघांच्या स्वभावांतला हा जो फरक त्याचा परिणाम दोघांच्याही आयुष्यांवर झाला! तात्यासाहेब केळकर व तात्यासाहेब कोल्हटकर हे डेक्कन कॉलेजपासून एकमेकांचे मित्र—एकमेकांचे अनुबंधी! दोघांचे सख्य फार, आपुलकीही मोठी. तात्यासाहेब केळकर आणि तात्यासाहेब कोल्हटकर ह्या दोघांनीही डेक्कन कॉलेजमधील संस्कृत मृच्छकटिक नाटकात काम केलेले! तात्यासाहेब केळकर ह्यांनी मदनिकेचे काम केलेले व तात्यासाहेब कोल्हटकर यांनी शकाराच्या विटाचे काम केलेले! डेक्कन कॉलेजातून सुटल्यावर वीरतनय नाटक लिहून तात्यासाहेब कोल्हटकर हे केळकरांच्या अगोदर जगाच्यापुढे आले! अभ्यासाकडे लक्ष देऊन तात्यासाहेब केळकर हे कोल्हटकरांच्या अगोदर एल्‌एल्. बी. झाले. १८९७ साली केसरीत येऊन मिळण्याबद्दल केळकरांनी श्रीपाद कृष्णांना पत्रही लिहिलेले होते.

पण श्रीपाद कृष्णांनी अकोल्याचा मार्ग धरला आणि तेव्हापासून दोघांच्या आयुष्यक्रमांत फरक पडला! श्रीपाद कृष्णांचा जगाशी संबंध सुटत चालल्यामुळे एकएका पावलाने ते जगाच्या मागे पडत चालले आणि रोजच्या जगात धावण्याची आवश्यकता पडल्यामुळे एकएक पाव-

लाने नरसोपंत केळकर जगाच्या पुढे आले! आज संपत्ती, कीर्ती, प्रतिष्ठा, सत्ता ह्या सर्व दृष्टींनी नरसोपंत केळकर हे श्लाघ्य व श्रेष्ठ पदावर आहेत आणि श्रीपाद कृष्णांची खाजगी किंवा सांपतिक स्थिती सोडून दिली तरी लढाईत दाणादाण झालेल्या एखाद्या सेनापतीप्रमाणे त्यांची स्थिती आहे! सी. आर. दासप्रमाणे किंवा जोशी- खापर्ड्यांप्रमाणे- देखील वकील म्हणून त्यांची किर्ती नाही— राजकारणात ते कोणीही नाहीत – सामाजिक बाबतीत कोणतीही विशेष कृती त्यांच्या हातून झालेली नाही—'मूकनायका'शिवाय त्यांचे एकही नाटक आज रंगभूमीवर नाही— एकाही नाटक कंपनीवर त्यांचे वजन नाही—ते उत्तम गणिती किंवा ज्योतिषी आहेत हेही लोक विसरून गेलेले आहेत!

तेव्हा दोघा तात्यासाहेबांकडे पाहिले म्हणजे हे चित्र पहा आणि हे चित्र पहा असे म्हणण्याची पाळी येते! केळकरांचे आयुष्य यशस्वी दिसते—श्रीपाद कृष्णांच्या आयुष्यावर निष्फळ ( failure ) असा एक मोठा 'फ' कार किंवा नकार दिसू लागतो! आणि ह्याचे कारण काय, तर श्रीपाद कृष्णांनी चालू जगावर आपली पकड ठेवली नाही. नरसोपंतांनी ह्याच्या उलट वर्तन ठेवले! ते चालू जगात राहिले—चालू जगात पोहले--चालू जगाशी लढले व चालू जगात भिसळले! त्यांच्या ढकलबाज स्वभावामुळे प्रत्येक परिस्थितीतून ते सहीसलामत बाहेर पडले! त्यांना सातव्या मजल्या-वर कोंडले तरी ते पहिल्या मजल्यावरून बाहेर पडले व पहिल्या मजल्या-वर कोंडले तरी तळघरातून निसटले! चालू जगाशी संबंध आल्यामुळे त्यांची बुद्धी अत्यंत कुशाग्र राहिली! बुद्धिमत्तेत त्यांचा 'नंबर' पहिला लागला. बुद्धीची कुशाग्रता, व्यापकता, सुपूर्तता व चपलता ह्या चारी गुणांनी त्यांची तुलना कै. महादेव गोविंद रानडे ह्यांच्याशीच करावी लागते. रानड्यांच्या वेळेपासून इतका बुद्धिमान पुरुष महाराष्ट्रांत झालाच नाही म्हटले तरी चालेल! अनेक प्रसंगीं कै. लो. टिळकांपेक्षा केळकरांनी सरस बुद्धिमत्ता दाखविलेली आहे! व्यासंगांत तर ते कोणापेक्षाही खात्रीने सरस आहेत.

ह्याचे उलट श्री. तात्यासाहेब कोल्हटकरांच्याकडे पाहिले म्हणजे सेंट हेलेना बेटातील तुरुंगवासात एखाद्या खडकावर शून्य दृष्टीने बसलेल्या

नेपोलियन बोनापार्टाच्या चित्राची आठवण होते ! त्याचे राज्य गेलेले आहे, त्याचे वैभव गेलेले आहे, पंचवीस वर्षांपूर्वी असलेला त्याचा दरारा गेलेला आहे–आणि आता मूकभाषेत समुद्राच्या लाटांना आपले मनोगत सांगत तो एकान्तवासात बसलेला आहे!

आणि इतके असूनही श्री. श्रीपाद कृष्ण हे नेपोलियन आहेत, हे लक्षात ठेविले पाहिजे ! जरी खाडिलकरांच्यापुढे त्यांचा पराभव झालेला असला, जरी गडकऱ्यांनी त्यांची नाटके सोमवारावर नेलेली असली, जरी त्यांना ' या बसा ' म्हणायला बालगंधर्वांना वेळ नसला, किंवा जरी नरसोपंत केळकर हे ड्यूक ऑफ वेलिंग्टनप्रमाणे यशस्वी वीर म्हणून संपत्ती, मान-मरातब, किर्ती किंवा सत्ता ह्यांनी अलंकृत असले तरी सेंट हेलेनामधील हा आधुनिक नेपोलियन महाराष्ट्राचा नेपोलियनच ठरेल. त्यांच्यापासून हजारो तरुणांना स्फूर्ती मिळेल. हजारो रसिक त्यांचे गुणांवर डुलतील, हजारो लेखक त्यांचे अनुकरण करावला लागतील व हजारो देशबांधव त्यांचेवर पुष्पवृष्टी करायला लागतील.

आम्हीही सहस्रावधी सुरुचिर कल्पना प्रसविणाऱ्या त्यांच्या सहस्र-शीर्षावर आज प्रेमभावांची कुसुमवृष्टी करीत आहो ! श्रीपाद कृष्ण हे आमच्या प्रेरणांचे जनक नव्हते, त्यांच्या परंपरेत आम्ही कधीही नव्हतो आणि तरीही मराठी भाषेत नावीन्यमय कल्पनांचे किती निसर्गसुंदर कालवे त्यांनी सोडलेले आहेत, हे पाहून आम्हा सरस्वतीच्या या लाडक्या सुपुत्रांस आपली प्रणती अर्पण करीत आहोत ! त्यांचे अवगुण आम्हांस माहीत आहेत ! त्यांचे अवगुण आम्हांला लक्षात ठेवायलाच पाहिजेत. पण त्या-मुळेच त्यांचे अनुपम गुण आम्हांस जास्तच अनुपम वाटतात आणि प्रेम-भावनांच्या वरचा ताबा नाहीसा होऊन त्या सर्व, मराठी भाषेच्या ह्या शाहिराच्या गुणांस जाऊन बिलगतात!

० ० ०

अच्युत बळवंत कोल्हटकर

## संगीत राक्षसी महत्त्वाकांक्षा

वरील जंगी 'मालगाडी' नावावरूनच पुष्कळ लोक भेदरले जाण्याचा संभव आहे. कारण ललितवाङ्मयाची हृदयभूत अशी जी नाट्यकला तिला अशा लांब लांब नावाचे हिसके बसलेले पाहून कोणाकोणाच्या नेत्रांत अश्रू उभे रहाणे अगदी साहजिक आहे. इतके दिवस संगीत नाटकांची नावे कशी नाजूक असत, 'सौभद्र,' 'शारदा' अशा गुलगुलीत, चिमुकल्या, मृदू व मधुर नावावरून इतके दिवस कला ओळखली जात असे. संगीत कलेने जास्त उडी मारिली तर 'शाकुंतल,' 'प्रेमगुंफा,' असे चौखांबी पूल ती ओलांडीत असे व कोणी 'शाप' दिल्यामुळे ती 'संभ्रमा'त पडलीच तर पंच अक्षरांपुढे तिने सहसा धाव मारली नाही. संगीत नाटके कशी नाजूकच असली पाहिजेत. संगीताचा—काव्याचा—असा गुणच आहे की त्याने परम कठोर विकारसुद्धा विरघळावयासच लावले पाहिजेत. कर्कश भावनांना लवचिक बनविणे हेच काव्याचे—संगीत काव्याचे—काम. मग काव्यातल्या महत्त्वाकांक्षेत तरी राक्षसीपणा कोठून येणार ? काव्यातली महत्त्वाकांक्षा 'बदमाष', 'बदफैली', 'खुनी', 'अवदसा' जर व्हावयाची असेल तर तिने संगीतातल्या 'द्रव' रूप आलापांचा आश्रय कशाला करावा ? आणि जर तिने तो तसा केला तर तो काव्याच्या मृदुत्वावर जुलूम तरी होईल. अथवा त्याच्या योगाने महत्त्वाकांक्षा तरी जितकी राक्षसी वठावयास पाहिजे तितकी न वठता तिच्यात विशोभित कमजोरपणा यावयास लागेल.

संगीत राक्षसी महत्त्वाकांक्षेत ह्या दोन्ही गोष्टी झाल्या आहेत. संगीत

राक्षसी महत्त्वाकांक्षेचा विषय संगीतास अनुकूल नसल्यामुळे एखाद्या अस्वलाचे रूप पाहून एखादी मुग्धकलिका जशी भयभीत होऊन जावी त्याचप्रमाणे ह्या नाटकातील कविता धास्तीने पांढरी फटफटीत पडली आहे व राक्षसी महत्त्वाकांक्षेला अष्टौप्रहर मृदू कवितेच्याच संगतीत ठेवल्यामुळे तिच्यातील पहिला पीळ पुढे पुढे शिथिल होऊन नाटकाच्या शेवटी-शेवटी ती एखाद्या शीघ्रवश कामिनीप्रमाणे 'प्रेमाच्या रंगि रंगे ही', असे भोळसट नाच नाचू लागली आहे. संगीत नाटकास कोणते विषय योग्य आहेत व कोणते अयोग्य आहेत ह्यांची अजून महाराष्ट्र कवींनी फारशी तीव्र चिकित्सा केलेली नाही व महाराष्ट्र नाटकांनी संगीत वेष घेतल्यास अजून फारसे दिवस लोटलेले नसल्यामुळे तसे होणे अगदी साहजिकही आहे. त्याचप्रमाणे नाटकवाल्या लोकांनीही अजून संगीत तर संगीत व प्रोज तर प्रोज असा आडमुठेपणा धारण केलेला असल्यामुळे एखाद्या 'केशवा'ची प्राप्ती करून घेणे असेल तर त्याच्या सुराशी सूर मिळविल्यावाचून दुसरे गत्यंतरच नसते. महाराष्ट्रातील नटवर्गातील एकांगीपणा जाऊन ते जर कधी काळी 'सव्यसाची' होतील तर किती तरी तबलजींचे भलत्या वेळी 'थापा' देण्याचे श्रम वाचतील !

संगीत राक्षसी महत्त्वाकांक्षा हे नाटक एखाद्या नटाप्रमाणे आहे. ज्याप्रमाणे कंपनीत गाणारे स्त्रीपात्र कोणी नसले म्हणजे एखादा पाणचट तोंडाचा पुरुषच मोठ्या जुलमाने शालू नेसून 'त्या मेल्याने पदर कि गे धरिला' असे आळवून आळवून म्हणू लागतो, त्याप्रमाणे राक्षसी महत्त्वाकांक्षेने आपल्या कपाळावर काव्याचे कुंकू लावून मोठ्या जबरदस्तीने संगीताचे रूप धारण केले आहे. वास्तविक हे नाटक प्रोजच आहे व ते प्रोजच असावयास पाहिजे होते. ह्या नाटकातील येथून तेथून सर्व विषय प्रोजला अनुकूल आहे. ह्यात थोडीबहुत जी कविता आढळते ती जशी पुरुषनटाच्या डोक्यावर मुद्दाम 'वेणी' ठेवावी, त्यासारखी आहे. ही 'वेणी' काढून टाकली तरी नाटकातील 'पौरुष' यत्किंचितसुद्धा कमी झालेले दिसणार नाही. उलट या 'वेणी'ने नाटकाच्या मर्दानी चेहेऱ्याची, जी खराबी झालेली आहे ती मात्र खात्रीने दुरुस्त होईल.

संगीत राक्षसी महत्त्वाकांक्षा या नाटकाने त्या नाटकातीलच सरोजिनी-

प्रमाणे आपल्या कपाळास मुद्दाम डकविलेले संगीताचे कुंकू जर पुसून टाकले तर ते नाटक बहुतेक मराठी नाटकांत अत्यंत परिणामकारक गणले जाईल यात संशय नाही. रंगभूमीवर या नाटकाचे प्रयोग चालले असता प्रेक्षकगण स्तिमित होतो, रोषास चढतो, क्षुब्धता पावतो व आवेगाने बेभान होऊन ' शाबास विक्रांत ', ' शाबास विक्रांत ' असे स्वयंस्फूर्तीने उद्‍गार काढू लागतो. विक्रांत हाच नाटकातील नायक आहे व जरी त्याच्या सेवेला कधी देवांगना तर कधी मृणालिनी व कधी प्रत्यक्ष मदालसा दिलेली आहे तथापि त्या सर्व ह्या वीरांपुढे ' हतप्रभ ' होऊन नाटकाच्या अव्वलपासून अखेरपर्यंत त्याचेच तेज काय ते शिल्लक रहाते. ' सरोजिनी ' हा या नाटकातील आणखी एक नायक आहे; व जरी त्याच्या नावावरून हा स्त्री असावा असे वाटते तरी त्याची कृती, मनःस्थिती व भाषणे ह्यांवरून हा पक्का पुरुष असला पाहिजे यात तिळमात्र संशय राहत नाही. सरोजिनी हा जर खरी स्त्री असली—आणि रंगभूमीवरचे पात्र स्त्रीच्या वेषात दिसते हे आम्हांस कबूल आहे—तथापि ' जो भेद विधिने स्त्रीपुरुषी केला ' त्यामुळे इलाज खुंटल्याकारणाने ती स्त्री राहिली असावी असेच आम्हांस वाटते. नाहीतर कुंकवाच्या अपवर्जनानंतर ' भिकार रमणी वस्त्रे ' फेकून द्यावयास तिने कधीही कमी केले नसते ! विक्रांताप्रमाणेच सरोजिनी–ही प्रेक्षकवर्गास आपल्याबरोबरच जोराने ओढून नेते. सरोजिनीच्या स्वभावात स्त्री व पुरुष ह्या दोघांचेही चमत्कारिक मिश्रण असल्यामुळे विक्रांतापेक्षाही हे पात्र वाचकांस काही काही प्रसंगी जास्त जोराने दवडावयास लावते. सरोजिनी हे पात्र नाटकात ओढूनताणून न आणता जर स्वतःच्याच पायांनी आले असते तर विक्रांतापेक्षा तेच फार उठावदार दिसले असते ह्यात काही संशय नाही.

या नाटकात प्रमुखत्वाने नर्तन करणारी आणखी एक व्यक्ती म्हणजे मदालसा होय. हिच्याच अत्याचारामुळे विक्रांताचा पराक्रमीपणा कसोटीस लागला व हिच्याच अत्याचारामुळे सरोजिनी आपला स्त्रीस्वभाव सोडून देऊन ' पुरुष ' बनली. मदालसा या नाटकात अगदी आरंभीच प्रवेश करते व हिच्याच राक्षसी महत्वाकांक्षेमुळे नाटकास आपले ठसठशीत नाव प्राप्त झाले आहे. हिची अनन्वित कृत्ये राक्षसांनासुद्धा लाजविणारी

आहेत व ब्रिटिश कोर्टात आपली अब्रू ‘ सफा ’ करून घेण्याची राक्षसांना जर परवानगी असती तर मदालसेच्या महत्त्वाकांक्षेला, ‘ राक्षसी ’ म्हटल्याबद्दल त्यानी ग्रंथकारांविरुद्ध, अगदी नॉर्टनसाहेबांना ‘ एंगेज ’ करण्याइतका मोठा दावा आणला असता. हिचे प्रेमसुद्धा ‘ प्राण घेणारे ’ आहे. पाचव्या अंकात विक्रांताचे गळ्यास ‘ प्रेमाने ’ मिठी मारून जेव्हा ही ‘ या अप्सरेच्या गोंडस बाहूंचा हा पाश तू कसा सोडवितोस ते मी पहाते, ’ असा धाक दाखवू लागते तेव्हा ‘ अप्सरा ’ही नकोत आणि ‘ गोंडस हात ’ही नकोत असे प्रेक्षकांस वाटावयास लागून थिएटरमधून पळून जावयास पुरेशी दारे आहेत की नाहीत, हे ते शोधू लागतात. ही ‘ माथेफिरू’, ही ‘ दगलबाज ’, ही ‘ कवटाळीण ’, ही ‘ हरामखोर ’ जोपर्यंत रंगभूमीवर आपले सैतानी सामर्थ्य प्रकट करीत असते, तोपर्यंत प्रेक्षकांचा जीव मुळीच सुचिंत न रहाता आपण आपल्या आयुष्याचा विमा उतरून आलो असतो तर फार चांगले झाले असते असे त्यांना वाटू लागते. खरोखर या ‘ कैदासणी ’च्या अघोर कृत्यांमुळे विमेवाल्या लोकांचे काम वाढू लागले असे कोणी सांगितले तर त्यात मुळीच आश्चर्य वाटण्याजोगे नाही. मुंबई इलाख्यात एक विमा कंपनी जी गतवर्षी स्थापित झालेली आहे तिचा व या ‘ अवदसे ’च्या आगमनाचा काही संबंध आहे की काय,ह्याचीही विचारपूस करण्याजोगी आहे.

संगीत राक्षसी महत्त्वाकांक्षेत जी तीन मुख्य पात्रे आहेत त्यांपैकी जरी दोन स्त्रिया असल्या तरी त्या स्त्रिया पुरुषांपेक्षासुद्धा पुरुष कशा आहेत, हे वर दाखविलेच आहे. म्हणजे ‘ प्रामाणिकपणा ’ने बोलावयाचे असल्यास राक्षसी महत्त्वाकांक्षेतील ही मुख्य पात्रे पुरुषच आहेत असे म्हणावयास हरकत नाही. जेथे सर्व मुख्य पात्रे पुरुष व जेथे मुख्य भावना उन्मादाची तेथे काव्याला—मृदुतम कवितेला—संगीताच्या रुणझुण नादाला—अवसर कोठून मिळणार ? आणि म्हणूनच हे नाटक संगीत नसता ‘ प्रोज ’ असते तर जास्ती निसर्गानुगामी झाले असते असे आमचे म्हणणे आहे. आता संगीतामुळे हातचा ‘ केशव ’ गमावला असता यात संशय नाही; पण दुसरी एखादी मार्दवविशिष्ट नाट्यकृती उत्पन्न करून ‘ केशव ’ची समजूत घालणे कितीसे कठीण होते ? संगीताच्या नादाला लागल्यामुळे ह्या नाटकात मदालसेच्या दणकट स्वभावाचा बाक वर उल्लेख केलेल्या एका

ठिकाणी उगीचच्या उगीच मोडून गेलेला आहे व त्यामुळे प्रेक्षकांच्या कल्पनासातत्याचा मध्येच विच्छेद होऊन नाटकसूत्राच्या संगतीचा लोप होतो. संगीताच्या नादामुळेच मृणालिनी हे जे एक 'नाटपेट' पात्र आणले आहे त्याचीही केवळ मुर्वतीस्तव संभावना केली गेली असल्यामुळे त्याचे संगीत जरी कानांस गोड लागते तरी मदालसेच्या हक्काची पायमल्ली करून ही मृणालिनी उगीच कोण गात बसणार असे 'पदोपदी' वाटल्यावाचून रहात नाही. काव्यदृष्ट्या मृणालिनीचे सर्वच प्रवेश फारच प्रशंसनीय आहेत; परंतु कोकिळेने आपले गायन पानपतच्या संगरात का सुरू करावे? तिच्या आलापांचें चीज करण्यास प्रशांत सुंदर असे उपवन उरलेच नाही काय?

कोकिळा असली तरी रणसंग्रामावर गावयास लावीन अशी जी एक उद्दाम रुधिरप्रियता ह्या नाटकात सरसहा दिसून येते त्यामुळे ह्या नाटकातील कोकिळा तर रडकुंडीस आलेल्याच आहेत; परंतु 'क्रूरेषु क्रूर' अशा मदालसेचीसुद्धा अगदी घामाघूम स्थिती झालेली आहे. अगदी मदालसा झाली तरी तिने पाय आपटायचे तरी किती वेळ? ती मोठी शिवराळ झाली तरी 'डिक्शनरी'च्या बाहेर ती तरी नवीन अपशब्द कोठून तयार करणार? शत्रूची आतडी सोलल्यावाचून तिला चैन पडत नसले म्हणून तिच्याही हाताला काही थकवा म्हणून आहे की नाही? पण या गोष्टीचा, या मानवी दुर्बलतेचा, या नाटकात मुळीच विचार केला गेला नसून येथून तेथून सर्व पात्रांची कातडी सोलण्याचे त्रासदायक काम मदालसेस देण्यात आले आहे. एकाच व्यक्तीचे कातडे किती वेळा सोलावे, ह्याचाही विचार नाटकात राहिलेला नाही, आणि ह्यामुळे मदालसेला जेवढे रासायनिक अथवा कलृप्तिजन्य प्रयोग माहीत होते त्या सर्वांचा ती प्रत्येक वेळी शत्रूंची कातडी सोलण्याकडे उपयोग करीत बसलेली आहे. 'मदालसे'ची महत्त्वाकांक्षा राक्षसी असेल; पण तिचे हातपाय काही राक्षसी नव्हते. मग हा जो निष्कारण खटाटोप तिच्या पाठीमागे लाविला आहे तो प्रेक्षकांस अनावश्यक वाटला तर मदालसा त्यांचेवर 'एकढाले डोळे' करील काय?

ह्या नाटकातील दुसरी एक त्रासदायक गोष्ट म्हटली म्हणजे पात्रांच्या नावाची 'उसनवारी.' हा शब्द जितका 'राक्षसी' असावयास पाहिजे

तितका नाही; पण वाङ्मयव्यवहारात चोरी हा शब्द अप्रतिष्ठित गणला गेल्यामुळे आम्हांस ‘ उसनवारी ’ हाच शब्द वापरावा लागत आहे. वास्तविक म्हटले म्हणजे या नाटकात इतक्या नव्यानव्या व ताज्या ‘ शिव्या ’, आहेत की, हीच कल्पनाशक्ती नवीन नावे शोधण्याकडे का खर्च झाली नाही, ह्याबद्दल काहीच ‘ कल्पना ’ चालत नाही. ‘ शारदा ’ पाहिले की, घे त्यातला ‘ कोदंड ’, ‘ देवकन्या ’ पाहिली की, घे त्यातील ‘ देवांगना ’, ‘ मदालसा ’ पाहिली की, घे त्यातली ‘ मदालसा ’, ‘ मूकनायक ’ पाहिले की, घे त्यातली ‘ विक्रान्त–सरोजिनी ’, अशा याचकी वृत्तीमुळे संगीत राक्षसी महत्त्वाकांक्षेची बरीच शोभा बिघडून गेली आहे असे आम्हांस वाटते. पात्रांची नावे ठेवायची, त्याला इतके दैन्य कशाला ? संस्कृत, महाराष्ट्र, बंगाली, हिंदी व उर्दू एवढा साहित्यसागर आपल्या उच्च तरंगांनी एवढा आंदोलन पावत असता जुन्या उष्ट्या नावांनी आपली कृती विटाळण्याची यत्किंचित तरी आवश्यकता आहे काय ? संगीत राक्षसी महत्त्वाकांक्षेत जी दुसऱ्या नाटकांतील पात्रे कान धरुन आणलेली आहेत त्यांनी जर उद्या पुंडावा केला व आपापल्या मूळ नाटकात जाऊ म्हटले तर राक्षसी महत्त्वाकांक्षेमध्ये सरदार व सेवक ह्यांचेवाचून काय शिल्लक राहील ? व मुख्य पार्टीच अशा तऱ्हेने फिरल्यानंतर सरदार व सेवक तरी कितीसा टिकाव धरुन राहतील ?

राक्षसी महत्त्वाकांक्षेतील आणखी एक चमत्कारिक प्रकार म्हणजे पात्रांची बेसुमार खोगीरभरती हा होय. पात्रे आणायची किती, याचा ह्या नाटकात मुळीच हिशोब न राहिल्यामुळे जसा प्रसंग पडला त्याप्रमाणे ह्या नाटकात पात्रांनी शिरकाव केलेला आहे. आपल्यामुळे कथानकाला शोभा येईल किंवा न येईल ह्याचा त्यांनी तिळमात्र विचार केलेला नाही. हा पात्रांचा जंगी तांडा पाहून भरतमुनी तर ‘ रामरक्षा ’ म्हणावयास लागतीलच लागतील; पण कदाचित प्रो. छत्र्यांनासुद्धा आपल्या सर्कशीत ‘ प्राण्यांचा भयंकर संग्रह ’ असल्याबद्दलची फुशारकी सोडून द्यावी लागेल. पात्रांच्या अव्यवस्थेचा दोष या नाटकात इतका विकोपाला गेलेला आहे की, इतर नाटकांतली सर्व नावे संपूनही ‘ सरदार ’, ‘ सेवक ’ अशा मोघम नावांनी पात्रांचा उल्लेख करण्याची पाळी आलेली आहे. शिव शिव ! काय दशा ही !

अव्यवस्थित ग्रथन, आटोकाट आततायीपणा, निष्कारण याचकवृत्ती, उग्रतम उद्दमत्व व विसंगत संगीत एवढे शब्द वापरले म्हणजे संगीत राक्षसी महत्त्वाकांक्षेतील सर्व दोषांचे सविस्तर वर्णन झाले असे आम्हांला वाटते. परंतु ज्यास नाट्यग्रंथनाचा फारसा सराव नाही त्याचे हातून पहिला दोष हा हटकून व्हावयाचाच, तेव्हा त्याबद्दल एखाद्यास दोष देणे म्हणजे पावसाच्या पहिल्या सरीनंतर पाण्याच्या गढूळपणास नावे ठेवण्यासारखेच आहे. आम्हांस आनंद ह्याच गोष्टीचा होतो की, वामन गोपाळ जोशी यांची ही पहिलीच कृती असूनही वरीलपेक्षा जास्त दोष त्यांचे हातून झालेले नाहीत. नूतन नाटककारांना असभ्य शृंगाराने आपले कल्पनान्यूनत्व झाकून टाकण्याचा नेहमी मोठा मोह पडत असतो व परवाच्या वसंत व्याख्यानमालेत चाफेकर या विद्वान वक्त्यांनी सांगितल्याप्रमाणे विनोदाच्या नावाखाली काही तरी 'वाह्यात 'चावटपणा करून प्रेक्षकांच्या दंतपंक्तीचे उद्‌घाटन करण्याची वेडी हौसही नाटककारांची पाठ सोडीत नाही. परंतु ह्या दोन प्रकारच्या मोहांपासून जोशी यांनी आपले अंग फारच चतुरपणाने 'चोरून' घेतले आहे. शृंगाराला मोकळीक न देता प्रेक्षकवर्गाचे पाचपाच तास मनोरंजन करणे खरोखर फार कठीण आहे. पण जोशी यांनी ते मोठ्या खुबीने घडवून आणले आहे ह्याबद्दल त्यांची पाठ कोण थोपटणार नाही ?

संगीत राक्षसी महत्त्वाकांक्षेतील अप्रतिम गुण म्हटला म्हणजे त्यात भरून राहिलेला ओतप्रोत स्वाभिमान हा होय. राक्षसी महत्त्वाकांक्षा हे नाटक अशा थोड्या नाटकांपैकी आहे की, जी काहीतरी उच्च हेतू पुढे ठेऊन लिहिलेली असतात. आता एखाद्या नाटकात प्रत्येक पृष्ठावर मांडूक्योपनिषद् भरून राहिलेले असूनही ते अगदी बेचव होईल, व अलीकडील संतविषयक निम्मी नाटके अशीच असतात असे म्हणावयास काही हरकत नाही. उलटपक्षी 'कमला ' नाटकासारखी कित्येक नाटके कोणत्याही विशेष उद्देशाने लिहिलेली नसूनही लोकांचे मनरंजन करण्यास समर्थ असतात. नाटकांचा नेहमीचा अनुभव लक्षांत घेतला असता हेतुविशिष्ट नाटकेच अहेतुसिद्ध नाटकांपेक्षा लिहिण्यास जड जातात असे कबूल करावे लागते. परंतु राक्षसी महत्त्वाकांक्षा हे नाटक पहिल्या वर्गातील असूनही लोकरंजन करण्यात अग्रगण्य झाले आहे, हे ग्रंथकाराच्या उच्च हेतूचे नशीबच नव्हे काय ?

स्वाभिमान हा सद्गुण असा आहे की, तो सर्वांस पटतो. ज्याचे अंगी स्वाभिमान आहे त्यास तर स्वाभिमान प्रिय असतोच; पण ज्याचे अंगीं स्वाभिमानाचा गंधही नाही त्यासही स्वाभिमानाचा विकास दृष्टीस पडल्या-बरोबर प्रशंसापूर्वक टाळी वाजविल्यावाचून राहवत नाही. राक्षसी महत्त्वाकांक्षेचे प्रयोग रंगभूमीवर चालले असताना टाळ्याच्या कडकडाटाने सभागृह जे एकसारखे दुमदुमून जात असते ह्याचे कारण तेथे जमलेले सर्वच लोक अगदी 'अभिमन्यू'चे अवतार असतात असे मुळीच नाही. किंबहुना, स्त्रिया जशा पुरुषाच्या लावण्याचे कुतूहलपूर्वक अवलोकन करीत असतात, त्याचप्रमाणे तेथे जमलेले नेभळटही विक्रांताच्या अलौकिक स्वाभि-मानाचे 'आपल्याजवळ नसलेली दिव्य वस्तू' ह्याच बुद्धीने अभिनंदन करीत असतील. तथापि विक्रान्ताचा असामान्य स्वाभिमानच असा आहे की, त्याचे कोणत्याही काळी, कोणत्याही देशात व कोणत्याही परिस्थितीत कोणासही सानंद आश्चर्यच वाटेल. ही स्वाभिमानाची अत्यावश्यक मात्रा जोशी यांनी महत्त्वाकांक्षेच्या प्रत्येक पृष्ठावर वाचकास सेवन करावयास लावल्यामुळे राक्षसी महत्त्वाकांक्षेचे सध्याच्या नाट्यवाङ्मयात फारच मोठे महत्त्व आहे हे आम्ही संतोषपूर्वक नमूद करतो.

दुष्ट महत्त्वाकांक्षा परिणामी कशी संकटावह असते, हे दाखविण्याचा या नाटकाचा दुसरा उद्देश आहे; परंतु महत्त्वाकांक्षेचे हिडिस स्वरूप दाखविण्याचे अवघड काम जोशी ह्यांस चांगलेसे झेपलेले नाही. खूबसूरत बलेपेक्षासुद्धा ह्या नाटकातील मदालसेचे चित्र काही ठिकाणी जास्त आततायी, तर काही ठिकाणी अगदी पुळचटपणाचे झालेले आहे, हे आम्ही वर एके प्रसंगी दाखविलेच आहे. जास्त मार्मिकपणाने हे नाटक पाहिल्यास मदा-लसेच्या कृत्यांत अमानुष क्रूरपणाच भरला असून जिला 'महत्त्वाकांक्षा' म्हणतात त्या मनोभावनेचा अल्पांशही नाही, असेच कबूल करावे लागेल. परंतु मदालसेच्या चित्राच्या कमतरतेमुळे या नाटकाचे काहीएक अडलेले नाही. विक्रान्त व सरोजिनी ही दोन चित्रे या नाटकात इतकी उदात्त, इतकी प्रबल मनोवृत्तीची, इतकी 'वफादार', इतकी बेगुमान व उठावदार झालेली आहेत की, त्यांच्यापुढे मदालसेचे काही महत्त्वच वाटेनासे होते. विक्रांत व सरोजिनी या दोन व्यक्तींचे स्वभाव म्हणजे उदारनीतीशी

संलग्न असलेल्या शिक्षणाच्या एका प्रधान अंगाचे उत्तम निदर्शक आहेत. व्यक्ती, समाज, राष्ट्र अथवा साम्राज्य ह्यांच्या अंगी जर कधी टिकाऊपणा यावयाचा असेल तर विक्रांत सरोजिनी ह्यांचा बहुमोल कित्ता रात्रंदिवस डोळ्यांपुढे ठेविला पाहिजे. आता आपल्या बायका जर ' सरोजिनी ' प्रमाणे निपजल्या तर आपली धडगत लागणे कठीण आहे असे कदाचित काही रडक्या नवऱ्यांना वाटण्याचा संभव आहे; पण ' पती ' होणे ह्या पवित्र कल्पनेचा अर्थ बायकोपेक्षाही ' काकणभर ' धैर्यवान, निष्ठाशील, निश्चयी व कंटक असणे असा आहे. नुसते ' कुंकवाला धनी होणे ' असा नव्हे, हे ज्यास मान्य असेल त्यांना राक्षसी महत्त्वाकांक्षेमुळे आपली बायको हातची जाईल अशी कधीही भीती वाटणार नाही.

राक्षसी महत्त्वाकांक्षेत कोणते दोष आहेत ते आम्ही प्रथमतः दाखविले आहे. परंतु या नाटकात यापेक्षा शतावधी दुसरे दोष असूनही जरी विक्रांत आणि सरोजिनी ही दोन पात्रे असती तरी हे नाटक संग्राह्य असे आम्हांस वाटले असते. परंतु आम्ही मागे सांगितल्याप्रमाणे या नाटकात अवगुणांचें माप परिमित आहे. प्रेमविषय प्रधान न करता नाटकास गोडी आणण्याचा जो साहसाचा उपक्रम जोशी यांनी केलेला आहे त्याची तर वाखाणणी करावी तेवढी थोडीच आहे. ह्या कामात त्यांना यशही उत्तम मिळाले आहे, ही गोष्ट सर्व नाटकलेखकांनी मुद्दाम लक्षात ठेवण्यासारखी आहे. या नाटकातील भाषा प्रौढ, रसविशिष्ट व मनोभावनांना प्रज्वलित करणारी आहे व नाटकात जो सर्वत्र एक प्रकारचा बेफिकीर धैर्यवानपणा दिसून येतो त्यामुळे तर प्रेक्षकांस आल्हाद वाटतो. उर्दू नाटकांवरून मराठी नाटककारांस आजपर्यंत बरीच नाटके सुचली आहेत; पण त्या नाटकांतील साहजिक वीरविक्रम जसा ह्या नाटकात दिसून येतो तसा इतरत्र क्वचितच दिसत असेल. ह्या नाटकात संगीताला स्वाभाविक स्थळ नाही हे आम्ही वर सांगितलेच आहे; पण अशा अडचणीत असतानासुद्धा जोशी यांची काव्यप्रतिभा आपले तेज चांगले व्यक्त करीत आहे ! संगीत राक्षसी महत्त्वाकांक्षा व अलीकडील इतर संगीत नाटके ह्यांची तुलना केल्यास ह्या नाटकातील पदे फारच शुद्ध व सरस ठरतील. पदांतील शब्दांची ठेवणही मनोरम आहे व

कवी जर गायकी लोकांच्या फार मुठीत गेले नसते तर तालसुराच्या ज्या कित्येक अल्पस्वल्प चुका राहून गेल्या आहेत, त्या खात्रीने तशा राहिल्या नसत्या. नाटकांचे प्रयोग होऊन जरी फार काळ लोटलेला नाही तरी इतक्या अल्पावधीतच 'लावि चटक गुणगाना,' 'मजला प्रेम-सुरस-रस पीता,' 'मी नवबाला,' 'प्रेम बाइ हे वेडे,' वगैरे सुंदर पद्ये प्रेक्षकांच्या कंठाग्री गुणगुण करू लागली आहेत. नाटकांतील प्रेमप्रसंग जरी मुद्दाम आणल्यासारखे दिसतात तरी जेवढे असे प्रसंग आहेत तेवढे फारच कवित्वप्रदर्शक आहेत. नाटककर्त्यांनी परस्परविरुद्ध सर्व प्रसंग एकाच नाटकात घालण्याची जर महत्त्वाकांक्षा धरली नसती तर घातलेल्या प्रसंगांतून निरनिराळ्या मनोवृत्तींची निदर्शक अशी तीन नाटके जोशी यांस निर्माण करता आली असती; आणि तसे त्यांनी केले असते तर एखाद्या रेल्वेच्या डब्यात जसे फर्स्ट क्लासच्या एका डब्यात युरोपिअन व पार्शी युवती, शेजारच्या सेकंड क्लासात मद्रासी 'इडुगुडु' व लगेच सर्व्हंट्स कंपार्टमेंटमध्ये घामट बबर्जी अशी जी विचित्र सृष्टी दिसते तशी न दिसता जोशी यांच्या सर्वच कृती फार मनोवेधक झाल्या असत्या. उदाहरणार्थ, या नाटकात पुतळीचा जो एक प्रवेश आहे तोच एखाद्या रम्य कथानकाचे मध्यसूत्र होण्याच्या लायकीचा नाही काय? पण तो मदालसेच्या धांगडधिंग्याखाली विनाकारण चेंगरून गेला आहे. नाट्य-विषय भिन्नभिन्न केल्याने नाटकाच्या पुस्तकास आटोपशीरपणा आला असता, पण पहिल्या कृतीतसुद्धा असले दोष न राहते तर ती पहिली कृती कसली? ह्याकरिता ग्रंथकार जोशी यांस या सर्व दोषांचे माफीपत्र आम्ही अर्पण करतो व त्यांच्या विकांत–सरोजिनीमुळे रसिकांस त्यांचे नाटक फार आदरणीय झाले आहे, असे त्यांना आश्वासन देतो.

० ० ०

विनोबा भावे

# कृष्णभक्तीचा रोग

दुनिया पैदा करावी अशी ब्रह्मदेवाला इच्छा झाली. त्याप्रमाणे आता घडण व्हावयाची. इतक्यात त्याच्या मनात काय आले कोण जाणे. त्याला वाटले, " आपल्या कामातील बरेवाईट सांगणारा कोणी तरी असला तर मोठी मौज होईल. " त्यामुळे आधी त्याने एक चांगला तरबेज टीकाकार बनविला. " ह्यापुढे मी जे काय घडून काढीन त्याची तपासणी करण्याचे काम तुझे " असा त्या टीकाकारास अखत्यार देण्यात आला. इतकी तयारी झाल्यावर ब्रह्मदेवाने आपला कारखाना चालू केला. ब्रह्मदेव एक एक चीज बनवीत गेला आणि टीकाकार तिच्यातली चूक दाखवून आपल्या जन्माचे चीज करू लागला. टीकाकाराच्या चाचणीपुढे बिनचूक म्हणून काही निघेच ना. हत्तीला वर पाहता येत नाही, उंट वरच पाहतो, गाढवात चपळपणा नाही, माकड अचपळ अशा रीतीने टीकाकाराची टाकसाळ सुरू झाली. तो आपला शेरे मारत गेला. ब्रह्मदेवाची अक्कल गुंग झाली. तरी त्याने शेवटचा प्रयत्न करून पाहण्याचे ठरविले आणि कारागिरीची कमाल करून 'माणूस' घडून काढला. टीकाकार निरखून पाहू लागला. अखेर चूक निघालीच. "ह्याच्या छातीत एक खिडकी पाहिजे होती. म्हणजे ह्याचे विचार सगळ्यांना समजले असते. " ब्रह्मदेव म्हणाला, " तुला बनविले हीच माझी एक चूक आहे. आता मी तुला शंकराच्या ताब्यात देतो. "

ही एक जुनी गोष्ट कुठेशी वाचलेली आहे, तिच्याविषयी शंका घेण्याला फक्त एकच जागा आहे. ती ही की गोष्टीत सांगितल्याप्रमाणे हे टीकाकार शंकराच्या ताब्यात गेलेले दिसत नाहीत. कदाचित ब्रह्मदेवाला त्याची दया

आली असेल किंवा शंकराने आपली शक्ती त्यांच्यावर चालविली नसेल. कसेही असले तरी त्याची जात आज बरीच फैलावली आहे एवढे मात्र खरे. गुलामगिरीच्या काळात कर्तृत्व न उरल्यामुळे वक्तृत्वाला संधी सापडते. कामाचे बोलणे खुंटले की बोलण्याचेच काम ! आणि बोलायला तरी रोज रोज नवीन विषय कोठून काढायचे ? त्यामुळे एक सनातन विषय ठरवून टाकला : " निंदा–स्तुती जनांच्या। वार्ता वधू–धनांच्या. " पण निंदा–स्तुती म्हटले तरी त्यात वाटणी समजावयाची आहे. निंदा म्हणजे पर–निंदा आणि स्तुती म्हणजे आत्म–स्तुती. ब्रह्मदेवाने टीकाकाराला बरेवाईट पाहावयाला सांगितले होते. त्याने स्वत:चे बरे पाहिले व ब्रह्मदेवाचे वाईट पाहिले. मनुष्याच्या मनाची ठेवणच अशी चमत्कारिक आहे की दुसऱ्याचे दोष जसे त्याला ठळठळीत दिसतात तसे गुण दिसत नाहीत. संस्कृतात 'विश्व–गुणादर्श–चंपू' म्हणून एक काव्य आहे. वेंकटाध्वरी नावाच्या एका दाक्षिणात्य पंडिताने ते लिहिले आहे. त्या काव्याची कल्पना अशी आहे की कृशानू आणि विश्वावसू नावाचे दोन गंधर्व विमानात बसून फिरत आहेत आणि जे जे दृष्टीस पडले त्याविषयी चर्चा करीत आहेत. कृशानू दोष–दृष्टी आहे. विश्वावसू गुण–ग्राहक आहे. दोघे आपापल्या दृष्टीने वर्णन करीत आहेत. 'गुणादर्श' म्हणजे 'गुणांचा आरसा' असे काव्याचे नाव ठेवून कवीने आपले 'निर्णायक मत' विश्वावसूच्या बाजूला दिले आहे. तरी एकंदर वर्णनाची धाटणी अशा थाटाची झाली आहे की शेवटी वाचकांच्या मनावर कृशानूच्या मताचीच छाप पडते. गुण घेण्याच्या इराद्याने लिहिले तरी ही दशा; मग दोष पाहण्याची वृत्ती असती तर काय झाले असते ?

चंद्राप्रमाणे हरएक वस्तुला शुक्ल–पक्ष आणि कृष्ण--पक्ष आहेत. त्यामुळे टीकाखोर मनाला स्वैर–संचार करण्यास हरकत येण्यासारखी नाही. सूर्य दिवसा दिवाळी करीत असला तरी "रात्री अंधारच देतो" एवढ्या वाक्याने त्या सर्व दिवाळीची होळी होऊ शकेल. त्यातून अवगुणच व्यावयाचा नियम ठरला म्हणजे दोन दिवसांमध्ये एक रात्र न दिसता एका दिवसाभोवती दोन रात्री दिसावयाच्या. मग अग्नीच्या ज्योतीकडे लक्ष न जाता धुरावरून अग्नीचे अनुमान करणारे न्यायशास्त्र निर्माण व्हावयाचे. भगवंतांनी ह्या सर्व मौजा गीतेत सांगितल्या आहेत. अग्नीचा धूर, सूर्याची रात्र किंवा चंद्राचा

कृष्णपक्ष पाहणाऱ्या ' कृष्णभक्तांचा ' त्यांनी एक स्वतंत्र वर्ग केला आहे. दिवसा डोळे मिटले म्हणून अंधार आणि रात्री डोळे उघडले म्हणून अंधार. असा स्थितप्रज्ञाच्या कार्यक्रमाबरहूकूम ह्या लोकांचाही कार्यक्रम आहे. पण भगवंतांनी स्थितप्रज्ञाला मोक्ष दाखविला आहे तर ह्यांची रवानगी कपाळमोक्षाकडे केली आहे. पण इतके झाले तरी हा संप्रदाय एखाद्या साथीच्या रोगाप्रमाणे वाढतच चालला आहे. बुबुळे काळी असल्यामुळे म्हणा किंवा काळ्या रंगात आकर्षण अधिक असल्यामुळे म्हणा, काळी बाजू जशी आमच्या डोळ्यात भरते तशी उजळ बाजू भरत नाही. अशा स्थितीत हा सांप्रदायिक रोग कोणत्या औषधाने बरा होईल हे पाहून ठेवणे जरूर आहे.

पहिले औषध म्हणजे चित्तात मुरलेल्या ह्या ' कृष्णभक्तीला ' बाहेरचा कृष्ण दाखवू नये; आतला कृष्ण दाखवावा. जगातला काळेपणा पाहण्यास सवकलेल्या नजरेला आपल्या मनातला काळेपणा दाखवावा. विश्वाचे गुणदोषपरीक्षण करू पाहणारा माणूस बहुधा स्वतःस निर्दोष मानून बसलेला असतो. हा त्याचा भ्रम दूर झाला म्हणजे त्याच्या परीक्षणाची नांगी आपोआप मोडून जाईल. बायबलच्या नव्या करारात ह्याविषयी एक सुंदर प्रसंग वर्णिला आहे. कोणा बाईच्या हातून काही दुर्वर्तन झाले असेल. त्याची चौकशी करून त्या बाईला योग्य न्याय देण्यासाठी ' महाजन ' मंडळ बसले होते. श्रवणभक्तही बरेच जमा झाले असतील हे सांगण्याची जरूरच नाही. पण त्या बाईच्या सद्भाग्याने खिस्तदैवांना तेथे खेचून आणले होते हे विशेष. पंचांनी निकाल फर्माविला, " बाईने घोर अपराध केला आहे. सर्वांनी दगड मारून तिला शरीरातून मुक्त करावे." निकाल ऐकताच माणसांचे हात सरसावले. आसपासचे दगड थरथर कापू लागले. खिस्तदेवांना त्या दगडांची दया आली. त्यांनी उभे राहून सर्वांना एकच वाक्य सांगितले, " ज्याचे मन अगदी चोख असेल त्याने पहिला दगड मारावा." मंडळी क्षणभर स्तब्ध राहिली. हळूहळू एकेक जण तिथून चालता होऊ लागला. शेवटी ती अभागी बाई आणि खिस्तदेव दोघेच उरले. त्यांनी तिला थोडा बोध करून प्रेमाने निरोप दिला. ही आख्यायिका निरंतर ध्यानात वागवावी. " कासया गुणदोष, वानू आणिकांचे। मज काय त्यांचे उणे असे ? "

दुसरे औषध मौन. दुसऱ्याचा दोष दिसूच नये ह्यासाठी पहिले औषध आहे. नजरचुकीने दोष दिसल्यानंतर हे दुसरे औषध खास उपयोगाचे आहे. ह्याने मनाची आतल्या आत तडफड चालेल. दोनचार झोपा कमी होतील. पण शेवटी थकून जाऊन मन शांत होईल. तानाजी पडल्यावर मावळे लोक पळ काढणार असा रंग दिसू लागला. तेव्हा ज्या दोराच्या मदतीने ते गडावर चढले होते आणि ज्याच्या मदतीने ते आता उतरण्याचा प्रयत्न करणार होते तो दोरच सूर्याजीने कापून टाकला. "तो दोर मी मघाच कापून टाकला आहे" ह्या सूर्याजीच्या एका वाक्याने लोकात निराशेची वीरश्री संचरली आणि गड सर झाला. दोर कापून टाकण्याचे तत्त्वज्ञान फारच महत्त्वाचे आहे. त्याविषयी निराळेच लिहावे लागेल. सध्याचा मुद्दा इतकाच की मौनाने दोर कापून टाकल्यासारखे होते. दुसऱ्याचा दोष पाहण्याचे विसरून तरी जा, नाहीतर तडफडत बैस अशी मनावर पाळी येते आणि तसे झाले म्हणजे मग सगळा रस्ता सरळ होतो. कारण, ज्याला जगावयाचे असते त्याला फार वेळ तडफडत बसणे सोयीचे होत नाही.

तिसरे औषध कर्म-योगात गढून जाणे. ज्याप्रमाणे आज सूत कातणे हा एकच असा उद्योग आहे की जो सरसकट सर्वांना पुरविता येईल त्याप्रमाणे कर्म-योग हा एकच असा योग आहे की ज्याची सर्वसामान्य लोकांना बिनधोक शिफारस करता येईल. किंबहुना सूत कातणे हाच आजचा कर्म-योग आहे. हा सूत कातण्याचा कर्म-योग स्वीकारला म्हणजे लोकनिंदेच्या गोष्टी किसत बसण्याला अवकाशच राहत नाही. ज्याप्रमाणे शेतकऱ्याला धान्याच्या एकेक कणाची खरी किंमत समजते, त्याप्रमाणे सूत कातणाऱ्याला एक एक क्षणाचे महत्त्व कळते. "रिकामा जाऊ नेदी क्षण" ही समर्थांची सूचना किंवा "क्षणार्ध देखील व्यर्थ घालवू नये" हा नारदांचा नियम काय सांगत आहे हे सूत कातताना अक्षरशः लक्षात येते. कर्मयोगाचे सामर्थ्य अजब असल्यामुळे त्यावर जितका जोर देता येईल तितका थोडा. ही मात्रा अनेक रोगांवर लागू आहे; पण ज्या रोगाची उपाययोजना आता चालली आहे त्यावर तिचा अद्‌भुत गुण अनुभवलेला आहे.

तीन औषधे सांगितली. तिन्ही औषधे रोग्याच्या तोंडाला कडू तर लागतील; पण ती परिणामी अतिशय मधुर आहेत. आत्मपरीक्षणाने मनाचा, मौनाने

वाणीचा आणि कर्म-योगाने शरीराचा दोष झडून गेल्याशिवाय आत्म्याला आरोग्य मिळणार नाही. एवढ्यासाठी औषध कडू म्हणून सोडता येत नाही. शिवाय हे औषध मधातून घ्यावयाचे आहे. त्याने कडूपणा जिरून जाईल. सर्वाभूती भगवद्भाव हा मध आहे. त्यात ह्या तीन मात्रा उगाळून घ्याव्या म्हणजे सगळेच गोड होईल.

◎ ◎ ◎

विनोबा भावे

# मते आणि मतप्रचार

आपल्यांत हल्ली मतभेद पुष्कळ दिसतात. मतभेद असण्यात दोष काही नाही. पण असणारा मतभेद आणि दिसणारा मतभेद ह्यात फरक केला पाहिजे. मत म्हणजे स्वतंत्र मनाचे म्हणणे. आपले मन स्वतंत्रपणे जे सांगेल ते आपले मत. पण आपल्या मनाची स्थिती इंग्लंडच्या राजासारखी असते. इंग्लंडच्या राजाला स्वतंत्र म्हणणे कोठे आहे? पार्लमेंटने ठराव करावा, औपचारिक मंजुरीसाठी राजेसाहेबांकडे तो जावा आणि ह्यांनी त्यावर सही करून टाकावी, अशी तऱ्हा आपल्या मनाची आहे. इंद्रिये काहीतरी ठराव करतात आणि मन त्यावर सही करून टाकते. एवढेच आहे की, मनाचा स्वभाव तर्कशील असल्यामुळे सही करण्यापूर्वी ते त्या ठरावाच्या समर्थनपर अशी काही युक्ती तयार करून ठेविते. त्याशिवाय त्याचे समाधान होत नाही. त्यापलीकडे इंद्रियाच्या म्हणण्याविरुद्ध तर्क चालविणे हे मात्र त्याच्या अधिकारात जणू नसतेच. साधकांनी तर्क करावा तर तो नेहमी वेदानुकूलच करावा अशी मर्यादा आहे. त्याप्रमाणे इंद्रियांना अनुकूल तर्क करण्याचे मनाचे व्रत अशा प्रकारची मते ही वास्तविक मते नव्हेत. ती फसवणूक आहे. पहाटे उठण्याचा इंद्रियांना आळस. त्यामुळे मनालाही तसेच वाटते. ते युक्तिपूर्वक म्हणू लागते, "पहाटे उठणे चांगले नाही. कारण त्यामुळे दिवसभर पुरती जागृती राहणार नाही. शिवाय असे की पहाटे उठणे ईश्वरी योजनेच्या विरुद्धच नाही का? मनुष्याने पहाटे उठावे असे ईश्वराला वाटत असते तर त्याने पहाटेसच प्रकाश दिला असता." इतके

झाले म्हणजे ते आपले निश्चित मत झाले. हरएकाला मतस्वातंत्र्य पाहिजे असे आपण म्हणतो. पण स्वतंत्र मत ह्याचा खरा अर्थ आपणांस कळलेला नाही. इंद्रियांचा पगडा बसू न देता स्वतंत्र वृत्तीने आपले मन आपल्याला जे सांगत असेल, ते आपले स्वतंत्र मत. मत म्हणजे मनात येईल ते नव्हे. पण मन आणील ते. हा मुद्दा लक्षात ठेवला म्हणजे पुष्कळसे मतभेद झडून जातील.

इंद्रिय-निग्रह-पूर्वक आपल्याला जे निश्चितपणे वाटते त्या आपल्या मताचा प्रचार करणे योग्य आहे पण अशा प्रकारचा प्रचार करण्याचे खरे साधन आचार, उच्चार नव्हे. उच्चाराने मतप्रचार करू पाहणे हा मोहच होय, हा मोह आपल्यांत फार आहे. आपले मत जर खरे असेल तर आपण त्याप्रमाणे वागल्याने त्याचा आपोआप प्रचार होईलच. आपला सत्यावर विश्वास असला पाहिजे. सत्यामध्ये स्वतःचा प्रचार करण्याची स्वयंभू शक्ती आहे. सत्य सूर्याप्रमाणे स्वयंप्रकाशी आहे. सूर्य जसा झाकला जात नाही. तसे सत्यही झाकले जात नाही. आचरण टाकून बाह्य उपायांनी प्रचार करण्याचा प्रयत्न फुकट आहे. त्याचा काहीच परिणाम होऊ शकत नाही. त्याने हिंसा वाढते आणि असत्याचा प्रचार होतो. प्रचारालाही मर्यादा आहे. सूर्याची प्रचारक शक्ती किती जबरदस्त आहे? पण तोही मर्यादा सांभाळून असतो. त्यामुळे तो दुनियेचा ‘ मित्र ’ राहून प्रचारही करू शकतो. दार बंद करून कोणी निजला आहे तर सूर्य त्याची सेवा करण्यासाठी त्याच्या दाराशी येऊन ऊभा राहतो. पण दाराला धक्का देऊन आत शिरत नाही. मात्र जरा दार किलकिले झाले की सबंधच्या सबंध आत शिरलाच. ही प्रचाराची मर्यादा होय. आपले मत सत्य असले तरी त्याचा स्वाभाविक रीतीनेच प्रचार झाला पाहिजे. मूक आचरण म्हणजे स्वाभाविक प्रचार. आचरणाचे मौन सुटले की हिंसा दाखल होते. आणि हिंसा दाखल झाली की, सत्य उडालेच. पाण्याने जसा अग्नी विझतो, तसे हिंसेने सत्य विझते. आणि आचरण टाकून प्रचार करण्याचा प्रयत्न म्हणजे नागडी हिंसाच, प्रचाराची घाई हीही हिंसाच. आणि शिवाय अश्रद्धा, अज्ञान तर खरेच, किंवा दंभ का म्हणू नये? लहान मुले बी पेरतात आणि जरा अंकुर फुटला की तो लवकर उगवावा म्हणून त्याला वर उपटतात. तसेच हे.

मत म्हणजे इंद्रियनिग्रही मनाचे म्हणणे, आणि त्याच्या प्रसाराचे साधन ते कृती. हे दोन सिद्धान्त निश्चित झाले की सर्व आकाश निवळले. कृती-बरोबर प्रसंगविशेषी अल्प उक्ती आपण कल्पू शकतो. पतिव्रता ज्याप्रमाणे पतीचे नाव घेत नाही त्याप्रमाणे कर्मयोगी आपल्या मताचा उच्चार टाळतो. पण दोन्ही पक्षी आपण अपवाद कल्पू शकू. क्वचित प्रसंगी आपले मत मांडण्यास हरकत नाही. पण आपले मत मांडावे, दुसऱ्याचे खंडण करण्याचा मोह टाळावा. मतप्रतिपादनात आपले मत मांडणे आणि दुसऱ्याचे खोडणे असे दोन भाग कल्पिले जातात. पण ते कल्पनेचे आहेत, खरे नाहीत. दिवा लावणे व अंधार झाडून टाकणे ही जशी दोन कामे तसलेच हे दोन भाग. आधी दोन भागच खोटे. त्यातही पुन्हा आपला भर बहुतेक दुसऱ्याचे मत खोडण्यावरच जास्त असतो. दुसऱ्याचे मत खोडले, की तेवढ्याने आपले मत सिद्ध झालेच असे होत नाही. आणि आपले मत सरळ मांडले म्हणजे दुसऱ्याचे मत खोडण्याची जरूर राहत नाही. भूमितीमध्ये युक्लिडने कोठेच खोडाखोड न करता थोडक्यात सरळ सिद्धान्त मांडले आहेत. त्या सिद्धान्तांची आज दुनियेवर सत्ता चालते. दुसऱ्याचे मत खोडून काढण्यात त्या मताविषयीचे सूक्ष्म प्रेमच असते. भक्तिमार्गात जसा प्रेमाने तसा द्वेषानेही ईश्वर मिळतो असे सांगतात. बिभिषण प्रेमाने तरला तर रावण द्वेषाने तरला अशी भाषा संत बोलतात, त्यातला अर्थ हाच आहे. मिल्टनने 'पॅरडाईझ लॉस्ट' मध्ये सैतानाच्या अंगी सात्त्विकतेचा तात्त्विक द्वेष दाखवून त्याच्याविषयी वाचकांची सहानुभूती उत्पन्न केली आहे. सात्त्विकतेचा ज्याला मनापासून इतका द्वेष वाटतो त्याच्या मनात सूक्ष्मरूपाने सात्त्विकता वसत आहे, तसेच तामसपणाचा जोरजोराने निषेध करीत बसणाऱ्या माणसात आतून तामसपणा चिकटलेला आहेच, ह्यात शंका नाही.

प्रचाराचे खरे साधन कृती हेच होय. तथापि, ज्याप्रमाणे प्रसंगी मतप्रतिपादनाची जरूरी कल्पून घेतली त्याप्रमाणे मतप्रतिपादनातूनही क्वचित दुसऱ्याच्या मतातील चूक दाखविण्याचा प्रसंग कल्पिता येईल. पण दुसऱ्याचे मत खोडून काढणे निराळे आणि दुसऱ्यालाच खोडून काढणे निराळे. एखाद्या मतातील असारता दाखविताना त्या मनुष्यालाही मध्येच

गुंतवून टीका करणे गैर आहे. नारळाची कवची फोडून अगदी आतून खोबरे घ्यावे त्याप्रमाणे मनुष्याचे मत, चुकीचे वाटल्यास खोडून आतला माणूस ग्रहण करता आला पाहिजे. नदीचे वळण वाकडे असले तरी ज्याप्रमाणे पाणी वाकडे असत नाही, किंवा भाकरी वाटोळी असली तरी तिची गोडी वाटोळी असत नाही, त्याप्रमाणे मनुष्याचे मत जरी कदाचित दूषित असले तरी आतला माणूस दूषित नसतो. नदीचे वळण किंवा भाकरीचा आकार ही जशी बाह्य परिस्थितीने बनलेली असतात, त्याप्रमाणे मनुष्याच्या मताचे आहे. म्हणूनच मताचा विचार करताना माणूस बाजूलाच राखला पाहिजे. पुष्कळ वेळा आपण असे पाहतो की, जे मत आपल्याला एके काळी खरे वाटत होते तेच आज खोटे वाटते. मनात विचार आल्याबरोबर लिहून टाकण्याची ज्यांना सवय आहे, अशा लेखकांच्या लेखनांत त्यांच्या मनाची वळणे कसकशी बदलत गेली हे दिसून येते. म्हणून शहाणे लोक स्वतःचे विचार कृतीत उतरून, अंगात मुरून, आणि हृदयात भरून आपोआप बाहेर पडल्याशिवाय दुसऱ्या कोणत्याही रीतीने त्यांना प्रगट होऊ देत नाहीत. आता आपलेच जुने मत पण आज जर आपल्याला ते पसंत नाही तर ते आपण सोडून देऊ, प्रसंगी खोडूनही काढू; पण कशा रीतीने आणि कोणत्या भावनेने? दुसऱ्याचे मतही खोडण्याचा प्रसंग आल्यास जणू आपलेच जुन मत आहे असे समजून ते खोडले जावे. ह्याहीपेक्षा अधिक चांगला न्याय असा मांडता येईल : आपल्या जुन्या मताकडे आपण कठोर नजरेने पहात नाही, पण पहावे; आणि दुसऱ्याच्या मताकडे कठोर नजरेने पाहातो, पण पाहू नये. मनुष्याचे खरे मत काय आहे हे त्याचे त्यालाच नीटसे माहीत नसते. केळीच्या सोपटाप्रमाणे मनुष्याच्या मनावर एकावर एक अनेक मतांचे पापुद्रे बसलेले असतात. हे सर्व पापुद्रे सोलून पाहिल्यास त्याचे आतले मन अगदी शुद्ध आणि सरळ असते. शिवाय कालचे माझे मत जसे आज बदलले आहे तसेच आजचेही मत, आज कितीही पक्के वाटत असले तरी, उद्या बदलण्याचा संभव आहे ही गोष्ट ध्यानात वागविली पाहिजे. ह्याचा अर्थ असा नाही की, माणसाने संशयावस्थेत राहावे. संशयात मुळीच राहू नये. आज मला जसे वाटते तसे जरूर वागावे.

पण दुसऱ्याच्या मताचे खंडन करताना आपल्या स्वतःच्या अनुभवावरून सिद्ध झालेली मतांची क्षणभंगुरता विसरू नये. संपूर्ण ईश्वर कोणत्याही व्यक्त स्वरूपात मावू शकत नाही. त्याचा एक लहानसा अंशच व्यक्त होतो. त्याप्रमाणे संपूर्ण सत्य माझ्या मतात असणे शक्य नाही. तसेच ईश्वराचा अंशही ज्याप्रमाणे अमुक एका वस्तूतच रहातो असे नसून सर्वच वस्तूंत कमी जास्त प्रमाणाने राहतो, त्याप्रमाणे सत्याचा अंशही माझ्याच मतात आहे असे नसून दुसऱ्याच्याही मतात थोडा तरी आहेच, ही श्रद्धा हाच सत्याग्रहाचा आधार. आणि हीच सत्याग्रहाची मर्यादा. कोणताही मनुष्य, समाज, संस्था सर्वथा सत्यहीन किंवा ईश्वरहीन नाही, म्हणूनच आपल्या दृष्टीने असत्यवश झालेल्या मनुष्याचा, समाजाचा, संस्थेचा प्रतिकार करताना आपण अहिंसामय साधनच वापरले पाहिजे. ही सत्याग्रहाची मर्यादा. सारांश, मनुष्याच्या मताचा विचार करताना किंवा त्याच्या कृत्याचा प्रतिकार करतानाही, त्या मनुष्याला त्याच्या मतापासून किंवा कृत्यापासून अलग करणे, हे सत्याग्रहाचे मुख्य कलम आहे.

आजच्या पवित्र दिवशी हा बोध ग्रहण करण्याची सद्बुद्धी ईश्वर आपणांस देवो.

◎ ◎ ◎

मराठी ग्रंथ संग्रहालय, ...
अनुक्रम ७९५२३ दि: [illegible]
क्रमांक ९८९८ नों: दि: ६/३/६०

श्रीनिवास नारायण बनहट्टी

# युगप्रवर्तक डॉक्टर केतकर

'न ब्रूयात्सत्यमप्रियम्' या न्यायानुसार कटू सत्य होता होईल तो ओठांबाहेर काढू नये, हे खरे. तथापि अशाच काही प्रसंगाने सांगणे येते. डॉ. केतकर हे फार थोर पुरुष होते, असे म्हटल्याने त्यांच्या मृत्यूने झालेल्या हानीची नीटशी कल्पना येणार नाही. आपल्या समाजात सध्या थोर पुरुषांचा केवढा भयंकर दुष्काळ पडलेला आहे याची जाणीव मनाला नीटशी झाली म्हणजेच डॉ. केतकरांच्या मृत्यूने झालेल्या हानीचा प्रचंड-पणा मनाला जाणवेल – काळजाला जाऊन भिडेल. विद्वत्तेने ते थोर होते, हे सर्वविश्रुत आहे. विद्वत्ता ही चीज देखील आपल्या समाजात सध्या इतकी दुर्मिळ झाली आहे की त्यांच्या थोरवीचे मापन करिताना हा मोठाच महत्त्वाचा मुद्दा मानिला पाहिजे. परंतु विद्वत्तेपेक्षाही कर्तृत्व आपणांमध्ये दुर्मिळ झाले आहे; म्हणूनच केतकरांचे प्रचंड कर्तृत्व अधिकच ठळक रीतीने आपल्या डोळ्यांत भरते. बहुतेक लोक त्यांच्या थोरवीचे वर्णन करिताना येथेच थांबतील. परंतु यापेक्षाही अधिक मूल्यवान आणि सध्याच्या काळात अधिक दुष्प्राप्य अशी वस्तू त्यांजजवळ होती; आणि तिजकरिताच निदान मी तरी त्यांना सर्वांत अधिक चाहत असे. ती वस्तू म्हणजे त्यांचे मोठे मन ही होय. परकायाप्रवेशाची काहीतरी युक्ती निघून त्यांच्या मृत्यूमुळे देह-निर्मुक्त झालेल्या त्यांच्या मनाचा एकेक लहानसा तुकडा महाराष्ट्रातील कार्यात वावरणाऱ्या आम्हा सर्वांच्या अंतःकरणात शिरला तर किती चांगले होईल ! ज्या अवयवांचे कार्य दुषित झाले असेल तोच अवयव

( निरोगी अवस्थेत असलेला ) रोग्याला खावयाला द्यावयाचा, अशा उपचारपद्धती ( organotherapy ) अलीकडे पाश्चात्य वैद्यकात निघाली आहे. शारीरिक रोगांप्रमाणे मानसिक दोषांच्या संबंधातही अशी उपचारपद्धती कोणी शोधून काढून शक्य केली तर मानव जातीवर तो मोठाच उपकार होईल. डॉ. केतकरांसारख्यांची द्राघिष्ठ आणि बलिष्ठ मने आमच्या समाजाच्या चांगलीच उपयोगी पडतील.

त्यांच्या मनाचे दांडगे सामर्थ्य उपजत व स्वभावसिद्ध होते. त्यांच्या मनाची विशालता ही काही अंशी स्वभावसिद्ध तर काही अंशी संस्कारसिद्ध अशी होती. अभ्याससिद्ध असा भाग त्यात फारसा नव्हता. पुष्कळ व्यक्ती आपल्या मनोवृत्तींना बुद्धिपुरस्सर विशिष्ट वळण लावण्याचा प्रयत्न करून दृढ अभ्यासाने आपली मनोरचना अभीष्ट तऱ्हेची बनवितात. म्हणजे एका जन्माच्या अवकाशातच ते पुष्कळशी मानसिक प्रगती करतात. डॉ. केतकरांचे मानसिक गुण असे अभ्याससिद्ध नव्हते. आपल्या हिंदु तत्त्वज्ञानाच्या भाषेत बोलावयाचे म्हणजे केतकरांची मनोरचना ही ' अनेकजन्मसंसिद्ध ' अशी होती.

त्यांच्या मनाचे विशालत्व आणि दांडगेपण हे त्यांच्या जीवनात प्रारंभापासून अखेरपर्यंत अनेक दिशांनी व्यक्त होत असलेले दिसे. लहानसान कल्पना केतकरांना कधी सुचावयाच्याच नाहीत. त्यांच्या योजना आणि त्यांनी हाती घेतलेली कार्ये प्रचंड व अवाढव्य असावयाची. ज्ञानकोशाची विशाल कल्पना त्यांना म्हणूनच सुचली आणि ती त्यांनी म्हणूनच तडीस नेऊन दाखविली. ' प्राचीन महाराष्ट्रा'चे काम देखील असेच प्रचंड. त्यांच्या राजकीय कामगिरीकडे वळले तरी तोच प्रकार. लहानसान राजकीय मागण्या मागणे, किंवा काँग्रेसच्या चळवळीची दिवटी हातात घेऊन मिरविणे हे त्यांना कधीच रुचले नाही. त्यांनी एकदम आपल्या एकट्याच्याच प्रयत्नाने स्वराज्याच्या गगनास गवसणी घालण्याची व्यापक व अद्‌भुत कल्पना काढली. आणि तीन राक्षसांच्या गोष्टीतील राक्षसाला बाटलीत कोंडणाऱ्या जादूप्रमाणे स्वराज्याला आपल्या गवसणीत गुंडाळून आपल्या देशबांधवांपुढे आणून हजर देखील केले ! हा सर्व त्यांच्या कल्पनेचा बुडबुडा असेल, परंतु एखाद्या प्रचंड घुमटाप्रमाणे तो विस्मयजनक होता यात मात्र शंका

नाही. त्यांचे व्यावहारिक सिद्धान्त व आडाखे देखील असेच त्यांच्या मनाच्या दांडगेपणास साजेसे असत. ‘एक रुपयाचे पुस्तक खपविण्यापेक्षा शंभर रुपयांचा ज्ञानकोश खपविणे व्यावहारिक दृष्ट्या अधिक सुलभ’ हा त्यांचा विक्रीशास्त्रातील सिद्धान्त सुप्रसिद्धच आहे.

त्यांच्या मनाचे मोठेपण विरोधप्रसंगांमधून चांगलेच दिसून पडत असे. त्यांनी भांडणे केली नाहीत असे नाही. आपल्या आयुष्यात पुष्कळच तंटे ते खेळले. महात्मा गांधीपासून तो तहत एखाद्या लहानशा ग्रामस्थ वकिलापर्यंत अनेकांवर त्यांनी प्रसंगोपात्त टीकेचे हत्यार चालविले. परंतु त्यांची युद्धपद्धती सरळ, प्रांजळ व रोखठोक होती. स्वतःची बौद्धिक श्रेष्ठता व प्रतिपक्षाची हीनता यांविषयीचा ग्रह त्यांच्या मनात नेहमी वज्रलेप झालेला असावयाचा. त्यामुळे स्वतःविषयी कधीही न ढळणारा दांडगा आत्मविश्वास आणि प्रतिपक्षाविषयी बेगुमान तुच्छता ही त्यांच्या लिखाणात नेहमी दिसून येत असे. तथापि त्यांच्या स्वभावात कुत्सितपणाचा लवलेशही नव्हता. मत्सर, द्वेष, असूया इत्यादि क्षुद्र मनामध्ये वास्तव्य करणाऱ्या विकारांचा त्यांच्या मनास स्पर्श होत नसे. कोणीही मनुष्य उपजत दुष्ट किंवा अकारण खल नसतो; आपला स्वार्थ साधण्याकरिता तो दुसऱ्याचे नुकसान करण्यास प्रवृत्त होतो, इतकेच; असे त्यांचे तत्त्व होते. आपल्या मार्गात आलेला काटा दूर करण्यापलीकडे त्यांनी कधी कोणाशी शत्रुत्व केले नाही; अनुदारपणे कधी कोणाचे पाय ओढण्याचा प्रयत्न केला नाही. भांडण खेळण्यात त्यांनी नेहमीच दिलदारपणा व खेळीमेळीची वृत्ती दाखविली. ते कधी चिडले नाहीत किंवा जळफळले व संतापले नाहीत. त्यांचे प्रतिपक्षी अनेकवार चिडले, जळफळले व संतापले. डॉ. केतकरांचे मोठे मन मात्र कधी क्षुद्र झाले नाही.

एखाद्या प्रचंड डोंगरावरील खाचखळगे व दऱ्याखोरी हीही ज्याप्रमाणे मोठीच असावयाची त्याचप्रमाणे त्यांच्या दांडग्या मनाचे काही दोषही दांडगेच होते, यात शंका नाही. परंतु त्यांनी स्वभाषेच्या व स्वसंस्कृतीच्या उन्नतीकरिता आपले आयुष्य अर्पण करावयाचे ठरविल्यामुळे त्यांच्या विशाल गुणसमुच्चयाचा फायदा समाजास मिळाला आणि त्यांचे दोष मात्र त्यांना स्वतःलाच भोवले. सामान्य जनांप्रमाणे द्रव्यार्जन करून प्रपंच

सुखाने चालविण्याचे ध्येय त्यांनी डोळ्यांपुढे ठेवले असते तर प्रकार उलट झाला असता; म्हणजे प्रचंड बुद्धिमत्ता, कल्पकता इत्यादि गुणांचा फायदा अधिक बढती मिळवून वैयक्तिक सुखसाधने वाढविण्यात त्यांनी करून घेतला असता आणि त्यांचा विक्षिप्तपणा, बेदरकारपणा इत्यादि अवगुणांची तोशीस समाजास सोसावी लागली असती. परंतु आपल्या आयुष्याच्या प्रारंभीच त्यांनी बुद्धिपुरस्सर त्यागाचा मार्ग स्वीकारला व केवळ ५३ वर्षांच्या आयुष्यात प्रचंड कर्तृत्व दाखवून ते कालवश झाले.

बरोबर दहा वर्षांपूर्वीची, म्हणजे १९२७ सालची गोष्ट. मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजात अध्यापकपदावर असताना माटुंग्यास मी राहत होतो. सकाळी ८ वाजण्याचा सुमार असावा. डॉक्टरसाहेबांची स्वारी मंद पावलांनी माझ्या खोलीत शिरली व कपाळावरचा घाम पुशीत पुशीत शेजारच्या खुर्चीवर स्थानापन्न झाली. त्यांच्या आगमनाचा हेतू अर्थात ज्ञानकोश खपविण्याचाच होता व आल्याबरोबर लगेच त्यांनी त्याबाबतची प्रस्तावनाही केली.

त्या वेळेपर्यंत या व्यक्तीशी माझा परिचय नव्हता व त्यांच्या ज्ञानकोशाविषयीही माझे मत फारसे चांगले नव्हते. त्यांच्याशी परिचय होण्याचा नव्हे, परंतु त्यांची चालचलणूक पाहण्याचा प्रसंग मला अनेकदा आला होता. एकदा पुण्यास सार्वजनिक सभेच्या हॉलमध्ये एक सभा होती. ( सभा कशाबद्दल होती ते स्मरत नाही व साल कोणते तेही आठवत नाही, परंतु बहुधा १९२०–२१ असावे. ) केतकर अध्यक्ष होते व त्या वेळी ते जोडा, पेशवाई पायजमा, अंगरखा व पगडी असा पोषाख करून आले होते. त्या वेळी ते काय बोलले ते अर्थातच आता आठवत नाही, तथापि त्यांच्या वक्तृत्वाविषयी माझे मत काही चांगले झाले नाही. त्यानंतर त्यांना पाहण्याचा प्रसंग आला तो १९२७ च्या साहित्य संमेलनात किर्लोस्कर नाटकगृहामध्ये. संमेलनांगभूत काव्यगायनास त्या दिवशी रात्री भलताच रंग चढला होता. मी रंगपीठावरच बसलो होतो. बहुतेक पट्टीच्या कवींचे काव्यालाप संपल्यावर अखेरीस डॉक्टरांची स्वारी रंगपीठावर अवतीर्ण झाली आणि अमेरिकेतील अनुभवांवरचे आपले आर्याबद्ध काव्य आपल्या बेसूर आवाजात वाचून दाखवू लागली. परदेशस्थ युवतींबरोबर युवकांनी केलेल्या प्रणयांचे

निर्विकाररीतीने रुक्ष भाषेत केलेले वर्णन, त्याला योजलेले आर्यावृत्त व स्पष्टीकरणात्मक टीपांसह ते वाचून दाखविणारे डॉ. केतकर ! या सर्व विचित्र गोष्टींच्या समुच्चयामुळे त्या वेळेस केवढी मजा आली असेल, याची कल्पनाच करावी.

आठवणीतून आठवणी निघतात. केतकरांचे 'उत्तर अमेरिकेतील वसंतकाल' हे काव्य किंवा त्याचा काही भाग १९१४–१५ च्या सुमारास प्रसिद्ध झाला होता. त्यात वर्णिलेल्या विषयावर कडक शब्दांत केलेली टीका एका मासिकात ( बहुधा ' केरळकोकीळ व नवे मन्वंतर ' असावे ) त्याच सुमारास आली होती. ती मोठ्या आवडीने त्या लहान वयात मी वाचीत असे. साहित्यसंमेलनातील केतकरांचे काव्यगायन ऐकून मला त्या टीकेचे स्मरण झाले. १९१४ सालचा समजुतीतला अपक्वपणा १९२७ साली राहिलेला नव्हता; उलट परदेशात केलेल्या किंवा पाहिलेल्या मौजांचे निर्विकार संथपणाने व खेळीमेळीच्या प्रांजलपणाने वर्णन करणाऱ्या केतकरांना पाहून या व्यक्तीमध्ये काही कुतुहलजनक अद्‌भुतता आहे, अशी भावना त्यांचे काव्यगायन ऐकताना झाली.

मिस कोहन यांच्याशी डॉ. केतकर यांनी केलेला विवाह तत्कालीन सामान्य लोकमतानुसार आम्हांस त्या अपक्व वयात गर्ह्यच वाटला होता आणि त्यासाठी त्यांनी केलेला व्रात्यस्तोम म्हणजे निवळ व्रात्यपणाच असे वाटत होते. ( आता अर्थात तसे वाटत नाही. ) तथापि या सर्व कृत्यांमध्ये एक प्रकारची चमत्कृतिजनक अलौकिकता होती; आणि ज्या ठिकाणी काही विलक्षणपणा, असामान्यता दिसेल त्याकडे ओढ घेण्याचा माझ्या मनाचा स्वभावच असल्यामुळे डॉक्टरांविषयी मला एकप्रकारचे कुतूहलमिश्र आकर्षण तेव्हापासूनच वाटत होते.

परंतु हे डॉक्टर केतकरांविषयी झाले. त्यांच्या ज्ञानकोशाविषयी तर यापेक्षाही प्रतिकूल भावना मनात वसत होती. ज्ञानकोशामध्ये त्यांनी मराठी काव्याविषयी " एकंदरीने मराठीतील काव्यवाङ्मय म्हणजे उष्टे आणि भिकार होय....आजपर्यंत झालेले मराठी वाङ्मय सर्व जरी जळून गेले तरी जगाचे काव्यनाश या दृष्टीने काही एक नुकसान व्हावयाचे नाही " असे जे विधान केले होते त्यावर सर्वत्र बरीच टीका झालेली त्या वेळी ताजी होती.

शिवाय ज्ञानकोशाचे जे थोडेसे प्रसंगोपात्त अवलोकन त्यापूर्वी मी केले होते त्यावरून त्याच्या अपूर्णतेचा प्रत्यय मला आलेला होता.

केतकर व ज्ञानकोश यांच्याविषयी माझ्या मनोवृत्ती याप्रमाणे होत्या, अशा काळी वर सांगितल्याप्रमाणे १९२७ साली, डॉक्टरसाहेब एकदम मजपुढे ' दत्त ' म्हणून उभे राहिले. संभाषणामध्ये मी त्यांना नडविले परंतु कृतीमध्ये मी त्यांच्यापुढे हार खाल्ली. म्हणजे इतकेच की मी ज्ञानकोशाचा ग्राहक झालो.

" तुमच्यासारख्या प्रोफेसरांनी तर ज्ञानकोश अवश्य घेतला पाहिजे. निरनिराळ्या विषयांची माहिती हरघडी तुम्हांला लागणार. त्यासाठी संदर्भ ग्रंथ अवश्य पाहिजे. ' ब्रिटानिका ' सारख्या परकीय ज्ञानकोशाचा आपणांस काही उपयोग नाही. आपल्या देशातील लोकांच्या गरजा पाहून तयार केलेला ज्ञानकोशच तुमच्या उपयोगी पडेल. " असा युक्तिवाद करून डॉक्टरसाहेबांनी ज्ञानकोश ज्यांनी घेतला अशा काही प्रोफेसरांची नावेही मला सांगितली.

" डॉक्टरसाहेब ! खरोखर जर पाहिले तर मला काही तुमचा ज्ञानकोश घ्यावा असे वाटत नाही. कारण मला त्याचा काही उपयोग होण्याचा संभव दिसत नाही. सर्वसामान्य माहितीचे जे विषय आहेत ते 'ब्रिटानिका' मधून आम्हांस उत्तम रीतीने जाणून घेता येतात. आपल्या देशासंबंधाच्या विशिष्ट ज्या बाबी आहेत त्यांपैकी आम्हांला ज्या माहितीची जरूरी लागावयाची ती देणारी पुस्तके बरीचशी मजजवळच आहेत आणि काही मला सहज मिळण्याजोगी आहेत. तेव्हा तुमच्या ज्ञानकोशाचा मला काही उपयोग होईलसे दिसत नाही."

यावर डॉक्टरसाहेबांनी निरनिराळ्या रीतींनी माझ्याशी युक्तिवाद करण्याचा प्रयत्न केला. हिंदुस्थानविषयक माहिती देण्यात ज्ञानकोशाची किती पृष्ठे खर्च पडली आहेत, ती माहिती कोणकोणत्या दुर्मिळ ग्रंथांतून कसकशी मिळविण्यात आली, इत्यादि गोष्टींचे विवरण त्यांनी केले. बऱ्याचशा बाबतीत नवीन संशोधन केले असल्याचीही प्रौढी त्यांनी गायिली. तथापि माझी समजूत पटल्याचे चिन्ह काही माझ्या चेहेऱ्यावर उमटेना.

"डॉक्टरसाहेब, कानाकोपऱ्यातल्या गोष्टी नेहमी थोड्याच उपयोगी पडावयाच्या आहेत ? नेहमी लागणाऱ्या विषयाची माहिती चटकन हातांशी येण्याजोगी असली तर त्या संदर्भग्रंथाचा खरा उपयोग. आधुनिक महाराष्ट्रातल्या प्रसिद्ध पुरुषांची माहिती ज्ञानकोशात आली पाहिजे इतके तरी आपण कबूल कराल की नाही ? कुंट्यांसारख्या प्रसिद्ध पुरुषाचे सदर आपल्या ज्ञानकोशात नाही. अशाच किती तरी व्यक्तींसंबंधाने माहिती सुलभ रीतीने देता येण्याजोगी असूनही ज्ञानकोशात दिलेली आढळत नाही."

ज्ञानकोशात उल्लेख नसलेल्या अशा आणखी कोणच्या व्यक्तींची नावे मी त्या वेळी सांगितली हे आता आठवत नाही, परंतु कुंट्यांचे नाव ऐकून डॉक्टरसाहेब थोडे स्तिमित झाल्यासारखे झाले यात शंका नाही. तथापि त्यामुळे मुळीच ओशाळून न जाता एक प्रकारच्या प्रांजळपणाने व सरावलेल्या मालखपव्याच्या चिकाटीने ते म्हणाले, "अशा ज्या काही उणिवा ज्ञानकोशात राहून गेल्या आहेत हे पाहण्याकरिता तरी आमच्या ज्ञानकोशाची एक प्रत तुम्हांला जरूर घ्यावयास पाहिजे. ज्ञानकोशात राहून गेलेली व्यंगे भरून काढण्यासाठी आम्ही पुरवणी खंड काढणार आहो, ते काढण्याचा काल शक्य तितका जवळ आणण्यास ज्ञानकोशाच्या शिल्लक प्रती विकत घेऊन पडीत मालाचा उठाव करण्यास हातभार लावणे हाच परिणामकारक उपाय आहे."

परंतु यानंतर डॉक्टरसाहेबांना जास्त युक्तिवाद करण्याची मी जरूरी ठेवली नाही, ग्राहक होण्याचे मी मान्य केले.

यानंतरचा प्रसंग १९२८ अगर १९२९ सालातला असावा. नागपूरच्या मॉरिस कॉलेजाने आपल्या वार्षिक स्नेहसंमेलनासाठी प्रमुख वक्ते म्हणून डॉ. केतकरांस पाचारण केले होते. समारंभाचे अध्यक्ष या नात्याने डॉक्टरांनी केलेल्या भाषणातील मुद्दे जरी चांगले होते तरी वक्तृत्वगुणांच्या दृष्टीने ते निराशाजनक झाले. त्यात त्यांनी दोन गोष्टी मुख्यत्वेकरून सांगितल्या. वऱ्हाड–नागपूर प्रांत हा अत्यंत प्राचीन व पुढारलेल्या संस्कृतीचा वारस असून संशोधनाला येथे अतोनात सामग्री

उपलब्ध होण्याजोगी आहे. तेव्हा या प्रांतातील होतकरू तरुणांनी संशोधनकार्यात पुढे सरसावले पाहिजे व सरकारलाही प्राचीन अवशेषांचे उत्खनन करण्यास भाग पाडले पाहिजे. प्राचीन विदर्भातील कन्या आपल्या स्वतंत्र बाण्याबद्दल प्रसिद्ध असून आपला नवरा पसंत करण्याचा हक्क त्या स्वतः बजावीत असत. विदर्भातील स्त्रियांचा तेजस्वीपणा व स्वतंत्र बाणा दमयंती, इंदुमती, रुक्मिणी इत्यादि राजकन्यांच्या उदाहरणांवरून व्यक्त होत असून तोच बाणा सध्याच्या मुलींनी देखील कायम ठेवला पाहिजे. इ० इ०

या त्यांच्या सिद्धान्तावर सायंकाळच्या उपाहाराच्या वेळी कॉलेजच्या मुलांसमोर त्यांनी जे भाष्य केले ते सोवळ्या नीतिवाद्यांस रुचण्याजोगे नव्हते. शाळा कॉलेजे ही मुलांमुलींनी परस्परांशी प्रेम जुळविण्याची ठिकाणे होत; त्यांनी तसें करू पाहिल्यास त्यांत गैर असे काही नाही; मात्र या प्रेमाराधनेस योग्य वळण लागावे आणि वंशशास्त्राच्या दृष्टीने अनिष्ट संबंध घडून येऊ नयेत यासाठी अध्यापक वर्गाने या बाबतीत मार्गदर्शन केले पाहिजे, असा त्यांच्या प्रतिपादनाचा आशय होता. अशा गोष्टी आणि त्या केतकरांनी मनमोकळेपणाने खुलवून सांगितलेल्या, तेव्हा पुष्कळांनी मिटक्या मारीत त्या ऐकून त्यावर चावटपणाची भाष्ये केली, हे ओघानेच झाले. काही गंभीर प्रकृतीच्या लोकांना हा 'चावटपणा' (केतकरांचा आवडता शब्द !) मनातून खपला नाही व त्यांनी त्याविषयीं नापसंती व्यक्त केली. परंतु केतकरांचे बोलणे थट्टेच्या सुरातले भासत असले तरी त्यात सामाजिकदृष्ट्या गंभीर व महत्त्वाचा असा एक प्रश्न अंतर्भूत झाला होता इकडे कोणाचेच लक्ष गेले नाही. सहशिक्षणाच्या सध्याच्या कालात उमलत्या वयातील मुलांमुलींचे परस्पर संघटन कशा प्रकारचे होत आहे व व्हावयास पाहिजे याचा विचार वस्तुस्थितीकडे डोळेझाक न करिता समाज नेत्यांनी केला पाहिजे. केतकरांच्या प्रवचनाचा आशय असाच होता.

डॉ. केतकरांच्या तऱ्हेवाईक प्रतिभेचा विचार करू लागले म्हणजे आंग्ल वाङ्मयातील सॅम्युएल बटलरची आठवण होते. दोघांमध्ये फरक पाहू गेले तर पुष्कळच आढळेल. ज्ञानकोशासारखी प्रचंड योजना कल्पून ती पार

पाडण्याचे व्यावहारिक संघटनाकौशल्य किंवा स्वदेश, स्वभाषा व स्वसंस्कृती यांविषयीची तीव्र अभिमानाची भावना बटलरमध्ये मुळीच नव्हती. तथापि केतकरांच्या मनाला ही भावनांची बैठक असूनही त्यांच्या लिहिण्या-बोलण्यात एक प्रकारची निर्विकारता व आदरशून्य चिकित्सक वृत्ती दिसत असे, तिचे स्वरूप सॅम्युएल बटलरच्या वृत्तीसारखे फार वाटते. विशेषतः त्यांच्या ‘ बऱ्यावाईट आठवणीं ’तील त्यांनी स्वतः आपली माता व इतर नातेवाईक यांच्यासंबंधीची केलेली वर्णने वाचली तेव्हा बटलरच्या The Way of All Flesh या कादंबरीची आठवण बरीच झाली. बटलरचा खुनशीपणा किंवा चीड डॉ. केतकरांमध्ये मुळीच नव्हती व तशी उत्पन्न होण्याचे कारणही नव्हते. परंतु एक विशिष्ट प्रकारचा फटिंगपणा, कौटुंबिक वातावरणाविषयी बेफिकिरी, भावनाशून्य रीतीने मानसिक हेतूचे व अवस्थांचे पृथक्करण व आविष्कार करण्याची पद्धती, इत्यादि ज्या विशेषांमुळे डॉ. केतकरांचे लिखाण आपणांस अपूर्व असे वाटते, ते बटलरच्या लिखाणा-मध्येही आपणांस प्रतीत होतात. रूढ समाजांची पर्वा न करिता, लोकांस विक्षिप्त किंवा अतिरेकी वाटणारे विचार व्यक्त करण्याचे धारिष्ट बटलर व केतकर यांच्यामध्ये सारखेच होते. त्यामुळेच बटलरच्या आयुष्यात बटलरची चहा मुळीच झाली नाही व इकडे डॉक्टर केतकरांवरही थोड्या निराळ्या संबंधात, परंतु “ मी जे काय लिहिले आहे त्याची उत्तम प्रकारे जाणीव होण्याइतका ज्ञानविलास भोवतालच्या जनतेत नाही. त्यामुळे लोकांच्या स्तुतिनिंदेचीही मला फारशी फिकीर वाटत नाही. ” असे उद्गार काढण्याची पाळी आली. बटलरने कादंबरी लिहिली तो बव्हंशी आत्मचरित्रात्मकच आहे; डॉक्टरसाहेबांनी कादंबऱ्या लिहिल्या त्यांत स्वतःच्या अनुभवांचे व आपल्या विविध आयुष्यांत आढळलेल्या निरनिराळ्या प्रकारच्या व्यक्तींचेच बव्हंशी चित्रण आहे. बटलर हा स्वतंत्र विचार करून नवे सिद्धान्त बांधणारा, रूढ विचारांचा द्वेष्टा, असा शास्त्रज्ञ होता तर डॉ. केतकरही तसेच होते.

परंतु इतक्या लांब जाऊन आपल्या लोकांस न समजणाऱ्या तुलना करीत बसण्यापेक्षा स्वतंत्र प्रज्ञेच्या बाबतीत आपल्याइकडील एका पुरुषाचे उदाहरण सहज सुचण्याजोगे आहे. हा पुरुष म्हणजे संशोधकाग्रणी राजवाडे होत हे वाचकांच्या सहज लक्षात येईल. राजवाडे आणि केतकर

दोघांचे जीवितकार्य निराळे, त्यांच्या आयुष्यक्रमाची तऱ्हाही परस्परांहून अगदी भिन्न. एकेका जीर्ण कपट्याची भीक मागत एक सर्वत्र हिंडले, तर दुसऱ्यांस एकेका ग्राहकाची भीक मागत भिरीभिरी भटकावे लागले. एकजण आहारविहारात अगदी व्यापक व निःसंकोची वृत्तीचा तर दुसरा जणू प्रती कार्तिकस्वामीच! असे असूनही केतकरांशी तुलना करण्यासाठी राजवाडे यांचेच नाव सुचते याचे कारण त्या दोघांची सर्वगामी बुद्धिमत्ता व स्वतंत्र प्रज्ञा हे होय. स्वतःविषयीचा अहंभाव व इतरांविषयीची, विशेषतः प्रतिपक्षाविषयीची तुच्छता, या गुणांमध्ये दोघे एका माळेचेच मणी असले तरी केतकरांपेक्षा राजवाडे या बाबतीत वरचढ ठरतील. समंजसपणा, गुणग्राहकता, मनाचे औदार्य व मोकळेपणा या गुणांचे लेणे केतकरांस लाभले होते तर राजवाडे यांच्या वृत्तीस तुसडेपणाखेरीज दुसरे नाव देणे कठीण पडेल. दोघेही पट्टीचे इतिहासज्ञ व समाजशास्त्री, तथापि राजवाडे यांचे लिहिणे शास्त्रीय कल्पनांच्या विद्युत्भारांनी कितीही भारलेले असले तरी एकंदरीत भरमसाट, तर केतकरांचे लिहिणे कितीही विचित्र कल्पनांनी युक्त असले तरी एकंदरीने शास्त्रपूत असे. अमेरिकेमध्ये पाच वर्षे त्यांनी पद्धतशीर रीतीने समाजविषयक आणि तत्संबंधी शास्त्रांचा जो दांडगा व्यासंग केला त्यामुळे शास्त्रीय दृष्टी त्यांच्या ठिकाणी कोरीव लेखाप्रमाणे ठसली. त्यांच्या विचारांची व लेखनाची शास्त्रीय बैठक कधी सुटली नाही. राजवाड्यांनी अनेक शास्त्रांत ढवळाढवळ केली, परंतु केतकरांनी शास्त्रशुद्ध रीतीने अभ्यासलेल्या व करतलामलकवत करून घेतलेल्या ‘भारतीयांची समाजस्थिती व सामाजिक इतिहास’ या समाजशास्त्रांतर्गत विषयाच्या बाहेर मौलिक लिखाण फारसे केलेले नाही.

परंतु सर्वांत मोठा फरक अद्याप सांगावयाचाच आहे. राजवाड्यांच्या कर्तृत्वास व्यावहारिक बाजू नव्हती तर केतकरांच्या कर्तृत्वास ती फार मोठ्या प्रमाणात होती. सरकारचा वगैरे आश्रय न घेता, केवळ लोकाश्रयावर प्रचंड प्रमाणात वाङ्मयनिर्मिती करण्याची कल्पना मराठी साहित्यक्षेत्रात-त्यांनी प्रथम आणली, अशा वाङ्मयनिर्मितीला जरूर ती साधनसामग्री कशी मिळवावी हे त्यांनी शिकविले, संघटना कशी करावी हे त्यांनी स्वतःच्या उदाहरणाने दाखवून दिले आणि ही सर्व संघटना कार्यसिद्धीच्या पैलतीरा-

पर्यंत नेऊन पोचविण्यास जरूर ती चिकाटीही त्यांनी दाखविली. वाङ्मय-कार्यांत वावरून त्यावर जगणारा असा वर्ग समाजात निर्माण करण्यास केतकरांचे कर्तृत्व फार मोठ्या प्रमाणात कारणीभूत झालेले आहे.

तेव्हा डॉ. केतकर यास दोन बाबतीत युगप्रवर्तकत्वाचा मान महाराष्ट्रीयांची आधुनिक पिढी खास देईल. महाराष्ट्रात समाजशास्त्रीय अभ्यासाचे नवे युग त्यांनी सुरू केले आणि वाङ्मयव्यवहाराच्या नवीन दिशेचे मंत्रद्रष्टे ते स्वतः झाले. या दोन्ही बाबतीत त्यांनी स्वतः केलेल्या अतुलनीय कामगिरीचा व त्यांनी स्वतः उत्पन्न केलेल्या प्रेरणेचा विचार करता त्यांच्या कर्तृत्वाच्या कालखंडास, म्हणजे १९१७–१९३७ या वीस वर्षांच्या अवकाशास, वाङ्मयक्षेत्रातील **केतकरी युग** म्हणून कोणी संबोधिले तर ते अगदीच अनाठायी होईल असे नाही. असे म्हणण्यात इतर कोणाही कार्यकर्त्यांस कमी लेखण्याचा उद्देश नाही. तथापि उपर्युक्त कालखंडात महाराष्ट्रीयांच्या बुद्धीवर व कार्यशक्तीवर वाङ्मयक्षेत्रात केतकरांच्याइतका प्रभाव इतर थोड्याच व्यक्तींनी गाजविला असेल.

**श्रीनिवास नारायण बनहट्टी**

# वैचारिक नेतृत्वाची अभावलापिका

'पाहिजे ! नेतृत्व पाहिजे !'

'तुम्ही म्हणता ते सगळं खरं, पण हे करायचं कुणी ? लायक माणसं मिळताहेत कुठं ? आता ही पाहा पंचवार्षिक योजना येऊन पडली आहे, तिच्यात पानोपानी आक्रोश केला आहे, की 'लीडरशिप' (नेतृत्व) पाहिजे. खेड्यांतून, शहरांतून, तालुक्यांतून, जिल्ह्यांतून, जनतेचे नेतृत्व करणारे बुद्धिमान, दमदार तरुण नेते निर्माण झाले पाहिजेत; तरच ही पंचवार्षिक योजना काय आणि समाजास पुढे नेणाऱ्या इतर अनेकानेक कल्पना काय, सफलतेच्या मार्गास लागतील. नाहीतर आहेच हे आपलं कागदी घोडे नाचविणं !'

अखिल भारतीय नभोवाणीच्या एका उच्च दर्जाच्या अधिकाऱ्यांशी गप्पा चालल्या होत्या. रेडियोवर काही भव्य, मनाची पकड घेणारे, सामान्य जनतेच्या जिव्हाळ्याचे कार्यक्रम करावेत या दृष्टीने मी आपल्या कल्पना त्यांना सांगत होतो, त्याला एकदम त्यांनी वरील आशयाचं उत्तर दिलं.

शिक्षणक्रमातून सुशिक्षित होऊन बाहेर पडणाऱ्या सध्याच्या तरुण पिढीमध्ये नेतृत्वगुण नाही, बुद्धीला दमदारपणा नाही, प्रभावी व्यक्तित्व नाही—असा नन्नाचा पाढा सगळीकडून ऐकू येत आहे. त्याचाच दाखला या अधिकाऱ्यांच्या संभाषणात पटला. हिंदुस्थानातील बहुतेक विद्यापीठाचे पदवीदान समारंभ नुकतेच पार पडले; त्यावेळची दीक्षांत भाषणे करणाऱ्या थोर विचारवंतांपैकी कित्येकांच्या भाषणांत विद्यापीठीय शिक्षणाचा दर्जा

खालावला आहे, उत्साही, ध्येयनिष्ठ आणि कणखर बुद्धिमत्तेचे तरुण निर्माण करण्याच्या कामी आमची विद्यापीठे दुबळी ठरू लागली आहेत, हाच सूर होता.

परवा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजच्या वार्षिक दिनाचे प्रवक्ते म्हणून भाषण करताना हीच विलापिका गायिली: “ आपण रानडे, तेलंग, जी. व्ही. जोशी या थोर पंडितांच्या तोडीचे आहो असे आजचे विद्यार्थी म्हणू शकतील काय ? त्या जाड्या पंडितांशी आजच्या विद्यार्थ्यांची तुलनाच होऊ शकणार नाही. न्या. रानडे हे एम्. ए. चा अभ्यास करीत होते तेव्हा त्यांनी गहन विषयांवरील सुमारे २५० ग्रंथ वाचले होते असा उल्लेख त्यांच्या चरित्रात सापडतो. आजचा विद्यार्थी त्याच्या क्रमिक पुस्तकांव्यतिरिक्त काही वाचतो की काय याची शंका आहे ” असे त्यांनी म्हटल्याचे प्रसिद्ध झाले आहे.

ही तर आता फॅशन पडल्यासारखी झाली आहे. गडकऱ्यांचा गोकुळ “ ते आमचे वेद, त्या आमच्या श्रुती ” म्हणून टाही फोडतो; त्याप्रमाणे “ ते आमचे रानडे, ते आमचे तेलंग, ते भांडारकर आणि ते शिंदे, ते टिळक आणि ते आगरकर—गेली ती मंडळी—आता कोणी तसे थोर विचारवंत नेते निर्माण होताना दिसत नाहीत–महाराष्ट्राचे नेतृत्व त्यांच्याबरोबर लोपले.” अशी अभावलापिका उद्गारण्याची एक रूढी पडल्यासारखी झाली आहे.

रूढी पडली म्हणून तिजकडे दुर्लक्ष करावे असे मात्र नाही. विचारवंत कळकळीचे पुरुष ज्या अर्थी ही अभावलापिका गातात त्या अर्थी तीत तथ्य असले पाहिजे. जरा चौकस बुद्धीने आजूबाजूला नजर फेकल्यास ते सत्य विषादजनक रीतीने प्रत्ययाला आल्याखेरीज राहत नाही.

आपल्या देशात, विशेषेकरून महाराष्ट्रात, असा सर्वसाधारण नियम दिसतो की प्रतिभावान, कर्तबगार व्यक्तीचे तेज तिशीच्या, फार तर पसतिशीच्या, आत प्रकट होऊन ती व्यक्ती समाजजीवनात आपल्या नेतृत्वपदी सुप्रतिष्ठित होते. त्यानंतर आयुर्दाय असेल व बुद्धीचे चैतन्य टिकून असेल, त्या मानाने त्या त्या व्यक्तीच्या कर्तृत्वाचा विकास होत जातो; पण प्रतिभेची मूळ चमक, कर्तृत्वाचा पहिला आविर्भाव प्रकट होण्यास तिशीपस्तिशीपेक्षा अधिक कालावधी फार करून लागत नाही. ज्योतिराव फुले, रानडे, चिपळूणकर, टिळक,

आगरकर, वामन शिवराम आपटे, गोखले ही सर्व मंडळी पंचविशीच्या आत-बाहेर आपले कर्तृत्व प्रकट करून कीर्तीसिंहासनावर सुप्रतिष्ठित झाली. पुढच्या पिढीतील हरिभाऊ आपटे, शिवरामपंत परांजपे, राजवाडे इत्यादिकांची स्थितीही तीच. यांच्या जरा पुढचे केळकर, खाडिलकर, कोल्हटकर प्रभृती ख्यातनाम साहित्यिक व राजकारणी पंचविशीतिशीच्या सुमारास आपल्या कर्तृत्वपदी स्थिर झाले होते. कर्मवीर शिंदे यांनी तिशीच्या सुमारास आपला ध्येयमार्ग निश्चित केला, तर केतकरांनी तेहतिशीच्या सुमारास ज्ञानकोशाची मुहूर्तमेढ रोवली. रँगलर परांजपे, गडकरी इत्यादि मंडळीही अल्पवयातच चमकली.

आजच्या महाराष्ट्राच्या नेतृत्वात पहिल्या उमेदीच्या वयात असलेल्या मंडळींचा वाटा कितपत आहे ? राजकारणात, समाजकारणात, साहित्यात, अध्यापनात, उद्योगधंद्यात, वकिलीत ज्यांनी प्रभावी नेतृत्व कमावले आहे अशा मंडळींमध्ये तिशीपसतिशीच्या तरुणांचा भरणा कितपत आहे ? साधारणपणे १९३५ नंतर जी मंडळी तिशीमध्ये आली, अशांपैकी किती जणांनी आपापल्या क्षेत्रात महाराष्ट्रव्यापी ख्याती संपादन केली आहे ? आज घडीचे महाराष्ट्राचे नेतृत्व सर्व क्षेत्रात, साठीच्या आतबाहेर असलेल्या किंवा याच्याही पुढे गेलेल्या व्यक्तींकडे आहे आणि सर्व क्षेत्रांत ख्यातनाम झालेल्या व्यक्ती निदान पन्नाशी तरी ओलांडलेल्या आहेत असे स्थूल विधान केल्यास ते चुकीचे होणार नाही. एकट्या सिनेमाच्या क्षेत्राचा आणि काहीसा ललित साहित्याच्या क्षेत्राचा मात्र यास अपवाद दिसतो. सिनेमाच्या साहित्यिक, कलात्मक आणि तांत्रिक या तिन्ही अंगांमध्ये १९३५ नंतर आपल्या पणात आलेल्या व्यक्तींची आवक मोठ्या प्रमाणात झालेली दिसते. इतर सर्व क्षेत्रात १९३५ नंतर प्रभावी नेतृत्वाची किंवा चमकदार कर्तृत्वाची आवक तरुण पिढीतून फारशी झाली आहे असे दिसत नाही. ज्या थोड्याशा व्यक्ती पुढे आलेल्या दिसतात, त्यांचे सामर्थ्य व कर्तृत्व जुन्या पिढीतल्या व्यक्तींच्या मानाने दुबळे, दुय्यम-तिय्यम प्रतीचे असल्याचे प्रत्ययास येते.

राजकारणात पाहिले तर निरनिराळ्या पक्षातून आंबेडकर, काकासाहेब गाडगीळ, डांगे, जेधे, पाटील, हिरे, पंजाबराव व रामराव देशमुख, गोरे, जोशी ही जुन्या पिढीतलीच नावे डोळ्यांसमोर येतात; अर्थकारणातही तसेच—

धनंजयराव गाडगीळ, चिंतामणराव देशमुख इ० इ०. समाजकारणात पुन्हा आंबेडकर, महर्षी कर्वे, नारायणशास्त्री मराठे हीच जुनी नावे ! वक्तृत्वासारख्या तरुणांना सहजव्याप्य अशा क्षेत्रातही पोतदार, कृष्णाजीपंत कुळकर्णी, फडके, अत्रे, दादा धर्माधिकारी, पेंडसे या कसलेल्या वाग्वीरांखेरीज सभा रंगू शकत नाहीत, असे अनुभवास येते. अध्यापन काय, वृत्तपत्रव्यवसाय काय, सर्वत्र पन्नाशीच्या पुढे गेलेली मंडळीच जागा धरून आहेत असे, एखादा अपवाद वगळता दिसून येते. ललित साहित्यात मात्र पेंडसे, भावे, गाडगीळ अशा काही नव्या पिढीतल्या व्यक्तींनी जुन्या नेतृत्वाला कलाटणी देण्यास सुरुवात केली आहे असा भास होतो. पण इतर सर्व क्षेत्रांत कोठेही नव्या पिढीच्या कर्तत्वाने जुन्या पिढीच्या नेतृत्वास धडक मारली आहे, असे दिसत नाही. साहाजिकच जुन्या पिढीतील थोर विचारवंतांची कळकळ त्यांना " शिक्षणाचा दर्जा खालावला आहे ", " तरुण पिढीची दानत व सामर्थ्य कमी होत आहे ", " नवे नेतृत्व आणि कर्तृत्व पुढे येत नाही "—असे विलापाचे सूर काढावयास लावीत आहे.

देशाच्या बौद्धिक व मानसिक नेतृत्वात असा खड्डा किंवा तुटवडा पडण्याचे कारण काय असावे ? " आजच्या शिक्षणाचा दर्जा खालावला आहे " हे कारण पुष्कळ जण देतात. पण शिक्षणाचा दर्जा खालावला आहे म्हणजे तरी काय ? विद्यापीठांच्या अभ्यासक्रमातले विषय गुणाने वा आशयाने कमी केले आहेत म्हणावे, तर तसे दिसत नाही. डॉ. आंबेडकरांनी आजचे प्राध्यापक थोर व विद्वान नाहीत, हे कारण दिले आहे. पण असे म्हणणे काहीसे वृक्ष-बीज न्यायाप्रमाणे तार्किक दुष्टचक्र निर्माण करणारे होते. प्राध्यापक विद्यार्थ्यांना घडवितात; आणि त्याच विद्यार्थ्यांतून पुढचे प्राध्यापक निर्माण होतात. आजचे प्राध्यापक कोते व दुबळे असतील तर तो दोष त्यांच्या प्राध्यापकांकडे जाईल, आणि ही परंपरा संपणार नाही.

पण याच्या उलट बरीच वर्षे प्राध्यापन करीत असलेले कित्येक प्राध्यापक असे म्हणणारे भेटतात, की आजकाल विद्यार्थीच पूर्वीच्या सारखे येत नाहीत. " काय करावे बोवा ! आजकाल वर्गात पहिल्या दर्जाचे stuff (मालमसाला) येतच नाही. किती माथेफोड, उरस्फोड करावी तिचे चीज होत नाही. मुलांमध्ये बुद्धीची झेप, मेंदूची रग आणि दानतीचे सामर्थ्य फार कमी प्रमाणात

आढळते. आम्ही तरी काय करावे ? " अशी तक्रार पुष्कळ जुन्या प्राध्यापकांच्या तोंडून ऐकू येते.

मात्र ही तक्रार ' आर्ट्स कोर्स 'च्या प्राध्यापकांकडूनच ऐकू येते, हे या बाबतीत लक्षात ठेवले पाहिजे. विद्यापीठीय शिक्षणाचे स्थूलमानाने तीन विभाग असतात. मानवीय विद्या ( Arts, Humanities ), भौतिक विद्या ( Science ) आणि तांत्रिक विद्या (Technology). शिक्षणाचा वर्ग खालावल्याची तक्रार यांपैकी मानवीय विद्यांच्या संबंधातच ऐकू येते हे सूक्ष्मपणे पाहिल्यास कोणाच्याही नजरेस येईल. डॉ. आंबेडकरांच्या डोळ्यांसमोर भाषण करताना, आर्ट्स कोर्सचा विद्यार्थीच होता. पदवीदान समारंभात भाषण करणारे विचारवंत नेते आर्ट्स कोर्समधून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांसच मुख्यतया अनुलक्षून बोलतात. कारण, देशाचे वैचारिक नेतृत्व बहुधा मानवीय विद्यांच्या अभ्यासकांतूनच निर्माण होते.

युनिव्हर्सिट्या स्थापन झाल्यापासूनच्या गेल्या शंभर वर्षांच्या सामाजिक इतिहासाचे जर सिंहावलोकन केले तर असे दिसून येते की विद्यापीठीय शिक्षण आणि समाजाचे नेतृत्व यांचा निकट संबंध चालत आला आहे. तुरळक अपवाद सोडल्यास महाराष्ट्रातील जीवनाच्या हरएक क्षेत्रांतील पुरुष विद्यापीठाचे पदवीधर होते व आहेत, असे दिसून येईल. हरिभाऊ आपटे, गडकरी, खांडेकर यांसारखी काही मंडळी जरी पदवीधर नसली तरी विद्यापीठाच्या मांडवाखालून गेली आहेत. काही मंडळी येथे पदवीधर झाली नसली तरी विलायतेतून बॅरिस्टर होऊन किंवा इतर पदव्या संपादून आली. विद्यापीठीय शिक्षणात कितीही दोष असोत, ते शिक्षण आणि समाजाचे वैचारिक नेतृत्व यांचा अविनाभाव संबंध इतका स्पष्ट आहे की तो नाकारता येण्याजोगा नाही.

त्यात आणखी असे दिसून येते की विद्यापीठीय शिक्षणात जे बुद्धिमान व व्यासंगी विद्यार्थी म्हणून चमकले तेच बहुतांशाने पुढील आयुष्यात कर्तबगार विचारवंत म्हणून प्रसिद्धीस आले. ज्या ज्या व्यक्तींनी निरनिराळ्या क्षेत्रांत वैचारिक नेतृत्व केले त्यांपैकी पुष्कळसे मॅट्रिकच्या परीक्षेत खूप वर आलेले किंवा पुढील विद्यापीठाच्या परीक्षांमध्ये उत्कृष्ट यश संपादन करणारे होते. रानडे, भांडारकर, तेलंग, टिळक, गोखले हे सर्व पुरुष विद्यापीठीय अभ्यासक्रमात

पहिल्या दर्जाचे विद्यार्थी म्हणून नावाजलेले होते. त्यानंतर चिंतामणराव वैद्य, वामनराव आपटे, भास्करराव जाधव, अण्णासाहेब लठ्ठे, शि. म. परांजपे, रँग्लर परांजपे, वा. म. जोशी, पां. वा. काणे, अ. बा. गजेंद्रगडकर इत्यादि उत्तर आयुष्यात समाजाचे नेतृत्व करणारी मंडळी विद्यार्थी जीवनात पहिला दर्जा कमावून आपले अलौकिकत्व दाखविलेली अशी होती. बऱ्याचशा लोकांनी परीक्षेत पहिला दर्जा व बक्षिसे वगैरे कमावली नसली तरी कॉलेजात बुद्धिमान, विचारी व व्यासंगी विद्यार्थी म्हणून त्यांची प्रसिद्धी होती. कॉलेजात ढफर विद्यार्थी म्हणून प्रसिद्ध असून पुढील आयुष्यात चमकदार नेतृत्व संपादन केले अशी उदाहरणे अपवादात्मक होती.

हे सिद्धांतिक सत्य लक्षात घेतले आणि 'देशाचे वैचारिक नेतृत्व बहुधा मानवीय विद्यांच्या अभ्यासकांतूनच निर्माण होते' या मागे वर्णिलेल्या दुसऱ्या सिद्धान्ताशी त्याचा मेळ घातला, म्हणजे सद्यःस्थितीच्या संशोधनाचा एक मार्ग खुला होईल. दमदार व तेजस्वी बुद्धीची मुले आर्ट्स कोर्स किंवा मानवीय विद्या यांच्या अभ्यासाकडे वळत नाहीत, किंवा कमी प्रमाणात वळतात, अशी वस्तुस्थिती गेल्या काही वर्षांपासून आपल्याकडे निर्माण झाली आहे काय ? प्रस्तुत लेखकाच्या अवलोकनावरून त्याला असे विधान करावेसे वाटते. गेली सुमारे पंधरा वर्षे मॅट्रिक परीक्षेत वर येणाऱ्या बुद्धिमान विद्यार्थ्यांचा फार मोठा ओघ 'सायन्स' (भौतिक शास्त्रे) कडे वळत असतो. पहिल्या दर्जाचे पुरुष विद्यार्थी आर्ट्सकडे फार कमी प्रमाणात जातात याचे मजेदार प्रत्यंतर यंदाच्या नागपूर विद्यापीठाच्या निकालात मिळते. या विद्यापीठाच्या १९५२ च्या इन्टर आर्टसच्या परीक्षेला ९२२ पुरुष व ५७८ स्त्री उमेदवार बसले होते. पुरुषांपैकी ५ जणांना पहिला वर्ग मिळाला तर स्त्री उमेदवारांपैकी १० जणींनी पहिला वर्ग पटकावला. म्हणजे स्थूलमानाने पुरुषांत २०० ला १ असे प्रमाण पडले तर स्त्रियांतून ६० ला १ असे प्रमाण पडले. बी. ए. च्या निकालातही हेच प्रमाण दिसते. त्या परीक्षेला पुरुष उमेदवार ६४९ बसले, त्यांतून तीन पहिल्या वर्गात आले; स्त्री उमेदवार २५१ बसले, त्यांतून ४ पहिल्या वर्गात आले. जी स्थिती नागपूरकडे, तीच बहुधा मुंबई–पुण्याकडेही असावी. मॅट्रिकमध्ये पहिल्या वर्गात आला की तो चाललाच सायन्सकडे. 'सायन्स'च्या वर्गात

ज्यांना प्रवेश मिळत नाही अशा शिलकी दुय्यम दर्जाच्या विद्यार्थ्यांचा लोंढा मग आर्ट्सकडे वळतो. मॅट्रिक परीक्षेत उत्कृष्ट यश मिळवूनही स्वतःच्या आवडीस्तव किंवा ध्येयास्तव आर्ट्स कोर्स ( मानवीय विद्यांचा अभ्यासक्रम ) घेणारा विद्यार्थी विरळा. सायन्सकडे गेलेले विद्यार्थी अभ्यासक्रम दोन अगर चार वर्षे चालवून त्यात वर नंबर मिळाल्यास तांत्रिक शिक्षणाकडे वळतात आणि त्यातून निरनिराळ्या शाखांचे तंत्रज्ञ ( इंजिनियर ) होऊन बाहेर पडतात. अशा तंत्रज्ञांची निरनिराळ्या सरकारी खात्यांमधून, कारखान्यांमधून, संशोधनशाळांमधून उच्च दर्जाचे हुद्देदार म्हणून मोठ्या पगारावर नेमणूक होते. काही थोडे स्वतंत्र औद्योगिक किंवा तांत्रिक व्यवसाय सुरू करतात. त्यांनाही अमूप मिळकत होते.

गेली पंधरावीस वर्षे—विशेषतः दुसऱ्या महायुद्धाच्या सुरुवातीपासून—देशात औद्योगिक नवरचना मोठ्या प्रमाणावर सुरू झाली आहे. मोटारी आणि विमाने ही तर आता जुनी झाली; त्यानंतर अलीकडे रेडिओ, टेलिफोन रेफ्रिजरेटर आणि इतर अनेक प्रकारची वैद्युत उपकरणे, प्लास्टिक्स, कृत्रिम तंतुवस्त्रे, नानाप्रकारची जीवरसायनी औषधे, इत्यादिकांच्या द्वारा शास्त्रीय प्रगतीचा सामान्य मानवाच्या जीवनात प्रवेश झाला आहे. तेव्हा शास्त्रज्ञांची आणि तंत्रज्ञांची जरूर सर्वत्र भासत आहे. अर्थात मागणी–पुरवठ्याच्या सर्वव्यापी सिद्धान्तानुसार शास्त्रज्ञ–तंत्रज्ञांना सध्या मोठी किंमत येत आहे. त्यामुळे विद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या तरुण पिढीचा फुलोरा, निवडक बुद्धिमंतांचा बहुतांश, शास्त्रीय व तांत्रिक शिक्षणाकडे वळत आहे.

वैचारिक नेतृत्व भौतिक शास्त्रे आणि तांत्रिक विज्ञान यांच्या व्यासंगातून निर्माण होणे दुरापास्त असते. रसायनशास्त्रज्ञ अणूचे पृथक्करण करून नवीन शक्तींचा शोध लावील, तंत्रज्ञ रेडिओचे व्हॉल्व्ह, किंवा मोटारीचे एंजिन तयार करील, अभियंता मोठे पूल अगर धरण बांधील—भौतिक सुखसमृद्धीची वा विनाशाची साधने उपलब्ध करून देणे हे त्याचे काम. मानवी व्यक्तीच्या आणि समाजाच्या मनाला योग्य वळण लावणे, व्यक्तीचे व समाजाचे सुखसंवर्धन होईल अशा रीतीने सर्व व्यवहारांचे नियमन व व्यवस्थापन करणे, साहित्य व कला यांची जोपासना करणे, मानवाच्या विचारसंपदेत भर घालणे, इत्यादि गोष्टी भौतिक शास्त्रज्ञांच्या व तंत्रज्ञांच्या नव्हेत. त्यांचे बुद्धिसर्वस्व जड वस्तूंशी

झटापट घेण्यात खर्च होते. समाजाचे व राष्ट्राचे वैचारिक नेतृत्व करणे हे त्यांचे कार्यक्षेत्रच नव्हे.

आचार्य प्रफुल्लचंद्र रे, जगदीशचंद्र बोस यांसारख्या काही अलौकिक प्रतिभाशाली शास्त्रज्ञांनी समाजाचे वैचारिक नेतृत्व थोड्याबहुत प्रमाणात केले आहे. पण अशा शेखरीभूत व्यक्ती फारच विरळा. आपल्याकडेही महर्षी धों. के. कर्वे, रँग्लर परांजपे, महाजनी या गणितशास्त्रज्ञांनी समाजसुधारणेचे व संस्थाचालनाचे चिरस्मरणीय कार्य करून दाखविले आहे. पण या व्यक्ती ज्या काळात भौतिकशास्त्रे आणि मानवीय विद्या यांच्या अभ्यासाची विद्यापीठात पूर्ण फारकत झाली नव्हती अशा काळात तयार झालेल्या होत. खेरीज त्या देखील अपवादात्मकच म्हणाव्या लागतील.*

तेव्हा, काही अपवाद असले तरी, समाजाचे वैचारिक नेतृत्व मानवीय विद्यांच्या अभ्यासकांमधून निर्माण होते हाच सिद्धांत खरा. जे पेरावे ते उगवते हे जे कार्यकारण साम्याचे तत्त्व सृष्टीमध्ये सर्वत्र आढळते, तेच येथेही लागू पडते. भाषा, साहित्य, मनोरंजन, राजनीती, कायदा, शासनशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, वेदान्त यांच्या अभ्यासातूनच खंदे भाषापंडित, साहित्यिक, मनोवैज्ञानिक, राजकारणी, कायदेपंडित, प्रशासक, अर्थशास्त्री, समाजनियामक व तत्त्वज्ञ निर्माण होतील. या सर्व मानवीय

---

* महर्षी कर्वे, र. पु. परांजपे, ग. स. महाजनी हे नामांकित गणितज्ञ होत. गणित हे भौतिक शास्त्रांना आधारभूत असले तरी ते मुळात मानवीय शास्त्र आहे. पाश्चात्यांकडून आपण घेतलेल्या उच्चशिक्षण व्यवस्थेमध्ये गणिताचा अंतर्भाव आर्ट्स व सायन्स या दोन्ही अभ्यासशाखांमध्ये केलेला असतो. तेव्हा 'वैचारिक नेतृत्व मानवीय विद्यांच्या अभ्यासकांमधून निर्माण होते' हे जे प्रमेय पुढे मांडले त्याला ही गणिती विद्वानांची उदाहरणे विरुद्ध जाणारी नव्हेत; ती प्रमेयाचे समर्थनच करितात. सतराव्या शतकातील प्रसिद्ध फ्रेंच तत्त्वज्ञ देकार्ते आणि सध्या ९० वर्षांचा असलेला इंग्रज तत्त्वज्ञ बरट्रांड रसेल हे मुळात गणितज्ञ होते.

( ही टीप नव्याने जोडली आहे. )

विद्यांच्या अभ्यासाकडे राष्ट्राच्या तरुण पिढीतील बुद्धिमंतांचा ओघ वळला, तर ही सर्व क्षेत्रे कर्तृत्ववान व्यक्तींच्या भरपूर पुरवठ्याने फुलून जातील. पण तेजस्वी व दमदार बुद्धीच्या तरुणांचा ओघ भौतिक शास्त्रे आणि तांत्रिक विद्या यांच्याकडे जात राहून मानवीय विद्यांची आलये दुय्यम दर्जाच्या विद्यार्थ्यांनीच जर भरू लागली, तर समाजाच्या वैचारिक आघाडीवर तरुणांचा खडखडाट होणार नाही तर काय होईल ?

शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञ कितीही बुद्धिमान असला तरी तो जड निसर्ग, म्हणजे वीज, प्रकाश, हवा, पाणी, यांवर किंवा जड वस्तू म्हणजे धातू, माती, विटा, दगड, सीमेंट यांवर आपली तीव्र बुद्धी खर्च करणार; पण भौतिक शास्त्रे आणि तंत्रविद्या यांच्या अभ्यासाच्या शेवटी चांगल्या द्रव्यप्राप्तीची बळकट आशा असते. मानवीय विद्यांच्या पदवीधरांना उपलब्ध असलेल्या वकिली, प्रोफेसरी, सरकारी नोकरी, राजकारण, व्यापारी, दलाली, इ. क्षेत्रांत अगोदरच खेचाखेच झाली असल्याने त्यांच्या नशिबी बेकारी किंवा कारकुनी बहुधा ठेवलेली; अशा स्थितीत तेजस्वी तीव्र बुद्धीचे तरुण मानवीय विद्यांच्या अभ्यासाकडे वळतील हे कसे शक्य आहे ?

समाजात नवे नेतृत्व निर्माण होत नाही, शिक्षणाचा दर्जा खालावत चालला आहे, इत्यादि ज्या तक्रारी समाजाच्या पुढाऱ्यांकडून, शासक-वरिष्ठांकडून किंवा शिक्षणश्रेष्ठींकडून अलीकडे उद्‌गारल्या जातात त्यांतली मूलभूत समस्या ही अशी आहे. हे एकच कारण प्रश्नभूत वैगुण्याच्या बुडाशी आहे असा आग्रह धरावयाचा नाही. समाजिक घटना अनेक कारणांच्या समवायाने निर्माण होत असतात. शिक्षणक्षेत्रातील उघड दिसणाऱ्या प्रवृत्तीवरून सुचणारे कारण येथे विवरिले आहे. त्याची यथार्थता पारखून शिक्षणप्रांतातील मानवीय विद्यांचा विभाग आणि शास्त्र–तंत्र यांचा विभाग यांत शिरणाऱ्या बुद्धिमान तरुणांच्या संख्येचा समतोल राखणे हे काम समाजनियामकांचे व राष्ट्रसंचालकांचे आहे.

○ ○ ○

**पुरुषोत्तम गणेश सहस्रबुद्धे**

# समाजकारणाची बचावती ढाल

' रत्नागिरीतील हे सामाजिक मतपरिवर्तन पाहून मी निःशंकपणे सांगतो की येथे घडत असलेली सामाजिक क्रांती खरोखर अपूर्व आहे. रत्नागिरी-सारख्या रेल्वे टेलिफोनचे तोंड न पाहिलेल्या सोवळ्याच्या बालेकिल्ल्यात अस्पृश्यतेचे उच्चाटन करून आज जन्मजात जातिभेदाचेच उच्चाटन करण्यास तुम्ही सजला आहात, याचा मला इतका आनंद होत आहे की हे पाहण्यास मी जगलो हे ठीक झाले असे मला वाटते. मी कुणाचा भाट होऊ इच्छीत नाही. पण ज्या स्वातंत्र्यवीराने आपल्या अज्ञातवासाच्या अवघ्या सात वर्षांत ही अपूर्व सामाजिक क्रांती घडवून आणली त्या बॅ. सावरकरांचा किती गौरव करू असे मला झाले आहे. त्यांनी चालविलेली सामाजिक क्रांतीची ही यशस्वी चळवळ पाहून मी इतका प्रसन्न झालो आहे की देवाने माझे उरलेले आयुष्य त्यांसच द्यावे ! कारण माझे अपुरे राहिलेले हेतू पुरवील तर हाच पुरवील असे मला वाटत आहे. ' कर्मवीर महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे हे उद्गार आहेत.

१९३३ सालच्या महाशिवरात्रीच्या दिवशी रत्नागिरीस अस्पृश्यतेचा पुतळा जाहीर समारंभाने जाळण्यात आला. कर्मवीर शिंदे हे त्या मंगल समा-रंभाचे अध्यक्ष होते. रत्नागिरीत स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी केवळ सात वर्षांत घडवून आणलेली सामाजिक क्रांती पाहून महर्षींचा आत्मा संतुष्ट झाला आणि त्यांनी त्यांच्या कार्याला वरीलप्रमाणे आशीर्वाद दिला.

सावरकरांनी रत्नागिरीस केलेले कार्य खरोखर अभूतपूर्व असेच आहे. भारताच्या इतिहासात पाच हजार वर्षांत अस्पृश्यता व जातिभेद यांचे असे

तत्त्वज्ञानपूर्वक उच्चाटन कधीच झाले नव्हते. त्या चळवळीचा इतिहास वाचताना आजही हे आपण एखादे स्वप्न तर पहात नाही ना, अशी शंका येऊ लागते.

इतक्या दृढपणे आसनस्थ झालेला हा पर्वत, हा रत्नागिरी स्वा. वी. सावरकरांनी हालविला कसा, कोणच्या पुण्याईने त्यांना हे सामर्थ्य प्राप्त झाले हा मोठा विचारणीय प्रश्न आहे. क्रांतिकारक राजकारणातली सावरकरांची अलौकिक देशसेवा, त्यांनी केलेला त्याग, अंदमानला भोगलेले कष्ट हीच पुण्याई येथे कारणीभूत झाली असावी असे वाटते. पूर्वीच्या काळी ऋषिमुनी अरण्यात जाऊन बारा बारा वर्षे तपश्चर्या करीत आणि मग त्यांना दिव्य सामर्थ्य प्राप्त होई.

सावरकरांनी अंदमानमध्ये जातिभेदाचा, अस्पृश्यतेचा हा नरकासुर भस्म करून टाकता येईल असे सामर्थ्य आपणांस प्राप्त व्हावे म्हणूनच चवदा वर्षे जणू तपःसाधना केली आणि तीतून प्राप्त झालेली अमोघ शक्ती त्यांनी या असुरावर सोडली. अत्यंत अल्पावधीत त्याचे निर्दालन करण्यात त्यांना यश आले त्याचे हेच कारण होय. या संग्रामात त्यांनी इतर आयुधे, इतर शस्त्रास्त्रेही अनेक वापरली यात शंकाच नाही; पण ही अमोघ शक्ती हे त्यांचे प्रधान अस्त्र होय.

ही शक्ती व इतर शस्त्रास्त्रे हाती घेऊन त्यांनी हा संग्राम कसा केला ते आता पाहावयाचे आहे. या संग्रामाची, या युद्धाची ही कथा खरोखरीच मोठी रम्य आहे.

हजारो वर्षे, निदान गेली हजार वर्षे जातिभेद व अस्पृश्यता यांमुळे हा हिंदुसमाज छिन्नविच्छिन्न होत आला आहे. प्राणज्योती नष्ट झाल्यावर एखादे प्रेत जसे सडत जाते, त्याचे अवयव विगलित होतात आणि शेवटी त्या मृत देहाचा कण न कण फुटून निराळा होऊ लागतो तशी बुद्धिप्रामाण्य, विवेकनिष्ठा, प्रत्यक्ष व प्रयोगनिष्ठ शास्त्रावरची श्रद्धा नष्ट झाल्यामुळे या हिंदुसमाजाची स्थिती झाली होती. प्रथम इस्लामी आक्रमण आणि त्यानंतर पोर्तुगीज, फ्रेंच, इंग्रज यांचे आक्रमण यांना तो सहजासहजी बळी पडत गेला, याच्या अनेक कारणांपैकी हे एक प्रधान कारण आहे. अस्पृश्यता (स्पर्शबंदी) व जातिभेद

(बेटीबंदी) यांतून अनेक प्रकारच्या बंदी कशा निर्माण झाल्या आणि त्यांमुळे कोणची अनर्थपरंपरा ओढवली याचे बॅ. सावरकरांनी फार उत्कृष्ट वर्णन केले आहे. वेदोक्तबंदी, व्यवसायबंदी, स्पर्शबंदी, सिंधुबंदी (परदेशगमन-निषेध) शुद्धिबंदी (पतितांना परत स्वधर्मात घेण्याची मनाई), रोटीबंदी आणि बेटीबंदी यांना सावरकर सात स्वदेशी बेड्या, सात स्वदेशी शृंखला म्हणतात. म्लेंच्छ, पोर्तुगीज, फ्रेंच, इंग्रज यांनी आपल्याला जिंकून आपल्या पायांत बेड्या घातल्या त्या परदेशी बेड्या होत. पण त्या बेड्या आपल्या पायांत पडल्या याचे मुख्य कारण हे की शत्रू येथे येण्यापूर्वी आपणच आपल्या पायांत या सात बेड्या ठोकून स्वतःच करंटेपणाने परतंत्र होऊन बसलो होतो. या सप्तशृंखला, पोथीजात जातिभेदाचे हे प्राणघातक विळखे आपण तोडून टाकले की त्या विदेशी बेड्या तोडण्यास आपणांस मुळीच अवधी लागणार नाही असा सावरकरांनी सिद्धान्त मांडला आहे. अमके राजकारण आणि अमके समाजकारण हा भेद त्यांच्या मते किती कृत्रिम आहे हे यावरून दिसून येईल. 'राजकारण ही एका हातातील चढती तलवार आणि समाजकारण ही दुसऱ्या हातातील बचावती ढाल' असे त्यांनी एका ठिकाणी या दोन 'कारणां'चे वर्णन केले आहे.

ते म्हणतात, 'शतवार सांगितले तरी पुन्हा सांगतो की, हिंदुराष्ट्राच्या अभ्युत्थानास्तव राजकारण व समाजकारण ही दोन्ही साधने अत्यावश्यक आहेत. यांपैकी कोणतेही एक दुसऱ्यावाचून पंगू आहे.' हिंदुराष्ट्र प्रबळ व्हावयाचे तर हा समाज एकजीव, एकात्म व संघटित झाला पाहिजे. सोळाव्या शतकापासून मराठे भारतात राजकारण करीतच आहेत. पण त्याला समाजकारणाचा पाठिंबा न मिळाल्यामुळे, त्या सात स्वदेशी बेड्या पायात तशाच ठेवून मराठे लढत असल्यामुळे, मोगली आक्रमण मोडून काढण्यास जरी त्यांना यश आले तरी पाश्चात्य संघटित, एकात्म राष्ट्रांशी गाठ पडताच ते नामोहरम झाले हे इतिहासात आपण पाहातच आहो. आजच्या राजकारणातही आपणांस तेच दिसत आहे. गेल्या शंभर वर्षांच्या प्रयत्नाने त्या सात बेड्या काहीशा ढिल्या झाल्या म्हणून आपणांस स्वातंत्र्य मिळाले. पण त्या निखालस तोडून टाकण्यात आपल्याला अजूनही यश आलेले नाही. त्यामुळे आजचे राजकारण नासत चालले आहे; म्हणून

'राजकारण हे समाजकारणावाचून नेहमी पंगूच राहणार' हा स्वातंत्र्यवीरांचा सिद्धान्त आजही शिरोधार्यच वाटतो.

या सप्तशृंखला तोडून टाकण्यास सावरकरांच्या मते एकच घण उपयोगी पडेल आणि तो म्हणजे बुद्धिप्रामाण्य, प्रत्यक्षनिष्ठ व प्रयोगक्षम धर्म, विज्ञाननिष्ठा हा होय. रत्नागिरीला स्थानबद्ध असताना या घणाचेच घाव ते या स्वदेशी बेड्यांवर घालीत होते. जातिभेद, अस्पृश्यता आणि एकंदर जन्मजात उच्चनीचता यांच्या मुळाशी असलेल्या कल्पना किती वेडगळ, किती अशास्त्रीय, किती भ्रांत व अधर्म्य आहेत ते त्यांनी अनेक लेखांतून दाखवून देण्यास प्रथम प्रारंभ केला.

पूर्वीच्या काळी भारतात शेकडो वर्षे श्रुतिस्मृतींच्या आज्ञेनेच वर्णसंकर कसा चालू होता, अनुलोम विवाहपद्धतीने का होईना, पण ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र यांच्यात सर्रास विवाह कसे होत होते, ब्राह्मणांची धर्मपत्नी म्हणून शूद्र स्त्री समानतेने एकाच घरात कशी नांदत होती आणि तिची मुले ब्राह्मणच कशी गणली जात होती ते सावरकरांनी 'मनुस्मृतीतील महिला', 'जातिभेदाचे इष्टानिष्टत्व' या आपल्या लेखमालांतून दाखवून दिले आहे. त्यावरून पाहता 'वेदकालापासून आम्ही शुद्ध वंशाचे आहो,' असे भारतात वास्तविक कोणाही शुद्धीवर असलेल्या समाजाला म्हणता येणार नाही. जातिभेदाला धर्माचा सनातन आधार आहे हे म्हणणे क्षणमात्र टिकणार नाही. इतकेच नव्हे तर जातिभेद म्हणजे हिंदूंना ( कोणत्याही अर्थाने का होईना ) अत्यंत प्रिय असलेले जे चातुर्वर्ण्य त्याचा उच्छेद होय हे श्रुतिस्मृतींच्या वचनांनीच सावरकरांनी दाखवून दिले आहे. त्याचप्रमाणे संकराविषयीच्या भ्रांत कल्पनाही त्यांनी आपल्या धर्मग्रंथाच्या आधारेच निरस्त केल्या आहेत. संकरज प्रजा कित्येक वेळा औरस प्रजेपेक्षाही प्रबळ व कर्तृत्वसंपन्न झाल्याची विदुर, वसिष्ठ, चंद्रगुप्त, विक्रमादित्य, महादजी इ. अनेक उदाहरणे देऊन संकर हा मुळीच अनर्थकारक नाही असे त्यांनी वारंवार सांगितले आहे. ज्या विवाहामुळे प्रजा नाकर्ती होते, दुबळी, कर्तृत्वहीन होते किंवा विवाहित स्त्री-पुरुष प्रजोत्पादनाला अक्षम ठरतात त्यालाच फक्त संकर म्हणावे असे सावरकरांचे मत आहे. या दृष्टीने पाहता आपले सर्व जातिभेद, वर्णभेद हे केवळ पोथीजात आहेत, त्या भिन्न जातींनी

आपसात विवाह केले तर तो संकर मुळीच होणार नाही असा सावरकरांचा ठाम सिद्धान्त आहे. आणि हा सिद्धान्त त्यांनी श्रुतिस्मृती, पुराणे व इतिहास यांच्या आधारेच मांडला आहे.

अनुवंशाच्या कल्पनेचा आधार जातिभेदाच्या व अस्पृश्यतेच्या समर्थनार्थ नेहमी घेतला जातो. त्याचाही सावरकरांनी असाच धुरळा करून टाकला आहे. आज हिंदू समाजात असलेल्या शेकडो जाती, पोटजाती या रक्तातल्या तितक्या भिन्न गुणांमुळे निर्माण झाल्या हे म्हणणे किती हास्यास्पद आहे हे वरवर पाहतासुद्धा दिसणार आहे. पण सावरकरांनी तेवढ्यावर ते ठेवले नाही. त्यांनी अनेक जातींचे इतिहास देऊन अत्यंत क्षुद्र कारणांनी, वेडगळ कारणांनी त्या कशा निर्माण झाल्या आहेत ते दाखविले आहे. गंध लावण्याच्या मानापमानावरून, कचोळे फेकून कोणी एकाने दुसऱ्यास मारले, तेवढ्यावरून तेढ माजली, बहिष्कार पडला आणि बहिष्कृतांची निराळी 'कंचोळे प्रभू' ही जात झाली. ओसवाल जातीतल्या एका लहान मुलाचा पाय चिमणीच्या अंड्यावर पडला. तेवढ्यावरून माळव्यातील अहिंसानिष्ठ जैन समाजात भांडणे माजली, बहिष्कार पडला आणि निराळी जात निर्माण झाली. हा प्रकार १९३१ साली माळव्यात घडलेला आहे. मागल्या काळी भक्ष्याभक्ष्य, पेयापेय, शिवाशिव; अग्रपूजेचे मान, यांवरून किती मारामाऱ्या होत असत आणि जरा खुट्ट होताच ग्रामण्ये, बहिष्कार यांचे सत्र कसे सुरू होत असे याची ज्याला कल्पना आहे त्याला एका जातीच्या कालांतराने शेकडो पोटजाती कशा होत असतील याची सहज कल्पना येईल आणि मग पाश्चात्य शास्त्रज्ञांचे आधार घेऊन या एवढ्या जाती-पोटजातींचे समर्थन करणारे आजचे पंडित आपल्या विद्वत्तेचा कसा दुष्ट विक्रय करीत आहेत, हिंदुधर्माचे व हिंदुराष्ट्राचे तेच कसे खरे शत्रू आहेत हे ध्यानास येण्यास उशीर लागणार नाही. परंपरेने आलेले विशेष गुण कायमचे जतन करून ठेवणे व पुढच्या पिढीत तेच संक्रान्त होतील याची काळजी वाहणे या हेतूने अनुवंशाचे शास्त्र पंडितांनी सांगितले आहे. पण त्याअन्वये पाहता हिंदू समाजातील वर्णांचा वा जातींचा अर्थाअर्थी अनुवंशाशी कसलाही संबंध नाही हे सावरकरांनी ठायी ठायी दाखवून दिले आहे. शेकडो वर्षे पिढ्यानुपिढ्या सुतारी, लोहारी, शिवणकाम, वेद-

पठण करीत आलेल्या घराण्यात व जातीत पुढील संतती त्या त्या कर्मात निपुण होतेच असे नाही. आणि ज्या जातीत एकही पिढी तो व्यवसाय कोणी केला नाही त्या जातीत पिढीजात तो व्यवसाय करणाऱ्यांच्या संततीपेक्षा त्या कर्मात जास्त निपुण असलेले पुरुष उत्पन्न होतात. हे मागल्या इतिहासातून शेकडो उदाहरणांवरून दाखवून देता येईल. तसे दाखवून अनुवंशाच्या आधारावर पोथीजात उच्चनीचतेचे, त्या सात स्वदेशी शृंखलांचे, समर्थन करणे हे विवेकबुद्धीचे दिवाळे निघाल्याचे लक्षण आहे असे स्पष्ट मत सावरकरांनी मांडलेले आहे.

पण याहीपेक्षा जातिभेदाने या देशात गेल्या हजार वर्षांत प्रत्यक्ष अनर्थ काय घडले त्याचे जे चित्रण सावरकरांनी केले आहे ते पाहून या सप्त-शृंखलांवर घण घालणे हाच खरा धर्म होय, हेच थोर राष्ट्रकार्य होय, हे कोणाही देशहिताची चिंता वाहणाऱ्या नागरिकाला पटल्यावाचून राहणार नाही. जातिभेद म्हणजे धर्मरक्षण असे सनातनी लोक मानतात. पण या जातिभेदानेच आपली धर्महानी झाली आणि त्यामुळेच पुढे व्यापार, साम्राज्य व शेवटी स्वराज्य यांची हानी झाली हे लक्षात घेतले तर स्वत:ला सनातनी म्हणविणाऱ्या लोकांनी हिंदुराष्ट्राचा केवढा घात केला आहे हे ध्यानात येईल. मागे हिंदू लोक व्यापारासाठी, साम्राज्यासाठी व धर्म-प्रसारासाठी तिन्ही खंडांत जात होते. पण जातिभेदाच्या कल्पना तीव्र झाल्या तेव्हा परदेशी गेल्यास इतर जातींशी अन्नोदक संबंध घडेल, स्पर्शास्पर्श-विचार पाळता येणार नाहीत, अभ्यक्ष्यभक्षण-अपेयपान करावे लागेल आणि मग जातिबहिष्कृत व्हावे लागेल अशी भीती सर्वत्र झाली आणि म्हणून समुद्रगमन, परदेशगमन निषिद्ध झाले. म्हणजे बेटीबंदीतून ही सिंधुबंदी निघाली आणि हा सारा समाज करंटा होऊन गेला. मलबारच्या राजास आपल्या काही लोकांनी दर्यावरील व्यापारात प्रवीण व्हावे अशी इच्छा झाली. तेव्हा त्या वेळच्या प्रौढ पोक्त हिंदूंनी असे ठरविले की प्रत्येक कुटुंबातील एका पुरुषाने मुसलमान व्हावे ! समुद्र ओलांडला तर जात जाईल. त्यापेक्षा जात घालविणारा धर्मच सोडावा हे बरे. जातिभेद हे धर्मरक्षणासाठी आहेत. पण समुद्रगमनाच्या ते आड येतात म्हणून उपाय काय ? तर धर्मत्याग !

९३६६३

समाज संघटित, एकात्म व बलशाली करणे हे धर्माचे अंतिम ध्येय असते. समाज विघटित व बलहीन आणि म्हणूनच परतंत्र करून टाकणाऱ्या सप्तशृंखलांवर घण घालून त्या तोडून टाकण्यात सावरकरांनी तेच ध्येय साधले आहे. स्वातंत्र्यवीर रत्नागिरीस गेले तेव्हा महारांच्या सावलीचाही विटाळ मानण्याची शेकडो वर्षांची दुष्ट व घातक रूढी तेथे दृढपणे पाळली जात होती. या पायरीवरून स्पृश्यांनी वस्तीत जाऊन भजने म्हणणे, अस्पृश्यांनी स्पृश्य वस्तीत भजनासाठी येणे, शाळेत स्पृश्य व अस्पृश्य मुलांनी सरमिसळ बसणे, हळूहळू देवळात अस्पृश्यांना सर्वांच्या बरोबर प्रवेश देणे, स्त्रियांचे हळदीकुंकू-समारंभ सरमिसळ करणे आणि शेवटी सर्रास सर्वांनी एका पंक्तीला बसणे या पायरीपर्यंत सावरकरांनी हिंदुसमाजाला नेले हा फार मोठा विक्रम आहे. त्रावणकोरच्या राजाने अशाच सुधारणा आपल्या राज्यात घडवून आणल्या होत्या, पण तेथेही अस्पृश्यांतील पालुवा व पारिया या जातींना प्रवेश दिलेला नाही. आणि भंग्यांना तर मुळीच नाही. रत्नागिरीच्या पतितपावनमंदिरात यच्चयावत हिंदुमात्राला प्रवेश मिळतो, एवढेच नव्हे तर हे सर्व पूर्वास्पृश्य वेदोक्ताने त्या मंदिरात देवाची पूजा करू शकतात. तो अधिकार त्रावणकोरात मंदिरात प्रवेश मिळालेल्या एझुवा जातीच्या अस्पृश्यांनाही नाही. बॅ. सावरकरांच्या पुण्याईची यावरून आपल्याला सहज कल्पना येईल. त्रावणकोरात राजशासनाला जे करता आले नाही ते रत्नागिरीस सरकारी अवकृपेत वावरणाऱ्या स्थानबद्ध अशा एका व्यक्तीने करून दाखविले.

जातिभेदाचे सावरकरांनी तात्त्विक खंडन केले, व त्यामुळे झालेले व भविष्यात होणारे अनर्थही वर्णून सांगितले. उपायाच्या चिंतनास आरंभ करताना पहिली गोष्ट त्यांनी स्पष्ट केली आहे की या अनर्थाला भारतातील एकच एक अशी कोणतीच जात किंवा वर्ण जबाबदार धरता येणार नाही. ब्राह्मण व क्षत्रिय जितकी अस्पृश्यता चांभार-महारांविषयी पाळतात, तितकीच अस्पृश्यता चांभार-महार हे धेड-भंग्याविषयी पाळतात. त्रावणकोरात पालुवा व पारिया जातींना मंदिरप्रवेश देण्यास एझुवा या अस्पृश्य जातीचाच विरोध आहे. आपल्याला ब्राह्मण-क्षत्रियादि वरिष्ठ मानलेल्या जातींनी बरोबरीचा मान द्यावा अशी महारांची मागणी आहे. पण तीच मांग-भंगी यांची मागणी त्यांना

मान्य होत नाही. ही प्रत्येक जातीची दुःखद कहाणी असताना आज त्या पापाचे खापर एका जातीने दुसरीच्या माथी फोडण्यात काय अर्थ आहे? सावरकर म्हणतात, 'जी जी शिवी अस्पृश्य स्पृश्यांना देतात ती ती त्या अस्पृश्यांना स्वतःलाही दिली जाते हे त्यांनी विसरू नये.' तेव्हा सर्वच या महाअनर्थाला जबाबदार आहेत, सारेच दोषी आहोत हे जाणून सर्वांनी मिळून तो दोष दूर करावा हे उचित. मद्रासमधील अस्पृश्य जातींची माहिती देताना, नि त्रावणकोरच्या सुधारणांचे विवेचन करताना आणि अन्यत्रही त्यांनी अनेक ठिकाणी हा विचार आवर्जून मांडला आहे. याचा अर्थच असा की उपाय योजावयाचे ते सर्वांनीच योजले पाहिजेत. कारण भारतीय राष्ट्र-पुरुषाच्या पायांत या स्वदेशी शृंखला ठोकून बसविण्याचा कामात लोहाराचे काम सर्वांनीच केले आहे.

उपायचिंतनाच्या प्रारंभीच भूमिका अशी स्पष्ट करून घेतल्यानंतर स्वातंत्र्य-वीरांनी धर्मांतराच्या उपायाचा विचार केला आहे आणि तो मार्ग सर्वस्वी त्याज्य होय असे आपले मत दिले आहे. 'धर्मांतराच्या प्रश्नाविषयी महार-बंधूंशी मनमोकळा विचार' या शीर्षकाखाली त्यांनी तीन लेख लिहिले आहेत. आणि धर्मांतराने कोणते अनर्थ होणार आहेत ते त्यांत सांगितले आहेत. स्वातंत्र्यवीरांचे म्हणणे असे की, सर्वच्या सर्व महार जाती धर्मांतर करणे कधीही शक्य नसल्यामुळे या धर्मांतरामुळे एक नवीनच जात निर्माण होईल. शिवाय धर्मांतर केलेल्याची अस्पृश्यता जाईल व केवळ धर्मांतरामुळे त्यांना समाजात प्रतिष्ठा प्राप्त होईल असे नाही. दुसरे असे की महार जातीतील हजारोंनी बौद्ध धर्म स्वीकारला असला तरी न स्वीकारणारांची संख्या किती तरी मोठी आहे. आणि त्यामुळे त्यांच्यात्यांच्यात उभा दावा निर्माण झाला आहे. इतर अस्पृश्य जाती तर धर्मांतरास मुळीच तयार नाहीत. त्यामुळे अस्पृश्यतेचा प्रश्न धर्मांतराने सुटणार आहे असे स्वप्नातसुद्धा मानता येणार नाही. यांसारखे अनेक युक्तिवाद सावरकरांनी या व अन्य लेखांत मांडले आहेत. पण त्यांचा सर्वांत प्रभावी युक्तिवाद अगदी निराळा आहे. ते म्हणतात की हा हिंदुधर्म काय केवळ स्पृश्यांचा आहे? त्यांच्या रक्षणार्थ आजवर अस्पृश्यांनी काय रक्त सांडलेले नाही? त्याच्या तत्त्वज्ञानात रोहिदास, चोखा, सजन तिरुवल्लुवर यांनी काहीच भर घातलेली नाही? असे असताना आजच्या

काही वरिष्ठ वर्गांनी अन्याय केला तर त्याच्याशी झगडून आपल्या स्वत्वाचे प्राणपणाने रक्षण करण्याचे सोडून तो स्वतःचा धर्मच टाकून देणे हे सावरकरांच्या मते नेभळेपणाचे लक्षण होय, 'हिंदुधर्म ही काही स्पृश्यांच्या बापाची मत्ता नाही; आमचाही तिच्यावर त्यांच्याइतकाच हक्क आहे' असे अस्पृश्यांनी सडेतोडपणाने सांगून त्यांच्याशी झुंजून आपले न्याय्य स्वत्व मिळवावे असे सावरकरांनी अस्पृश्यांना आणि विशेषतः महारबंधूंना आवाहन केले आहे. 'हिंदुधर्मावरील अस्पृश्यतेचा कलंक वेळ पडली तर आम्ही आपल्या रक्ताने धुऊन काढू' ही आंबेडकर प्रतिज्ञा सावरकारांना अत्यंत योग्य व खऱ्या हिंदूस शोभण्यासारखी वाटली. त्यामुळे त्यांचा सत्याग्रह त्यांना न्याय्यच वाटला. महाड, पुणे (पर्वती) येथील सत्याग्रहाचे सावरकरांनी जोरदार भाषेत समर्थन केले आहे. पण धर्मांतर हा उपाय मात्र त्यांना अगदी मान्य नाही. त्यामुळे अस्पृश्यांचाच अधःपात होईल असे त्यांचे मत आहे.

ब. सावरकरांच्या मते अस्पृश्यता म्हणजे स्पर्शबंदी आणि तसल्याच इतर सप्त-बंदी म्हणजे बेडया तोडण्यास विज्ञानाचा प्रसार हा एकच उपाय आहे. पोथीजात उच्चनीचतेचे सर्व तत्त्वज्ञान अत्यंत भ्रांतिमूलक अशा सिद्धान्तावर आधारलेले आहे. विज्ञानाने निर्माण केलेल्या शास्त्रापुढे, नव्या तत्त्वज्ञानापुढे, ते क्षणमात्र टिकू शकणार नाही. तेव्हा या विज्ञाननिष्ठेचा प्रसार हेच या शृंखला तोडण्याचे खरे हत्यार होय. युरोपने याच मार्गाने आपली प्रगती करून घेतली हे अनेक लेखांमधून त्यांनी पुनःपुन्हा दाखविले आहे. हिंदूंपैकी सनातन धर्माचा कैवार घेणारे लोक मुसलमानांच्या पोथीनिष्ठ कट्टरपणाकडे बोट दाखवून कित्येक वेळा सांगतात की त्या कट्टरपणामुळेच मुसलमान सर्वत्र विजयी झाले व होत आहेत. तेव्हा आपणही तसेच पोथीनिष्ठ नि कट्टर झाले पाहिजे. पण हा भ्रम सावरकरांनी 'विज्ञानबळ' या आपल्या लेखात समूळ उच्छेदून टाकला आहे. मराठ्यांचा उदय झाला तेव्हा मुसलमान तितकेच कट्टर होते. पण त्यांचे साम्राज्य मराठ्यांनी सहज धुळीस मिळविले. युरोपात तेच झाले. विज्ञानाचा उदय युरोपात झाला नव्हता तेव्हा काही ठिकाणी मुस्लिमांना जय मिळाले. पण युरोप विज्ञाननिष्ठ होताच मुस्लिम सत्ता त्यांच्यापुढे उभ्यासुद्धा राहू शकल्या नाहीत. तुर्कस्तान हा त्याला अपवाद

आहे पण त्याला हे सामर्थ्य प्राप्त झाले ते विज्ञानबळामुळेच होय, अंध अविवेकामुळे नव्हे हे स्वातंत्र्यवीरांनी सप्रमाण दाखवून दिले आहे.

शब्दप्रामाण्य, पोथीनिष्ठ, श्रुतिस्मृति-पुराणोक्त व अपरिवर्तनीयता यांतून आपल्या सात स्वदेशी बेडया निर्माण झाल्या आहेत. तेव्हा त्यांचा उच्छेद करावयाचा तर त्या शब्दाप्रामाण्यादि रूढींचा प्रथम उच्छेद केला पाहिजे. या सर्व शृंखला मानसिक असल्यामुळे बुद्धिप्रामाण्य, प्रत्यक्षनिष्ठ व प्रयोगक्षम विज्ञान, आणि विवेकी वृत्ती या शास्त्रांनीच त्या तोडता येतील.

स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या दिव्य जीवनाचा विचार करता त्यातले अनेक रोमहर्षक प्रसंग आपल्या डोळयांपुढे उभे राहतात. त्यांना हिंदुस्थानात घेऊन येणाऱ्या बोटीतून त्यांनी फ्रान्सच्या सागरात उडी फेकली तो प्रसंग त्या सर्वांत अत्यंत अद्‌भुतरसपूर्ण होय. पण माझ्या मते रत्नागिरीस त्यांनी जे सीमोल्लंघन केले ते त्यांचे हिंदुसमाजाला सर्वांत मोठे देणे होय. पहिल्या विक्रमाने त्यांनी पारतंत्र्याच्या शृंखलेवर घण घातला. पण दुसऱ्या विक्रमाने भारताच्या कपाळी ज्या शृंखलेमुळे पुन्हा पुन्हा पारतंत्र्य येत होते तिच्यावर घण घातला; आणि ती छिनून टाकली. पहिल्या विक्रमाने स्वातंत्र्यवीर स्वतः मृत्युंजय झाले, दुसऱ्याने हा हिंदुसमाजच मृत्युंजय होईल अशी आशा वाटते.

◎ ◎ ◎

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 69483 वि: ...
क्रमांक 9694 नों: दि: 26/3/60

पुरुषोत्तम गणेश सहस्रबुद्धे

# काव्याच्या पायावर शास्त्र

जेजुरी, आळंदी या स्टेशनवर पुष्कळ वेळा चांगले अंजीर मिळतात आणि पुष्कळ प्रवासी येथे अंजीर घेतातही. एकदा गाडीत माझ्या शेजारचे एक गृहस्थ अंजीर घेत होते. अंजीरवाल्यानें तागडीत एका बाजूस पावशेर टाकला व दुसऱ्या बाजूस ७/८ अंजीर टाकले. ते अंजीर सगळे सारखे नव्हते. काही हिरवट होते. काही बारीक होते. तीन-चारच चांगल्यापैकी होते. त्यामुळे गाडीतील गृहस्थ जरा तक्रार करू लागले. सगळे अंजीर चांगले घाल, असे ते माळ्यास सांगू लागले. पण अंजीरांत कोणताच बदल न करता माळी शांतपणे म्हणाला, "पाची बोटं कुठं सारखी असत्यात का दादा? बरं–वाईट, लहान मोठं, राह्याचंच. धरा, आवरा." ते गृहस्थही मग कांही बोलले नाहीत. त्यांनी पावशेराचे पाच पैसे काढून दिले आणि माळी निघून गेला.

त्या उत्तराने त्या गृहस्थाचे पूर्ण समाधान झाले नव्हते हे खरे. पण, तो माळी म्हणतो ते साधारण बरोबर आहे, बरे वाईट असायचेच असा काहीसा भाव त्यांच्या मुद्रेवर दिसला. माझ्या मनात मात्र आले की, पाची बोटे सारखी नसली तरी अंजीर सारखे असावयास काय हरकत आहे? आणि उलट बाजूने विचार केला तर असे नाही का म्हणता येणार की, पाची बोटे सारखी नसली तरी मी दिलेले पाची पैसे सारखे आहेत, त्या अर्थी अंजीर सारखे असणे अवश्य आहे! पाच बोटे सारखी नाहीत

म्हणून पाच अंजीर सारखे असण्याची जशी आवश्यकता नाही, त्याचप्रमाणे पाच पैसे सारखे आहेत म्हणून पाचही अंजीर सारखे असणे अवश्य आहे !

याचा अर्थ असा की, बोटांच्या सारखेपणावरही काही अवलंबून नाही आणि पैशाच्या सारखेपणावरही नाही. गोष्टी अवलंबून असतात कोठल्यातरी निराळ्याच तत्त्वावर. पण व्यवहारात पुष्कळ वेळा अशा उदाहरणांनी आपण फसतो हे मात्र खरे. आणि व्यवहारात आपण फसतो एवढेच नव्हे तर मोठमोठ्या तात्त्विक विचाराच्या क्षेत्रातही ही फसगत होते. आणि तीही मोठमोठ्या विचारवंतांची. ही फसगत पाहण्यात फार करमणूक आहे यात शंका नाही.

'पोट आणि अवयव' या गोष्टीत त्या रोमच्या वकिलाने लोकांना केवळ उपमा-दृष्टान्तांच्या साहाय्यानेच झुलविले की नाही ! श्रीमंत लोक, महाजन हे नुसते बसून खातात, आम्ही मात्र रात्रंदिवस काबाडकष्ट करून मरतो अशी लोकांची तक्रार होती. पण 'ही तक्रार योग्य नाही, जे घडत आहे तेच योग्य व न्याय्य आहे,' असे त्या वकिलाने लोकांना पटवून दिले; आणि हे कशाच्या आधारे ? तर 'पोट आणि अवयव' या दृष्टान्ताच्या. हात, पाय, डोळे हे श्रम करतात तसे पोट करीत नाही. ते बसून खाते हे खरे; पण यामुळे हातापायांनी जर तक्रार करून काम बंद केले तर अंती तेच उपाशी राहतील. म्हणजे हातापायांची ही तक्रार आत्मघातकीपणाची आहे, त्याचप्रमाणे, श्रीमंत सरदार जरी बसून खात असले तरी, लोकांनी काम करणे बंद केले तर अंती त्यांचाच नाश होईल, व त्यांचीही तक्रार आत्मघातकीपणाची ठरेल. युक्तिवाद वकिलाने सांगितला आणि दंतकथेच्या अन्वये तरी तो लोकांना पटला. म्हणजे उपमेचा अर्थशास्त्राच्या क्षेत्रातील प्रश्न सोडविण्यास केवढा उपयोग झाला पाहा !

या ठिकाणी रोममधील सामान्य लोक जर जास्त विचारी असते तर त्यांना या दृष्टान्तातील फसवणूक सहज उमगली असती. पोट श्रम करीत नाही असे जरी बाह्यतः दिसत असले तरी हातापायांनी आणून दिलेले अन्न पचवून त्याचे रस पुन्हा त्यांच्याकडेच पोचविण्याचे कार्य ते करीत असते.

त्या पोटाची उपमा ज्यांना दिली ते रोमचे महाजन मात्र सामान्य जनांनी निर्माण केलेली संपत्ती आपणच पचवून टाकीत असत, एक कणही पुन्हा सामान्य जनांकडे जाऊ देत नसत. हा फरक जर त्या जनांच्या ध्यानी आला असता तर ' पोट आणि अवयव ' या ऐवजी ' गळू आणि अवयव, असा दृष्टान्त देऊन त्यांनी वकीलाला परत पाठविले असते. ते म्हणाले असते, " वकीलसाहेब, तुम्ही श्रीमंत महाजन पोटासारखे नसून गळवासारखे आहा. सर्व अवयव चलनवलन करीत असता गळवाच्या जागी मात्र रुधिराभिसरण बंद झालेले असते व ते गळू कापून काढणे हाच त्यावर उपाय असतो."

रोमच्या सामान्य जनांनी असा दृष्टान्ताला काटदृष्टान्त दिला नाही हे खरे. पण अशा दृष्टान्ताचे दुसरे एक मोठे रम्य उदाहरण स्कॉटच्या टॅलिसमन या कादंबरीत आहे. आणि तेथे प्रश्नही असाच गंभीर आहे. रोमचा प्रश्न आर्थिक होता. हा समाजशास्त्रीय आहे. एकपत्नीत्व चांगले की बहुपत्नीत्व असा हा महत्त्वाचा प्रश्न आहे. आणि केवळ दृष्टान्ताच्या साह्याने या बाबतीत लोकांनी समर्थन केलेले पाहून क्षणभर चांगलीच करमणूक होते.

सॅरासीन सुलतान सलादिन व एक इंग्लिश सरदार यांची पॅलेस्टाइनमध्ये एकदा गाठ पडली. थोड्या वेळाने दोघांनीही आपापल्या शिदोऱ्या सोडून फराळास आरंभ केला. इंग्लिश सरदाराच्या शिदोरीत डुकराचे मांस होते. मुसलमानांना ते वर्ज्य असल्यामुळे सलादिनने ते स्वतः तर घेतले नाहीच; पण उलट ते खाण्याबद्दल सरदारावर टीका केली. यावर सरदार उत्तरादाखल म्हणाला, " तुम्ही मुसलमान लोक अगदी अरसिक आहात. अहो, डुकराचे मांस म्हणजे परमेश्वराने निर्माण केलेली किती रुचकर, खमंग चीज ! तिचा तुम्ही अव्हेर करता हे योग्य नाही. यात अरसिकता तर आहेच. प्रण शिवाय परमेश्वराच्या कृतीचा तो अपमान आहे ! "

सलादिन काही कमी बुद्धिमान नव्हता. सरदाराच्या या उत्तरावर तो हसू लागला. " आम्हांला एवढ्याशा क्षुल्लक गोष्टीवरून तुम्ही अरसिकांत काढता. पण दुसऱ्या एका अत्यंत महत्त्वाच्या गोष्टीत तुम्ही स्वतः

अरसिकपणाची किती कमाल करता, आणि परमेश्वराच्या रम्य निर्मितीचा किती अवमान करता याची तुम्हांला कल्पना तरी आहे ! " तो म्हणाला.

" कोणच्या बाबतीत आम्ही अरसिकपणा दाखवला सांगा पाहू. "

" अहो, तुमच्या युरोपात तरुण स्त्रिया अतिसुंदर असतात असे आम्ही ऐकले आहे ! " सलादिन सांगू लागला.

" यात शंकाच नाही. " सरदार अभिमानाने म्हणाला.

" होय ना ! मग प्रश्न असा की इतक्या सुरेख तरुण स्त्रिया असून तुम्ही एकच बायको करता याचा अर्थ काय ? ही काय रसिकता झाली ? परमेश्वराने इतक्या मदिराक्षी निर्माण केलेल्या असताना तुम्ही निदान प्रत्येकाने चार-पाच तरी स्त्रिया करावयाच्या ! पण तसे मुळीच न करता त्यातली एखादीच स्वीकारून बाकीच्यांचा तुम्ही अव्हेर करता ही अरसिकता तर आहेच, पण हा परमेश्वराच्या कृतीचा अवमान आहे ! "

इंग्लिश सरदार या टीकेमुळे क्षणभर मूढ झाला. पण स्वस्थ बसून ती टीका ऐकणे त्याला शक्यच नव्हते. ख्रिस्ती धर्मातील एकपत्नीत्वाच्या चालीचे समर्थन करणे हे त्याचे कर्तव्यच होते. पण तितक्यात त्याला एक युक्ती सुचली. म्हणजे एक दृष्टान्त सुचला.

हातातील हिऱ्याची अंगठी काढून त्याने तो खडा सुलतानापुढे धरला. " याचे पाणी अगदी अलौकिक आहे नाही ? " त्याने विचारले.

" आहे. हिरा डोळे दिपवीत आहे यात शंका नाही " सुलतान सलादिन म्हणाला.

" आता असा विचार करा. " सरदार अभिनिवेशाने सांगू लागला. " समजा, याच्यावर घण घालून याचे अनेक तुकडे केले आहेत. तेव्हा तुकड्या-तुकड्यांचे शतधा झालेले तेज मनोहर दिसेल की सर्व हिऱ्याचे एकवटलेले तेज मनोहर दिसेल ? सांगा पाहू ! "

" एकवटलेले तेज मनोहर दिसेल यात वादच नाही " सलादिनने उत्तर केले.

" हे खरे ना ? तेच आमच्या प्रेमाचे आहे. एका पुरुषाचे अनेक तरुण स्त्रियांवर विखुरलेले, शतधा झालेले प्रेम हे रम्य प्रेम नाही. एकाच तरुणीवर एकवटलेले प्रेम हे खरे प्रेम होय. "

सलादिन या उत्तराने मुळीच गोंधळला नाही. त्याने शांतपणे आपल्या हातातील अंगठी काढून सरदाराच्या हाती दिली.

" ही अंगठी सुंदर आहे की नाही ? " त्याने विचारले.

" हे कोण नाकारील ? " सरदार म्हणाला.

" यात सौंदर्य कशामुळे आले आहे पहा. मध्ये एक मोठा हिरा आहे व भोवताली अनेक रम्य हिरकण्या आहेत. यामुळे खरी शोभा आली आहे. तेच संसाराचे आहे. एक पुरुष मध्ये व हिरकण्यांसारख्या अनेक तरुण स्त्रिया त्याच्या भोवती याच दृश्यात खरी मोहकता आहे ! "

यावर इंग्लिश सरदाराला आणखी काही दृष्टान्त सुचला की नाही ते इतिहासाला माहीत नाही. पण त्यावेळेपुरते तरी बहुपत्नीकत्व श्रेष्ठ ठरले. आणि कारण काय ? सलादिनाच्या हातातील अंगठी ! एक हिऱ्याभोवती अनेक हिरकण्या खुलून दिसतात म्हणूनच एका पुरुषाभोवती अनेक रमणी खुलून दिसतील. आणि या आधारामुळे बहुपत्नीकत्व समर्थनीय ठरते.

ही उत्तर–प्रत्युत्तरे गमतीची म्हणून एक वेळ सोडून देता येतील. पण विश्वाच्या मूलतत्त्वांची चिकित्सा करताना जर कोणी दृष्टान्तावर भर देऊ लागला तर ! ब्रह्माचे निर्गुणत्व विवेचिताना वेदांतात असा प्रकार झालेला अनेक वेळा दृष्टीस पडतो.

वेदान्ती असे म्हणतात की, ब्रह्म हे कारण असून सृष्टी हे तदुत्पन्न कार्य आहे व जगाच्या अंतकाळी सृष्टी ब्रह्मात विलीन व्हावयाची आहे. यावर अशी शंका येते की, सगुण सृष्टी निर्गुण ब्रह्मात मिसळली तर ब्रह्म दूषित होऊन त्याचे निर्गुणत्व ढळेल. या शंकेला वेदान्तसूत्राधारे आचार्यांनी उत्तर काय दिले आहे ? " छे छे ! असे होणार नाही. कारण " तसे होत नाही असे दृष्टान्त आहेत. ( शा. भा. २. १. ९ ) मातीचे घट करतात, चित्रे करतात. ती मोडून पुन्हा मातीत मिसळली तरी माती दूषित होत नाही. सोन्याची साखळी करतात, बिलवर करतात. ते मोडून पुन्हा सोन्यात विलीन केले तरी सोने दूषित होत नाही. यावरूनच असे म्हणता येते की, सगुणसृष्टी ब्रह्मात मिसळली तरी ब्रह्म दूषित होत नाही. ते निर्गुणच रहाते. "

दृष्टान्ताच्या आधारे केलेले हे समर्थन कितपत टिकू शकेल? दुसरा दृष्टान्त दिला नाही तोपर्यंत. प्रतिपक्षी हा युक्तिवाद करून असे म्हणू शकेल की, ' सगुण सृष्टीमुळे ब्रह्म दूषित होणारच. कारण यालाही दृष्टान्त आहेत. दुधापासून दही होते. पण तेच दही पुन्हा दुधात मिसळले तर दूध नासते. अन्नातून कृमी निर्माण होतात. ते कृमी अन्नात पुन्हा मिसळले तर अन्न नासून जाईल. यावरून असे म्हणता येईल की, कार्य हे कारणात परत मिसळले तर कारण दुष्ट होते. आणि सगुण सृष्टी ही परब्रह्मात मिसळली तर ब्रह्म दुष्ट होणारच.

दुसऱ्या एका शंकेवर आचार्यांनी असेच उत्तर दिले आहे. शंका अशी : जगात काही कार्य घडावयाचे तर मनुष्याजवळ साधने असली पाहिजेत. विणकराला वस्त्र विणण्यास माग लागतो. कुंभाराला मडकी घडवण्यास चाक लागते. पण ब्रह्माजवळ तर असे काही साधन नाही मग ब्रह्म सृष्टी कशी करणार ?

यावर उत्तर असे की, ' असेही एक उदाहरण आहे. दूध हे स्वतः होऊनच दही होते. त्याला बाह्य साधनांची अपेक्षा नसते. त्याचप्रमाणे ब्रह्मही साधनावाचून सृष्टिरूपात परिणत होईल ' या दृष्टान्ताला तर शेकडो काटदृष्टान्त देता येतील. रॉकेलपासून व्हॅसलिन होते. पण त्याला साधने लागतात. डांबरापासून साखर, सुगंध तयार होतात. पण त्यालाही साधने लागतात. त्याचप्रमाणे ब्रह्मालाही साधने लागतील.

या ठिकाणी व इतरत्रही वेदान्त चर्चेत जे दृष्टान्त येतात ते स्पष्टीकरणासाठी येत नसून समर्थनासाठी येत असतात. आणि म्हणूनच ते आक्षेपार्ह वाटतात. स्पष्टीकरणासाठी आलेले दृष्टान्त खोडून टाकावे असे कोणाच्याच मनात येत नाही. पण वेदान्तात तर प्रतिपक्षीयाचा दृष्टान्त खोडून आपला नवीन दृष्टान्त देण्यासाठी विलक्षण धडपड चाललेली दिसून येते. म्हणजे, दृष्टान्त हेच प्रमाण त्या ठिकाणी वापरण्याचा हेतू आहे, यात शंका राहत नाही. काव्याच्या पायावर शास्त्राची उभारणी करण्याचा हा प्रयत्न आहे.

आणखी एक गमतीदार उदाहरण सांगतो. मला श्रीधर, महीपती यांचे ग्रंथ वाचण्याचा अगदी लहानपणापासून नाद असे. आणि ते ग्रंथ

वाचीत असताना त्याच वेळी मला एक विचित्र शंका आलेली होती. माझी मलाच भीती वाटल्यामुळे त्या वेळी मी ती कोठे बोलून दाखविली नाही. पण अजूनही मला तिचे उत्तर मिळालेले नाही हे मात्र खरे. वरील ग्रंथात आत्मा व परमात्मा एकच आहेत असे वारंवार प्रतिपादन केलेले आहे. प्रत्येक मनुष्य जरी निराळा दिसत असला तरी, त्याच्या शरीरात जो आत्मा आहे तो परमात्म्याचा अंश आहे. ज्ञानेश्वराने तर असे स्पष्टच सांगितले की " माझ्यात व या रेड्यात काहीच भेद नाही. कारण, आत्मा व्यापक सर्वांठायी, पशूचे देही तोच की. " शंकर, विष्णु, विठ्ठल, राम हे देव मानवदेहधारी दिसतात. पण त्यांच्या ठायीही माझ्या ठायींचा परमात्माच वास करीत आहे. हे सर्व वाचल्यामुळे माझ्या मनात असे येई की, विठ्ठल व मी यांच्यात जर भेद नाही तर मीच विठ्ठलाचे स्मरण नेहमी काय म्हणून करावे ? त्याने माझे स्मरण, भजन, कीर्तन का करू नये ? त्यावाचून त्याला मोक्ष कसा मिळणार ?

अशी शंका आली की मला भीती वाटे हे खरे. पण ती पुनः-पुन्हा येत असे हेही खरे. या शंकेला उत्तर दिलेले नाही असे नाही. पण ते उत्तर म्हणजे एक दृष्टान्त आहे. त्याला काटदृष्टान्त मी पन्नास देऊ शकेन. उत्तर असे आहे.

' देवा, तुझ्या माझ्यात भेद नाही हे खरे असले तरी मी तुझ्या ( अंकित ) आहे हेच म्हणणे योग्य. तू माझा असे म्हणणे केव्हाही योग्य नाही. कारण काही झाले तरी समुद्र आणि लाट यांमध्ये लाट ही समुद्राची असते. समुद्र हा लाटेचा आहे असे म्हणणे शोभणार नाही. '

यावर वरच्याप्रमाणेच अनेक उलट दृष्टान्त देता येतील. पण ते न देता आम्ही एवढेच म्हणू. " समुद्र हा लाटेचा हे म्हणणे शोभणार ! पण त्याचा येथे संबंध नाही. आत्म्यात व परमात्म्यात जर भेद नसेल तर कोणत्याही तऱ्हेने उलटसुलट बोलण्यात प्रत्यवाय असता कामा नये. आणि मग माझे स्मरण परमात्म्याने केले पाहिजे हे तितकेच खरे आहे. भेद असेल तर गोष्ट निराळी. " आणि भेद आहे की नाही हे मला माहीतच नसल्यामुळे आता मला तशी शंका येत नाही. लहानपणी भेद नाही असा समज झाल्यामुळे तसे वाटे इतकेच !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
क्रमांक ८१४२३ दि: ......

दृष्टान्त हे प्रमाण मानण्याची चाल तत्त्वज्ञानाच्या सर्व शाखांतून सापडते. युरोपातही ग्रीक विद्येचा उदय होण्यापूर्वी हाच प्रकार असे. कल्पनेच्या प्रांतात तर्क करीत बसणाऱ्या कोणाही माणसाची हीच स्थिती होणार. आणि ही प्रवृत्ती असेपर्यंत बुद्धीला भौतिकशास्त्रांचा अवगम होणे कधीच शक्य नाही. या प्रवृत्तीनेच समाज तमोयुगात बुडून जातात.

पृथ्वी गोल आहे हा सिद्धान्त दृष्टान्ताच्या साहाय्याने एका क्षणात खोडता येईल.

१. पृथ्वी गोल नाही.

२. गोल असती तर खालच्या बाजूच्या वस्तू खाली पडून गेल्या असत्या.

३. गोल पदार्थावरील वस्तू अशा पडून जातात याविषयी व्यवहारात उदाहरणे आहेत. लोखंडी गोळ्यावर ठेवलेल्या वस्तू तो फिरू लागताच दूर फेकल्या जातात हे आपण नेहमी पाहतोच.

आगगाडीत देवता असलीच पाहिजे हेही असेच सिद्ध करता येईल.

१. आगगाडीत देवता आहे.

२. सजीव, सुबुद्ध प्राणी जोडला असेल तरच वाहन चालू शकते अशी उदाहरणे आहेत. बैलगाडी, पालखी, रथ वगैरे उलट नाहीत.

३. आगगाडीला असा प्राणी नाही. त्या ;अर्थी तिच्यात देवतेचा वास असलाच पाहिजे.

असल्या दृष्टान्तांना शास्त्राचे उत्तर साधे आहे. ते असे की, ‘ लोखंडी गोळ्यावरच्या वस्तू पडून जात असतील. पण पृथ्वीवरच्या पडत नाहीत.’ याचा अर्थ असा की दृष्टान्ताने काहीच सिद्ध वा असिद्ध होत नाही. एका शास्त्रज्ञाने म्हटले आहे की, दृष्टान्ताने फार तर पक्षप्रतिज्ञा म्हणजे हैपॉथेसिस सुचविता येईल. कल्पिता येईल. त्यावरून काहीही सिद्ध करणे शक्य नाही.

दृष्टान्ताने विधान सिद्ध करण्याची ही प्रवृत्ती भौतिक शास्त्राने आता पार नष्ट केली आहे. समाजशास्त्रातही ती दिसत नाही. पण या शास्त्रात कल्पना चालविण्यास अवसर असल्यामुळे कधी कधी ती येथे

दृष्टोत्पत्तीस येते. दृष्टान्त असा शब्द कोणी आता वापरीत नाहीत. पण भाव तोच असतो. अलीकडे समाजरचनेतील कोणचेही तत्त्व सांगताना निसर्गाचा आधार घेण्याची प्रवृत्ती फार बोकाळली आहे. या प्रवृत्तीत व दृष्टान्त देण्याच्या प्रवृत्तीत मुळीच फरक नाही.

लोकशाही हीच राज्यपद्धती श्रेष्ठ असे सांगताना, एका लेखकाने म्हटले आहे की, 'निसर्ग हा लोकशाहीचाच पुरस्कर्ता आहे. कारण नेहमीच आपण पाहतो की, पाणी नेहमी समपातळीतच असते. जेथे नसेल तेथे त्याची त्या स्थितीत जाण्याची धडपड चालू असते. म्हणजे निसर्ग हा समतेचा व म्हणूनच लोकसत्तेचा भोक्ता आहे हे स्पष्ट आहे.'

निसर्गातील उदाहरण घेताना या लेखकाला पाणी दिसले. आणि भूमी दिसली नाही. भूमीकडे त्याने पाहिले असते तर सर्वत्र विषमता आहे, उंचसखलपणा आहे हे ध्यानात येऊन निसर्गाला लोकसत्ता अप्रिय आहे, असा निष्कर्ष त्याने काढला असता. आणि अनेकांनी तशा पद्धतीचा तर्क लढाविलेला आहे. 'एकाच पृथ्वीतून निघालेले दगड, पण त्यांत काही हिरे, काही माणके व काही क्षुद्र असे दगड असतात, म्हणजे कार्य बहुविध असले तरी कारण एकरूप असू शकते. आणि यावरून सृष्टीत वैचित्र्य असले तरी त्या अनेक विचित्र वस्तूंचे कारण एकच ब्रह्म आहे हे सिद्ध होते' हा आचार्यांनी जुन्या काळी मांडलेला विचार व पाणी आणि लोकसत्ता यांविषयी अर्वाचीन काळचा विचार एकाच सरणीचा आहे.

जातिभेद, बालविवाह, अस्पृश्यता, युद्धप्रवृत्ती या सर्वांचे समर्थन असेच निसर्गातली उदाहरणे घेऊन अजूनही केले जाते. याचा अर्थ असा की, अजून समाजाला शास्त्रीय पद्धतीने विचार करण्याची शिकवण मिळालेली नाही, सवय लागलेली नाही. परमेश्वर न्यायी असेल तर जगात दुःख का आहे ? असा प्रश्न विचारताच, 'सुंदर युवतीच्या गालावर तीळ असतो. त्यामुळे तिचा गौरवर्ण जसा खुलून दिसतो त्याचप्रमाणे जगातील दुःखाच्या तिळामुळे ते खुलून दिसते; व तसे ते दिसावे म्हणूनच परमेश्वराने दुःख निर्मिले आहे.' असे रवींद्रनाथांसारखे पंडित उत्तर देतात. आणि लक्षावधी श्रोते मोठ्या समाधानाने मान डोलवून परमेश्वराला क्रूरतेच्या आरोपातून मुक्त करतात. ही प्रवृत्ती आहे तोपर्यंत भौतिकशास्त्रांची वाढ होणे कठीण आहे.

रवींद्रनाथांच्या या उत्तरावर कै. प्रा. वा. म. जोशी यांनी एकाच वाक्यात टीका केली. पण ती फार अर्थगर्भ आहे. ते म्हणतात — “ उपमा चांगली आहे, पण उपमा म्हणजे प्रमाण नव्हे .”

आणि या दृष्टीतच विज्ञानाच्या प्रगतीची बीजे आहेत. ती दृष्टी जोपर्यंत आपल्याला प्राप्त झाली नाही तोपर्यंत अर्थशास्त्र, समाजशास्त्र, संपत्तीचे विभाजन, एकपत्नीत्व, बहुपत्नीत्व, लोकसत्ता, अस्पृश्यता या बाबतीत आणि अध्यात्मविद्येच्या अनेक शास्त्रांत कल्पनाचतुर लोक समाजाला असेच झुलवीत राहणार, आणि समाज झुलत राहणार !

◎ ◎ ◎

विठ्ठल दत्तात्रय घाटे

# भाषांचे ओझे

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपल्या देशापुढे विचारासाठी आणि निर्णयासाठी जे बिकट प्रश्न उभे आहेत, त्यांमध्ये हा भाषांचा प्रश्न फार महत्त्वाचा आहे, असे मी मानतो. आपल्या या विस्कळीत, अवाढव्य बहुभाषी देशाला एकजीव करण्यासाठी भाषा हे फार मोठे आणि प्रभावी साधन आहे असे मला वाटते. या बाबतीत आपल्या हातून एकही चूक होता कामा नये. थोडा उशीर झाला तरी चालेल. किंबहुना थोडाबहुत उशीर उपकारकच ठरेल. घाईघाईत वरवरच्या भावनांच्या आहारी जाऊन आपण चुकीचे निर्णय घेतले तर पुढील पिढ्यांच्या शिव्याशापांचे आपण धनी होऊ.

आपला देश मोठा आहे. आपले जगातील इतर लहानमोठ्या देशांबरोबर अनेक प्रकारचे संबंध येत चालले आहेत. आपण त्यांच्या जवळ आलो आहोत आणि भविष्यकाळी अधिकाधिक जवळ येत जाऊ यात संदेह नाही. जागतिक देवघेवीसाठी आपल्याला जगातल्या महत्त्वाच्या सर्व भाषा आल्या पाहिजेत. संस्कृत ही आपली संस्कृतीची, धर्माची आणि तत्त्वज्ञानाची भाषा. आपल्या प्रादेशिक भाषा तिच्यापासूनच निघाल्या. ज्यांची जातकुळी वेगळी आहे त्या द्राविडी भाषांनीही संस्कृतपासून पुष्कळच उसने घेतले आहे. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे वाहतुकीची साधने फारशी अनुकूल नसतानासुद्धा संस्कृतनेच गेली दोन हजार वर्षे आपल्या या अजस्र बहुभाषी आणि बहुरंगी देशाला एकत्र आणले आहे. संस्कृत म्हणजेच आपली संस्कृती. आजही गरज लागली म्हणजे आपल्या

सर्व देशी भाषांना ज्ञान आणि विज्ञान या क्षेत्रांत सूक्ष्म विचार आणि भावना व्यक्त करण्यासाठी याच म्हातारीकडे धाव घ्यावी लागते. आपली संस्कृती आणि ऐक्य जतन करण्यासाठी आपल्याला संस्कृत शिकलेच पाहिजे. आपल्या राष्ट्रभाषा अनेक आहेत. या राष्ट्रभाषाकुलामध्ये या म्हातारीचे स्थान मानाचे आहे.

आणि हिंदी ? आपले कोट्यवधी भाईबंद ही भाषा बोलतात. इतर लक्षावधी अहिंदी लोकांना ती समजते. थोडीबहुत बोलताही येते. ही भाषा सोपी आहे. आपल्या मराठीला जवळ आणि जुळती आहे. मी तिला राष्ट्रभाषा मानीत नाही. इंग्रजांची इंग्रजी, जर्मनांची जर्मन आणि फ्रेंचांची फ्रेंच या भाषा ज्या अर्थाने राष्ट्रभाषा आहेत त्या अर्थाने हिंदी ही अखिल भारताची राष्ट्रभाषा होऊ शकत नाही. शिवाय राष्ट्र एक असले म्हणजे त्याची एकच राष्ट्रभाषा असली पाहिजे असे मानण्याचे कारण नाही. तसे असले तर फारच चांगले. दुधात साखर पडली. परंतु तसे नसले तर खेद करण्याचे आणि मारूनमुटकून तसे घडविण्याचे कारण नाही. आपण या बाबतीत इंग्लंड, फ्रान्स आणि जर्मनी या एकभाषी देशाकडेच पाहत असतो. कॅनडा, बेल्जम, दाक्षिण आफ्रिका या देशांच्या दोन राष्ट्रभाषा आहेत. स्वित्झर्लंडसारख्या चिमुकल्या देशाच्या चार आहेत, हे आपण विसरतो.

या बहुभाषी राष्ट्रांच्या धर्तीवरच आपल्या देशाच्या बारा-तेरा राष्ट्रभाषा आहेत हे आपण जाणले पाहिजे. हिंदी ही त्यातील एक राष्ट्रभाषा. देशातील बहुसंख्य लोक ती बोलतात आणि ती समजू शकतात म्हणून आपण आपल्या घटनेत हिंदीला संघभाषेचे स्थान दिले आहे. हिंदीचे हे स्थान आणि त्याची मर्यादा लक्षात घेऊनच आपण अहिंदी लोकांनी तिला आपापल्या प्रदेशात योग्य ते स्थान दिले पाहिजे आणि तिची जपणूक केली पाहिजे.

राहता राहिली मराठी. ती तर आपली मातृभाषा—आपली आई. पहिला मान तिचा. पहिला पाट तिच्यासाठी. प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाप्रमाणेच पुढचे उच्च शिक्षणही मराठीतून झाले पाहिजे. काही विषय आज शिकविता येतील, काही उद्या, काहींना कालावधी लागेल. परंतु

आपले उद्दिष्ट आपल्या डोळ्यांसमोर स्पष्ट असले पाहिजे आणि त्या दिशेने वाटचाल केली पाहिजे.

काही देशभक्त म्हणत असतात, आपल्या विद्यापीठांचे अध्ययन-अध्यापन हिंदीतून व्हावे. मला ते पटत नाही. ज्या भाषेतून विद्यार्थ्याने अकरा वर्षे शिक्षण घेतले, तीच भाषा पुढे चालू राहिली पाहिजे हे उघड आहे. शिक्षणाचा व्यापक अर्थ घेतला तर मूल जन्मापासून घरी-दारी, बाजारी शिकत असते, आणि ते शिकत असताना मातृभाषेच्या ज्ञानाचीही वाढ होत असते. मिळविलेले ज्ञान आणि अनुभव भाषानिविष्ट झाले म्हणजे पुढे जाता येते. पुढच्या पिढीकडेही ज्ञानाच्या पूर्वसंचिताचा वारसा भाषेच्या द्वारेच येत असतो. ज्ञान आणि भाषा यांचा हा घनिष्ठ, अन्योन्य संबंध लक्षात घेतला म्हणजे ज्ञानाचे मातृभाषा हे स्वाभाविक आणि अपरिहार्य असे माध्यम आहे, हे मान्य केलेच पाहिजे.

सामाजिक समतेच्या आणि लोकशाहीच्या विकासाच्या दृष्टीनेही हिंदी किंवा इंग्रजी हे शिक्षणाचे माध्यम राहणे योग्य नाही. या परक्या भाषा बहुजनसमाजाला येत नाहीत. पुढेमागे त्या चांगल्या येतील अशी आशा बाळगण्याचे कारण नाही. हिंदीचा किंवा इंग्रजीचा कधी काळी खेड्यां-पाड्यांत प्रसार झाला असे गृहीत धरले तरी या भाषा विचार, भावना आणि अनुभव व्यक्त करण्यासाठी मातृभाषेची जागा घेऊ शकणार नाहीत.

साहित्याच्या दृष्टीने विचार केला तरी हाच निष्कर्ष पत्करावा लागेल. साहित्य सकस व्हायचे असेल, त्याला तेज चढायचे असेल, त्याचे नाना प्रकारचे पैलू पडायचे असतील, तर ते लोकांच्या जीवनातून जन्माला आले पाहिजे आणि वाढले पाहिजे.

इंग्रजीत ज्याला 'सोशल मॉबिलिटी' म्हणतात, ती आमच्याकडे आली पाहिजे. तीच समाजाच्या जिवंतपणाचे लक्षण आहे. समाजाचे कल्याण तिच्यातच आहे. समाजिक जीवन सारखे ढवळले गेले पाहिजे. खालचे बिंदू वर आणि वरचे खाली असे आले-गेले पाहिजे. वरच्या थरातला मनुष्य ऐदी आणि गाढव निघाला तर तो खाली गेला पाहिजे. आणि खालच्या थरातला बुद्धिमान तडफदार मनुष्य वर चढला पाहिजे.

बडे बापके बेटे फक्त म्हणीतच राहिले पाहिजेत. परत सांगतो, समाज खूप खूप ढवळला गेला पाहिजे.

हे माझे उद्याचे स्वप्न साकार होण्यासाठी मराठी भाषा महाराष्ट्राच्या सिंहासनावर बसली पाहिजे. आणि तिने प्रेमाने भरविलेला घास आमच्या सर्वांच्या पोटांत गेला पाहिजे. मराठीचे सार्वजनिक जीवनातले आणि शिक्षणातले स्थान निश्चित करताना या साऱ्या गोष्टींचा विचार झाला पाहिजे.

या सर्व विवेचनाचा अर्थ एकच आहे, आपल्याला मातृभाषा, हिंदी, संस्कृत, इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, रशियन, चिनी, इराणी आणि अरबी—कमीत कमी इतक्या भाषा आल्या पाहिजेत. एका वाक्यात सांगायचे म्हणजे आपल्याला बहुभाषी झाले पाहिजे.

गंमत आहे ती पुढेच आहे. तेथेच विचारवंताला डोके खाजवावे लागते. अर्थात ज्याच्या खांद्यावर डोके असेल त्यांनाच. जे कबंध आहेत त्यांच्या बाबतीत प्रश्नच उद्‌भवत नाही.

या साऱ्या भाषा आपल्याला शिकल्या पाहिजेत. कबूल आहे पण आपल्याला म्हणजे कोणाला ? आपण साऱ्या जणांनी या साऱ्या भाषा शिकल्या पाहिजेत काय ? माझ्या पिढीला दादोबांनी आपल्या लघुव्याकरणात सांगून ठेवले होते की नामाचा वारंवार उच्चार होऊ नये म्हणून सर्वनामाचा उपयोग करतात. आपण तर नामाचा उच्चारच न करता सर्वनामावरच भिस्त ठेवतो आणि त्याची टोपी वाटेल त्या आणि वाटेल तितक्या नामांच्या डोक्यावर घालतो. यामुळेच गोंधळ माजला आहे आणि चुका घडत आहेत.

आधी जर्मन, फ्रेंच, रशियन, जपानी, चिनी, इराणी आणि अरबी भाषा घ्या. या भाषा आपल्या सर्वांना आल्या पाहिजेत असे कोणीही शहाणा म्हणणार नाही. या भाषांच्या बाबतीत आपली राष्ट्रीय गरज बेताची, फार मर्यादित आहे. काही थोडया लोकांना या भाषा आपण शिकविल्या म्हणजे आपले काम भागणार आहे. विद्यापीठामध्ये ऐच्छिक तत्त्वावर या भाषा शिकता येतील. संध्याकाळचे वर्ग काढून त्यांची सोय करता येईल. फार तर या भाषांसाठी एक दोन मध्यवर्ती संस्था काढून त्यांचे यथासांग शिक्षण देता येईल. मुद्दा

हा आहे की या दूरच्या भाषा सर्वांच्या वर लादावयाच्या नाहीत. थोड्याच लोकांना त्या शिकवायच्या आहेत. कारण त्यांच्याबद्दलची आपली गरज थोडी आहे. एखादीची गरज पुढे मागे वाढलीच तर पुढेमागे, त्या भाषेची अधिक सोय करू. उद्याची बात उद्या.

जितकी आणि जशी गरज तितके आणि तसे स्थान ज्या त्या भाषेला द्यावयाचे ही कसोटी एकदा पत्करली म्हणजे इतर वादग्रस्त भाषांचेही प्रश्न आपल्याला सहज सोडविता येतील. हे प्रश्न कोणाच्या लहरीवर किंवा भावनेवर अवलंबून न ठेवता केवळ राष्ट्राच्या गरजांच्या दृष्टीनेच निकालात काढले पाहिजेत.

आधी सोयीच्या दृष्टीने संस्कृतचा विचार करतो. हिचे महत्त्व मी जाणून आहे. तरीसुद्धा मला असे म्हणायचे आहे की, माध्यमिक शिक्षणातसुद्धा संस्कृतची सक्ती नसावी. ती मृत भाषा आहे. बोलण्यालिहिण्यात तिचा वापर नाही. तथापि आपल्या प्रादेशिक भाषांमधून ती अमर झाली आहे. म्हणून मला वाटते की प्रादेशिक भाषांच्या अभ्यासक्रमात कामापुरत्या संस्कृतचा समावेश केला तर तो त्या भाषांनासुद्धा उपकारक होण्यासारखा आहे. हा प्रयोग करून पाहण्यासारखा आहे.

आपण प्राथमिक व माध्यमिक अभ्यासक्रमांत विनाकारण गर्दी करू नये. गर्दीतील माणसे दिसत नसतात; त्यांचा नीट परिचय होत नाही. सलगीची बातच सोडून द्या. गर्दीवर कुणाला प्रेम करता आले आहे काय ? प्रेम करण्यासाठी, व्यक्तीला गर्दीतून दूर करावे लागते. जवळ घ्यावे लागते. आपल्या प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणात हे प्रेम आणि सलगी शक्य होण्यासाठी म्हणजेच विषयाचे ज्ञान सकस आणि घट्ट होण्यासाठी विषय थोडे असावेत. या विषयांनाच मी नेहमी पायाचे ( basic ) विषय म्हणतो, त्यांच्या शिक्षणाला पायाचे शिक्षण म्हणतो. हा पाया भक्कम होण्यासाठी, विषयांची, व्यवसायांची, सटरफटर गोष्टींची गर्दी आपण टाळली पाहिजे.

मराठीच्याच अभ्यासक्रमात संस्कृतचा कामापुरता समावेश करणे हा एक मार्ग झाला. परंतु याशिवाय संस्कृतला स्वतंत्र असे स्थान आपण दिले पाहिजे आणि तेही दोन प्रकारचे. ज्यांना हौस आहे आणि कुवत आहे

त्यांनी संस्कृत हा स्वतंत्र विषय म्हणून शिकावा. कुणी कामापुरता, छोटा (B) कोर्स, कोणी विशेष, बडा (A) कोर्स. मात्र संस्कृतच्या अध्यापनात आणि अभ्यासक्रमात आमूलाग्र बदल झाला पाहिजे. शाळांना या बाबतीत निरनिराळे प्रयोग करण्यास स्वातंत्र्य आणि मदत मिळाली पाहिजे. आजवर आपण शाळांत नुसते संस्कृतचे व्याकरण शिकत आलो. उदाहरणांदाखल काही सुभाषिते किंवा सुंदर वाक्ये व श्लोक वाचण्यात आले असतील तेवढेच. याच्या उलट झाले पाहिजे. अगदी पहिल्या दिवसापासून मुलांना सोप्या, सुबोध आणि सुंदर अशा संस्कृत वाङ्मयाचा परिचय घडला पाहिजे आणि ते समजण्यापुरते व्याकरण शिकविले पाहिजे. आपली संस्कृत सुभाषिते म्हणजे बहुमोल रत्नांची खाण आहे. त्यांच्यात उत्तम काव्यगुण असून शिवाय अनेक शतकांचे आपल्या पूर्वजांचे शहाणपण साठले आहे. अशी निवडक सुभाषिते, पंचतंत्र, रामायण-महाभारतातील सोपे उतारे अभ्यासक्रमात समाविष्ट करावेत. संस्कृत चार वर्षे शिकल्यावर विद्यार्थ्याला नवा श्लोक लावता आला पाहिजे. नव्या श्लोकातील किंवा वाक्यातील कर्ता–क्रियापद–कर्म, कर्ता आणि कर्म यांची अनुसारी विशेषणे व क्रियाविशेषणे हुडकून काढून, या उताऱ्यांचा चुकतमाकत अर्थ लावण्याची सवय विद्यार्थ्याला झाली पाहिजे.

याशिवाय शिक्षणसंस्थाच्या बाहेर संस्कृत शिकण्याची आणि संस्कृत वाङ्मयपरिचयाची किंवा विशेष अभ्यासाची सोय करता येईल. त्यासाठी अभ्यासमंडळे काढावीत, वर्ग काढावेत, स्वतंत्र परीक्षा घ्याव्यात. या संदर्भात एक गोष्ट आठवली म्हणून येथेच सांगून टाकतो. आपल्याला एक वाईट सवय लागली आहे. या स्वातंत्र्याच्या काळात आपण ती टाकून दिली पाहिजे. जे काही ज्ञान, कला, कसब मिळवायचे ते सारे शाळा कॉलेजांच्या अभ्यासक्रमांतच कोंबले पाहिजे आणि ते सारे सरकारच्या ओंजळीनेच प्राशन केले पाहिजे, अशी आपली सवय झाली आहे. यामुळे अनेक दुष्परिणाम घडत आहेत. सरकारकडे अधिकाधिक सत्ता जाते आणि जसजशी सत्ता जाते तसतशी सरकारची सत्तेची भूक वाढते. सरकारला ही संधी आपण देऊ नये. दुसरी गोष्ट, सारेच 'सरकारी' अभ्यासक्रमात कोंबायचे म्हणजे त्या अभ्यासक्रमाचा बोजा साहजिकच वाढतो व त्या

ओझ्याखाली एक ना धड भाराभर चिंध्या या न्यायाने काही नीट शिकवले व शिकले जात नाही.

आता हिंदी. हिच्याबद्दलचे आपले उद्दिष्ट स्पष्ट केले म्हणजे हिंदी किती वर्षे व किती शिकवावे हे ठरवणे सोपे जाईल. हिंदी आपल्याला ज्ञानासाठी, वाङ्मयपरिचयासाठी, माध्यम म्हणून वापरण्यासाठी शिकायचे नाही. केवळ व्यवहारासाठी शिकायचे आहे. हिंदी आपल्याला बोलता आले पाहिजे, बोललेले समजले पाहिजे आणि सोपे हिंदी समजून वाचता आले पाहिजे. एवढे हिंदी येण्यासाठी माध्यमिक शाळांत सर्वांना दोन किंवा फार तर तीन वर्षे हिंदी शिकविले म्हणजे काम भागेल. ज्यांना हिंदीचा विशेष अभ्यास करायचा आहे त्यांच्यासाठी त्या भाषेचा संस्कृतप्रमाणेच विशेष अभ्यासक्रम ( A कोर्स ) असावा, त्यांनी हिंदी खुशाल सहा-सात वर्षे शिकावे. हिंदीत प्रवीण व्हावे. हिंदीत लेखन करावे, नाव मिळवावे. हिंदी कथा-काव्य, कादंबऱ्या, निबंध लिहून हिंदीला मराठीची चुणूक दाखवावी. परंतु हे प्रावीण्य, हा विशेष अभ्यासक्रम सर्वांवर लादणे चुकीचे होईल.

हिंदी भाषेच्या प्रचारसंस्था खूप चांगले काम करीत आहेत. आपल्या नुसत्या महाराष्ट्रातच लाखांच्या वर विद्यार्थी हिंदीच्या खाजगी परीक्षांना बसले आहेत. ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. मला कधी कधी असे वाटते की सरकार विनाकारण शाळांतून हिंदी शिकविण्याच्या भानगडीत पडले. आरंभी त्याने तीन वर्षे हिंदी शिक्षणाची व्यवस्था केली होती ती पुरेशी होती. अधिक गरज व हौस असलेले या खाजगी संस्थांत शिकले असते.

आता राहिले इंग्रजी. ही ‘ दूरची ’ भाषा असली तरी गेल्या दीडशे वर्षांच्या सहावासाने ती तशी राहिली नाही. इंग्रजीने आपल्याला आधुनिक संस्कृतीचा, ज्ञानाचा, विज्ञानाचा परिचय करून दिला आहे, यापेक्षाही महत्त्वाचे दुसरे काम तिने केले आहे. जुन्या काळी संस्कृतने आपल्या पुढारलेल्या वर्गाला एकत्र आणले. ती बोलभाषा नसल्यामुळे आणि अन्य कारणांमुळे ( सुज्ञांस अधिक लिहिणे नलगे ) बहुजनसमाज या ज्ञानापासून वंचित राहिला. तरी ब्राह्मणसमाज आसेतुहिमाचल एकत्र आणला ही संस्कृतची त्या जुन्या काळची कामगिरी काही कमी महत्त्वाची नाही.

गेली दीडशे वर्षे इंग्रजीने नेमके तेच काम केले. अंदाजे शंभरांतली दीड माणसे इंग्रजी शिकली. इंग्रजीचे लोण संस्कृतप्रमाणेच खेड्यांपाड्यांपर्यंत पोहोचले नाही. तरी इंग्रजीने संस्कृतप्रमाणेच आपल्या पांढरपेशा वर्गाला एकत्र आणले ही त्याची कामगिरी वाखाणण्यासारखी आहे. इंग्रजीनेच आपल्याला स्वातंत्र्याचे विचार आणि भाषा दिली. इंग्रजीचे हे फार मोठे ऋण मान्य करूनसुद्धा राष्ट्रीय गरजेस अनुसरून तिचे स्थान आपण निश्चित केले पाहिजे. इंग्रजीचा प्रश्न फार गुंतागुंतीचा आहे. त्याला अनेक बाजू आहेत. तसा गुंता थोडाच होता, परंतु आपल्या शाहण्या लोकांनी या विषयाचा सांगोपांग विचार न करता हुज्जत घातल्यामुळे गुंता वाढला आहे आणि तो उकलणे कठीण झाले आहे.

इंग्रजीबद्दलची आज आपली नक्की काय गरज आहे, किंवा काय गरजा आहेत हे हे स्पष्ट झाले की गुंता आपोआप सुटेल. परत एकदा एक गोष्ट सांगतो, कोणत्याही भाषेबद्दल आधुनिक समाजाची एकच गरज नसते. गरजा बहुविध असतात. मी मातृभाषेचासुद्धा यात समावेश करतो. कोणी कामापुरते मराठी शिकतील, कोणी तिचा थोडा विशेष अभ्यास करतील तर काही थोडे लोक तिच्यात प्रावीण्य मिळवतील. या साऱ्या गरजवंतांची आपण आपल्या शिक्षणसंस्थांत आणि अन्यत्र सोय केली पाहिजे. इंग्रजीला तर हा नियम विशेषत्वाने लागू आहे. दूरवर पाहून सांगायचे तर मी असे म्हणेन की, इंग्रजीबद्दलच्या आमच्या गरजा तीन प्रकारच्या आहेत :

( अ ) अगदी दूरवर पाह्याचे तर असे बिनदिक्कत म्हणता येईल की आमच्या बहुसंख्य लोकांना इंग्रजीची काहीच गरज नाही. त्यांचे सर्व माध्यमिक आणि उच्च शिक्षण पुढेमागे मातृभाषांतूनच होणार. तेथे 'तडजोड नाही रे तडजोड नाही.' ते अटळ आहे, अपरिहार्य आहे.

( ब ) काही दिवस—काही वर्षे आपल्या बऱ्याच लोकांना इंग्रजीचे कामचलाऊ ज्ञान आपल्याला द्यावे लागेल. हे ज्ञान माध्यमिक शाळांत तीन-चार वर्षांत देण्यासारखे आहे.त्यासाठी खास अभ्यासक्रम आखले पाहिजेत. ( मी अनेकवचन वापरीत आहे इकडे लक्ष असू द्या. ) ते अभ्यासक्रम लवचिक पाहिजेत. त्यांच्यांत अवश्य ते बदल करण्याचे शाळांना स्वातंत्र्य

अनुक्रम 69422 दि: ... क्रमांक ... नों: दि: ...


पाहिजे. या स्वातंत्र्याचा वापर करण्यासाठी शाळाखात्याची आगाऊ परवानगी घेण्याची जबरदस्ती नसावी. मात्र या स्वातंत्र्याचा वापर कसा केला हे कसून तपासण्याचा आणि अवश्य तेथे प्रत्येक शाळेला तिच्यापुरते मार्गदर्शन करण्याचा आणि सल्ला देण्याचा अधिकार शाळाखात्याच्या इन्स्पेक्टर्सना असावा. सब घोडे बारा टक्के या न्यायाने मुंबईच्या आणि माखजनच्या शाळांना सारखीच लागू पडतील (ती क्वचितच लागू पडतात) अशी सक्युलर्स या स्वतंत्र देशात शाळाखात्याकडून निघू नयेत. इंग्रजी आठवड्यातून किती तास शिकवायचे हे शाळाखात्याने ठरवू नये. प्रत्येक शाळेने आपल्या गरजेप्रमाणे आणि कुवतीप्रमाणे ठरवावे आणि याबाबत घेतलेले निर्णय योग्य आहेत का हे सरकारी इन्स्पेक्टर्सनी ठरवावे. फारशी चूक नसेल तर नुसता सल्ला द्यावा आणि गप्प बसावे. चूक ढोबळ असेल तर फतवा सोडावा, कान पकडावा, दुरुस्ती करावी. फार संयम ठेवावा; फार विवेक बाळगावा. फार कल्पकता वापरावी.

(क) काही अल्पसंख्य लोकांनी इंग्रजीचा विशेष अभ्यास करावा. सहासात वर्षे. त्यासाठी खास शाळा नसाव्यात. परंतु वेगळे वर्ग असावेत.

हे चित्र आजचे नाही. उद्याचे आहे. तो उद्या केव्हा उगवेल हे मला सांगता येणारे नाही. हाती सत्ता असती तर कदाचित सांगितले असते. आज ही इंग्रजीची वाटणी व्यवहारात उतरणार नाही. सारेच सात वर्षे आम्ही इंग्रजी शिकवणार असे आज म्हणतील. (उद्या म्हणणार नाहीत.) परंतु जेव्हा उद्या उगवेल, जेव्हा सरकारी कारभारी, उच्च शिक्षण (व्यावसायिक आणि तांत्रिक शिक्षणसुद्धा), न्यायालये, विधानसभा यांत इंग्रजीची खुर्ची मराठी घेईल, तेव्हा इंग्रजीबद्दलच्या मागण्या स्वाभाविक आणि सांस्कृतिक राहतील. त्यांना पोटापाण्याचा वास येणार नाही. त्या वेळी शिक्षणातले इंग्रजीचे स्थान आणि त्याची मर्यादा स्पष्ट होईल. आज बापाजवळच्या पैक्यासाठी प्रेयसीवर प्रेम आहे. उद्या ती केवळ प्रेयसी आहे म्हणूनच प्रेम बसेल आणि तिला ते मानवेल.

काही वर्षांपूर्वी प्राथमिक शिक्षकांच्या खास शिक्षणासाठी आणि इतरांच्याही सोईसाठी मुंबई सरकारने लोकशाळांचा एक सुंदर प्रयोग सुरू केला

होता. या माध्यमिक शाळांत इंग्रजीला स्थान नसल्यामुळे इतर विषयांची आणि कलांची अभ्यासक्रमात पुष्कळच तरतूद करता आली आणि साधारणपणे इंटरमीजिएटपर्यंतचे शिक्षण या लोकशाळांना देता आले. हा प्रयोग चारपाच वर्षांतच बंद झाला. तो परत सुरू करण्यासारखा आहे. इंग्रजीचे आकर्षण आपल्याला इतके जबरदस्त आहे आणि त्या भाषेचे शिक्षण न दिले तर इतके गैरसमज पसरत जातात की यापुढे लोकशाळा निघतील की नाही याबद्दल मला शंका वाटते. निघाल्यास मी त्यांचे स्वागत करीन. लोकशाळेत माध्यमिक शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना मातृभाषेतून उच्च शिक्षण मिळण्याची सोय झाली पाहिजे. लोकशाळा ही आंधळी गल्ली ( blind lane ) होता कामा नये.

लोकशाळांना भविष्याच्या हवाली करून सद्यःस्थितीच्या संदर्भात आपण इंग्रजीचा आजच्यासाठी विचार करू. चार वर्षांत पुरेसे इंग्रजी शिकविता येईल असा माझा विश्वास आहे. काम कठीण आहे, पण अशक्य नाही. मुंबई सरकारने चार वर्षांचे इंग्रजी सुरू केल्याबरोबर हाकाटी झाली, हाहाःकार उडाला. सरकारचीही चूक झाली. मुंबई सरकारला आपल्या राज्यात सात वर्षांचे हिंदी लादायचे होते. म्हणून इंग्रजीची साताची चार वर्षे झाली. सरकार केवळ भावनेच्या आहारी गेले. इंग्रजी ही बोलूनचालून परकी भाषा. तिचा शब्दसंग्रह आणि व्याकरण वेगळे. ती शिकवायला अधिक वेळ लागणार. उलट हिंदी ही आपली जवळची भाषा. तिचा शब्दसंग्रह मराठीशी आणि गुजरातीशी जुळता. व्याकरणसुद्धा फारसे वेगळे नाही. तेव्हा हे तारतम्य जाणून सरकारने सात वर्षे हिंदीची सक्ती करायला नको होती.

ते काही असले तरी चार वर्षांचा इंग्रजीचा अभ्यासक्रम निश्चित करताना ट्रेनिंग कॉलेजात त्यापूर्वी प्रयोग व्हायला पाहिजे होते. एकाच सरकारी ट्रेनिंग कॉलेजात नव्हे, तर सर्वत्र. या प्रयोगापासून निघालेले निष्कर्ष ध्यानात घेऊनच इंग्रजीचे स्थान, स्वरूप आणि मर्यादा निश्चित करायला हव्या होत्या. ते झाले नाही.

सरकारने दुसरी मोठी चूक केली. दहा वर्षांच्या अल्पावधीत चुका तरी

किती कराव्यात ? फार घाई झाली म्हणजे असेच होणार. इंग्रजीला माध्यमिक शाळेत चार वर्षे दिल्यावर शहाणपणाची गोष्ट ही होती की त्या विषयाला किती तास द्यायचे हे ज्या त्या शाळेवर सोपविणे योग्य होते. परंतु शिक्षणसंस्थांचे स्वातंत्र्य दैनंदिन मामुली बाबतीतसुद्धा काढून घेण्यास सरकार इतके अधीर झाले होते की इंग्रजीचेच नव्हे तर इतर सर्व विषयांचे तासमुद्धा फतवा काढून सरकारने ठरविले. सुधारलेल्या देशांत वेळापत्रके तयार करण्याचा अधिकार शाळेच्या मुख्याध्यापकाचा असतो. या अधिकारावर सरकारला आणि सरकारी अधिकाऱ्यांना तिकडे अतिक्रमण करता येत नाही. आम्हांला राजकीय स्वातंत्र्य मिळाले आहे; शैक्षणिक स्वातंत्र्य मात्र आम्ही आस्ते आस्ते गमावीत आहोत; ते परत मिळवले पाहिजे.

परत मुद्द्यावर येतो. शिक्षकाने चांगली तयारी केली, शिकवायला पुरेसे तास मिळाले आणि उद्दिष्ट स्पष्ट झाले तर इंग्रजी चार वर्षांत पुष्कळच आणि पुरेसे शिकविता येईल. काहीच प्रयत्न न करता, अभ्यास न करता नुसती हाकाटी करणे अविचाराचे होईल. ज्या विद्यार्थ्यांना पुढे मेडिकल, एंजिनिअरिंग इत्यादि विषयांचे शिक्षण घ्यावयाचे आहे त्यांनी माध्यमिक शाळांत इंग्रजीचा सात वर्षांचा अभ्यासक्रम घेतलेला बरा. त्यांची चार वर्षांत तयारी होणार नाही असे नाही. परंतु आज तरी तशी आशा वाटत नाही. चार वर्षे इंग्रजी शिकलेल्या विद्यार्थ्यांनासुद्धा या एंजिनिअरिंग किंवा मेडिकल कॉलेजांत प्रवेश मिळाला पाहिजे. या विद्यार्थ्यांनी विज्ञान आणि गणित या विषयांत सामाधानकारक प्रगती केली असल्यास केवळ त्यांचे इंग्रजी कमी पडते म्हणून त्यांना मज्जाव नसावा. आपल्या प्रयत्नाने ते इंग्रजीची उणीव भरून काढतील. शिवाय या व्यावसायिक कॉलेजांतसुद्धा आस्ते आस्ते मराठी आले पाहिजे.

भाषेचा आपण विनाकारण बाऊ करतो आणि अडथळे निर्माण करतो. महत्त्व बुद्धिमत्तेला, परिश्रमाला आणि ज्ञानाला आहे, भाषेला नाही. जर्मनीमध्ये किंवा फ्रान्समध्ये आमचे अनेक पदवीधर तरुण उच्च शिक्षणासाठी जात असतात. या भाषांचे त्यांना बहुधा ज्ञान नसते. असले तरी ते अगदी कमी असते. परंतु अल्पवधीत हे तरुण पाच-पाच सहा-सहा तास अभ्यास करून या परक्या भाषा शिकतात आणि उच्च शिक्षणाच्या वर्गात इतर

तद्देशीय विद्यार्थ्यांप्रमाणे शिकू लागतात. तेव्हा इंग्रजी अपुरे येते या सबबीवर कोणत्याही प्रकारच्या शिक्षणाची दारे बंद केली जाऊ नयेत.

इंग्रजी ही माझी आवडती भाषा आहे. तिच्या वाङ्मयावरच मी वाढलो आहे. तिनेच मला स्वतंत्र आणि ताजे विचार दिले आहेत. हौस आहे, प्रेम आहे. अशा माझ्यासारख्या वाटेल तितक्या लोकांनी ऐच्छिक तत्त्वावर खूपच इंग्रजी शिकावे असे मी मानतो. उद्याचे राधाकृष्णन्, विजयालक्ष्मी पंडित आम्हांला तयार केले पाहिजेत. सहस्रावधी होतकरू विद्यार्थ्यांना इंग्लंड अमेरिकेत पाठवून आम्ही ती गोष्ट साध्य करीतच आहोत. तथापि ज्यांना परदेशात जाण्याची ऐपत नाही, त्यांना आपल्या देशातच खूप इंग्रजी शिकण्याची संधी मिळाली पाहिजे. यासाठी विद्यापीठातील ऑनर्सचे अभ्यासक्रम, खास इंग्रजी शिक्षणाच्या हैदराबादसारख्या मध्यवर्ती संस्था, अभ्यासमंडळे, वगैरे अनेक साधने आपल्याला उपयोगात आणावी लागतील. या बाबतीत सर्वस्वी सरकारवर विसंबून राहू नये. ज्यांना इंग्रजीची आस्था आहे त्यांनी नुसती व्याख्याने देऊन आणि लेख लिहून आपले काम संपले असे समजू नये. त्यांनी इंग्रजीसाठी प्रत्यक्ष रचनात्मक कार्य केले पाहिजे. पूर्वीच्या स्टूडंट्स ब्रदरहुडसारखे वर्ग काढले पाहिजेत. अभ्यासमंडळे काढली पाहिजेत.

शेवटी मातृभाषा. तिचे शिक्षणक्षेत्रातील महत्त्व मी पूर्वीच तोंड भरून वर्णिले आहे. मातृभाषेचा खूप अभ्यास झाला पाहिजे, संशोधन झाले पाहिजे. तिच्यात ज्ञान आणि विज्ञान क्षेत्रांतील सर्व प्रकारचे ग्रंथ निर्माण झाले पाहिजेत. हे होण्यासाठी मातृभाषा ही शिक्षणाचे माध्यम झाली पाहिजे. आधी गरज, मग पुरवठा हा नियम येथेही लागू आहे. ही गरज निर्माण केली म्हणजे ग्रंथ भराभर तयार होतील. परिभाषा तयार होत राहील. या बाबतीत आपला आद्य गुरू माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन आहे. त्या शहाण्या माणसाने जे सांगितले आणि जे प्रत्यक्ष केले त्याला आजही महत्त्व आहे. तो म्हणाला, “ इंग्रजी ही हिंदुस्थानात केवळ ‘ क्लासिकल लँग्वेज ’ म्हणून शिकवावी आणि सर्वसामान्य ज्ञान मातृभाषेमधून द्यावे.” या उद्दिष्टास अनुसरून एल्फिन्स्टनने हजारो रुपयांची बक्षिसे लावून नाना प्रकारच्या इंग्रजी पुस्तकांचे मराठीत अनुवाद करून घेतले. ही मराठी पुस्तके एल्फिन्स्टनच्या

टेबलावर असत. एका इंग्रज मित्राने हे काय म्हणून विचारले असता त्या प्रज्ञावंताने उत्तर दिले, " ही आपण हिंदुस्थान सोडून जाण्याची तयारी आहे." रावबाजीला हुसकावून लावून त्याच्या गादीवर बसलेल्या या पहिल्या इंग्रजाचे हे उद्‌गार !

एल्फिन्स्टनच्या भाकिताप्रमाणे इंग्रज गेले, परंतु त्याच्या आवडत्या प्रादेशिक भाषांना अद्याप मानाचे स्थान मिळाले नाही. अजून आपण वाद घालीत आहोत, पारिभाषिक संज्ञांसाठी अडून बसलो आहोत. पाठ्य पुस्तकांसाठी अडून बसलो आहोत. ज्यांना हौस नाही, विश्वास नाही ते असेच अडून बसतात. एल्फिन्स्टनच्या अमदानीत आणि विद्यापीठे स्थापन होण्यापूर्वी लेखक अडून बसले नाहीत. त्यांनी भूमिती, रसायनशास्त्र, पदार्थविज्ञानशास्त्र आणि इतर शास्त्रे यांना अवश्य ती कामचलाऊ परिभाषा तयार केली आणि काम भागवून घेतले. त्यांनी तयार केलेल्या अनेक संज्ञा आजही सामान्य प्रचारात आहेत. काही काळाच्या चाळणीतून गळून गेल्या. परिभाषा हळूहळू तयार होईल. आज प्रचलित असलेली इंग्रजी परिभाषा आहे तशी वापरून काम चालविता येईल. ती परिभाषा तशी इंग्रजीही नाही, लॅटिन म्हणजेच आंतरराष्ट्रीय आहे. आपली परिभाषा तयार होईल, रूढ होईल तसतशा या लॅटिन संज्ञा प्रचारातून जातील, मुख्य मुद्दा, पोटात पोटतिडीक पाहिजे, थोडी धडाडी पाहिजे, बराचसा ध्येयवाद पाहिजे आणि कामाला लागले पाहिजे.

आम्ही केव्हा कामाला लागणार ?

◎ ◎ ◎

विठ्ठल दत्तात्रय घाटे

# हर्लिंगहॅमचा वीरपुरुष

तो हर्लिंगहॅमच्या प्रसिद्ध रेसेसचा दिवस होता. सारे इंग्लंड हर्लिंगहॅमकडे लोटले होते. पाच-पाच गिन्यांची तिकीटे हा हा म्हणता खपली होती. इंग्लंमधील सारे बडे अमीर-उमराव, सरदार-दरकदार आपापल्या शामियान्यामध्ये बसले होते. सुंदर स्त्रियांना अधिक सुंदर दिसण्याची आणि कुरूप स्त्रियांना कमी कुरूप दिसण्याची हीच एक सुवर्णसंधी होती. साऱ्या मनमुराद नटल्याथटल्या होत्या. बादशहा पंचम जॉर्ज आणि सारे राजकुल मोठ्या थाटाने मिरवत आपल्या खास शामियान्यामध्ये दाखल झाले होते. बरोबर एक हिंदुस्थानचे पाहुणेही होते आणि त्यांना शाही शामियान्यामध्ये स्थान होते. कारण ते बोलूनचालून 'फरजंदे इंग्लिस्तान' होते. रेसेस चालू झाल्या. तरुण स्त्रीपुरुषच नव्हे, तर म्हातारेकोतारेसुद्धा बेहोष झाले. आरडाओरड करू लागले. जागच्या जागी उड्या मारू लागले. इतक्यात एक नवल वर्तले. एक घोडे उधळले. फार तेज जनावर होते ते. बंदिस्त वाट सोडून त्याने शाही शामियान्याकडे चाल केली आणि हा हा म्हणता ते बेफाम जनावर शामियान्याजवळ येऊन थडकले. साऱ्यांच्या तोंडचे पाणी पळून गेले. काही जण पळून गेले. काहींनी त्यांचे अनुकरण करण्याची तयारी केली. सम्राट-सम्राज्ञी भांबावून गेली. घोडे अगदी जवळ येऊन ठेपले. शामियान्यामध्ये ते घुसणार, इतक्यात फरजंदे इंग्लिस्तान महाराजा माधवराव शिंदे या वीरपुरुषाने शामियान्यामधून खाली उडी टाकली आणि ताडकन घोड्याचा लगाम पकडला आणि त्याला जोराने मागे ढकलले. घोडे तेज होते. परंतु माधवराव त्याच्याहीपेक्षा तेज होते. घोडे

थांबले. त्याच्या तोंडातून रक्त गळू लागले. महाराजांचेही हात रक्तबंबाळ झाले. परंतु या वीरपुरुषाच्या धाडसामुळे राजकुटुंबावरले एक मोठे संकट टळले. महाराजांचा जिकडेतिकडे जयजयकार झाला. इंग्लंडमधील सर्व वर्तमानपत्रांनी 'हर्लिंगहॅमचा वीरपुरुष' असा महाराजांचा गौरव केला आणि त्यांचे फोटो प्रसिद्ध केले.

माधवमहाराजांच्या जीवनात साहसाचे असे अनेक प्रसंग आले. महाराजांना शिकारीचा फार शोक होता. ठिकठिकाणी दाट जंगलांत त्यांनी आपल्या मुक्कामासाठी पाण्याचा आसरा पाहून सुंदर लहानसे Humnting Lodges बांधले होते. महाराज अशा लॉजेसमध्ये रात्री मुक्काम करीत, सर्व रात्र ख्यालीखुशालीत घालवीत, आणि सकाळी उठून मोटार घेऊन शिकारीस निघत. मामुली पद्धतीने ते शिकार करीतच. परंतु त्यांचा असा शिकारीचा एक खास प्रकार होता. समोर वाघ दिसला म्हणजे महाराज मुद्दाम त्यावर मोटार घालीत आणि त्याच्या उडीची वाट पाहत. शेजारी गुलाब बसलेली असे——नखशिखांत पुरुषी शिकारी वेषात-जोधपुरी ब्रीचेस, हंटिंग कोट, पाठीवर वेणी सोडलेली आणि हातात भरलेली बंदूक. वाघ उडी मारून वर उसळला, त्याची झेप जवळ आली, तो अंगावर आला, म्हणजे महाराज हसून "बघ गंमत! म्हणून बार करायचे आणि त्या विक्राळ जनावराला खाली पाडायचे. थोडा विलंब झाला तर प्राणावर बेतायचे, असे हे विलक्षण धाडस होते आणि महाराजांच्या प्रेमविलासामधला तो एक अद्‌भुत प्रकार होता. त्याची आठवण झाली म्हणजे गडकऱ्यांच्या 'राजसंन्यासा'मधल्या तुफान दर्यांत तुळशीबरोबर प्रेमविलास करणाऱ्या संभाजीचीच आठवण होते. गडकऱ्यांची ती एक कल्पना होती. परंतु महाराजांची मात्र ही वस्तुस्थिती होती.

महाराजांच्या धाडसाचा आणखी एक प्रसंग नमूद करण्यासारखा आहे. ग्वाल्हेर संस्थानाचे दोन भाग होते. दक्षिण भाग म्हणजे माळवा प्रांत आणि उत्तर भाग म्हणजे ग्वाल्हेर प्रांत. या उत्तर प्रांतात बुंदेलखंड, बाघेलखंड, आणि इतर रजपूत ठाकोरांचे प्रदेश मोडत होते. शिंदे येण्यापूर्वी या प्रदेशात या ठाकोरांची लहानमोठी संस्थाने होती. शिंद्यांनी सर्व ठाकोरांचा पराभव करून आपले राज्य स्थापले होते. संस्थाने गेली

तरी हे ठाकोर लोक आपली जुनी परंपरा, रीतिरिवाज आणि शौर्य विसरले नव्हते. युद्धांचे प्रसंग संपले, तेव्हा काही ठाकोर ठकसेन बनले, आपल्या आश्रितांच्या बळावर दरोडे घालू लागले. परवा पकडला गेलेला मानसिंग हा त्यांच्यामधलाच एक वीरपुरुष. हा शब्दभेदी होता. अंधारातून ज्या दिशेनें शब्द आला तिकडे तो आपल्या बंदुकीची अचूक गोळी घाली. मानसिंगाची गोळी कधी वाया गेली नाही. या ठाकोरांच्या प्रदेशात सर्वांजवळ बंदुका, तलवारी असत. या प्रदेशात मी चार वर्षे फिरतीची नोकरी केली. ते धिप्पाड, तेजस्वी, हत्यारबंद, कपाळाला त्रिपुंड्र लावलेले, दाढीला मेंदी लावलेले शूर रजपूत पाहून मला विस्मय वाटे. डाकबंगल्यावर हजामतीसाठी न्हावी येई तोही हत्यारबंद. कमरेस जुनीपुराणी तलवार असलेला असा हा वीरांचा प्रदेश होता आणि आहे. पराक्रमास वाव नसल्यामुळे या प्रदेशात ठाकोर लोकांनी बंडाळी चालविली होती. हमेशा दरोडे पडत. क्षुल्लक कारणांवरून खून होत. सरकारी कारभार फार कठीण झाला. या पराक्रमी पण बेशिस्त ठाकोरांना वठणीवर कसे आणावे हा महाराजांपुढे प्रश्न होता. फौजेची किंवा हत्यारबंद पोलिसांची तुकडी पाठविली, तर हे लोक हुलकावण्या दाखवून वाऱ्यासारखे नाहीसे होत. किंवा प्रसंग पडला तर सामना देत, मारीत आणि मरत. पण चुकून एकही ठाकोर सरकारला शरण आला नाही.

माधवमहाराजांनी ठाकोरांना जिंकण्याचा एक अभिनव प्रयोग केला आणि महात्मा गांधींनी भारतात अवतार घेण्यापूर्वी तो केला. महाराजांनी झाशी-जवळच्या करेरा या गावी ठाकोरांची एक सभा बोलाविली. सर्व लहान-मोठ्या ठाकोरांना सरकारी आमंत्रणे गेली. मोठा शामियाना उभारला गेला. महाराजांनी आपल्या आमंत्रणपत्रिकेत लिहिले होते, "तुम्ही शूर आहात—मला तुमची कदर वाटते. मी तुमचा मित्र आहे आणि मित्रच राहू चाहतो. मला तुम्हांला भेटायचे आहे, तुमच्यांशी बोलायचे आहे, तुमच्या समोर माझे हृदय मोकळे करायचे आहे. तुम्हांला मी आश्वासन देतो, दगाफटका होणार नाही. खुशाल या. हवे तर हत्यारे घेऊन या. माझी हरकत नाही. मी मात्र एकही हत्यार न घेता तुमच्या भेटीस येणार आहे, अवश्य या." शूर मर्द दुसऱ्या शूर मर्दाला जाणतो, कदर करतो.

हत्यारबंद ठाकोर आपापल्या आश्रितांसह करेऱ्यास आले. शामियान्यात आले. महाराजांच्या सल्लागारांनी महाराजांना परावृत्त करण्याचे प्रयत्न केले. पण महाराजांचा निश्चय कायम होता. महाराजांनी प्रात:काळी स्नान केले; मनोभावाने दररोजप्रमाणे पार्थिवपूजा केली. मातोश्रींच्या पाया पडले. तलम मलमलीचा पोषाख अंगावर चढवला, घोड्यावर स्वार झाले. जवळ ती नेहमीची आवडती बंदूक नव्हती. दुसरे हत्यार नव्हते. छातीवर चिलखत नव्हते. कारण त्या छातीला चिलखताची जरूर नव्हती. महाराज शामियान्यात शिरले. एका नव्हे सहस्रावधी सिंहांच्या गुहेत शिरले—शिरले ते हसतच शिरले. आपल्या आसनाकडे जाताना दोन्ही बाजूच्या ठाकोरांना अभिवादन करीत गेले. आणि हसत गेले. महाराज येताच पूर्वीचे विचार किंवा बेत विसरून सारे ठाकोर ताडकन उभे राहिले. एकाच वेळी हत्यारांचा खण् असा आवाज निघाला. महाराज उभे राहिले आणि अस्खलित उर्दूमध्ये भाषण करू लागले. उर्दू हीच महाराजांची मातृभाषा. मराठी ते परक्यासारखे बोलत. महाराजांचे उर्दू वक्तृत्व अमोघ होते. त्यांच्यासारखा वक्ता मी अद्याप पाहिला नाही. महाराज पंचेचाळीस मिनिटे बोलत होते. शेजारच्या यमुना नदीसारखा त्यांच्या रसवंतीचा ओघ वाहत होता. काय बोलले हे आता मला आठवत नाही. पण महाराजांच्या भाषणानंतर टाळ्या वाजल्या नाहीत. कारण त्या रांगड्यांना सभेतले शिष्ट प्रकार माहीत नव्हते. एक मात्र झाले. साऱ्या ठाकोरांनी कमरेच्या तलवारी काढल्या आणि महाराजांच्या पायांपाशी ठेवल्या. ते खुनी, बेशिस्त, बेफाम ठाकोर त्या क्षणापासून महाराजांचे सेवक झाले. महाराजांनी सर्वांना त्यांच्या योग्यतेप्रमाणे नोकऱ्या दिल्या. त्यांच्यातला एक ठाकोर मोठा होता. फार पराक्रमी होता, खुनी होता. महाराजांनी या दरोडेखोराला आपल्या पोलीसखात्याचा मुख्य अधिकारी नेमले. एकदा मी आणि तो पोलीसप्रमुख--ठाकोर कोकसिंग—ग्वाल्हेरहून आगगाडीतून शिवपुरीस जात होतो. त्यांनीच मला हा करेऱ्याचा किस्सा सुनावला.

ग्वाल्हेर संस्थान फार मोठे होते. पण इतर संस्थानांप्रमाणे तेथे दिवाण नव्हता. महाराज स्वतःचे दिवाण. प्रत्येक खात्याला दिवस नेमून दिले होते. नेमलेल्या दिवशी त्या त्या खात्याच्या प्रमुखाने येऊन स्वतः पेशी

करायची आणि हुकूम व्यायचे. महाराज मोडीत 'मा शिं' अशी सही करीत. मराठी संस्थानांचे जुने सिलसिले मोठे मजेदार होते. सरकारी कागदपत्रांची भाषा इंग्रजी असो का उर्दू असो, आज्ञापत्रांच्या शेवटी 'बहुत काय लिहिणे हे विनंती' हे मराठी वाक्य असे. कारण ग्वाल्हेरीस मराठेशाही होती. सरकारी दफ्तराची भाषा उर्दू असली तरी लिपी देवनागरी होती आणि सर्वांना ती लिहावी लागे. ग्वाल्हेरीस असा समन्वय साधला गेला होता. इंदुरास सरकारी हुकुमांचा असाच मजेदार मराठशाही सिलसिला होता. सर्व सरकारी हुकूम लिहिला जाई देवनागरीमध्ये. नंतर तो पिढीजात हुजूरचिटणिसांकडे जाई. चिटणीस हूकुमाच्या शेवटीं 'श्री' हे अक्षर मोडीत लिहीत. नंतर हुकूम महाराजांच्या सहीसाठी जाई. महाराज सही करीत नसत. फक्त चिटणिसांनी लिहिलेल्या 'श्री' च्या पुढे मोडीमध्येच 'शंकर' हा शब्द लिहीत. इंदुरास सरकारी हुकूम झाला असे म्हणायचे असले म्हणजे अमक्या प्रकरणावर आज 'श्रीशंकर' झाला असे म्हणत असत. होळकरांचे कुलदैवत श्रीशंकर होते आणि म्हणून सरकारी हुकूम श्रीशंकरांच्या नावानेच निघत. ते श्रीशंकर गेले, बहुत काय लिहिणेही गेले. मराठशाहीचे शेवटचे बुरूज परवा ढासळून पडले पण अद्याप चाळीस वर्षांनंतरसुद्धा माधवमहाराजांच्या आठवणी ताज्या आहेत.

महाराज सरकारी काम दिवसभर पाहत, भराभर हुकूम सोडीत. महत्त्वाच्या प्रकरणावर दोनदोन, तीनतीन पानांच्या नोट्स स्वतः लिहीत. पेशीस आलेले अधिकारी जुने सलगीतलेच असत; काही नातलग असत; ख्यालीखुशालीतले साथीदार असत. परंतु सरकारी कामकाज चालू असता सलगी करण्याची कोणाची छाती नव्हती. विनोद, सटरफटर गोष्टी, हसणे वर्ज्य होते. महाराजांचे डोळे फार मोठे होते. रात्री केलेल्या मद्यपानामुळे ते किंचित लालसर दिसत. त्या डोळ्यांत रुबाब होता, गुर्मी होती, एक प्रकारचे रक्तातून आलेले खानदानी सामर्थ्य होते. ते डोळे तुमच्याकडे वळले म्हणजे मान पटकन खाली लवायची. दिवसभर काम करूनसुद्धा सरकारी काम संपत नसे. महत्त्वाच्या काही फायली शिल्लक राहायच्या. बरेच काम शिल्लक राहिले म्हणजे महाराज मुंबईस येण्यास निघत. त्यांच्या

खास डब्यात एकावर एक फायली रचून ठेवलेल्या असत. बोरीबंदर येईपर्यंत फायलीचा फडशा पडे.

महाराज मुंबईस वारंवार येत. ते राज्यकर्ते होते, तसेच एक नामांकित आणि तज्ज्ञ असे व्यापारी आणि उद्योगपती होते. त्यांनी सरकारी आणि खासगी कोट्यावधी रुपये मुंबईस आणि इतरत्र बाजारात गुंतविले होते. एफ्. ई. दिनशा हे महाराजांचे विश्वासू दलाल. त्यांच्याशी चर्चा करून महाराज त्यांच्या साह्याने वेगवेगळ्या उद्योगधंद्यांत पैका पेरीत. काही सरकारी खात्यांचे असे स्वतंत्र भांडवल असे आणि ते व्यापारात गुंतविलेले असे. येणाऱ्या मुनाफ्यातून त्या त्या खात्याचा खर्च चालावा अशी योजना होती. महाराजांच्या उद्योगधंद्यांचे एक फळ म्हणजे मुंबईची प्रसिद्ध ' सिंदिया स्टीम नॅव्हिगेशन कंपनी. '

महाराजांचे व्यक्तिमत्त्व चौरस होते. शिपाईगिरीची जितकी आवड तितकीच कलेचीसुद्धा. गाण्याची त्यांना चांगली माहिती होती. पंडित भातखंड्यांचे ते आश्रयदाते होते. भातखंड्यांची पद्धती महाराजांना पटली होती आणि ग्वाल्हेरीस व उज्जैनीस त्या पद्धतीप्रमाणे शिकविणाऱ्या गायनशाळा त्यांनी काढल्या. दरबारात आणि रात्रीच्या जलशांत मोठमोठ्या गवयांची गाणी होत आणि त्यांची योग्य कदर केली जाई. निवडक मंडळींच्या खासगी जलशात महाराज रंगात आले म्हणजे तबला वाजवायला घेत आणि चांगला वाजवीत. ग्वाल्हेरीचे त्या वेळचे ते जलसे बडे मशहूर होते. या जलशांत महाराज आपले राजेपण पूर्णपणे विसरत आणि सर्वांशी खेळीमेळीने वागत. सारखा विनोद चालू असे आणि त्यात महाराज खूप भाग घेत. एखाद-दुसरा भाबडा, बावळा मानकरी किंवा सरदार तावडीत सापडला की त्याला उल्लू बनविण्यात येत असे. पुष्कळ धूर्त माणसे जाणूनबुजून बावळटपणाचे सोंग घेत आणि महाराजांच्या विनोदास पात्र होत. महाराचांची मर्जी संपादन करण्याचा तो एक यशस्वी मार्ग आहे, असे त्यांना वाटे. महाराज त्यांच्यापेक्षा अधिक धूर्त होते. या धूर्त बावळटांना ते बनवीतच, पण बनविल्यावर दूर सारीत. या रात्रीच्या जलशात मनसोक्त मद्यपान होत असे. जलसेबाजांना बनविण्याचा महाराजांचा एक आवडता छंद म्हणजे त्यांना आग्रह करकरून खूप पाजायचे. इतके पाजीत की काही जण नशा चढून

बरळत वेडेचार करीत, तर काही भूमिगत होत. चाणाक्ष माणसे अनेक हातरुमाल घेऊन येत आणि प्याल्यातली दारू ओठाजवळ नेऊन ती खुबीने हातरुमालावर सांडीत. सारेच तर्र असल्याने सहसा हे लबाडीचे प्रकार उघडकीस येत नसत.

ग्वाल्हेरीस चाळीस वर्षांपूर्वी मद्याइतकेच थंडाईला महत्त्व असे. आपल्याकडे कचेऱ्यात दुपारच्या सुटीत चहाची सामुग्री आणि साधने असतात, त्याचप्रमाणे ग्वाल्हेरीस प्रत्येक कचेरीत भांग वाटायचा पाटा आणि वरवंटा असे. आणि एखाद्या तज्ज्ञ कारकुनाकडे दुपारच्या सुट्टीत भांग छनण्याचे काम असे. उन्हाळ्यात तर बदामपिस्ते घालून ' दुधिया ' बनविण्यात येत असे आणि तिच्या रुचीपुढे अमृत बापुडे असे. होळीच्या रात्री तर सर्व संस्थानभर गाण्यानाचण्याचे जलसे होत आणि थंडाई झडे. मला असाच एक प्रसंग आठवतो. मी दौऱ्यावर निमचला गेलो होतो. त्याच वेळी ग्वाल्हेरहून काही बडेबडे अधिकारी दौऱ्यावर आले होते. होळीचा दिवस आला. सर्वांत सीनिअर असलेल्या एका अधिकाऱ्याने जलसा सुरू केला. डाकबंगल्यासमोर टेनिसच्या मैदानावर बिछायत घालण्यात आली. गाणे सुरू झाले. इकडे कारकून थंडाई बनवू लागले. बडे बदमाष होते साले. त्यांनी भांगेत पैसा घातला आणि लौकरच तो काढला. पण पैशाने आपले काम केले. थंडाई जहाल झाली. सरदारसाहेबांनी आग्रह करकरून सर्वांना थंडाई पाजली. गाणाऱ्या बायांही त्या आग्रहातून सुटल्या नाहीत. मध्यरात्री सर्वांच्या डोळ्यांपुढे काजवे चमकू लागले. वेदांत ब्रह्माचें वर्णन आले आहे—ते एकच आहे; पण विप्र त्याला अनेकविध समजतात. आमची त्या विप्रांसारखीच मनःस्थिती झाली. आम्ही सर्व जण एकेकच होतो. परंतु परस्परांना अनेक दिसत होतो. बाया तर नाचता-नाचता खिदूळू लागल्या. अखेरीस मध्यरात्री सर्व ऑफिसर लोकांना त्यांच्या चपराशांनी उचलून डाकबंगल्यात नेले. जलसा संपला. असे अतिरेकी प्रकार होळीतच होत असत हे सांगितले पाहिजे.

महाराजांच्या जलशांत असे प्रकार नेहमी नाही तरी बऱ्याच वेळी होत. काही प्रसंगी तीनतीन, चारचार वाजेपर्यंत जलसे चालत. सारे जलसेबाज मद्याच्या आणि गाण्याच्या धुंदीत घरोघर जात आणि नऊदहा वाजेपर्यंत झोपत. महाराजांना मात्र झोप माहीत नसे. ते तसेच स्नानगृहात जात.

स्नान करीत. देवघरात जात. तेथे पार्थिवपूजेचे साहित्य तयार असे. महाराज भक्तिभावाने पार्थिवपूजा करीत. एका वेगळ्याच विश्वात प्रवेश करीत. जलशामध्ये हसणारे, विनोद करणारे, तबला वाजविणारे, मद्य पिणारे ते मन नव्हते. ते वेगळेच मन होते आणि अफजलखानाशी मुकाबला करण्यापूर्वी जगदंबेची आळवणी करणाऱ्या मनाशी त्याचे लागेबांधे होते.

पार्थिवपूजा संपेपर्यंत उजाडत असे. मग महाराजांचे तिसरे मन जागे होई. महाराज लष्करी पोषाख करीत, घोड्यावर बसत आणि घोडदौड करीत परेडग्राउंडवर जात. तेथे स्वत: फौजेची सर्व प्रकारे कसून परेड घेत आणि नास्त्याला राजवाड्यात येत.

महाराजांना आपल्या फौजेचा फार अभिमान होता. ग्वाल्हेरची फौज लढाईसाठी नेहमी सज्ज असे. लष्करी अधिकाऱ्यांना फारसे इंग्रजी येत नसे. परंतु लष्करी डावपेच आणि हमले व इतर लष्करी विद्या यांच्यात ते निष्णात असत. दरसाल खोट्या लढायांचे कार्यक्रम होत. लष्कराचे दोन भाग पाडण्यात येत. सर्व योजना आणि कार्यक्रम छापण्यात येई. हिंदुस्थान सरकारचे लष्करी अधिकारी पाहुणे म्हणून अगत्याने येत, कधी या लढायात भागही घेत. महाराज एका तुकडीचे आधिपत्य स्वत: करीत. या लढायांचे डावपेच, हल्ले, एकमेकांस गाठण्याचे आणि फसविण्याचे प्रकार अनेक दिवसपर्यंत चालत.

मला नेहमी वाटे, माधवमहाराज फार उशिरा जन्माला आले. त्यांचे मन आणि भावना शिवकालीन होत्या. शिवछत्रपतींच्या जमान्यातच ते जन्माला यायला हवे होते. त्यांची योग्य कदर झाली असती. परंतु विसाव्या शतकातसुद्धा महाराज चमक दाखवून गेले—अवेळीच. अशी माणसे अवेळीच जात असतात. त्यांच्या मनाला आणि शरीराला विसावा माहीत नसतो. दोघांकडूनही ते कसून काम घेत असतात. माधवमहाराज जीवनरस आकंठ प्याले. एकही थेंब त्यांनी खाली पडू दिला नाही. आणि पितापिताच त्यांनी जगाचा निरोप घेतला !

◎ ◎ ◎

## दुर्गा भागवत

# कोंडलेले क्षितिज

अश्वत्थाम्याची मूर्ती आठवली की मला गुदमरल्यासारखे होते. खूप मोठा बिलोरी आरसा असावा आणि त्याची मोजता येणार नाहीत अशी शकले शकले व्हावीत आणि तरीही प्रत्येक भंगलेल्या तुकड्यात आजूबाजूचे मावेल तेवढे प्रतिबिंब मात्र सारखे दिसत राहावे; आणि एकेरी प्रतिबिंबांचा एकमेकांशी ताळमेळ नसला तरी त्या सर्वांतून एकाच गोष्टीचे रूप बिंबलेले दिसावे तसेच अश्वत्थाम्याच्या व्यक्तिमत्त्वाचे झाले आहे. द्रोण, पांडव, युधिष्ठिर या साऱ्यांत तो दुभंगला. युद्धाने साफ भंगलेली व्यक्ती जर कुणी असेल तर हीच. युद्धाने याचे सारे व्यक्तित्वच तिरकस झाले. रुद्र, भयानक आणि तरीही अति खंतावलेला दुसरा कुणी पुरुष महाभारतात याच्यासारखा नाही. त्याच्या विदीर्ण व्यक्तिमत्त्वाच्या कणांना सांधणारा एकच मानसिक दुवा आहे. तो म्हणजे सरलतेचा. बालभावाचा. वोढाळ मूलच राहिला तो शेवटपर्यंत. तो वीर झाला, पण जाणता झाला नाही. योद्धा झाला, पण पुरुष झाला नाही. नपुसक नव्हता, पण पौगंडदशेच्या पलीकडे त्याचे मन पोचू शकले नाही. अपरिपक्व नवयुवकाचे मन एकदा आदर्शवादाने पछाडले म्हणजे ज्या विकृती भोगते, त्याच विकृती,—बऱ्या आणि वाईट—अश्वत्थाम्याच्या वाट्याला आल्या. त्या जाज्वल्य वृत्तींना मनोरम आकार देणे, आदर्शवादाला मुक्त स्वरूप देणे त्याला जमले नाही. स्वप्नेही नीट पाहणारा हा मुलगा नव्हता आणि वास्तवाशीही त्याचे नीटसे नाते कधी जमले नाही. सदा बावरलेला, भित्रा नसूनही गडबडलेला दिसतो.

स्वतःचे हरवलेले काहीतरी कावरेबावरेपणाने शोधीत राहतो. कुणी पाहिले तर जागच्या जागी संकोचून उभा राहतो. संकट सामोरे आले तरच तो ताठ उभा राहतो आणि निकाराने आणि विश्वासाने ते दूर करतो. बोलणे सहसा याला माहीत नाही. पण जगाकडे पहाण्याची दृष्टी चौकस नसली तरी मायाळू. स्वसंरक्षणाविषयी हा जागरूक आहे. पित्याने दिलेल्या ब्रह्मशिर अस्त्राने वास्तविक ब्रह्मांडाला जाळील, बारा वर्षे पृथ्वी निर्बीज करील असे कोणाचाही थरकाप करणारे अस्त्र त्याला विद्यार्थिदशेतच मिळाले होते. मुळातच हा अंतर्मुख, पण अंतर्मुखतेला गूढ सत्याचा आविष्कार झाला नाही. कारण त्याची कल्पनाशक्ती अधू होती. त्याची वासना रसरंगहीन होती. त्याच्या पौरुषाची क्षितिजे मुळातच त्याच्या बापाने वात्सल्याच्या विपरीत ऊद्रेकात कोंडून टाकली होती. वात्सल्याच्या या उफराट्या कोंडीतून अश्वत्थामा कधीही मुक्त झाला नाही.

योगायोगाने युद्ध झाले. थोरामागे थोर सेनानी पडले, आणि धुळीत उडत्या प्राणांचे क्षीण कण मिसळणाऱ्या दुर्योधनाच्या इच्छेचा अंकुर अश्वत्थाम्याच्या वैशिष्ट्यपूर्ण युद्धकृतीत स्फुरला. धूळ, रक्त, गिधाडे, कोंडलेल्या काळोखी दिशा, असंयत वैर, कमालीचे वैराग्य आणि निराशा, या सर्वांचा अर्क त्याच्या सेनापतीच्या भूमिकेत आढळतो. वास्तविक सेनानीची भूमिका ही मुळी अश्वत्थाम्याची नैसर्गिक भूमिकाच नव्हे. भीष्म, द्रोण, कर्ण वगैरेंना ती साजेशी होती. या भूमिकेला लागणारे सुसंस्कृत, प्रगल्भ व टवटवीत व्यक्तिमत्त्व आणि कल्पकता त्याच्यामध्ये नव्हती. पण थोरांमागे थोर पडले आणि हे माडाएवढे वाढलेले थोराड, निष्ठावान, बलिष्ठ पोर केवळ प्रसंगामुळे सेनानी झाले. ते पायघोळ, ढिगाळ पद त्याच्या व्यक्तित्वाला केवढे तरी पुरून उरणारे होते. या योद्धयाचे स्नायू आणि रक्त युद्धाने स्फुरली, पण मन यत्किंचितही तरल झाले नाही. ते झिंगले. पण कोणत्याही दृश्याने हलून नव्हे. बापाच्या मृत्यूच्या प्रसंगाने तो हादरला. पण त्या हादऱ्याने त्याला कैफ आला तो केवळ अजाण दुःखाचा. त्यातून उद्भवले ते मूढ क्रौर्य. आणि क्रौर्यात असायचा तेवढा सगळा रिक्तपणा, वांझोटा मोठेपणाही अश्वत्थाम्याच्या वाट्याला आला.

अश्वत्थाम्याचे जीवन सारे धुक्याने व्यापलेले वाटते. त्याच्या जीवन-

नाट्यातले चार प्रसंगच काय ते व्यासाने प्रकट केले आहेत. आणि हे अपुरे नाटक त्याने कुठेही जोडणी न करता तसेच विस्कळितपणे बाजूला सारून दिले आहे. मनासारखा न जमलेला डाव त्याने उधळून टाकला आहे. आणि म्हणूनच अर्धवट असला तरी हा विस्कटलेला डाव पुनः मांडणे कुणाला जमण्यासारखे नाही. पहिल्या प्रसंगात दूध मिळत नव्हते तेव्हाचे बाळपणचें दृश्य आहे. दरिद्री बापाचे दुधाकरिता लालचावलेले मूल पीठ कालवलेले पाणी दूध समजून पिते आहे. आणि आनंदाने ' मी दूध प्यालो ' म्हणत थयथय नाचते आहे. या प्रसंगात बाळपणातले निरागसपण कुठेही केव्हाही आढळणारेच आहे. व्यक्तीचा विशेष असा काही नाही. दारिद्र्यावरचे ते एक दारुण भाष्य आहे. अविस्मरणीय असे. पण यात विशेष हाच की हे वैषम्याचे भाष्य याच मुलाच्या अनुसंधानात अमर वाणीत उच्चारले गेले. त्या अमर वाणीमुळे अश्वत्थाम्याच्या जीवनाची पार्श्वभूमी रेखाटली गेली. या पार्श्वभूमीमुळे आजूबाजूला धुके पसरले असले, तरी बिंदूबिंदूंनी इथे रेखाटलेली अश्वत्थाम्याची आकृती कल्पनेने अजमावता येते. दुसरा प्रसंग त्याच्या विद्यार्थिदशेतला, पण दोन दृश्यांत विभागलेला आहे. द्रुपदाशी वैराची प्रतिज्ञा करून आलेला द्रोण मुलाबाळांसहित द्रुपदाला नाहीसे करण्याची मनोमन प्रतिज्ञा करतो. त्याचा प्रारंभ मुलाला विद्या देऊन तो करतो. कौरव–पांडव नंतर आले. अश्वत्थाम्याच्या स्वतंत्र सहज वर्तनाचे एकच अत्यंत ओझरते, एका वाक्यात मावणारे मनोज्ञ चित्र व्यासाने रेखाटले आहे. हे कौशल्य म्हणावे की गफलत हे मला समजत नाही. पण हे टाकण्यासारखे खचित नाही, याचा उमज व्यासाला नव्हता असे कसे म्हणावे ?

द्रोण नव्यानेच हस्तिनापुरी आलेला. आपले नावगाव गुप्त राखूनच तो कृपचार्यांकडे तेव्हा राहत होता. पांडव तिथे आसपास खेळायला यायचे. चोरून अश्वत्थामा त्यांच्यांत मिसळायचा. पांडवांवर त्याचे मन जडले आणि त्या भाबड्या सरळ मुलाने अर्जुनाला—आपल्या लाडक्या मित्राला—आपणाला अवगत असलेली युद्धाची विद्या शिकविली. राजपुत्राची मैत्री म्हणजे केवढी भाग्याची गोष्ट. त्या भाग्याचे उतराई होण्यासाठी त्याने विद्या दिली का ? गरिबी त्याला आतून टोचीत होती का ? पण एवढे

मात्र खरे की जे दिले ते अश्वत्थाम्याने भरलेल्या मनाने, उदारपणाने, लाजाळू वृत्तीने आणि खेळाच्या पवित्र्यात दिले. कुणाला न कळता मैत्रीचे ऋणदान त्याने केले. चिमणीच्या दाताने खाऊ दुसऱ्याला द्यावा तसे. आणि हा खेळ कुठे जरा आकाराला येतो न येतो तोच पित्याच्या आक्रमक धोरणाने अश्वत्थाम्याला हे स्वरूप आखडते घ्यावे लागले. तो संकोचला. द्रोणाने कौरव-पांडवांना शिकवण्याचे काम उघड पत्करले. हा क्षण अश्वत्थाम्याच्या सहजतेला मारक झाला.

बापलेक द्रोण मरेतोवर एकत्र होते. शरीराने व मनाने. पण हे मनाचे एकत्वच अश्वत्थाम्याच्या विकासाच्या आड आले. त्याचे गोड, उदार व लाजाळू व्यक्तित्व लोपून गेले. मुळात त्याचा स्वभाव महत्त्वाकांक्षी नव्हे. बापाने आकांक्षा त्याच्यावर लादली. पांडवांवर दोघांचे प्रेम. पण तरीही विद्येबद्दलचा पक्षपात द्रोणाने केला. अश्वत्थामाही बापाच्या इच्छेप्रमाणे सगळ्या कुमारांबरोबर पाणी भरायला जायचा त्याला अगोदर बोलावून द्रोण त्याला अधिक शिकवी. बापाची आकांक्षा त्याला माहीत होतीच. बापाच्याच मानसिक संघर्षाचे प्रतिबिंब मुलात या वयातच पडले असावे काय ? बापाच्या पक्षपाताला अश्वत्थाम्याने विरोध केला नाही. मुकाट्याने तो सांगेल तसे केले. प्रेमळ पण करारी पित्याचे कोणतेही मूल ऐकते, तसेच त्याने केले. कदाचित वाढत्या वयाबरोबर द्रोणाची जरबही त्याला बसली असावी. या प्रसंगातला त्याचा मानसिक संघर्ष कुठेच दाखविलेला नाही. त्यावरून एवढेच समजायचे की अश्वत्थाम्याच्या मनात वैयक्तिक महत्त्वाकांक्षा नव्हती. उत्कृष्ट योद्धा शिस्तीचा भोक्ता असतो. याच शिस्तीने अश्वत्थाम्याला गिळले. त्यातल्या त्यात जीवन सुखाचे होते. सुरक्षित होते. राजघराण्याला चिकटूनच राहण्यात या ब्राह्मण पिता-पुत्र योद्ध्यांचे काय ते श्रेय होते. परशुरामाची स्वतंत्र युद्धप्रतिभा दोघांतही नव्हती, आश्रितांच्या पेशातला सुस्थितपणा आणि लाचारी यांच्या आहारी दोघेही गेले होते. यानंतर वर्षेच्या वर्षे जातात. अश्वत्थामा जणू सुस्थितीत पुरला जातो. तारुण्याचा पहिला बहर येतो आणि जातो. त्या वेळी तो काय करतो, कसा वागतो, त्याची मनःस्थिती कशी असते, कौरव-पांडवांच्या सदा वाढत्या वैरात त्याची स्थिती कशी होते, काही काही व्यासांनी सांगितलेले नाही.

आणि मग एकदम त्याचे दर्शन होते ते युद्धाचा वणवा पेटल्यावर. त्याचा आवाज कर्कशपणे उंच ऐकू येतो तो बापाच्या मृत्यूनंतरच. हा जन्मला तेव्हा घोड्यासारखा म्हणे खिंकाळला. इतक्या जोराने हे मूल रडले, ते मोठे बळकट म्हणूनच. आणि म्हणूनच त्याचे नाव पडले अश्वत्थात्मा. पण हे कर्कश ओरडणे अक्राळविक्राळ आक्रंदनात, क्रूर गर्जनेत उमटले ते फक्त याच युद्धाच्या वेळी. याचा स्वभाव रागीट. संतापला की मग त्याला सुमार राहायचा नाही. त्यात आणखी मनाने घेतले तर वाटेल ते अघोर कृत्य करायला हा माघार घ्यायचा नाही, अशीही त्याची ख्याती होतीच. बापाचा वध धृष्टद्युम्नाने व पर्यायाने पांडवांनी अधर्माने केला, हे पाहून अश्वत्थाम्याचा संताप अनावर झाला. आता वैर हे भाडोत्री वैर राहिले नाही. अगदी स्वतःचे ते झाले. त्या वैराला बैठक कर्ण, भीष्म व दुर्योधन यांच्या वधाच्या वेळी पांडवांनी केलेल्या कपटाची. ते आठवून आठवून अश्वत्थाम्याने त्यांना अभद्र शिव्या मोजल्या. कृष्णाला त्याने पापात्मा म्हटले. बापाची प्रतिज्ञा हेच त्याचे उद्दिष्ट झाले. दुर्योधन त्याचा राजा आणि सखा. त्याची अखेरची इच्छा हे त्याचे कर्तव्य झाले. बाप व राजा यांच्या इच्छेत प्रथमच त्याची स्वतःची इच्छाही एकरूप झाली आणि तो सेनानी झाला. हा तिसरा प्रसंग खूप विस्ताराने रंगवला आहे व्यासाने. परंतु विस्तारातच जिज्ञासूला चांगलेच चकवले आहे त्याने. या विस्तृत प्रसंगाभोवती, आणि नंतरच्याही, जे धुके त्याने भरले आहे त्याला तोड नाही. म्हटले तर दृश्यावर खूप प्रकाश आहे; म्हटले तर सारेच सारवल्यासारखे दिसावे अशी खुबी केली आहे त्याने. व्यासाचे हे वाङ्मयीन मयगृहच आहे म्हणाना. उलटेसुलटे एक झाले आहे. प्रमाणे हरवली आहेत. रेखा इतक्या ठळक की त्यांनी चरेच चरे उत्पन्न केले आहेत. किंबहुना हे चरेच अश्वत्थाम्याच्या मनोवृत्तीचे व कृतीचे प्रतीक असावेत. विसंगती हाच या दोन्ही प्रसंगांचा आधार. आणि सर्वांत मोठा चमत्कार हा की ही विसंगती तत्त्वज्ञानाच्या सुसंगततेच्या आधाराने साधली गेली आहे. भगवद्गीतेतला रोमहर्षक प्रसंग आणि तेच ते तत्त्वज्ञान पार उफराट्या रीतीने इथे वापरले आहे. वस्तूची छाया असते तशी. त्या दृष्टीने पाहिले तर कृष्णार्जुनाची भुतासारखी सावलीच वाटतो सेनानी

अश्वत्थामा या प्रसंगात. तसे न वाटते तरच आश्चर्य होते. क्रांतदर्शी व्यासाची प्रतिभा व प्रज्ञा वास्तवाच्या दर्शनाच्या मिषाने, खऱ्याखुऱ्या व्यक्तीच्या आधाराने अज्ञेयाचे चित्रण करू धजते. आकृती वास्तवाची पण रंग अवास्तवाचे. शब्द व दृश्ये परिचित. भयानकाची अगाऊ सूचनाही आलेलीच असते. दुर्योधनाचे मरण म्हणजे वास्तविक एका बाजूचा सर्वनाश. तिथेच युद्ध थांबायला हवे. पण नाही. दुर्योधनाचा प्राण एकदम गेला नाही. किती तरी वेळ, दोनचार दिवस तो तगून होता. हा काळ हा या प्रसंगात नाट्यमय ताण उत्पन्न करणारा काळ आहे. या ताणाचा वेध अश्वत्थाम्याच्या विलक्षण गतीत व प्रचंड शक्तीने भारावलेल्या कृतीत आहे. पण ही गती व कृती कोणत्याही जयिष्णू प्रेरणेने भरलेली नाही. तिचे स्वरूप संपूर्णपणे अभावात्मक आहे. विनाशाचा वेग तिच्यात आहे. मृत्यूतला व जीवनातला प्रत्येक विकट आविष्कारच तिच्यात भरलेला आहे. अश्वत्थाम्याला पराभवाने चेतवले. अहंकाराने नव्हे. त्याचा द्वेष प्रचंड मृत्युमय आंधळ्या शक्तीशी जोडला गेला. स्वतःचा बचाव त्याला करायचा नव्हता. त्याला मालकाचे राज्य राखायचे नव्हते. त्याला फक्त सूड घ्यायचा होता. धृष्टद्युम्नाचा आणि पांडवांचा. आणि या उन्मनस्क स्थितीत त्याने शब्द उच्चारले. ते देहाच्या नश्वरतेचे आणि आत्म्याच्या अमरत्वाचे. हे रणांगणोचित तत्त्वज्ञान कृष्णाने युद्धाच्या सुरुवातीला, आपल्या लोकांशी आपण युद्ध कसे करावे, या संभ्रमात पडलेल्या हाडामांसाच्या अर्जुनाला सांगणे वेगळे आणि पिशाच मनोवृत्ती बनलेल्या अश्वत्थाम्याने कृप वगैरे अर्धमेल्या झालेल्या मूढ लोकांना युद्धाच्या अखेरीस सांगणे वेगळे. दैवाधीन असलेल्या माणसाची लीन मूढताही यात नाही. तत्त्वज्ञानाला आवश्यक अशी कोणतीच उभारी यात नाही. चौकट केवळ स्वामिभक्तीची.

पण या तत्त्वज्ञानाच्या आविष्काराहूनही अधिक चमत्कार पुढेच आहे. स्वतः पिशाचवत् बनलेल्या अश्वत्थाम्याला भुताच्याच दर्शनाने उलटसुलट हादरे बसतात. या हादऱ्यांचा प्रारंभ देखील फार भयाण असून त्याला प्रतीकही फार समर्पक योजले आहे व्यासाने. अश्वत्थाम्याचा पराभव पांडवांकडून झाल्यावर त्याला रात्री कावळ्यांच्या अंड्यांचा, पिलांचा नाश करणारे घुबड झाडावर दिसते, त्यावरून त्याला धृष्टद्युम्न व द्रौपदीचे मुलगे यांना

झोपलेले असताना मारावे ही कल्पना सुचते. अधू कल्पनेच्या माणसाला कल्पना सुचली तर ती त्याला पूर्णपणे ग्रासते. अश्वत्थामाही कृपाने निषेध केला तरी आपले म्हणणे सोडीना. आणि ती इच्छा इतकी बलवत्तर झाली की शेवटी कृपही तिच्या आहारी गेला.

अश्वत्थाम्याला धृष्टद्युम्नाच्या शिबिराच्या तोंडाशी भूत दिसले. आकाळ-विकाळ, तेजस्वी आणि भव्य. भुताचा भास न होणेच कठीण. ज्या मनःस्थितीत अश्वत्थामा होता त्या स्थितीत अश्वत्थाम्याच्या घुम्या स्वभावाचे उलटे प्रतीकच ते होते. हे भूत बोलणारे नव्हते. अश्वत्थाम्याप्रमाणेच ते भूत क्रियाशील मात्र होते. क्रियाशील या अर्थाने की अश्वत्थाम्याने शस्त्रे टाकली की ती ते गडप करी. अश्वत्थाम्यावर उलट प्रहार त्याने केला नाही. भूत पाहून अश्वत्थामा घाबरला नाही किंवा आश्चर्यचकितही झाला नाही. कोणतीही भयंकर गोष्ट पाहून घाबरण्याच्या स्थितीपलीकडे तो केव्हाच गेला होता. जोपर्यंत त्याचे शरीर सुदृढ होते तोपर्यंत अश्वत्थामा भीतीपासून मुक्त होता.

भुताने सारी आयुधे गडप केली. तेव्हा अश्वत्थाम्याने शिवाची आराधाना केली. शिव प्रकट झाला आणि त्याने अश्वत्थाम्याला सांगितले की, "कृष्ण मला प्रिय असल्याने त्याचा आवर करण्यासाठी मी धृष्टद्युम्न, द्रौपदीचे मुलगे व पांचाळ यांना काही काळ संरक्षण दिले. पण वास्तविक ते काळाच्या जबड्यात सापडलेले आहेत. त्यांचा मृत्यू अटळ आहे. हा मृत्यू घडून यावा म्हणून मी तुला मृत्युंजय असे शस्त्र देतो." विराट स्वरूपात कृष्णाच्या कराल दाढात सापडलेल्या योद्ध्यांच्या दर्शनाची व उक्तीची ही फिकट आवृत्ती आहे. मात्र हे दर्शन अश्वत्थाम्याला आश्वासक असले तरी विश्वरूपदर्शनाप्रमाणे प्रेरक नाही. युद्धातले संहाराचे अखेरचे माप पूर्ण करण्याच्या दृष्टीने ते घडून आले. घडून आले ते भक्त व ईश्वर यांच्या नैसर्गिक उमाळ्यामुळे नव्हे. अश्वत्थाम्याच्या उग्र आत्माहुतीच्या निश्चयाच्या आव्हानातून ते निघाले. ईश्वर करुणेने भक्ताकडे वळला नाही, तर दैवाने मृत्यू जिथे घडवला तिथे त्याला फार काळ थोपवून धरण्यात अर्थ नाही, या दैववादी चिंतनातून हे घटित निर्माण झाले आहे. या दर्शनात व शस्त्रदानात अश्वत्थाम्याला वांछित वस्तू व शक्ती मिळाली.

मोल देऊन वस्तू घ्यावी तशी, पण त्याला करुणा, शुद्धी, मुक्ती, शांती यांपैकी काही काही मिळाले नाही. त्याचे मन शत्रूंना मारल्यावर सुद्धा वैराने भरलेलेच राहिले. धृष्टद्युम्नाला मारताना त्याने झोपेत असताना पायाला स्पर्श करून त्याला जागे केले. त्याला सावरायलाही अवसर दिला नाही. इतकेच नव्हे तर त्याने त्याला शस्त्राने मारण्याचे नाकारले. वीरोचित मृत्यू त्याला येऊ नये म्हणून त्याने त्याला पशूसारखे मारले. पायांनी तुडवून मारले. तो स्वतःही त्या वेळी पशूच बनला.

दुर्योधनाला त्याने आपण पांडवांकडील या वीरांचा निःपात कसा केला ते सांगितले. पांडवांकडचे सात व कौरवांकडचे तीन योद्धे बाकी राहिले. युद्धाची ही समाप्ती दुर्योधनाने ऐकली. अश्वत्थाम्याने सूड घेतला हेच त्याचे व अश्वत्थाम्याचे समाधानाचे एक स्थान.

शिवदर्शनाच्या वरात व्यासाने पुढचे अशुभ भवितव्यच जणू सूचित केले आहे. इथेही कृष्णाकडून अश्वत्थाम्याला अधर्माचा बोल लावून त्याच्या मस्तकातला मणी त्याने कापून काढून घेतला. अश्वत्थाम्याने पांडवसंहारासाठी ब्रह्मशिर अस्त्राचा वापर केला. द्रोणाने हे अस्त्र कधी वापरू नको असे सांगितले असतानासुद्धा वापरले. इथेच अश्वत्थाम्याचे पित्याशी असलेले नाते तुटते. पतंग गहाळ झालेल्या दोरीप्रमाणे अश्वत्थाम्याची स्थिती होते. सूडाचे पिशाच त्याला अनावर होते. पांडव नाहीत तर उत्तरेच्या गर्भाचा बळी घेऊन तो ते अस्त्र कृष्णाच्या सांगण्याप्रमाणे आवरतो. मणी गेला. ज्या मण्यामुळे भूक, तहान, भयभीती सारे जाते. तो मणी द्रौपदी मागते व कृष्ण तिला देतो. या मण्याच्या उल्लेखाने एक लहान विसंगती व्यासाने निर्माण केली आहे. अश्वत्थाम्याजवळ हा मणी जन्मतः होता. मग लहानपणी दूध हवे हा भुकेचा आक्रोश कसा ? मण्याबाबतचे काहीतरी घटित हरवले आहे. पुसून टाकले गेले आहे. मणी गेला ( आणि ही विसंगती सोडली तर ) अश्वत्थाम्याची बाळपणाची क्षुधा परतली. आता तो पूर्णपणे भूक-तहानेच्या आहारी गेला. लाचार झाला. दुबळा झाला. आणि कळस म्हणजे व्यासानेच मणिदानाची आज्ञा त्याला केली. व्यास स्वामी. त्याची आज्ञा तो कशी मोडणार ? स्वामिभक्तीचेच वलय काय ते त्याच्याभोवती उलट्या सुलट्या प्रकाराने फिरत राहिले. उत्तरेच्या गर्भाचा नाश हा लहानात

लहान नाश करून अस्त्र परत येईल असे अश्वत्थाम्याने म्हटले व त्याप्रमाणे घडले. आणि जरी उत्तरेचे मूल कृष्णाने जिवंत केले तरी त्या अस्त्राच्या वापराबद्दल सजा म्हणून त्याने अश्वत्थाम्याला रक्तपितीचा शाप दिला. अश्वत्थाम्याने शस्त्रे टाकली. जखमी व अती दीन होऊन तोंड झाकून तो रडत रडत रानाकडे पळून गेला आणि दिसेनासा झाला.

कृष्णाने सांगितले त्याप्रमाणे अजून शापित अश्वत्थामा पृथ्वीवर भटकतोच आहे. सात चिरंजीवांपैकी अभागी चिरंजीवित्व याच्याच वाट्याला आले. बळी देवानेच पाताळात गाडले तरी तो पुण्यात्मा होता. अजून दिवाळीच्या वेळी बळी घरोघरी धान्याधुन्याची लयलूट करीत अदृश्य रूपाने हिंडतो असे म्हणतात. मारुती चिरंजीव. तो विविध रूपांनी भक्तांना पावतो. बाळंतिणींची सुटका करतो. स्मशानात प्रेताची राखण करतो. चेटक्यांचा नाच तिथे अवसेपूर्णिमेला पाहतो. मांत्रिकांना सिद्धी देतो. नाना तऱ्हा करतो. इतर चिरंजीव माणसांच्या जीवनात लुडबूड करीत नाहीत. पण अश्वत्थामा मात्र दुनियेतल्या हरएक माणसाच्या दुःखदैन्याची मूर्तिमंत निशाणीच झाली आहे. एकटा, परित्यक्त दीन, याचक असा हा महारोगी खेडोपाडी भटकतो. डोकीतली जखम म्हणे दाखवतो आणि तेल व चिंध्या मागीत हिंडतो. भयंकर दहशत आहे त्याची अजून लोकांना. तेल न देईल त्याला तो शापतो. महारोगी जगाला कसलेच वरदान देऊ शकत नाही. हे भयंकर व्यवहारी सत्य अश्वत्थामा चिरंजीव आहे या समजुतीच्या रूपाने भारतात घरोघरी शेकडो वर्षे फिरते आहे.

रोग भोगताना व्यथेच्या पोटात दडलेले एक नाजूक सत्य असते. परम नम्रतेचे सत्य आर्तांच्या भक्तिभावात कृष्णाने उल्लेखिलेले आहे. आर्तांचे निमूट सोशिकपण विशिष्ट सौंदर्याने भरलेले असते. हे सौंदर्य आकलन झाले म्हणून का अश्वत्थामा मृत्यूच्या वराची अपेक्षा करीत नाही ? त्याला मृत्यूचे वरदान न देण्यात व्यासाने शेवटचा एक कलात्मक गूढ पेच निर्माण केला आहे. मृत्यू नाही, धन्यता नाही, शांती नाही. वैर नाही, सूड नाही. आहे ती फक्त रखरखच. शारीरिक वेदनांची अपार जाणीव. या न मिटणाऱ्या वेदनेत, कुणाची साथ-सोबत नसलेल्या जीवनयात्रेत, अती हीन अवस्थेत देखील मृत्यूच्या भव्यतेला आपल्याहून लहान करण्याची शक्ती आहे हे

त्याला सुचवायचे आहे का? सूक्ष्म व भव्य दोन्ही टाळूनही असल्या रणरणत्या अवस्थेच्या कायमपणातही तोंडदेखल्या दयेला दूर ठेवणारे काहीतरी विलक्षण व आकर्षक आहे यात संशय नाही. पण तें इतके विलक्षण आहे, आणि इतके जरबेने भरलेले आहे की त्याला नाव देणे शक्य नाही. फक्त कधीकधी त्याचा किंचित प्रत्यय मात्र, जिथे अती दुरवस्था आणि दैन्य आहे तिथे होतो. तोच अश्वत्थाम्याच्या चिरंजीव व्यथेचा व व्यक्तिमत्त्वाचा साक्षात्कार. मोकळ्या आकाशाखाली धरणीवर संचार करीत असतादेखील अनुभवांचे हाताशी असलेले विश्व बुद्ध्याच बाजूला लोटून अश्वत्थामा चारी क्षितिजे जवळ ओढतो. स्वतःला कोंडून घेतो. कोंडून घेण्याची, गुदमरण्याची त्याची ही सवय सुटत नाही. बापाचे नाते तुटले. स्वामीची स्मृतीही संपली आणि या अखंड कोंडलेल्या मनोमय जगात अक्षय संचार करण्याचा निर्धार मात्र प्राक्तनाच्या रूपाने स्वीकारून अश्वत्थामा फिरतो आहे. कोणताही संदेश त्याला द्यायचा नाही. अमरत्वाला अंकुर नसतात. त्यात स्रष्टेपणा नसतो हे त्याला दाखवायचे आहे काय?

◎ ◎ ◎

दुर्गा भागवत

# चिर - दाह

माझ्या खिडकीच्या बाहेर तीन निंबाची झाडे आहेत. एकमेकांना स्पर्श करीत, एकमेकांच्या आधाराने उभी आहेत. आणि त्यांच्या मागचे बुचाचे झाडही त्यांच्याशी सलगी करीत, पण तरीही आपले उंच माथे तसेच ताठ ठेवून उभे आहे. निंबाच्या झाडांना फुलोरा भरगच्चपणे भरला होता, तेव्हा हे झाड एखाद्या पोक्त शेजारणीप्रमाणे अधूनमधून आपल्या डहाळ्या त्यांच्यापर्यंत पोचवून, नवशिक्या लेकुरवाळयांना द्यावा तसा सल्ला अधूनमधून देत होते. उन्हाळयाच्या झळात क्षणोक्षणी तरळून येणाऱ्या त्यांच्या सुगंधाला आपल्याभोवती लपेटून घेत होते. आणि एकाएकी चैत्री मळभ आले. निंबाचा फुलोरा गळतीला लागला. कढत वाऱ्यावर डहाळ्या फडफडू लागल्या. आणि आज तर एकाएकी वावटळीचा सपकारा या झाडांवर बसला. धुळीच्या लोटात, वाऱ्याच्या झोतात ही चारी झाडे एकच झाली. पसरट विचित्र बुंधा आणि निमुळते, विसंगत, गर्द हिरव्या रंगाचे हडकुळे पोक्त माथे, असे हे झाड त्या वावटळीत पिंगा घालू लागले. ती खरी चार झाडे जणू नाहीशी झाली आणि वावटळीने हे नवेच झाड तयार केले. ते खरे होते आणि खोटे पण. अर्धा तास वावळटीच्या तपकिरी लोळात ते झाड घुमले. साऱ्या मेलेल्या झाडांचे आत्मे एक होऊन घुमतील तसे घुमले. ढगांना झोंबू लागले. काही मिनिटे गेली. वावटळ गर्दावली. झाडही अधिक पिसाटले. ढगे गोळा झाली होती ती पांगू लागली. पांगता पांगता पाच ढगांनी कडे केले. ते रुंदावू लागले. ते रुंदावले आणि वावटळ

थांबली. मी पाहत होते. या ढगांच्या कड्यात निळ्या आकाशाचे एक जादूचे तळे येईल म्हणून अपेक्षेने पाहत होते. पूर्वी असे ते दोनदा आले होते. असेच चैत्री वावटळीत झाडे घुमत असताना एका पिसाटलेल्या झाडाला भेटायला आले होते. आणि ते झाड न भेटल्याने जणू भरकटत जाऊन विरून नाहीसे झाले होते. झाडाच्या उंच माथ्याला जवळून स्पर्श करू पाहणारे ते आकाशातले निळे तळे. ते तर मेल्या झाडाला भेटायला आले होते. ढगातला निळा प्राण गोळा होऊन सैरभैर पृथ्वीवरच्या हिरव्या मित्राला शोधीत होता. पण मित्र कुठे होता ? इथली ही झाडे तर जिवंत झाडे. त्यांच्या शोधात कशाला तो निळा प्राण येईल ?

पण माझे मन झाडांचा हा दंगा पाहिल्यावर आणि ढगांची गर्दी पाहिल्यावर ह्या निळ्या जलवंतीची अपेक्षा करू लागले. तिची अपेक्षा म्हणजे फिरून ते कोरडे जळणे आले. न संपता सारखे जळणे आले. तिनेच हा दाह निर्माण केला. ती आकाशात तरंगत होती. साऱ्या करड्या-कबऱ्या दुधाळ आकाशात तेवढीच बचकभर जागा निळ्या पाणीदार तेजाने भरून गेली होती. आणि त्याच त्या शून्य झालेल्या जागेवर ती थबकली. पिशाच्च ठराविक जागेचा, ठराविक माणसाचा कानोसा घेते म्हणतात; तसाच तिने घेतला. आणि तो न दिसल्याने तिने देहाची ती निळी लटकी छाया ताबडतोब सोडून दिली. पसरत, विकट हास्य करीत, काळेबेरे ओबडधोबड अजस्र रूप धारण करून तीही इतर ढगात मिसळली. आकाश फिरून निर्विकार झाले.

आकाश निर्विकार झाले. स्मशानासारखे निर्विकार झाले. आणि माझे डोळे जमिनीवरच्या त्या रित्या जागेवर खिळले. पाय तिथून हालेनात. दोन विदेही प्राणांचा तो पैशाचिक पातळीवरून चाललेला एकमेकांचा पाठलाग पाहून त्या थडग्यासारख्या पसरट पण बुझवलेल्या खळग्याशी मी सुन्न होऊन उभी राहिले. बाकीची जमीन फरसबंदीची होती. आणि इथेही आता विटावाळूचा ढीग पडला होता. भिंत आणि विद्यालयाच्या बोळातली ती अरुंद जागा लवकरच स्वच्छ आणि बांधीव होणार होती. माती पायाला येता-जाता लागणार नव्हती. पाचोळा पडणार नव्हता. पक्षी शिटणार नव्हते. कावळे तिथे बसून कर्कशपणे ओरडून विद्यालयाचे शांत

वातावरण बिघडवणार नव्हते. चिमण्या कलकलणार नव्हत्या. पूर्वेच्या बाजूने कोंडलेला प्रकाश मोकळा झाला होता. झाडांचे अजस्र धूड साफ गेल्यामुळे खोलीतले अर्धउजेडाचे वातावरण चांगलेच उजळले होते. वाऱ्याच्या झुळुका अडत नव्हत्या. बाजूच्या घराच्या शुभ्र भिंती विद्यालयाच्या भिंतींशी आता सुखाने संवाद करू शकत होत्या. विद्यार्थी जात-येत होते. अध्यापक जात-येत होते. कुणालाच काही बदल झाल्याचे वाटत नव्हते. अवघ्या पंधरा दिवसांत सारे पालटले. एवढे मोठे आणि दुर्मिळ असे कदंबाचे झाड गेले. पानाफुलांनी डवरणारे. पण कुणाला काही जाणवले नाही. शहराची खुलावट साधायची तर झाडापाल्याची प्रतिष्ठा काय ? ती अडगळ करायची तरी काय ? मी मात्र वेड्यासारखी किती दिवस तरफडत होते. पंधरा दिवसांपूर्वी असेच ते जादूचे तळे आकाशात जमून खाली तोंड करून वाकत होते. पावसाचे ते पहिले चिन्ह पाहून मला वाटले, माझा कदंब आता लवकरच वर्षेच्या मिठीत फुलेल. केशरी गेंदांनी भरेल. पहिल्या मेघमालेच्या ओष्ठस्पर्शाने पुलकित झालेला असेल. पण तरातरा येऊन पाहते तो काय ? इमारतीच्याही वर वीस हात उंच गेलेला तो गगनस्पर्शी भव्य वृक्ष तिथे नव्हता. होते नुसते चार हात उंचीचे जखमी खोड. माझे मन मुकेपणीच हंबरू लागले. चार महिनेच माझी आणि या झाडाची ओळख झालेली. पण जिव्हाळा वाढीला लागला होता. किती वर्षे मी या विद्यालयात शिकले. कितीदा हे झाड पाहिले असेल. पण अनोळखी माणसाप्रमाणे अनोळखी झाडही कितीदा पाहिले तरी विसरायला होते. त्यात हे झाड बोळीत वाढलेले. त्याचा शेंडा इमारतीच्या वर जाऊन विस्तारला होता. पण कोण बघते इतकी मान उंचावून ? कोण उठाठेव करणार एवढ्या राठ आणि ताठ झाडाची ? सलगी करायला तो का बागेतला गुलाब होता की बटमोगरा ? जे फूल डोकीत माळता येणार नाही, ज्याच्या सुगंधाचा लेप केसांना लागणार नाही, त्याची विचारपूस कुठली विशीतली तरुणी करील ?

आणि आता किती वर्षांनी तरी मला झाडांची सोबत हवीहवीशी वाटू लागली होती. काश्मीरातले चिनारचे झाड पाहायचे होते. हिमालयातला देवदार पाहायचा होता. आणि रानावनात हिंडूनही दृष्टीस न पडलेला

किंवा दिसूनही ओळख न आलेला कदंब. एकदा प्रवरेच्या काठी कुणी तरी एक बरीचशी पाने गळलेले, आठदहा फूट उंचीचे रोडकेहाडके झाड दाखवले आणि म्हटले, "हे कदंबाचं झाड."...हे कदंबाचे झाड ? ना याला भरघोस पाने ना फुले. किती खुरटे, उदास आहे हे ! याच कदंबात का कृष्णाचा चेंडू अडकला आणि तो राहीला मिळाला ? याच कदंबाखाली का गायी आणि गोपी सुखावल्या ? याच कदंबाखाली उभे राहून का कृष्णाने मुरली वाजवली ? याच कदंबाच्या झाडाखाली का यमुनेचे पाणी झुळझुळ वाहत होते ? हाच का मराठ्यांचा कुलपालक वृक्ष ? याचे लाकूड तोडायचे नाही. फुले खुडायची नाहीत. पाने तोडायची नाहीत. मात्र लग्नात वाजतगाजत जाऊन, हळद चर्चून, गाणी म्हणत म्हणत याची फांदी आणून तिचे देवक बसवायचे. हे सारे संस्कृतीचे ललितरम्य आविष्कार, स्वप्नसुंदर काव्य ज्याच्या भोवती शतकानुशतके प्रांतोप्रांती तरळले तोच का हा रडका नि रोडका वृक्ष ? छे ! असे कसे असेल ? कालिदास का वेडा होता, याचे नि वर्षेचे एकत्र वर्णन करायला ? उगीच का संस्कृत कवींनी प्रेयसीच्या प्रियकर-दर्शनाने पुलकित झालेल्या किंचित आरक्त बालांची उपमा याच्या गोंडेबाज फुलांना दिली ? मी फिरून निरखून पाहिले. असेल हा कदंब—पण मग याचा गौरव म्हणजे संस्कृतिपूजकांचे एक वेडच असेल. उरल्यासुरल्या पानांकडे पाहिले; पण त्यांचा आकार इतका आकृतिशून्य, कुबड्याच्या छातीसारखा आत ओढलेला, की या झाडाचे कुठलेच वैशिष्ट्य मला स्मृतीत धारण करता येईना. मुकाट्याने मी पुढे चालू लागले. कदंबाच्या शोधाचे आणि दर्शनाचे पहिले वेडे स्वप्न भंगले.

पण जे भंगले भंगले म्हणून वाटत होते ते अचानक आपण होऊन दोन्ही हात पसरून एक दिवस सामोरे आले. एक विख्यात विद्वान मला कदंबाबद्दल बोलताना एकदा म्हणाले होते की, 'कदंबाचं झाड महाराष्ट्रात आहे कुठे, तर तुम्ही पाहाल ?' आणि ते रोड, एकाकी असे प्रवराकाठचे झाड पाहून मीही तसेच मानू लागून कदंबाचा विषय मनातून काढून टाकला होता. पण एक दिवस एक मित्र म्हणाले, "शिरीषाचं झाड संस्कृत काव्यात वर्णन केलं आहे; पण ती केवळ कविकल्पनाच असेल. कुणीच ते पाहिलेलं दिसत नाही."

मी म्हटले, "मी पाहिलं आहे ते झाड. दाखवीन तुम्हांला. समोरच

आहे इथं. फुललं कीं दाखवीन, म्हणजे लक्षात राहील. पण कदंबाचं झाड मात्र या महाराष्ट्रात तरी दिसत नाही. खरंच दुर्मिळ आहे ते."

"कसलं दुर्मिळ? आपल्या विद्यालयातच आहे की, पावसाळ्याच्या तोंडी केशरी पिवळ्या फुलांनी भरतं. मोठा छान वास येतो. मी नेहमी देवाकरिता फुलं नेतो त्याची. तुम्ही उद्या या. मी दाखवीन."

मी घरी आले ती आनंदाने झिंगूनच. आता हा कदंब आपण रोज पाहू या कसा फुलतो, कसा फळतो ते. आमच्या काव्यमय संस्कृतीत अमर झालेल्या झाडाला मी प्रथमच जवळून भेटणार होते. ही बातमी कुणाला सांगू नि कुणाला नको, असे मला होऊन गेले. मी वडिलांना म्हटले, "आपल्या कॉलेजात कदंबाचं झाड आहे म्हणे. ते मी उद्या पाहणार आहे."

ते म्हणाले, "मी कॉलेजात होतो, तेव्हापासून ते आहे. भिंतीच्या बाजूला एवढं मोठं झाड क्वचितच कुठे दिसतं. चेंडूसारखी केशरी फुलं येतात त्याला. तुला कसं माहीत नाही एवढंसुद्धा!"

खरेच, दोन पिढ्यांवर ज्याने सावली धरली ते झाड आपण अजून कसे नाही पाहिले? आमच्या दोन पिढ्यांच्या विद्यार्थीदशेचा मुका साक्षी झालेला तो वृक्ष मी कसा जाणून घेतला नाही? पण ही गेल्या पिढीची ओळख कळली आणि मग तर जणू आपण आपल्या घराण्याच्या एका जुन्या मित्राला भेटायला जातो आहो असे वाटू लागले.

दुसऱ्या दिवशी (फेब्रुवारीची चौदावी तारीख होती ती) मी घाईघाईने विद्यालयात गेले. त्या स्नेह्यांनी सज्जात उभे राहून जवळच्या फांदीला स्पर्श करीत म्हटले, "हेच ते झाड."

तो प्रचंड वृक्ष पाहून माझे मन भरून गेले. वाटोळी, पण मधोमध टोकाला किंचित निमुळती, अशी सुंदर मोठाली पाने होती त्याची. पारिजातकासारखी जरा खरबरीत. वड आणि पळस यांच्या आकाराचा मिलाफ होऊन व्हाव्या तशा आकाराची. गर्द हिरवी. अजून लहान फिकी केशरी फुले इथे लटकली होती. पण ती दूर होती. भर ओसरल्यामुळे विरळ झाली होती. वास तर लांबून येतच नव्हता झाडभर. फुले गळल्यानंतर लागलेल्या फळांच्या काळ्या गुंड्या लटकत होत्या. माझा हातही आपोआप

त्या डहाळ्यांवरून, पानांवरून फिरला. आता कुठेही स्पर्शाने मी कदंबाची पाने ओळखू शकेन. कदंबाचे झाड मी प्रत्यक्ष पाहिले. आता कधी मी ते विसरणार नाही. या आमच्या कुटुंबमित्राला मी वारंवार भेटेन. जुनी पाने गळताना पाहीन. नवी लागताना पाहीन. कळ्यांनी डवरलेले पाहीन. पक्षी घरकुले बांधताना पाहीन. याचा सारा प्रपंच पाहीन, असे विचार मी सारखी करू लागले. त्याचा छंदच लागला मला. मी नेहमी तिकडे जाऊ लागले. सकाळी, दुपारी, संध्याकाळी, केव्हाही. इतके की मी त्या रस्त्याला दिसले की माझे मित्र म्हणायचे, " कदंबाला भेटायला चालला असाल ना ? "

आणि मी त्याची पानगळती पाहिली आणि लागोलाग कोक्यातून ते फिरून कसे पालवू लागले तेही पाहिले. पक्ष्यांच्या घरट्यांची सुरुवात हेरली. या पावसाळ्यात मी वर्षा-कदंबाची फुललेली मिठी पाहणारच या अपेक्षेने मी हुरळून गेले होते. जिकडेतिकडे फुलते कदंबच मला दिसू लागले. एकदा वाचले की काशी प्रांतातल्या स्त्रिया कदंबाच्या फुलांच्या आकृतीची सोन्याची कर्णफुले घालतात म्हणून; आणि मग एक दिवस उमगले की, आमच्या मराठ्यांच्या स्त्रिया गळ्यात जो मोठा, काटेरी जाळीचा मणी घालतात त्याचा आकारही कदंबाच्या रोमांचित फुलाचाच आहे. कदंबाचेच प्रतीक ते. नुसत्या राधाकृष्णांच्या प्रेमजीवनातच नव्हे, तर साध्यासुध्या स्त्रियांच्या जीवनातदेखील या सांस्कृतिक रूपाने तो स्थिर झालेला दिसला. कदंब आता केवळ पुराणकथांना चिकटलेला वाटेना. कलाकुसरीतही तो दिसू लागला.

आणि मग जलवंतीच्या त्या जादूच्या निळ्या तळ्याचे दर्शन झाले आणि तिथेच व तेव्हा कळले की हा वडीलधारा मित्र नव्या जगात अडगळ वाटल्यामुळे खंडला गेला. आणि मग त्याचा गोतावळा कुठे दिसतो का म्हणून मी भिरीभिरी हिंडू लागले. पळसाचे झाडही चुकून कदंबाचे नाही ना, म्हणून थबकून पाहू लागले. अखेर दिसली दोन चार झाडे जंगलात. एक तर पहिल्यासारखेच भव्य. पण पहिल्याची ती शहरातल्या बोळीतहि उंच वाढून पसरण्याची जिद्द, ती ताठ उभे राहण्याची लकब याच्यात नव्हती. जंगलातल्या भव्य झाडांच्या गोतावळ्यातले ते एक झाड होते.

आहे इथं. फुललं कीं दाखवीन, म्हणजे लक्षात राहील. पण कदंबाचं झाड मात्र या महाराष्ट्रात तरी दिसत नाही. खरंच दुर्मिळ आहे ते."

"कसलं दुर्मिळ? आपल्या विद्यालयातच आहे की, पावसाळ्याच्या तोंडी केशरी पिवळ्या फुलांनी भरतं. मोठा छान वास येतो. मी नेहमी देवाकरिता फुलं नेतो त्याची. तुम्ही उद्या या. मी दाखवीन."

मी घरी आले ती आनंदाने झिंगूनच. आता हा कदंब आपण रोज पाहू या कसा फुलतो, कसा फळतो ते. आमच्या काव्यमय संस्कृतीत अमर झालेल्या झाडाला मी प्रथमच जवळून भेटणार होते. ही बातमी कुणाला सांगू नि कुणाला नको, असे मला होऊन गेले. मी वडिलांना म्हटले, "आपल्या कॉलेजात कदंबाचं झाड आहे म्हणे. ते मी उद्या पाहणार आहे."

ते म्हणाले, "मी कॉलेजात होतो, तेव्हापासून ते आहे. भिंतीच्या बाजूला एवढं मोठं झाड क्वचितच कुठे दिसतं. चेंडूसारखी केशरी फुलं येतात त्याला. तुला कसं माहीत नाही एवढंसुद्धा!"

खरेच, दोन पिढ्यांवर ज्याने सावली धरली ते झाड आपण अजून कसे नाही पाहिले? आमच्या दोन पिढ्यांच्या विद्यार्थीदशेचा मुका साक्षी झालेला तो वृक्ष मी कसा जाणून घेतला नाही? पण ही गेल्या पिढीची ओळख कळली आणि मग तर जणू आपण आपल्या घराण्याच्या एका जुन्या मित्राला भेटायला जातो आहो असे वाटू लागले.

दुसऱ्या दिवशी (फेब्रुवारीची चौदावी तारीख होती ती) मी घाईघाईने विद्यालयात गेले. त्या स्नेह्यांनी सज्जात उभे राहून जवळच्या फांदीला स्पर्श करीत म्हटले, "हेच ते झाड."

तो प्रचंड वृक्ष पाहून माझं मन भरून गेले. वाटोळी, पण मधोमध टोकाला किंचित निमुळती, अशी सुंदर मोठाली पाने होती त्याची. पारिजातकासारखी जरा खरबरीत. वड आणि पळस यांच्या आकाराचा मिलाफ होऊन व्हाव्या तशा आकाराची. गर्द हिरवी. अजून लहान फिकी केशरी फुले इथे लटकली होती. पण ती दूर होती. भर ओसरल्यामुळे विरळ झाली होती. वास तर लांबून येतच नव्हता झाडभर. फुले गळल्यानंतर लागलेल्या फळांच्या काळ्या गुंड्या लटकत होत्या. माझा हातही आपोआप

त्या डहाळ्यांवरून, पानांवरून फिरला. आता कुठेही स्पर्शाने मी कदंबाची पाने ओळखू शकेन. कदंबाचे झाड मी प्रत्यक्ष पाहिले. आता कधी मी ते विसरणार नाही. या आमच्या कुटुंबमित्राला मी वारंवार भेटेन. जुनी पाने गळताना पाहीन. नवी लागताना पाहीन. कळ्यांनी डवरलेले पाहीन. पक्षी घरकुले बांधताना पाहीन. याचा सारा प्रपंच पाहीन, असे विचार मी सारखी करू लागले. त्याचा छंदच लागला मला. मी नेहमी तिकडे जाऊ लागले. सकाळी, दुपारी, संध्याकाळी, केव्हाही. इतके की मी त्या रस्त्याला दिसले की माझे मित्र म्हणायचे, " कदंबाला भेटायला चालला असाल ना ? "

आणि मी त्याची पानगळती पाहिली आणि लागोलाग कोंक्यातून ते फिरून कसे पालवू लागले तेही पाहिले. पक्ष्यांच्या घरट्यांची सुरुवात हेरली. या पावसाळ्यात मी वर्षा-कदंबाची फुललेली मिठी पाहणारच या अपेक्षेने मी हुरळून गेले होते. जिकडेतिकडे फुलते कदंबच मला दिसू लागले. एकदा वाचले की काशी प्रांतातल्या स्त्रिया कदंबाच्या फुलांच्या आकृतीची सोन्याची कर्णफुले घालतात म्हणून; आणि मग एक दिवस उमगले की, आमच्या मराठ्यांच्या स्त्रिया गळ्यात जो मोठा, काटेरी जाळीचा मणी घालतात त्याचा आकारही कदंबाच्या रोमांचित फुलाचाच आहे. कदंबाचेच प्रतीक ते. नुसत्या राधाकृष्णांच्या प्रेमजीवनातच नव्हे, तर साध्यासुध्या स्त्रियांच्या जीवनातदेखील या सांस्कृतिक रूपाने तो स्थिर झालेला दिसला. कदंब आता केवळ पुराणकथांना चिकटलेला वाटेना. कलाकुसरीतही तो दिसू लागला.

आणि मग जलवंतीच्या त्या जादूच्या निळ्या तळ्याचे दर्शन झाले आणि तिथेच व तेव्हा कळले की हा वडीलधारा मित्र नव्या जगात अडगळ वाटल्यामुळे खंडला गेला. आणि मग त्याचा गोतावळा कुठे दिसतो का म्हणून मी भिरीभिरी हिंडू लागले. पळसाचे झाडही चुकून कदंबाचे नाही ना, म्हणून थबकून पाहू लागले. अखेर दिसली दोन चार झाडे जंगलात. एक तर पहिल्यासारखेच भव्य. पण पहिल्याची ती शहरातल्या बोळीतहि उंच वाढून पसरण्याची जिद्द, ती ताठ उभे राहण्याची लकब याच्यात नव्हती. जंगलातल्या भव्य झाडांच्या गोतावळ्यातले ते एक झाड होते.

मागच्या टेकाडांमुळे ठेंगणे झालेले. शांत आणि विनम्र वृत्तीचे. पहिल्याचा आकाशातच निव्या तळ्यालाही तहानेले करणारा आकर्षक उद्दामपणा त्याच्यात नव्हता. तरी ते झाड आता मला जवळचे वाटले. आपल्या त्या भव्य, एकाकी आणि ताठर सोयऱ्याच्या सुतकात गढलेले दिसू लागले. महाराष्ट्राच्या फुलत्या कदंबकुलाचा एकमेव साक्षी वाटू लागले. पण ते पाहतानाही कुठे तरी आकाशात कुऱ्हाडीचे पाते लखलखून गेल्यासारखे वाटले. त्याच्या हिरव्या पानात एक ठिणगी वळवळू लागली. ती आशेची की अशाच अकस्मात मरणाची ? पण मी अजूनही कदंब पावसाळ्यात दारोदारी फुललेला पाहिला नाही. कधी पाहीन कुणास ठाऊक ? आणि पाहिला तरी पहिल्याच्या खंडनाने झालेला चिरदाह कसा शमेल ?

◎ ◎ ◎

अनंत आत्माराम काणेकर

# जगाशी संबंध

अलीकडे अलीकडे मला जिरवणे, हा गणूकाकांचा व्यवसाय झाला आहे. मी जिरलो आणि माझा चेहरा गोरामोरा झाला म्हणजे गणूकाकांना अपरंपार आनंद होतो! काल असेच झाले. गणूकाकांबरोबर मी बोलत बसलो होतो. मी अगदी बोलण्याच्या रंगात आलो होतो, "... मानवजातीच्या हिताकरिता सध्याची विषम समाजपद्धती आमूलाग्र बदललीच पाहिजे..." मी एखाद्या पुढाऱ्यासारखा किंवा दारुड्यासारखा बोलत होतो.

"काय रे, ही तुझी मानवजात कुठे असते रे?" काकांनी शांतपणे धोतऱ्याच्या सोग्याने चष्म्याची भिंगे पुशीत मला विचारले, "आपण काही पाहिली नाही कुठे! ब्राह्मणजात, परभूजात, साळीजात, माळीजात आपल्याला माहीत आहे. पण ही काही नवीनच जात दिसते आहे!"

झाले, मी जिरलो. काकांना आनंद झाला.

मला जिरवण्याकरिता वरील शब्द उच्चारताना मला जिरवणे हा काकांचा उद्देश होताच; पण थट्टेने बोलताना का होईना, काकांच्या त्या शब्दांच्या मागे एक विशिष्ट मनोवृत्ती होती, यात शंका नाही. ती मनोवृत्ती म्हणजे, जगाशी करायचे काय आहे आपणाला? आपण बरे, आपले घर बरे; साऱ्या जगाच्या आणि अखिल मानवजातीच्या उठाठेवी हव्यात कशाला?

एका दृष्टीने काकांचे हे म्हणणे अगदीच चूक आहे, असे मला वाटत नाही. उठल्यासुटल्या प्रत्येक मनुष्य कोणतीही लहानसहान गोष्ट करताना त्या गोष्टीचे साऱ्या जगावर आणि अखिल मानवजातीवर काय परिणाम होतील,

याचा जर विचार करू लागला, तर त्याच्या हातून काहीच होणार नाही. व्यापक दृष्टीचा तो अव्यवहार्य अतिरेक होईल. अहिंसातत्त्वाचा फाजील अतिरेक करून स्वतःला हास्यास्पद करून घेणारे काही जैन साधू ज्याप्रमाणे श्वासोच्छ्वासाबरोबर नाकात जीवजंतू शिरून हिंसा होऊ नये म्हणून नाकावर एक फडके बांधून फिरतात, किंवा खाली बसताना आपल्या अंगाखाली एखादा जीव चिरडू नये, म्हणून भुई झाडण्याकरिता एक लहानशी झाडू काखेत सैदव लटकवितात, त्याप्रमाणेच प्रत्येक माणसाला वागावे लागेल!

—जगाच्या आणि मानवजातीच्या कुणी गप्पा मारू लागला, की पूर्वी मीही त्याला काकांच्यासारखाच जिरवीत असे. पण असे करताना एकदा मात्र मी चांगलाच जिरलो. अर्थशास्त्राच्या एका सुप्रसिद्ध प्रोफेसरांबरोबर एकदा मी चहा पीत बसलो होतो. बोलता बोलता प्रोफेसरसाहेब एकदा अगदी रंगात येऊन मी जसा काकांना साऱ्या जगाच्या गोष्टी सुनावीत होतो, त्याप्रमाणेच सारी मानवजात अलीकडे किती परस्परावलंबी झाली आहे, प्रत्येक बारीकसारीक प्रश्नाचा विचार करताना सर्व मानवजातीचे हितसंबंध आपण कसे डोळ्यांपुढे ठेवले पाहिजेत, वगैरे वगैरे विषयांवर माझ्यापुढे व्याख्यान झोडण्याच्या बेतात आले होते. त्यांना जिरवण्याकरिता हातातला चहाचा कप पुढे करून मी मिस्किलपणे म्हणालो,

" काय हो, या कपातला चहा पिताना सबंध मानवजातीचे हितसंबंध कसे काय डोळ्यांपुढे आणायचे ? "

माझ्या प्रश्नाने जिरून जाण्याऐवजी प्रोफेसरसाहेब मला शांतपणे उत्तर देऊ लागले, " चहा पिऊन टाकून तो कप उलटा करून पाहा. कुठे बनवला आहे तो ? "

मी कप उलटा करून पाहिला. कपावर कोरलेली पुढील अक्षरे मी वाचून दाखविली, " मेड् इन् झेकोस्लोव्हाकिया. "

" बरं, " ते पुढे बोलू लागले, " कप झेकोस्लोव्हाकियाचा झाला, चहातील साखर जावा किंवा मॉरिशस बेटातली, मी दार्जिलिंग चहा वापरतो तेव्हा चहाची पावडर दार्जिलिंगची. तो दुधाचा ' जग् ' आहे. तो मेड्

इन् चायना–चीन मधला. काय– एक कप चहा पिताना जगाच्या किती भागांशी तुझा संबंध आला?"

मी थंडच झालो, प्रोफेसरसाहेबांना जिरवायला गेलो, आणि मीच पुरा जिरलो!

त्या दिवसाचे संभाषण मी कधीच विसरणार नाही. व्यवहारापुरती मनुष्याने कितीही संकुचित दृष्टी ठेवली, तरी जगाचा आणि आपला किती जिव्हाळ्याचा संबंध आहे, ही गोष्ट त्याने विसरून जाता कामा नये. कळत अगर नकळत आपण जगाशी संबंध ठेवतो. कळत अगर नकळत आपणांला जग हवे आहे.

काकांनी मला त्या दिवशी जिरवले, ही गोष्ट माझ्या मनात सारखी डाचत होती. दोन–तीन दिवसांनी काकांना जिरवायचा निश्चय करून मी काकांच्या घरी गेलो. अगाऊ सूचना न देता शत्रूवर हल्ला करावयाचे मी ठरविले होते. काकांना कल्पनाही नव्हती मी कशाकरिता आलो आहे त्याची. ते बिचारे ती गोष्ट विसरून गेले होते. बोलता बोलता काकांना पकडण्याचा मी प्रयत्न करू लागलो.

"का हो काका, हजार जातींची आणि हजार प्रकारची माणसं या चाळीत आहेत. तुम्ही ही जागा सोडून तिकडे माहीमच्या बाजूला एकान्त जागी एवढ्याच भाड्यात लहान घरं मिळतात तिकडे राहायला का जात नाही?"

काका खुषीत येऊन मला सांगू लागले, "नको रे बाबा तिकडे, आपणाला माणसांचा गजबजाट हवा आवतीभोवती. आपल्याला नाही एकलकोंडेपणा परवडत."

"अस्सं!" मी विजयोत्साहाने बोलू लागलो, "जगाशी आणि मानवजातीशी मला काय करायचं आहे म्हणून मला सांगत होता नाही त्या दिवशी! पण या बऱ्यावाईट, तुसड्या, मनमिळाऊ माणसांचा गजबजाट हवाच आहे तुम्हांला आवतीभोवती! मी तरी काय सांगत होतो, की सारा मानवी समाज –"

मी एकदम आटोपते घेतले. काका जिरले होते. पण मी आणखी लांब जीभ सोडली असती, तर काका तसे कमी नव्हते. ते पुन्हा जिरवायचे!

◎ ◎ ◎

अनंत आत्माराम काणेकर

# गणूकाका

माझ्या अनेक लघुनिबंधांतून वावरणारे 'गणूकाका' खरोखरच अस्तित्वात आहेत, की ते एक काल्पनिक व्यक्ती आहेत, की माझ्या परिचयातल्या दोनतीन व्यक्तींच्या स्वभावविशेषांचे मिश्रण करून मी एक स्वभावचित्र निर्माण केले आहे असा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. पहिल्यांदाच हे स्पष्ट सांगून टाकले पाहिजे की कोणत्याही एका खऱ्या व्यक्तीचे हे चित्र नाही. माझ्या गणूकाकांवर बेहद्द खूष झालेल्या एका शाळेतल्या मुलाने काही वर्षांपूर्वी मला एक पत्र लिहिले होते—'तुमचे गणूकाका पाहण्याची मला फार इच्छा आहे. तरी ते कुठं आणि केव्हा भेटतील ते कळवावे.' त्या बिचाऱ्याची मला निराशा करावी लागली. नात्याचे किंवा मानलेले असे कुणीही काका मला नाहीत. मात्र गणूकाकांच्या स्वभावातले काही विशेष असलेल्या तीनचार व्यक्ती लहानपणापासून माझ्या चांगल्या माहितीच्या आहेत. त्यांच्यामध्ये जुन्याचा अतोनात अभिमान असलेल्या एकदोन व्यक्ती आहेत, पण त्यांना वाद घालण्याची आवड नाही. एका व्यक्तीला वितंडवाद घालण्याची हौस आहे. स्वतःच्या मतांचा अभिमान, वितंडवाद करण्याची हौस असूनही, मतापेक्षा माणुसकीला अधिक किंमत देणारी अशीही एक व्यक्ती मला माहीत आहे. ज्यांची मते मला कधीच पटणे शक्य नाही, पण ज्यांचा स्वभाव मला अतिशय आवडतो, अशा तीनचार व्यक्तींच्या स्वभावविशेषांच्या मिश्रणातून गणूकाका निर्माण झाले आहेत.

मात्र याचा अर्थ असा कुणी समजू नये की, लघुनिबंध लिहावयाला सुरुवात करण्यापूर्वीच अशी एक व्यक्ती निर्माण करायची असे मी ठरवले. तिच्या स्वभावविशेषांची, तिच्या रंगरूपाची टाचणे करून तिची रूपरेषा तयार केली आणि मग लघुनिबंध लिहायला बसलो. असे मुळीच झाले नाही. एखादा लघुनिबंध लिहिताना जुन्या मतांचे नुसते रुक्ष वर्णन करून ती खोडून काढण्यापेक्षा एखाद्या जुन्याच्या अभिमानी माणसाच्या तोंडी ती घालावी आणि मग ती उत्तरे देऊन खोडावी, असे मला वाटले असेल, आणि गणूकाकांना निबंधात आणून ती मते मी मांडली असतील. असेल, असतील असे मी म्हणतो. कारण खरोखरच, कुठल्या निबंधात आणि केव्हा गणूकाका पहिल्यांदा अवतीर्ण झाले ते मला आता आठवत नाही. एकदा आल्यावर मात्र मला ते अतिशय आवडू लागले आणि मग निबंध लिहिताना त्यांच्याशिवाय मला चैनच पडेना. गणूकाकांमुळे निबंधात चमकदार प्रसंग आणि चुरचुरीत संवाद आले आणि निबंधातल्या तत्त्वविवेचनाचा रूक्षपणा नाहीसा झाला, एवढे मात्र खरे. 'पिकली पाने' या माझ्या पहिल्याच लघुनिबंधसंग्रहातले बरेचसे निबंध चौदापंधरा वर्षांपूर्वी मी लिहिले, तेव्हा आताच्यापेक्षा प्रत्येक बाबतीत माझी मते हिरवट पण भडक आणि ठाम होती. आपल्याइतकीच भडक आणि ठाम मते असलेला प्रतिपक्षी असला की दोघांची चांगलीच जुपते आणि पाहणारांची करमणूक होते. दोन्ही बाजूंना भरपूर खेळाडूपणा असला की खेळणारांना आणि पाहणारांनाही खूप मजा वाटते. गणूकाकांच्या रूपाने मला असा छानदार प्रतिपक्षी मिळाला आणि वय, मते, सवयी, कपडे सर्व काही दोघांची दोन टोकांना असून आमची चांगलीच गट्टी जमली.

गणूकाकांची आणि माझी इतकी गट्टी झाली की, अनेक निबंधांत मला विचारल्याशिवाय गणूकाका बेलाशक शिरू लागले. त्यांच्या आयुष्यातल्या अनेक गोष्टी आणि त्यांच्या स्वभावातल्या छटानूछटा लहानपणापासून एकत्र वाढलेल्या एखाद्या जिवाभावाच्या मित्राप्रमाणे माझ्या माहितीच्या झाल्या. माझी स्वतःची मतेसुद्धा गणूकाकांबरोबर बोलताबोलताच माझी मला अधिक स्पष्ट दिसू लागली. आपली काही मते बनलेली असतात. पण दुसऱ्याने त्यांच्यावर हल्ला केला की तो परतवताना आपणांला आपल्याच मताच्या

पुष्कळ नवीन बाजू दिसून येतात ! आपण भौतिकवादी असून वर्तमानपत्रातले भविष्य आपणांला वाचावेसे वाटते याबद्दल माझे मला कसंसं वाटे, पण गणूकाकांनी माझ्या या सवयीवर हल्ला केल्याबरोबर त्यात कसंसंच वाटायचे काही कारण नाही, हे गणूकाकांबरोबर वाद करताकरता माझ्या ध्यानात आले. ‘ आम्हा जुन्या लोकांना हसता पण तुम्ही मात्र तेच करता ’ असे म्हणून माझ्या प्रामाणिकपणाबद्दल गणूकाकांनी संशय घेतल्याबरोबर मला माझ्या त्या वागण्याच रहस्य कळले. ज्योतिष वाचून, आपण काय करायचे नाही हे ठरविणे वाईट असेल. पण गंमत म्हणून ज्योतिषात तथ्य आहे की नाही हे पाहण्यात चूक नाही. आपला ज्यावर विश्वास नाही, ते आहे तरी काय, हे समाजावूनसुद्धा घ्यायचं नाही, ही काही भौतिकवादी किंवा शास्त्रीय दृष्टी नव्हे. हा केवळ हटवाद झाला. ही गोष्ट गणूकाकांशी वाद करताना जशी मांडता आली तशी गणूकाका नसते तर मांडता आली नसती.

मतापेक्षा माणुसकीला अधिक किंमत आहे असे मला नेहमी वाटते. असे आहे म्हणूनच विविध रंगरूपे आणि चित्रविचित्र मते असलेली माणसे मिळून आपली मानवजात बनलेली असली, तरी ती अजून टिकून आहे. माझ्या-सारखीच मते असलेल्या काही लोकांपेक्षाही प्रत्येक बाबतीत माझ्या विरुद्ध असलेले गणूकाका मला कधीच विसरत नाहीत. गणूकाकांचे हे वैशिष्ट्य दाखविणारे दोन प्रसंग पुष्कळांना आठवत असतील. काकांकडून पैसे उसने घेऊन ते परत न करणाऱ्या मित्रावर ते एकदा खूप रागावले नी ‘ आता येऊ द्या त्याला पैशाशिवाय, मग पहिल्यांदा मुळी दोन कानशिलातच वाजवतो, मग पुढच्या गोष्टी ’ अशी त्यांनी माझ्यासमोर प्रतिज्ञा केली. तेवढ्यात तो मित्र आला. त्याने आपल्या बायकोच्या भयंकर आजाराचे रडगाणे काकांपुढे गाऊन दाखविले. त्याबरोबर ‘ अरे वैतागतोस काय ? काहीतरी उपाय केलाच पाहिजे, वेड्या ! ’ असे ते म्हणाले. पाच रुपयांची त्या मित्राला निकड होती. काकांजवळ त्यावेळी तेवढे पैसे नव्हते. पण तावडतोब ते माझ्याकडे वळले आणि माझ्याकडून पाच रुपये उसने घेऊन त्यांनी त्या मित्राला देऊन टाकले. ते पैसे घेऊन तो निघून गेला. मी जेव्हा त्यांना म्हटले, ‘ काका, तुम्ही त्याच्या कानशिलात वाजवणार होता ना ? ’ तेव्हा माझ्यावर उलटून ते म्हणाले, ‘ अरे बाळा, वेळवखत बघून रागावले

पाहिजे. दारावर आलेल्या माणसाला काय मारून घालवून देतात ? ' मतापेक्षा माणुसकीला अधिक किंमत आहे, मी म्हणतो ते हेच. पांडित्य, विद्वत्ता, कला ही कुठेही दिसली की मोठा माणूस आहे असे पुष्कळांना वाटते. पण हे सर्व अंगी असूनही माणुसकी नसेल तर त्याच्या मोठेपणाचा काही उपयोग नाही. यांपैकी काही जवळ नसलेल्या सामान्य बुद्धिमत्ता, सामान्य कल्पना असलेल्या सामान्य माणसात केव्हाकेव्हा असामान्य माणुसकी दिसून येते. किंबहुना, सामान्य माणसातही जितकी दिसते तितकी तथाकथित मोठ्या माणसातही ती पुष्कळ वेळा नसते. गणूकाकाही अशाच सामान्य व्यक्तींपैकी एक आहे.

संस्कृतीच्या, शिष्टाचाराच्या गोष्टी सांगणारे खूप असतात, पण त्यांच्या स्वार्थाला जरा कुठे धक्का लागला की त्यांचे सर्व शिष्टाचार नि संस्कृती ढासळून पडते. याच्या उलट गणूकाकांसारख्या साध्या, सामान्य बुद्धीच्या माणसांना हे शब्दसुद्धा माहीत नसतात, पण त्यांच्या कृतीत असामान्य सुसंस्कृतपणा आणि शिष्टाचार दिसून येतो. गणूकाकांच्या या स्वभाव-विशेषाचे एक उदाहरण सुपरिचित आहे. गणूकाकांना मी एक काचेची सुंदर फुलदाणी दिली होती. एकदा मी, काका आणि दुसरा एक गृहस्थ काकांच्या खोलीत काहीतरी गप्पा मारीत बसलो होतो. तो गृहस्थ हातवारे करीत काहीतरी सांगत होता. त्याचा चुकून त्या फुलदाणीला हात लागला आणि ती खाली पडून तिचे तुकडे तुकडे झाले. थोडाच वेळ का होईना, पण ती सुंदर फुलदाणी फोडल्याबद्दल मला त्या गृहस्थाचा राग आला. मी काही बोललो नाही. पण माझ्या चेहऱ्यावर नापसंतीच्या रेषा खात्रीने उमटून गेल्या असणार ! काहीच झाले नाही असे मोठ्या प्रयासाने मी दाखविले. त्या गृहस्थाचे माझ्या चेहऱ्याकडे लक्ष गेले असते तर त्याला कसेसेच वाटले असते. त्याने पाहिले नाही ही गोष्ट वेगळी. पण त्याच वेळची गणूकाकांची वर्तणूक पहा. त्या गृहस्थाच्या तोंडून काही दिलगिरीचे शब्द बाहेर पडायच्या आतच काका म्हणाले, ' अहो, त्यात काही नाही. त्या शेजारच्या बंडूने कालच तिचे दोन तुकडे केले होते. टाकून देण्याऐवजी मी आपले ते जुळवून ठेवले होते. तुम्ही उगाच निमित्त झालात एवढेच. ते तुकडे मी टाकायला पाहिजे होते ! '

त्या गृहस्थाच्या मनावरचे ओझे एकदम उतरलेले दिसले. तो निघून गेल्यावर मी काकांना म्हटले, ‘ ते फुटके तुकडे उगाच कशाला जुळवून ठेवले होतेत काका ? ’

‘ अरे, कुठे फुटले होते ते ? चांगली धड होती ती फुलदाणी– ’ काका म्हणाले.

‘ म्हणजे ? ’ मी विचारले.

काका सांगू लागले, ‘ अरे, एकदा फुटली ती पुन्हा का सांधणार होती ? त्या बिचाऱ्याला आणखी वाईट वाटायला कशाला लावायचे ? ’

मी थक्क झालो. थोर सुसंस्कृतपणा म्हणतात तो हा !

गणूकाकांचे मन जितके मोठे आहे तितकीच त्यांची मते अगदीच सामान्य आणि पारंपरिक आहेत. सर्व आधुनिक सुधारणा त्याज्य आहेत असे त्यांचे ठाम मत आहे. ते म्हणतात, ‘ सर्व प्रगतीचा, सुधारणेचा हेतू काय ? माणसाचे सुख हाच ना ? सुधारणेबरोबर माणसांची दुःखेही शेकडो पटीने वाढली आहेत ! पूर्वी आगगाड्या आणि मोटारी नव्हत्या. पण त्यामुळे माणूस अधिक सुखी होता. मोटारींनी हा हा म्हणता इकडून तिकडे जाता येते खरे. पण जगात शेकडो माणसे दररोज मोटारीखाली चेंगरून मरतात. पूर्वीची माणसे कंदमुळावर भूक भागवीत होती आणि वल्कलांनी अब्रू झाकीत होती, हे खरे आहे. पण चहा आणि कॉफी येथेच्छ पिऊन नंतर अमक्याचे फ्रुटसॉल्ट नि तमक्याच्या लिव्हरपिल्स घेत, डॉक्टरांचे उंबरठे झिजविणाऱ्या अलीकडच्या माणसांपेक्षा सुखी होती खास ! ”

सुधारणेपासून मिळणाऱ्या सुखांचा विचारही करायला गणूकाका तयार नाहीत, दुःखे मात्र त्यांना दिसतात. कथा, कादंबऱ्या वगैरे ललित वाङ्मयप्रकारांनी समाजाचा काही फायदा होणे शक्य नाही, ही केवळ करमणुकीची साधने आहेत, असे गणूकाकांना वाटते. ‘ तुमच्या लघुकथा-कादंबऱ्यांनी, माणसांत काय किंवा समाजात काय, काही सुधारणा होणे शक्य नाही—’ ते म्हणतात, ‘ पुनर्विवाहावरच्या कादंबऱ्या वाचून कितीसे पुनर्विवाह झाले ? दारूबद्दलची नाटके पाहून कितीशा लोकांनी दारू प्यायची सोडली ?, कादंबरीकारांना आणि नाटककारांना ते खडसावून विचारतात, ‘ दारूचे काय भयंकर परिणाम होतात किंवा पुनर्विवाहामुळे समाजाचा

किती फायदा होण्याचा संभव आहे हे लोकांना सरळसरळ सांगणे शक्य असताना तुम्ही लोक तेच सांगण्याकरिता नाटके लिहून ती रंगभूमीवर दाखविण्याच्या आणि कादंबऱ्या लिहिण्याच्या नि प्रसिद्ध करण्याच्या आड-मार्गात का शिरता? मानवजात, मानवता वगैरे मोठमोठे शब्द गणूकांकाना मुळीच मंजूर नाहीत. त्यांची दृष्टी रोखठोक आहे. मानवजातीच्या हिताकरिता अमुक अमुक केले पाहिजे असे कुणी म्हटले की ते ताडकन विचारतील, 'तुमची ही मानवजात कुठून आली? ब्राह्मणजात, प्रभुजात, माळीजात, साळीजात वगैरे जाती आम्हांला माहीत आहेत, पण ही मानवजात कुठली बुवा?' स्वराज्याच्याही त्यांच्या कल्पना जगावेगळ्याच होत्या, 'अरे, इकडे चळवळी करून काय होणार? तिकडे विलायतेला जाऊन साहेबाकडून स्वराज्य आणले पाहिजे!' स्वराज्य म्हणजे काहीतरी एक गाठोडे आहे अशी त्यांची कल्पना असावी! गणूकाका स्वतः काळे असल्यामुळे गोऱ्या माणसांपेक्षा काळी माणसे कशी चांगली असतात, ही गोष्ट ते बेमालुम सिद्ध करून दाखवितात. काळी माणसे गोऱ्या माणसांपेक्षा चांगली कशी? असे कुणी विचारल्यास ते ताडकन उत्तर देतील, 'अरे, गोऱ्या लोकांपेक्षा आम्ही लोक अधिक स्वच्छ असतो. गोऱ्या लोकांना वाटते की जराशी अस्वच्छता राहिली तर काय मोठेसे होणार आहे? गोरेपणावर सर्व काही नेऊ आपण चालवून! पण आमचे काळ्या लोकांचे तसे नसते. थोड्याशा अस्वच्छतेमुळे-सुद्धा आपण फार मळकट दिसू, या भीतीने घासूनपुसून आम्ही नेहमी स्वच्छ राहतो!' यावर काळे लोकच अधिक मळकट राहण्याचा संभव आहे, कारण काळ्या रंगात थोडासा मळकटपणा सहज खपून जाईल असे गणूकाकांना आपण उलट सांगायला लागलो तर ते आपणांला पुढे बोलूच देणार नाहीत. गणूकाकांची मते अशी चमत्कारिक, जुनाट, पारंपरिक आहेत. पण या मतांच्या मागे त्यांचे विशाल, निर्मल, सात्विक मन असल्यामुळे ते मलाच काय, पण सर्वांनाच मनापासून आवडतात.

◎ ◎ ◎

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम 69423 दि: 6/9/95
क्रमांक 9696 नोंद दि. 26/3/60

# लेखक-परिचय व टीपा

## १. २. आपल्या देशाविषयी......वाचन

(पृष्ठ क्र. १७ ते ३४)

विष्णुशास्त्री चिपळूणकर (१८५०-१८८२)— केवळ आपल्या निबंधवाङ्मयाने मराठी भाषा, साहित्य व संस्कृती यांमध्ये अपूर्व चैतन्य निर्माण करणारा युगपुरुष. बी. ए. झाल्यानंतर पुणे येथील सरकारी हायस्कूलमध्ये शिक्षकाची नोकरी धरली. बी. ए. होण्यापूर्वीच त्यांचे वडील कृष्णशास्त्री चिपळूणकर चालवीत असलेल्या 'शालापत्रका'च्या संपादनाचा भार उचलला व 'रासेलस'च्या काही भागाचे भाषांतर व इंग्रजी व संस्कृत कवींवरील लेखमाला प्रसिद्ध केली होती. वयाच्या २४ व्या वर्षी १८७४ ला त्यांनी 'निबंधमाला' सुरू केली व १८८२ मध्ये ८१ अंक निघाल्यानंतर तिचा हेतू पूर्ण झाला आहे या कृतकृत्यतेने बंद केली. या अंकांतील मजकूर त्यांचा एकट्याचा असून तो पुस्तकाची २५०० पृष्ठे होतील इतका आहे. इंग्रजांच्या आगमनामुळे आपल्या मनांत निर्माण झालेल्या स्वाभिमानशून्यतेचे, ध्येयशून्यतेचे व न्यूनगंडाचे निर्मूलन करून स्वदेश, स्वधर्म व स्वभाषा यांच्याबद्दलच्या उत्कट अभिमानाची ज्योत त्यांनी उभी केली व न्यू इंग्लिश स्कूल, केसरी-मराठा ही वृत्तपत्रे, चित्रशाळा प्रेस, काव्येतिहाससंग्रह हे संशोधनाला उपयुक्त असे नियतकालिक व किताबखाना ही पुस्तक प्रसिद्धीची संस्था स्थापून स्वार्थत्याग व ध्येयवादित्वाच्या उदाहरणांनी सबंध पुण्याचा व पर्यायाने महाराष्ट्राचा कायापालट घडवून आणला.

या संग्रहातील पहिला निबंध, निबंधमालेतील 'इतिहास' या निबंधातून व दुसरा 'वाचन' या निबंधातून संपादित करून घेतला आहे.

टीपा—

**नीचैर्गच्छत्युपरि**—हा कालिदासाच्या मेघदूत-उत्तरमेघातील ४६ वा श्लोक आहे.

**झर्सीज**—पर्शियाचा राजा. **रॉम्युलस**—रोमचा राजा— याच्या नावावरून 'रोम' हे नाव पडले. **मालकम**—पेंढाऱ्यांचा बंदोबस्त करणारा व मध्य हिंदुस्थानमध्ये मराठ्यांच्या राजकारणावर लक्ष ठेवणारा दक्ष अधिकारी. याने मध्य-हिंदुस्थानचा इतिहास लिहिला आहे.

**आल्पिस्टन**— ( मौंट स्टुअर्ट एलफिन्स्टन १७७८–१८५९ ) दुसऱ्या बाजीरावाच्या कारकीर्दीत पुण्याचा रेसिडेंट म्हणून आला व १८१८ नंतर मुंबई प्रांताचा गव्हर्नर झाला.

**कोलब्रुक**—( १७६५–१८३७ ) संस्कृत भाषेचा मोठा पंडित. इंग्रज.

**विल्किन्स**— काशी येथें ब्राह्मणाजवळ मोठ्या कष्टानें संस्कृत भाषेचे अध्ययन करून याने १७८५ ते १७९६ मध्ये भगवद्गीता, हितोपदेश व शाकुंतल यांची भाषांतरे केली.

**विद्येपासून लाभ**—नारायण दिनानाथ यांच्या व्याख्यानांवरून लिहिलेले व १८६० साली प्रसिद्ध झालेले पुस्तक.

**दक्षिणा-प्रैज**—श्रावण महिन्यात पेशवे रमण्यात दक्षिणा वाटत. १८९१ साली एलफिन्स्टनने ही प्रथा बंद करून त्या रकमेतून दक्षिणा संस्कृत पाठशाळा ( डेक्कन कॉलेज ) चालू केली व उरलेल्या पैशातून दक्षिणा फेलोशिप व दक्षिणा प्राईज फंड सुरू करून मराठी ग्रंथांना त्या रकमेतून उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यास सुरुवात केली.

**श्लेजेल**—( १७६७–१८४५ ) जर्मनमधील संस्कृत पंडित. **हंबोल्ट**—( १७६७ १८३५ ) जर्मन भाषाशास्त्रज्ञ. **गेटी**—( १७४९–१८३२ ) जर्मनीतील श्रेष्ठ कवी.

**फर्दोसी**—(९४१–१०२०) इराणचा राष्ट्रीय कवी. फारसीमध्ये 'शहानामा' ग्रंथ लिहिला.

**शेक सादी**—( ११८४–१२९२ ) फारसी कवी. गुलिस्तान व बोस्ता ही काव्ये.

**नंदकुमार**—इंग्रजांना फितुर झालेला बंगाली गृहस्थ. वजीर होण्याच्या हेतूने हेस्टिंग्जला लाच दिली व त्यामुळे हेस्टिंग्जवर आरोप ठेऊन त्याची चौकशी करण्याकरता त्याला परत इंग्लंडला बोलावण्यात आले. **लाट**—लॉर्ड.

**राज्यासंबंधीचे कायदे**—थॉमस बॅबिंग्टन मॅकोले (१८००-१८५९) या कायदेपंडिताने केले.

**जेम्स मिल्ल**—( १७७३-१८३६ ) इंग्रज इतिहासकार, अर्थशास्त्रज्ञ व तत्त्वज्ञ. ' History of British India ' हा त्याचा ब्रिटिशांच्या भारतांतील हालचालीचा इतिहास देणारा ग्रंथ अतिशय प्रसिद्ध आहे.

**मिल्टन**—( १६०८-१६७४ ) इंग्रजीतील प्रसिद्ध कवी.

**न्यूटन**—सर ऐझॅक ( १६४२-१७२७ ) गुरुत्वाकर्षणाचा शोध लावणारा जगद्विख्यात इंग्रज संशोधक.

**पोप, अलेक्झांडर**—( १६८८-१७४४ ) सुप्रसिद्ध इंग्रज कवी.

**भर्तृहरी**—( सातवे शतक ) राजकवी, व्याकरणपंडित व योगी.

## ३. ४. बोलके सुधारक......आणखी एक...कांदा

(पृष्ठ क्र. ३५ ते ४६ )

गोपाळ गणेश आगरकर ( १८५६-१८९५ )—महाराष्ट्रातील प्रखर बुद्धिवादाचे पुरस्कर्ते, आत्यंतिक ध्येयवादी, कडवे सुधारक म्हणून आगरकर ओळखले जातात. ' इष्ट असेल ते बोलणार व साध्य असेल ते करणार ' हा त्यांचा तेजस्वी बाणा ते ज्या काळात जन्मले, त्या काळात विशेष महत्त्वाचा म्हणावा लागेल. अत्यंत गरिबीतून नाना तऱ्हेच्या हालअपेष्टा सोसून, माधुकरी मागून, कऱ्हाडात आजोळी मुन्सफ कोर्टात उमेदवारी करून, दवाखान्यात कपौंडर म्हणून औषधाच्या बाटल्या भरून व शिष्यवृत्त्या-बक्षीसे मिळवून ते विश्वविद्यालयीन शिक्षणाची सर्वोच्च पायरी चढून गेले, आणि एम्. ए. झाल्यानंतर सगळ्या प्रलोभनांचा त्याग करून विष्णुशास्त्र्यांनी सुरू केलेल्या न्यू इंग्लीश स्कूलला जाऊन मिळाले. डेक्कन कॉलेजमध्ये शिक्षण घेत असताना लो. टिळकांच्या बरोबर आपल्या समाजाच्या अभ्युदयाची नाना स्वप्ने रंगविली व चिपळूणकरांनी सुरू केलेल्या केसरीचे ते पहिले संपादक झाले. केसरीतून

त्यांचे विचार मोकळेपणाने मांडण्यास टिळकपक्षीयांकडून अडथळे आणण्यात आले म्हणून १८८७ मध्ये राजीनामा देऊन ते बाहेर पडले व त्यांनी १८८८ मध्ये मोठ्या धडाडीने आपले ' सुधारक ' पत्र सुरू केले.

१८९२ साली आगरकर फर्ग्युसन कॉलेजचे प्राचार्य झाले व त्यांच्या कारकीर्दीत फर्ग्युसन कॉलेजची प्रतिष्ठा चांगलीच वाढली.

आगरकर हे मुख्यतः समाजसुधारक म्हणून ओळखले जातात, परंतु त्यांच्या सुधारकत्वाची जात सर्वस्वी स्वतंत्र व जिवंत होती. त्याबाबतीत त्यांच्याशी तुलना करता येतील, असे फारच थोडे सुधारक त्या काळात सापडतील. असे असताही आगरकर हे जाज्वल्य देशाभिमानी, धर्माभिमानी, सौंदर्यासक्त, कर्तव्यनिष्ठ, प्रेमळ ' गृहस्थ ' होते, या गोष्टीकडे बऱ्याच वेळा दुर्लक्ष होते. उपहास, उपरोध, आवेशमयता व भावनाशीलता या वैशिष्ट्यांनी त्यांचे लेखन युक्त असलेले दिसेल.

टीपा—

**टिळक सुधारकाचेच उदाहरण**—मलबारीशेठ नावाच्या सुधारकांनी विलायतेत जाऊन गोऱ्या लोकांच्या मताच्या जोरावर हिंदी लोकांवर सामाजिक सुधारणेचा कायदा लादावा म्हणून एक गुप्त चळवळ चालविली. त्यातील पहिले कलम ' बारा वर्षांच्या लग्न झालेल्या मुलीशीही नवऱ्याने संभोग केला तर त्याला कायद्याने शिक्षा व्हावी ' असे होते. त्यावर महाराष्ट्रांत १८९० ते १८९२ पर्यंत मोठे वादंग माजले. त्यालाच ' संमति वयाची चळवळ ' असे म्हणतात. टिळकांनी यावेळी सरकारने आपल्या सामाजिक बाबतीत लुडबूड करू नये म्हणणाऱ्यांचा पक्ष घेतला व आपली एक आठ कलमी योजना करून (२६–१० १८९०) त्यावर दोनशे सह्या मिळविण्याचा प्रयत्न केला. त्यातले पहिले कलम ' मुलीचे लग्न सोळा वर्षांचे आत करू नये. ' व सातवे कलम प्राप्तीचा दहावा भाग सार्वजनिक कामाकडे द्यावा ' असे होते. नंतर सुधारकांनी या सूचनेस विरोध केल्यानंतर टिळकांनी काही तडजोड करण्याचा प्रयत्न केला. (केळकरकृत लो. टिळक यांचे चरित्र–पृ. २५० ते २७९ पहा. )

**पुराणप्रिय**— सनातनी.

**साक्रेतीस**— प्रसिद्ध ग्रीक तत्त्वज्ञ ( इ. स. पूर्व ४६९-३९९ ) त्याच्या क्रांतिकारक तत्त्व विचारामुळे त्याला पाखंडी ठरवून तत्कालीन अधिकाऱ्यांनी विषप्राशन करावयास लावले.

**बुद्ध, खिस्त**— गौतमबुद्ध व येशू खिस्त. बौद्ध व खिस्ती धर्मांचे संस्थापक.

**ल्यूथर-मार्टिन** ( १४८३-१५४६ )— जर्मन प्रॅाटेस्टंट सुधारक. पोपच्या पापविमोचन पत्राचा धिःकार करून याने धर्मक्रांतीची चळवळ उभारली म्हणून याचा अतोनात छळ करण्यात आला.

**राममोहन** ( १७७२-१८३३ )— अव्वल इंग्रजीतील पहिले समाजसुधारक. ब्राह्मो समाजाचे संस्थापक, राजकारणी मुत्सद्दी. बंगाली गद्याचे आद्य प्रवर्तक. बंगालमध्ये हिंदू कॉलेज व वेदान्त कॉलेजची स्थापना करून नवयुगप्रवर्तकाचा मान मिळविला व सती जाण्याच्या चालीविरुद्ध चळवळ करून ती बंद करावयास लावली.

**दयानंद** ( **स्वामी दयानंद सरस्वती**-१८२४-१८८३ )— वेदान्त मताचा प्रसार करणारे व मूर्तिपूजेविरुद्ध निर्भयपणे मतप्रतिपादन करणारे धर्मसुधारक. 'आर्यसमाज' ही संघटित, कार्यक्षम व लढाऊ संस्था स्थापन केली. अत्यंत तेजस्वी, निर्भय व विद्वान वक्ते. जोधपूर येथे त्यांच्यावर विषप्रयोग झाल्याने त्यांना मृत्यू आला.

**लॉर्ड वुइलियम बेंटिंग** ( १७७४-१८३९ )— १८२८ ते १८३५ या कालखंडात हा हिंदुस्थानचा गव्हर्नर-जनरल होता. सतीची चाल बंद करणे, ठगपेंढारी यांचा बंदोबस्त करणे, भारतात सर्वत्र इंग्रजीतून शिक्षण सुरू करणे, इत्यादि महत्त्वाच्या सुधारणांसाठी तो प्रसिद्ध आहे.

**लिंगविषयक नीती**—स्त्रीपुरुष संबंध.

**रेनॉल्ड**—इंग्रज स्त्री-पुरुषांची गुप्त कृत्ये मांडणारा रहस्यप्रिय कादंबरीकार. १९ व्या शतकात याच्या कादंबऱ्या इंग्लंडमधील सामान्य वाचकांना अतिशय प्रिय होत्या. मराठीमध्ये त्याच्या बहुतेक कादंबऱ्यांची भाषांतरे गो. ना. दातार, तात्या नेमिनाथ पांगळ, नाथमाधव इत्यादिकांनी केली आहेत.

**ॲरिस्टॉटल**—( इ. स. पूर्व ३८४-३२२ ) प्रसिद्ध ग्रीक तत्त्वज्ञ. जगज्जेत्या

अलेक्झांडरचा गुरु. तत्त्वज्ञान, राज्यशास्त्र, काव्यशास्त्र, नीतिशास्त्र, इ. विषयांवर महत्त्वाची ग्रंथरचना करणारा श्रेष्ठ विचारवंत.

**हर्बर्ट स्पेन्सर**—( १८२०–१९०३ ), विश्वाची अखंड उन्नती होत आहे, अशा रीतीचे तत्त्वविवेचन करणारा इंग्रज तत्त्ववेत्ता.

## ५. ६. हे तात्या......राक्षसी महत्त्वाकांक्षा

( पृष्ठ क्र. ४७–६४ )

**अ. ब. कोल्हटकर** (१८७९–१९३१)—वृत्तपत्रव्यवसायाच्या धकाधकीच्या व्यवसायावर मनापासून प्रेम करणारे व लेखनाचे जबरदस्त व्यसन असलेले साहित्यिक म्हणून अच्युतरावांचे नाव प्रसिद्ध आहे. शिक्षणाच्या निमित्ताने साताऱ्यास चुलत्यांकडे ( बळवंत ) राहिले व त्यांचेच नाव वडिलांच्या ठिकाणी ( वामनराव ) शाळेत नाव घालण्याच्या निमित्ताने जे एकदा लागले ते कायमचेच. एल्. एल्. बी. होऊनही त्यांचे वकिलीत मन रमले नाही व नागपूर काँग्रेसचा अध्यक्ष कोण असावा यासंबंधी आपल्या ‘ देशसेवक ’ पत्रामध्ये त्यांनी जो जहाल लेख लिहिला, त्यामुळे त्यांना राजद्रोहाच्या आरोपावरून २॥ वर्षे तुरुंगाची हवा खावी लागली. तुरुंगातून सुटल्यावर ऋग्वेदाचे भाषांतर करण्याचा छंद त्यांनी घेतला व ‘ श्रुतिबोध ’ नावाचे मासिक सुरू केले, परंतु लोकमान्यांच्या जहाल राजकारणाने प्रेरित होऊन ते वृत्तपत्रव्यवसायात शिरले व संदेश, स्वातंत्र्य, राष्ट्रमत ही दैनिके, युगांतर, चाबुकस्वार, रणसंग्राम ही साप्ताहिके व काही मासिके काढली. त्यांतल्या ‘संदेश’मधील चुरचुरीत आणि चटकदार लेखनवैशिष्ट्यांनी त्यांनी दैनिक वृत्तपत्र लोकांना पैसे देऊन वाचावयास शिकविले. स्वतःची नाटकमंडळी काढून, काही नाटके लिहून त्यांनी रंगभूमीवर आणली व स्वतःही त्यांत काम केले. चटकदार, आकर्षक लेखनाची उपजत देणगी, नानाविध उद्योगांमुळे प्राप्त झालेली बहुश्रुतता आणि त्याचबरोबर वाङ्मयीन टीकालेखनासाठी आवश्यक असणारी विश्लेषणवृत्ती या सर्वांचा मोठा मजेशीर समन्वय त्यांच्या लेखनात दिसून येतो.

१९२७ साली पुणे येथे साहित्य संमेलनानिमित्त अध्यक्ष-स्वागताध्यक्षांबद्दल त्या दोघांच्या व्यक्तित्वाची चर्चा करणारा 'हे तात्या आणि हे तात्या' हा बहारदार लेख अच्युतरावांनी 'चाबूकस्वार' मध्ये लिहिला आहे.

टीपा—

**नाना—नाना फडणीस,** सबंध नाव बाळाजी जनार्दन भानू. (१७४२-१७००) वयाच्या चवदाव्या वर्षी फडणिसीची वस्त्रे मिळाली. भानू घराण्यातील मुत्सद्दी पुरुष म्हणून प्रसिद्धीला आले.

**हरिपंत—हरिपंततात्या फडके,** सवाई माधवरावाच्या कारकीर्दीत पेशव्यांचे सेनापती.

**श्रीपाद कृष्ण कोल्हटकर**—(१८७१-१९३४) प्रसिद्ध नाटककार, टीकाकार विनोदी लेखक व ज्योतिष-शास्त्राचे अभ्यासक.

**नरसिंह चिंतामण केळकर**—(१८७२-१९४७) केसरीचे संपादक. लोकमान्य लो. टिळकांचे निष्ठावंत अनुयायी. राजकीय पुढारी, अव्वल दर्जाचे निबंधकार, टीकाकार, नाटककार, कादंबरीकार इ. सर्व नात्यांनी मराठी वाङ्मयाच्या बहुतेक सर्व दालनांतून विहार. म्हणूनच 'साहित्य सम्राट' या नावाने ओळखले जातात.

**नाटकांचा सोमवार**—महत्त्वाची नाटके शनिवारी, रविवारी अथवा सुटीच्या दिवशी लावली जात व त्यामानाने लोकप्रिय नसलेली व कमी उत्पन्नाची नाटके सोमवारी लावण्याचा प्रघात असे.

**आबासाहेब म्हाळस**—हे जळगाव येथील वकील.

**विनायक कोंडदेव (ओक)**—हे 'बालमित्र' नावच्या मुलांच्या मासिकाचे संपादक.

**भालचंद्र कृष्ण (भाटवडेकर)**—(१८८५-१९२०) हे मुंबईतील एक प्रसिद्ध डॉक्टर व प्रागतिक पुढारी होते.

**खाडिलकर, वरेरकर, शुक्ल**—कृष्णाजी प्रभाकर ऊर्फ काकासाहेब, भार्गवराम विठ्ठल ऊर्फ मामा व सदाशिव अनंत शुक्ल-हे तिघे मराठी नाटककार.

**असहकारी किंवा प्रतिसहकारी**—इंग्रजांच्या जुलुमी राज्यकारभारास प्रतिबंध घालण्यासाठी सरकारी पदव्या, नोकऱ्या, शाळा, कॉलेजे व कोर्टे यांवर बहिष्कार घालून म. गांधींनी पुकारलेली १९२० नंतरची राजकीय चळवळ.

**ना. पटेल**—( विठ्ठलभाई जव्हेरभाई १८७१-१९३३ ) मध्यवर्ती कायदे-मंडळाचे पहिले लोकनियुक्त अध्यक्ष ( १९२५ ) म्हणून राजकारणात फार मोठे यश मिळविले.

**बाळासाहेब नातू**—( मृत्यू–१८५० ) दुसऱ्या बाजीरावाच्या कारकिर्दीत पुण्याचा रेसिडेंट एल्फिन्स्टन याच्याशी संधान बांधून पुण्याची पेशवाई व साताऱ्याची छत्रपतीची गादी घालविणारे राजद्रोही गृहस्थ.

**विविधज्ञानविस्तार**—१८६७ च्या जुलैत श्री. रा. भि. गुंजीकर ( १८४४-१९०१ ) यांनी सुरू केलेले महत्त्वाचे मासिक. पहिली चार वर्षे गुंजीकर हे संपादक होते, नंतर जनार्दनपंत मोडक ( १८४५-९० ) यांनी पुढे १७ वर्षे त्याचे संपादन केले. त्याचवेळी पुरुषोत्तमपंत नाडकर्णी यांनी त्याच्या पोषणाची जबाबदारी पत्करली व २९ व्या वर्षापासून रावसाहेब मोरमकरांच्याकडे ही जबाबदारी आली. मराठीमधील सर्वांत महत्त्वाचे असे विचारप्रवर्तक असे हे मासिक ठरले. कोल्हटकरांचे बहुतांश वाङ्मयीन लेख विस्तारातूनच प्रसिद्ध झाले. ६९ वर्षे चालून हे मासिक बंद पडले.

**टिंबक्टू**—उत्तर आफ्रिकेतील सहारा वाळवंटाच्या नैऋत्येकडे असलेले अगदी छोटे गाव. आंग्ल कवी टेनिसन याने या विषयावर कविता लिहिली म्हणून वाङ्मयामध्ये हे नाव वारंवार येते.

**गंगाधरराव देशपांडे**—( १८७०-१९६० ) कर्नाटकाचे प्रसिद्ध वक्ते आणि पुढारी. लो. टिळकांचे कर्नाटकातील अनुयायी. त्यामुळे त्यांना ' कर्नाटकसिंह ' म्हणण्यात येते. मुंबईस १९०७ साली निघालेल्या ' राष्ट्रमत ' या दैनिकाच्या संपादकमंडळात ते होते, परंतु नंतर वृत्तपत्रे व व्यासंग या क्षेत्रांत ते मागे पडले.

**शिवरामपंत परांजपे**—( १८६४-१९२९ ) प्रतिभावंत साहित्यिक व वक्ते. काळ पत्राचे संपादक. वक्रोक्ती, काव्यमयता व स्वातंत्र्यप्रियता या ठराविक वैशिष्ट्यांनी युक्त असे त्यांचे लेखन असल्याने त्यांच्या लेखनात एकदेशियता आली, असा भावार्थ.

**चिंतामणराव वैद्य**—( १८६१-१९३८ ) मराठीत व इंग्रजीत विद्वत्तापूर्ण ग्रंथरचना करणारे पंडित.

**मौज पत्र**—१९२३ साली अच्युतरावांचे सहकारी अनंत हरी गद्रे यांनी चालू केलेले आकर्षक साप्ताहिक पत्र. श्री. पांडोबा भागवत यांनीं ' मौजे 'चे

स्वरूप अतिशय आकर्षक ठेविले होते, गद्रे, सारोळकर, स. अ. शुक्र, वि. पु. भागवत यांनी हे पत्र १९६० पर्यंत चालविले व पुढे ते बंद पडले.

**सी. आर. दास**— ( चित्तरंजन दास-१८७०-१९२५ ) बंगालमधील प्रसिद्ध कवी, वकील, राजकारणी पुढारी व वृत्तपत्रकार. 'वंदेमातरम्' या इंग्रजी दैनिकाचे संपादक. असहकारतेची चळवळ, राष्ट्रीय पुढाऱ्यांवर भरलेल्या खटल्यात वकीलपत्र घेउन त्यांनी केलेली कामगिरी प्रसिद्ध आहे. बंगालमधील चळवळ उग्र करण्यामध्ये ते विशेष यशस्वी ठरले.

**जोशी-खापर्डे**—वीर वामनराव गोपाळ जोशी ( १८८१-१९५६ ) व गणेश कृष्ण खापर्डे ( १८५४-१९३८ ) वऱ्हाड-नागपूर कडील प्रसिद्ध वकील व लोकमान्य टिळकांचे सहकारी. 'राक्षसी महत्त्वाकांक्षा', 'रणदुदुंभी', 'धर्मसिंहासन' व 'शीलसंन्यास' ही वामनरावांची चार नाटके प्रसिद्ध झाली आहेत.

**बालगंधर्व**— नारायणराव राजहंस ( जन्म १८८८ ). मराठी रंगभूमीवरचे प्रख्यात गायक नट. स्वर्गीय आवाजामुळे अगदी तरुणपणी लो. टिळकांनी त्यांना 'बालगंधर्व' ही पदवी दिली.

**ड्यूक ऑफ वेलिंग्टन**—(१७६९ ते १८५२) जनरल ऑर्थर वेलस्ली. दुसऱ्या बाजीरावाच्या कारकिर्दीत हा भारतात आला होता. १८०५ पर्यंत टिपू व मराठ्यांशी इंग्रजांचा सेनापती म्हणून लढला व श्रीरंगपट्टणच्या लढाईत टिपू सुलतानास याने ठार मारले. टिपूने फ्रान्सचा बादशहा नेपोलियन यास हिंदुस्थानात बोलावून इंग्रजांची दाणादाण उडविण्याचा प्रयत्न चालविला होता, म्हणून त्यास मोठ्या शर्थीने याने ठार मारले व १८०५ मध्ये तो इंग्लंडला परत गेला. तेथेही वाटर्लूच्या लढाईत इंग्लंडचा सेनापती म्हणून याने नेपोलियनचा पराभव करून त्याला सेंट हेलिना येथे अटकेत ठेविले. त्याच्या या असाधारण यशामुळे १८२८-३० मध्ये तो इंग्लंडचा पंतप्रधान म्हणून निवडून आला होता; व त्याला ड्यूक ऑफ वेलिंग्टन हा किताब मिळाला होता.

**राक्षसी महत्त्वाकांक्षा**— वीर वामनराव जोशी यांचे मराठीतील प्रसिद्ध असे वीररसात्मक व प्रमेयप्रधान नाटक. उज्ज्वल स्वदेशाभिमान, स्वातंत्र्यप्रेम, न्यायनिष्ठा व धर्मनिष्ठा यांचे चित्रण अतिशय प्रभावीरीत्या या नाटकात करण्यात आलेले आहे. 'खूपसूरत बला' या उर्दू नाटकावर हे नाटक आधारित असले

तरी तत्कालीन स्वातंत्र्याच्या चळवळीला पोषक अशी त्याची रचना नाटककाराने केली आहे. या नाटकांतील मृणालिनीची भूमिका प्रसिद्ध नट केशवराव भोसले करीत असल्यामुळे त्यातील पदांना फारच महत्त्व आले. राक्षसी महत्त्वाकांक्षेवर दैवी महत्त्वाकांक्षा मात करते असे या नाटकात दाखविले आहे. विक्रान्त हा या नाटकाचा नायक व देवांगना ही त्याची पत्नी. ब्रह्मावर्ताची राणी मदालसा ही अत्यंत महत्त्वाकांक्षी, स्वार्थी, क्रूर व रक्तपाताची आवड असलेली. ती स्वतःच्या पतीचा खून करविते, भावाचा खून करते व प्रत्यक्ष मुलाचा वध करण्यासाठी नानाविध कारस्थाने करीत राहते. परंतु स्वामिनिष्ठेसाठी प्राणार्पण करण्यास सिद्ध असलेल्या विक्रान्त, देवांगना, मृणालिनी, सरोजिनी, वसंत व कंदन ही मंडळी तिची सर्व कारस्थाने हाणून पाडतात. रक्ताचे पाट वाहून शेवटी सिंहासनाच्या योग्य वारसाला गादीवर बसवितात. असे याचे थोडक्यात कथानक आहे.

क्रूर, दुष्ट व्यक्ती व स्वामिनिष्ठ, स्वार्थत्यागी व्यक्ती यांतला संघर्ष अतिशय भडकपणे या नाटकांत चित्रित केला आहे. केशवराव भोसले यांच्या ललितकलादर्श नाटक मंडळीने हे नाटक मराठी रंगभूमीवर अतिशय यशस्वीरीत्या करून दाखविले.

**शाकुंतल**—कालिदासाच्या ‘ अभिज्ञान शाकुंतल ’ या नाटकाचे अण्णासाहेब किर्लोस्कर यांनी १८८० मध्ये केलेले रूपांतर.

**प्रेमगुंफा**—शेक्सपियरच्या ‘ As you like It ’ या नाटकाच्या आधारे जगद्हितेच्छु प्रेसने १९०८ साली छापलेले नाटक. लेखकाचे नाव नाही.

**‘ शाप ’ दिल्यामुळे ती संभ्रमात**—देवलांच्या ‘ शापसंभ्रम ’ या पंचाक्षरी नाटकास उद्देशून.

**‘ केशवा ’ची प्राप्ती**—प्रख्यात संगीत नट केशवराव भोसले.

**‘ नॉर्टन ’ साहेबांना एंगेज**—लोकमान्य टिळकांवर १९०८ साली दुसरा राष्ट्रद्रोहाचा जो खटला झाला त्यावेळी लोकमान्यातर्फे काम चालविणारे प्रसिद्ध युरोपियन कायदेपंडित.

**‘ केशव ’ ची समजूत**—रंगभूमीवरील नटांना डोळ्यांसमोर ठेवून नाटककार नाटके लिहीत. केशवराव भोसले संगीत नट होते, म्हणून त्यांच्यासाठी मुद्दाम वामनरावांनी पदे टाकली आहेत.

**नाटपेट**—अनावश्यक पात्र.

**उसनवारी**—शारदा, मदालसा आणि मूकनायक ही अनुक्रमे गोविंद बल्लाळ देवल, चिंतामण महादेव गोळे व श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांची नाटके आहेत.

**देवकन्या**— या नावाच्या नाटकाचा निर्देश कुठे आढळला नाही. कदाचित श्री. कृ. ह. दीक्षित यांनी लिहिलेल्या व अच्युतरावांचे सहकारी अनंत हरी गद्रे यांनी १९१३ साली प्रसिद्ध केलेल्या 'देवयानी' नाटकाचा हा उल्लेख असावा.

**मदालसा**—गद्य-पद्यात्मक पौराणिक नाटक. चिंतामण महादेव गोळे जहागीरदार यांचे १८७९ मध्ये प्रसिद्ध झालेली शत्रुजिताचा पुत्र ऋतुध्वज आणि विश्वावसु गंधर्वाची कन्या मदालसा यांच्या प्रीतीची कथा.

**मूकनायक**— श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांचे १८९० साली प्रसिद्ध झालेले नाटक. विक्रांत-सरोजिनी ही यातील प्रमुख पात्रे.

**प्रो. छत्रे**— महाराष्ट्रातील सर्कशीचे एक आद्य-प्रवर्तक.

**चाफेकर**—नारायण गोविंद चाफेकर (१८६९) समाजशास्त्र, मराठी व संस्कृत वाङ्मय यांचे व्यासंगी विद्वान.

'**कमला**'—यशवंत नारायण टिपणीस यांचे मेरी कॉरेली यांच्या 'थेल्मा' वर आधारलेले नाटक.

## ७. ८. कृष्णभक्तीचा रोग.....मतप्रचार

(पृष्ठ क्र. ६६–८४)

विनायक नरहर उर्फ आचार्य विनोबाजी भावे—(१८९४) मराठी भाषेचे सारे अंतरंग ज्यांच्या लिहिण्या-बोलण्यातून सहजगत्या व्यक्त होते, असे मराठी भाषेतील सर्वश्रेष्ठ विचारवंत म्हणून विनोबाजी ओळखले जातात. पणजवळ गागोदे येथे त्यांचा जन्म झाला व बडोदे येथे शिक्षण झाले. महात्मा गांधींचा अगदी तरुणपणीच सहवास झाल्यामुळे त्यांच्या जीवनात परिवर्तन घडून आले. १९४० सालच्या सत्याग्रहात गांधीजींनी 'पहिला सत्याग्रही' म्हणून

त्यांची योजना केली, त्या वेळेपासून गांधीवादाचे ते एकनिष्ठ पुरस्कर्ते म्हणून ओळखले जाऊ लागले. अनेक भाषांवर त्यांनी जसे प्रभुत्व मिळविले आहे, त्याप्रमाणे वेदोपनिषदांचे, संत साहित्याचे, तत्त्वज्ञानाचे त्यांनी एकाग्रतेने चिंतन केले आहे, त्यामुळे त्यांच्या वाणीला आर्षऋषींचे तेज प्राप्त झाले आहे. गांधीजींचे 'इंग्रजी' लेखन जसे सहज सौंदर्यामुळे प्रसिद्ध आहे, तसेच विनोबाजींचे 'मराठी' लेखन अस्सल मराठमोळ्या शैलीने युक्त आहे. कोटिबाजपणा आणि प्रासात्मकता यांच्याकडे असलेली त्यांच्या शैलीची ओढ चटकन लक्षात येण्यासारखी आहे.

टीपा—

**भगवंतांनी...मौजा गीतेत—**

गीतेमध्ये दुसऱ्या अध्यायातील ६९ व्या श्लोकात स्थितप्रज्ञाचे लक्षण— 'सर्व लोकांना जी रात्र, तेथे स्थितप्रज्ञ जागृत असतो आणि सर्व प्राणिमात्र जेथे जागृत असतात तेथे या ज्ञानवान पुरुषास रात्र वाटत असते' अशाप्रकारे केले आहे व आठव्या अध्यायातील व २४ व २५ या श्लोकांत शुक्लपक्ष व कृष्णपक्ष यांमध्ये मृत्यू पावणाऱ्या कर्मयोग्यांना कोणती गती मिळते, हे सांगितले आहे. २७ व्या श्लोकात प्रकाशमय व अंधकारमय अशा जगताचे दोन कायमचे मार्ग असून एकाने गेले असता मोक्ष मिळतो व दुसऱ्याने गेले असता त्याला परत जन्म घ्यावा लागतो असे म्हटले आहे.

**पॅरडाईझ लॉस्ट** (१६०८–१६७४)—प्रसिद्ध इंग्रज कवी मिल्टन याने लिहिलेले महाकाव्य. १६५८ साली या महाकाव्य लेखनास त्याने सुरुवात केली. १६६४ साली ते संपविले व १६६७ मध्ये ते प्रथम प्रसिद्ध झाले. बायबलमधील आदिमानव आदम हा या काव्याचा नायक आहे व 'मानवाचा अधःपात' हा या कवितेचा विषय आहे.

**युक्लिड**—(इ. स. पूर्व ३००) प्रसिद्ध ग्रीक गणिती.

## ९. १०. युगप्रर्तक डॉ......वैचारिक...लापिका

(पृष्ठ क्र. ७५-९४)

प्रा. श्री. ना. बनहट्टी— (१९०१). नागपूर-विदर्भातील मराठीचे व्यासंगी प्राध्यापक व भाषाशास्त्रज्ञ म्हणून प्रा. बनहट्टींचा अतिशय लौकिक आहे. प्राचीन मराठीतील संत वाङ्मय व पंडिती काव्य, तसेच अर्वाचीन मराठीतील नाट्यवाङ्मय यांकडे त्यांच्या व्यासंगाचा काहीसा अधिक ओढा आहे.

चिंतनशीलता व परिश्रमपूर्वक आपल्या विचारांची मांडणी, ही वैशिष्टये त्यांच्या लेखनातून तात्काल जाणवतील. त्यामध्ये सत्यजिज्ञासा, शांत, सौम्य दृष्टिकोनातून एखाद्या विषयाचे केलेले मर्मभेदी विश्लेषण यांचे दर्शन झाल्याशिवाय राहणार नाही. शैलीपेक्षा विचारांची कसून केलेली छाननी वा चिकित्सा याला ते अधिक महत्त्व देताना आढळता.

'ज्ञानोपासना आणि भारतीयांचे कर्तव्य', 'मयूर काव्यविवेचन', 'मराठी रंगभूमीचा इतिहास भाग १', 'चिंतन आणि चर्चा', 'एकावळी', 'टिळक आणि आगरकर' इ. त्यांचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

या संग्रहातील 'युगप्रवर्तक डॉ. केतकर' हा केतकरांच्याबद्दलचा 'एकावळी'-मधला मृत्युलेख संपादित करून घेतला आहे व दुसरा निबंध 'चिंतन आणि चर्चा' या संग्रहातील आहे.

टीपा—

**'न ब्रूयात'**—अप्रिय गोष्ट सत्य असली तरी तिचा उच्चार करू नये.

**डॉ. केतकर मृत्यु**—१० एप्रिल १९३७.

**प्राचीन महाराष्ट्र**—केतकरांनी व्यासंगपूर्वक लिहिलेला ग्रंथ.

**'महात्मा गांधीपासून...'** १९३५ चा ब्रिटिश पार्लमेंटने कायदा मान्य केल्यानंतर हिंदुस्थानला स्वराज्य मिळालेच आहे, आता त्यासाठी मुद्दाम चळवळ करण्याची गरज नाही. अशा अर्थाची नोटीस त्यांनी गांधींना पाठविली होती.

**व्रात्यस्तोम**—केतकरांनी कु. कोहन नांवाच्या ज्यू तरुणीशी विवाह केला,

परंतु तसे करण्यापूर्वी त्यांना तिला हिंदू करून घेतले व त्यासाठी शुद्धीकरणाचे नवे विधी न स्वीकारता व्रात्यस्तोम नावाचा वेदातील विधी शोधून काढला.

**ब्रिटानिका**--इंग्रजी भाषेतील प्रसिद्ध ज्ञानकोश.

**कुंटे**—( महादेव मोरेश्वर १८३५–१८८८ ) साताऱ्याजवळ माहुली येथे यांचा जन्म झाला व वयाची बारा वर्षे त्यांची उनाडपणात गेली. परंतु पुढे त्यांनी मोठ्या जिद्दीने बी. ए. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. सिंध, कोल्हापूर व पुणे येथील शाळांवर हेडमास्तर म्हणून त्यांची योजना सरकारने केली; पुढे एल्फिन्स्टन कॉलेजात संस्कृतचे प्राध्यापक व अहमदाबाद कॉलेजचे ते प्राचार्य झाले. मराठीमध्ये 'राजा शिवाजी' हे खंडकाव्य, तसेच इंग्रजी व सिंधी भाषेत त्यांची काही पुस्तके प्रसिद्ध आहेत. अतिशय हुशार परंतु विक्षिप्त गृहस्थ म्हणून ख्याती. पुण्याच्या सरकारी हायस्कूलात विष्णुशास्त्री चिपळूणकरांचे ते वरिष्ठ शिक्षक ( हेडमास्तर ) होते.

**मॉरिस कॉलेज**—सध्याचे नागपूर महाविद्यालय.

**सॅम्युएल बटलर**—(१८३५–१९०२) इंग्रजी कादंबरीकार, उपहासप्रधान लेखक, निबंधकार व टीकाकार.

**Way of all flesh**—बटलरच्या मृत्यूनंतर १९०३ मध्ये प्रसिद्ध झालेली आत्मचरित्रात्मक कादंबरी. आपल्या घरादारातील आप्तांचे मोठ्या निर्विकारतेने, परखडपणे व उपरोधाने यात त्याने चित्रण केले आहे.

**राजवाडे**—विश्वनाथ काशीनाथ ( १८६३–१९२६ ). इतिहास, भाशाषास्त्र, व्याकरण, उत्पत्तीशास्त्र, नाणेशास्त्र, प्राचीन मराठी इत्यादि गहन विषयांमध्ये मराठीत व्यासंगपूर्ण लेखन करणारे प्रतिभाशाली युगपुरुष.

**कार्तिकस्वामी**—महादेवाचा ( शंकराच्या ) पुत्र. ऋषिपत्न्या किंवा कृत्तिकांनी त्यास आपला पुत्र मानले म्हणून त्यास कार्तिकेय असे म्हणतात व देवस्त्रियांवर बलात्कार केल्यामुळे पश्चाताप होऊन याने स्त्रीजातीचे दर्शन वर्ज्य केले. म्हणून त्याला कार्तिकस्वामी म्हणतात.

**आंबेडकर, भीमराव रामजी तथा बाबासाहेब ( १८९२–१९५६ )**

महाडला एक सामान्य हरिजनाच्या कुटुंबात जन्म झालेल्या या पुरुषाने आपल्य विद्वत्तेने त्रिखंड कीर्ती मिळविली. अनेक हालअपेष्टांतून 'बॅरिस्टर' झाले.

'रुपयाचा प्रश्न' या ग्रंथास लंडन विद्यापीठाने पी. एच्. डी. ही पदवी दिली. हरिजन-समाजासाठी त्यांनी जे प्रचंड आंदोलन उभारले, त्यामुळे त्यांच्या समाजात त्यांना 'देवपद' प्राप्त झाले. अतिशय हुशार, उद्योगी व मानी पुरुष.

**रानडे**— न्यायमूर्ती माधव गोविंद (१८४२-१९०१). राष्ट्रीय सभा, हिंदी अर्थशास्त्र व सामाजिक सुधारणांच्या जळवळीचे जनक. बुद्धिमत्ता, व्यासंग व समतोल विवेचनासाठी प्रसिद्ध.

**तेलंग**— न्यायमूर्ती काशीनाथ त्र्यंबक (१८५०-१८९३). प्रसिद्ध कायदे-पंडित, संस्कृत भाषेचे मोठे विद्वान. अतिशय तेजस्वी व स्वतंत्र विचारसरणीचे बुद्धिमान ग्रंथकार म्हणून लौकिक.

**जी. व्ही. जोशी**— गणेश वासुदेव (१८२८-१८८०). सार्वजनिक कार्याची मुहूर्तमेढ रोवणारे स्वार्थत्यागी पुरुष. 'सार्वजनिक काका' या नावाने प्रसिद्ध. पुण्यातील 'सार्वजनिक सभा' १८७० ला यांनी स्थापिली.

**भांडारकर**— डॉ. सर रामकृष्ण गोपाळ (१८३७-१९२५). आंतरराष्ट्रीय कीर्तीचे संस्कृत भाषा व प्राच्यविद्या पंडित.

**शिंदे**— महर्षि विठ्ठल रामजी (१८७३-१९४४) अस्पृश्यता निवारण्याची चळवळ हाती घेणारे ध्येयवादी व त्यागी समाजसेवक. समाजशास्त्र व भाषाशास्त्र यांवर महत्त्वाचे लेखन.

**ज्योतिराव फुले**—महात्मा ज्योतिबा गोविंद (१८२७-१८९०) महाराष्ट्रातील आद्य कर्ते समाजसुधारक.

**वामन शिवराम आपटे**—(१८५८-१८९२) मॅट्रिकला जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ती मिळविणारे संस्कृत भाषेचे व्यासंगी कोषकार.

**हरिभाऊ**—हरी नारायण आपटे (१८६४-१९१९) प्रसिद्ध कादंबरीकार

**शिवरामपंत परांजपे**—(१८२४-१९२९) 'काळ' पत्राचे संपादक. निबंधकार व वृत्तपत्रकार लो. टिळकांचे निष्ठावंत अनुयायी.

**जाधव भास्करराव विठोजीराव**— ब्राह्मणेतर समाजाचे पुढारी. कोल्हापूर दरबारांत अधिकारी. धार्मिक, सामाजिक विषयांवर संशोधनात्मक लेखन केले आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम.................... दि: ..................

**लट्ठे दि. बा. अण्णा बाबाजी**— ( १८७८–१९५० ) प्रसिद्ध राजकारणी मुत्सद्दी व सार्वजनिक कार्यकर्ते. १९२६ ते ३० मध्ये कोल्हापूरचे दिवाण. राष्ट्रसभेतर्फे निवडून येऊन काही काळ मुंबई प्रांताचे अर्थमंत्री होते.

**वा. म. जोशी**—( १८८२–१९४३ ) कादंबरीकार व चिंतनपर लेखक.

**पां. वा. काणे**—( १८८० ) संस्कृत भाषा, हिंदुधर्मशास्त्र, भाषाशास्त्र यांचे जबरदस्त व्यासंग असलेले पंडित.

**अ. बा. गजेंद्रगडकर**—संस्कृत भाषेचे प्रसिद्ध प्राध्यापक.

**खाडिलकर कृष्णाजी प्रभाकर**—(१८७२–१९४७) नाटककार व वृत्तपत्रकार.

**रँगलर परांजपे, रघुनाथ पुरुषोत्तम**—( १८७६ ) १८९९ साली केंब्रिजला सिनियर रँगलर परीक्षेत पहिले आलेले गणितज्ज्ञ.

**पेंडसे–भावे–गाडगीळ**—श्री. ना. पेंडसे, पु. भा. भावे, गंगाधर गाडगीळ.

**गडकरी**— राम गणेश ( १८८५–१९१९ ). श्रेष्ठ प्रतिभेचे कवी, नाटककार व विनोदी लेखक.

**डांगे...पाटील**— कम्युनिस्ट पुढारी श्रीपाद अमृत डांगे, केशवराव जेधे, स. का. पाटील, हे पुढारी.

**गोरे...जोशी**— ना. ग. ऊर्फ नानासाहेब गोरे, एस्. एम्. जोशी.

**नारायणशास्त्री मराठे**—केवलानंदसरस्वती स्वामी (१८७७–१९५७). वाईला प्राज्ञपाठशाळेची स्थापना करून यांनी जुन्या-नव्या शास्त्रांचे सूक्ष्म अध्ययन करण्याची परंपरा चालू केली.

**प्रफुल्लचंद्र रे**— ( १८६१–१९४४ ). बंगालमधील महान संशोधक, हिंदुस्थानातील अर्वाचीन रसायन शास्त्राचे जनक व त्यागी देशभक्त.

**जगदीशचंद्र बोस**—( १८५८–१९३७ ). वनस्पतीजीवनावर संशोधन करून आंतरराष्ट्रीय कीर्ती मिळविणारे बंगाली संशोधक.

**महाजनी**— ( गणेश सखाराम–जन्म १८९८ ). 'गणित' विषयातले अतिशय हुशार संशोधक. रँग्लर ही पदवी. १९२९ ते १९४३ मध्ये पुण्यातील फर्ग्युसन कॉलेजचे प्राचार्य.

## ११. १२. समाजकारणाची बचावती.....काव्याच्या...शास्त्र

(पृष्ठ क्र. ९५-११४)

डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे—(१९०४) आगरकरांची प्रखर बुद्धिवादी भूमिका पत्करून त्यातूनच एक नवे डोळस चिंतन विज्ञाननिष्ठेच्या रूपाने प्रा. श्री. म. माट्यांनी महाराष्ट्रीयांसमोर मांडले. माट्यांचे विद्यार्थी दशेत शिष्यत्व पत्करून विज्ञाननिष्ठेची प्रखर उपासना करण्याची आवश्यकता प्रतिपादणारे दमदार शैलीचे लेखक म्हणून डॉ. सहस्रबुद्धे ओळखिले जातात. विज्ञाननिष्ठा, ऐहिकता, लोकशाही व चारित्र्यशील व्यक्तिमत्वाचे पुरस्कर्ते म्हणून त्यांच्या निबंधांना विशेष महत्त्व आहे.

त्यांच्या निबंधाची रचनाही अतिशय व्यवस्थित व परिणामकारक असते. अनेक उदाहरणांनी आपले प्रतिपादन ते नाट्यपूर्ण करतात. निबंधाप्रमाणेच जीवनाच्या प्रत्येक अंगात शिस्तीची आवश्यकता ते प्रतिपादताना दिसतात. ज्या देशांत उत्कृष्ट निबंधरचना (म्हणजे नवविचारदोहन व चिंतन) होते तोच देश राष्ट्र म्हणून अभ्युदयाला जातो आणि आपल्याकडे या निबंधाची हेळणा झाली म्हणून शतकानुशतके आपण पारतंत्र्यात खिचपत पडलो, ही त्यांची भूमिका दिसते. राष्ट्राच्या अभ्युदयाला खीळ घालणाऱ्या गोष्टी म्हणून ते संतांचा निवृत्तीवाद किंवा जातिभेदासारख्या विषमतेकडे पाहताना दिसून येतात.

डॉ. सहस्रबुद्धे हे 'मराठी'तील पहिले डॉक्टर (पी. एच्. डी.) आहेत. 'स्वभावलेखन' या प्रबंधाबद्दल त्यांना १९३८ मध्ये ही पदवी मिळाली. त्यानंतर 'विज्ञानप्रणीत समाजरचना', 'माझे चिंतन', 'राजविद्या', 'भारतीय लोकसत्ता', 'पराधीन सरस्वती', 'लोकसत्तेला दंडसत्तेचे आव्हान' व 'वैयक्तिक व सामाजिक' ही त्यांची पुस्तके प्रसिद्ध आहेत.

त्यांचे या संग्रहातील दोन्ही निबंध अनुक्रमे 'राजविद्या' व 'वैयक्तिक व सामाजिक' या पुस्तकांतून घेतले आहेत.

### टीपा—

**सावरकरांची अलौकिक देशसेवा**— स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर, (जन्म १८८३). लंडनमध्ये बॅरिस्टरीच्या अभ्यासासाठी स्वा. वी. सावरकर गेले

असता देश स्वतंत्र करण्यासाठी त्यांनी तेथे ज्या चळवळी केल्या, त्यामुळे व त्यांनी लिहिलेल्या १८५७ च्या स्वातंत्र्य संग्रामाबद्दलच्या इंग्रजी ग्रंथामुळे राजद्रोहाचा आरोप ठेवून त्यांना हिंदुस्थानात आणत असता सावरकरांनी मार्सेलीस बंदरात बोटीच्या पोर्टहोल्मधून उडी मारून फ्रान्सचा किनारा गाठला. परंतु फ्रान्सच्या पोलिसांनी विश्वासघात केल्यामुळे त्यांना इंग्रजांच्या ताब्यात देण्यात आले व हिंदुस्थानात आणून (१९१०) त्यांच्यावर खटला होऊन त्यांना जन्मठेपेची शिक्षा फर्मावली (१९११). १९२१ पर्यंत सावरकरांना अंदमान येथील तुरुंगात ठेवण्यात आले. पुढे १९२१ च्या मे महिन्यात त्यांना रत्नागिरी तुरुंगात हलविण्यात आले व १९२४ साली त्यांना कारागृहातून मुक्त करण्यात आले. परंतु पुढची जवळ जवळ १४ वर्षे त्यांना 'स्थानबद्ध' म्हणून रत्नागिरीत राहावे लागले. १९३७ साली त्यांच्यावरील सर्व निर्बंध दूर होऊन बाहेर जाण्यास त्यांना मोकळीक मिळाली.

**अनुलोम विवाह**—उच्च वर्णातील वर व कनिष्ठ वर्णातील वधू यांचा विवाह.

**विदूर**— व्यासापासून विचित्रवीर्याची स्त्री अंबिका हिच्या दासीचे ठिकाणी झालेला पुत्र.

**वशिष्ठ**— मित्रावरुण व उर्वशी यांच्या संकरापासून हा कमलात किंवा कुंभात उत्पन्न झाला.

**चंद्रगुप्त मौर्य**— (खि. पू. ३२१–२९६). महापद्म नंद नावाच्या राजास न्हावी जातीच्या स्त्री–पासून झालेला मुलगा.

**विक्रमादित्य**— कलियुगातील सहा शककर्त्यांपैकी हा दुसरा शककर्ता. वीरसेन नामक गंधर्वापासून सुशीला नामक राजकन्येस झालेल्या चार मुलांपैकी दुसरा मुलगा.

**महादजी**— (१७२७–१७९४). राणोजी शिंदे यांस चिमाबाई नावाच्या राजपूत दासीच्या पोटी झालेला पुत्र.

**स्कॉट**—सर वॉल्टर (१७३१-१८३२) प्रसिद्ध इंग्रज ऐतिहासिक कादंबरीकार.

**आचार्य**— शंकराचार्य. (७८८–८२०). ब्रह्मसूत्रांवर भाष्य लिहून वाद-विवादात सगळ्या पंडितांचा पाडाव केला व काश्मीरच्या शारदेच्या देवालयातील

सर्वज्ञ पीठावर त्यांनी आपल्या अलौकिक बुद्धिमत्तेने आरोहण केले. वयाच्या केवळ ३२ व्या वर्षी त्यांनी समाधी घेतली

## १३. १४. भाषांचे ओझे......हर्लिंगहॅमचा वीर पुरुष

( पृष्ठ क्र. ११५-१३५ )

### श्री. वि. द. घाटे—( १८९५ )

प्रसिद्ध कवि दत्त यांचे चिरंजीव, शिक्षणाच्या व नोकरीच्या निमित्ताने इंदूर-ग्वाल्हेरसारख्या शहरांतील वास्तव्य, रविकिरण मंडळाचे एक प्रमुख घटक-माधव जूलियन यांचे परममित्र व शिक्षणाधिकारी या नात्याने महाराष्ट्रांतील शिक्षणविषयक प्रश्नांचे व्यापक दर्शन या सर्वांच्या संमिश्रणापासून तयार झालेले विलोभनीय व्यक्तिमत्व हा घाट्यांचा महत्त्वाचा विशेष होय. त्यांनी जरी मोजकेच लेखन केले असले तरी या विलोभनीय व्यक्तिमत्वाचे सारे पैलू त्यांच्या लेखनाच्या अंगप्रत्यंगातून प्रगट झाले आहेत. सौंदर्यासक्त, काव्यात्म युयुत्सु वृत्तीने जीवनाच्या निरानिराळ्या दालनात उत्सुकतेने डोकावणारे, विभूतीपूजा-कांक्षी व इतिहासप्रेमी असे त्यांचे मन त्यांच्या लेखनातून सारखे डोकावत असते.

‘ दिवस असे होते ’ या त्यांच्या आत्मचरित्रातून त्यांचे शिक्षणविषयक महत्त्वाचे विचार देण्यात आले आहेत तर ‘ पांढरे केस-हिरवी मने ’ मधून ‘हर्लिंगहॅमचा वीरपुरुष’ निवडला आहे त्यांनी आपल्या आत्मचरित्रात म्हटले आहे,

‘ ज्ञान एक आहे, सलग आहे. नुसता एक पदर उलगडू म्हटले तर चालायचे नाही. बाकीचे सारे उलगडावे लागतात. तसे न केले तर ज्ञान अपुरे आणि सदोष राहते, ही प्रचीती मला इतिहासाच्या अभ्यासाने मिळाली. इतिहासाने करून दिलेल्या मनाच्या तयारीचा उपयोग मला ओघानेच शिक्षण-क्षेत्रात आणि इतरत्रही करता आला. माझी शिक्षणविषयक मते मी अनुभवाच्या बळावर नेहमी तपासली, बदलली, गाळली, ठाकठीक केली; शिक्षणाच्या पसाऱ्यातले धागेदोरे थोडेबहुत उलगडले आणि या कार्यात माझ्या मगदुरा-प्रमाणे यश मिळविले. हे फळ इतिहासाच्या व्यासंगाचे आहे, असे मी समजतो.’

त्यांच्या या विधानाची खात्री ' भाषांचे ओझे ' हा निबंध वाचल्यानंतर वाचकांना निश्चितपणे पटेल. त्यांचा दुसरा लेख-तो तर माधवराव शिंद्यांचे एक चिरस्मारकच ठरेल.

टीपा—

**एल्फिन्स्टन, माऊंट स्टुअर्ट**—( १७७९-१८५९ ). स्कॉटलंडमध्ये जन्म. कंपनी सरकारची नोकरी धरून निरनिराळ्या हुद्यांवर कामे करीत १८१० ला पुण्याला इंग्रजांचा रेसिडेंट म्हणून आला व १८१९ ते १८२७ मध्ये मुंबईचा पहिला गव्हर्नर म्हणून याने मोठी लोकप्रियता मिळविली. देशी भाषेत शिक्षण देण्याच्या धोरणानुसार याने तत्कालीन विद्वानांना प्रोत्साहन देऊन अनेक ग्रंथ लिहून घेतले व इंग्रजीतील ग्रंथांची मराठी भाषांतरे करविली.

**शिंदे, महाराज माधवराव जयाजीराव**—( १८७६-१९२५ )

ग्वाल्हेर संस्थानचे अधिपती. शूर, कर्तबगार व दक्ष राज्यकर्ते. १९०० साली चीनमध्ये व १९१४ सालीं पहिल्या महायुद्धाच्या आघाडीवर फ्रान्समध्ये दाखल झाले होते. पुण्याच्या शिवस्मारकास जातीय स्वरूप देण्यास यांनी विरोध केला आणि ' राष्ट्रपुरुष ' म्हणून छत्रपति शिवाजीमहाराजांचे स्मारक करण्यासाठी, अटीतटीने प्रिन्स ऑफ वेल्स यांच्या हस्ते भव्य प्रमाणात त्या स्मारकाची स्थापना केली. फ्रान्समध्ये पॅरिसजवळ यांना मृत्यू आला.

## १५. १६. कोंडलेले क्षितिज.....चिर-दाह

(पृष्ठ क्र. १३६-१५२)

### श्रीमती दुर्गा नारायण भागवत—(१९१०)

ज्यांच्या लेखनातून सूक्ष्मतर लालित्य आणि सखोल विश्लेषण यांचा अत्यंत आल्हाददायक संगम आढळून येतो अशा ललित-लेखिका व विदुषी म्हणून दुर्गाबाई ओळखिल्या जातात. लोकवाङ्मय, समाजशास्त्र, भाषाशास्त्र व साहित्यशास्त्र यांच्या व्यासंगातून प्रस्फुरित झालेली त्यांची लेखणी अगदी सहजगत्या परंतु शोधक बुद्धीने जीवनाचे जसे विश्लेषण करते तसेच आपल्या ललित साहित्यातून गुंतागुंतीच्या अशा मानवी जीवनाचा व निसर्गसौंदर्याचा वेध घेते. त्यांच्या ललित निबंधांतून अनुभवसिद्ध व तन्मय संवेदनशीलता हा त्यांचा विशेष तात्काल लक्षात येतो. ' लोकसाहित्याची रूपरेखा, ' ऋतुचक्र ', ' व्यासपर्व ', ' भावमुद्रा ' ही त्यांची प्रसिद्ध पुस्तके.

या संग्रहातील पहिला लेख ' व्यासपर्व ' या पुस्तकातून व ' चिर-दाह ' हा ललित निबंध ' भावमुद्रा ' या संग्रहातून घेण्यात आला आहे.

### टीपा—

द्रोण— भरद्वाज ऋषीला घृताची नामक अप्सरेमुळे झालेला पुत्र. धनुर्वेद व ऋग्वेदात पारंगत. यास अग्निवेश नावाच्या चुलत्यांकडून आग्नेयास्त्र प्राप्त झाले. परशुरामाकडून त्याची सगळी अस्त्रविद्या याला प्राप्त झाली. अतिशय दारिद्र्यामुळे, द्रव्यसाहाय्यार्थ द्रुपदराजाकडे गेला. परंतु तेथे अपमानित झाल्यामुळे, त्याचा सूड घेण्यासाठी हस्तिनापुरी कृपाचार्यांकडे येऊन राहिला. अश्वत्थामा हा त्याचा मुलगा.

कृप— हा पांचाल देशाच्या राजघराण्यातील गौतम नावाच्या मुनीचा नातू. रानात जन्मला व राजा शंतनूने यास व याच्या बहिणीस घरी आणले. शंतनूच्या कृपेने हा मोठा झाला म्हणून हा ' कृप '. धृतराष्ट्राने आपल्या कुमारांना वेदविद्या शिकविण्यासाठी याची योजना केली होती. याची बहीण ' कृपी ' ही द्रोणाची पत्नी.

## १७. १८. जगाशी संबंध व गणूकाका

(पृष्ठ क्र. १५३–१६१)

प्रा, अनंत काणेकर—(१९०४)

कवी, पत्रकार, लघुनिबंधकार, कथालेखक, रूपककथाकार, प्रवास लेखक, नाटककार इत्यादि विविध भूमिकांवरून काणेकरांनी मराठी वाङ्मयात स्वतःचे वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केले असले तरी त्यांचा अस्सल काणेकरी छाप त्यांच्या लघुनिबंधांच्या क्षेत्रांत अतिशय प्रकर्षाने दिसून येतो. फडके–खांडकरांनी लघुनिबंधाच्या क्षेत्रांत आपले उंच झेंडे फडकाविल्यानंतर त्यानंतर येऊन काणेकरांनी त्यांच्याबरोबरीचा स्वतंत्र झेंडा लावला. काणेकरांना माणसे अतिशय प्यार. त्यांच्या निरनिराळ्या वैशिष्ट्यांची ते अगदी सहजगत्या आपल्या लघुनिबंधांतून ओळख करून देतात. ‘गणूकाका’ ही व्यक्ती नित्याच्या आढळात येणाऱ्या कित्येक व्यक्तींचे एक अस्सल प्रतीकच.

काव्यात्म परंतु मिष्किल वृत्ती, वर्तमानकाळाकडे पाहाण्याचा समंजस दृष्टिकोण, खेळकरपणा व कमीतकमी शब्दांत आकर्षकपणे जास्तीतजास्त आशय व्यक्त करण्याचे भाषेचे सामर्थ्य ही त्यांची प्रमुख वैशिष्ट्ये.

या संग्रहातील त्यांचा लघुनिबंध ‘पांढरी शिडे’ या त्यांच्या प्रातिनिधिक लघुनिबंधसंग्रहातून व ‘गणूकाका’, ‘बोलका ढलपा’ या लेखसंग्रहातून घतला अ

REFBK-0013783

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ६९४२२ वि: निबंध
क्रमांक ९८९६ नों: दि: २६।३।८०